**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**पृ.शी.**: विदर्भ व मराठवाड्यातील सिंचन आणि वीज क्षेत्रातील कामांना होत असलेला विलंब दूर करणे
**मु.शी.**: विदर्भ व मराठवाड्यातील सिंचन आणि वीज क्षेत्रातील कामांना होत असलेला विलंब दूर करणे याबाबत सर्वश्री माणिकराव ठाकरे, मोहन जोशी, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री रमेश शेंडगे, अशोक ऊर्फ भाई जगताप, संजय दत्त, हेमंत टकले, सुभाष चव्हाण, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु....)

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)** : या प्रस्तावावरील चर्चा 11.00 वाजेपर्यंत संपवावयाची असून 11.00 वाजता माननीय मंत्री महोदयांचा रिप्लाय सुरु केला जाणार आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, विदर्भात अधिवेशन सुरु असून त्यामध्ये विदर्भाच्या अनुशेषावर चर्चा सुरु आहे. विदर्भाच्या चर्चेवर आपण वेळेचे बंधन घालणार असाल तर ते बरोबर नाही. वाटले तर ही चर्चा आज दुपारी 12.00 वाजेपर्यंत सुरु ठेवा व त्यानंतर माननीय मंत्री महोदयांचे उत्तर केव्हाही ठेवा. विदर्भाचा अनुशेष ठेवला गेल्यामुळेच आम्हाला बोलावे लागत आहे. विदर्भाचा अनुशेष आपण भरला असता तर आम्हाला विदर्भाच्या अनुशेषावर बोलण्याची वेळ आली नसती. आम्हाला बोलू द्यावयाचे नसेल तर आम्ही बोलणार नाही.

**तालिका सभापती** : आपण दिनांक 12 डिसेंबर, 2013 रोजी या प्रस्तावावरील चर्चेत आपण 9 मिनिटे भाषण केले असून आता आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, या चर्चेवर सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे हे जवळपास 1 तास बोलले आहेत. या चर्चेसाठी दोन्ही बाजूंना अर्धा अर्धा वेळ देण्यात आलेला आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, आमच्या बफर झोन (दोन) क्षेत्राच्या संदर्भातील बैठक घेण्यास आमच्या वन मंत्र्यांना वेळ मिळत नाही. आम्ही बफर झोन व इको झोनच्या प्रश्नाच्या संदर्भात आम्ही हैराण झालेलो आहोत. सगळीकडचा कचरा उचलून विदर्भात टाकण्याचेच या सरकारचे धोरण दिसते आहे. वाघ वाचवले म्हणून आम्ही पाप केले आहे काय ? या प्रश्नाच्या संदर्भात विदर्भाचे मंत्री महोदय आग्रही नाहीत परंतु पश्चिम महाराष्ट्राचे मंत्री आग्रही आहेत. सन्माननीय मंत्री महोदय श्री. नारायण राणे यांनी इको झोन रद्द करण्यात यावे अशा पध्दतीची घोषणा केली होती. परंतु आमच्याकडे मात्र अद्यापि अशा प्रकारची घोषणा झालेली नाही.

सभापती महोदय, "विदर्भात आलेले उद्योग बंद होत आहेत" अशी बातमी आज लोकमत वर्तमानपत्रामध्ये छापून आली आहे. विदर्भातील पॉवर प्लँटचे जवळपास 7 उद्योग बंद पडले आहेत. विदर्भातील पॉवर प्लँटमधून जी वीज तयार होते ती वीज महाराष्ट्र सरकार किंवा वीज वितरण कंपनी घेण्यास तयार नसल्यामुळे आज विदर्भातील पॉवर प्लँट बंद पडत आहेत. एका बाजूने पॉवर प्लँटमध्ये तयार झालेली वीज विकत घ्यावयाची नाही व दुसऱ्या बाजूने या कंपनीला बाहेर वीज विकण्यासही परवानगी द्यावयाची नाही हे काही योग्य नाही. वीज विकत घ्यावयाची नाही व या कंपनीला दुसऱ्यानाही वीज विकू दिली नाही तर हे पॉवर प्लँट सुरु कसे राहतील ?

सभापती महोदय, विदर्भामध्ये 5 हजार अब्ज मेट्रीक टन कोळसा आहे. ज्या ठिकाणी कोळसा असतो त्याच ठिकाणी थर्मल प्लँट सुरु होत असतात. या ठिकाणी कोळसा असताना या पॉवर प्लँटला कोळसा मिळू नये यासाठी प्रयत्न केला जातो आहे. दिल्लीमध्ये कोळशाचे प्रकरण मोठया प्रमाणात गाजत आहे. नको त्यांना प्लॉट विकण्यात आलेले असून सर्व घोटाळयांची चर्चा सुरु आहे. असे असताना विदर्भात आलेल्या पॉवर प्लँटला तुम्ही कोळसा देणार नसाल तर पॉवर प्लँट कंपनीने कोणाकडे जावे ? विदर्भातील 7 पॉवर प्लँट बंद पडलेले असतांना दुसऱ्या बाजूने विदर्भ ॲडव्हान्टेज मध्ये विदर्भात खूप उद्योग येणार आहेत अशा घोषणा करावयाच्या व प्रत्यक्षात येथे आलेले उद्योग बंद कसे होतील यासाठी षडयंत्र चालणार असेल तर ते योग्य नाही.

सभापती महोदय, दर वेळेस आम्ही विदर्भाच्या अनुशेषावर बोलतो असे इतर सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे परंतु विदर्भाचा अनुशेष भरुन काढण्यासाठी प्रत्यक्षात काहीही प्रयत्न होत नाहीत. विदर्भातील शेतकऱ्यांनी आत्महत्या करु नये असे कोणालाही वाटत नाही. असे असतांना



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

विदर्भाच्या अनुशेषावर बोलण्याच्या संदर्भात आमच्यावर बंधने येणार असतील तर ते आम्ही खपवून घेणार नाही. विदर्भाच्या पॉवर प्लँट कंपन्यानी या उद्योगासाठी जवळपास 20 हजार कोटी रुपये गुंतवलेले आहेत. विदर्भ ॲडव्हान्टेज मध्ये आपण सांगतात की, विदर्भात 40 हजार कोटी रुपयांचे उद्योग येणार आहेत. 20 हजार कोटी रुपये घालून विदर्भात आम्ही उद्योग सुरु केले ही आमची चूक आहे असे म्हणत आहेत. अशाच पध्दतीने विदर्भातील उद्योग बंद पडणार असतील तर विदर्भातील कोणत्या उद्योगाचा विकास आपण करणार आहात ? हे शासन केवळ घोषणाच करण्याचे काम करते एवढे मला या निमित्ताने म्हणावयाचे आहे. आपल्या राज्यापेक्षा हरियाणा, पश्चिम बंगाल पुढे गेले आहेत परंतु आम्ही त्यांच्या मागेच राहिलो आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांनी दि.6 मार्च, 2008 रोजी सिंचन क्षेत्रासाठी निर्देश निर्गमित केले होते त्यातील परिच्छेद 7.8 प्रमाणे गोदावरी खोऱ्यात महाराष्ट्रासाठी उपलब्ध असलेल्या एकूण पाण्यापैकी जवळपास 203 टीएमसी पाण्याचे अजूनही नियोजन झालेले नाही.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ ST/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 10:05

श्रीमती शोभा फडणवीस....

महाराष्ट्र राज्याची स्थापना होऊन किती वर्षे झाली, विदर्भ महाराष्ट्रात येऊन किती वर्षे झाली ? इतक्या वर्षात पाण्याचे नियोजन होत नसेल तर जलसिंचन विभागामध्ये नियोजनाचा दुष्काळ आहे असे म्हणावे लागेल. कोणत्याही बाबीचे नियोजन करायचे असेल तर सरकारला फक्त पश्चिम महाराष्ट्राची आठवण होते आणि कोणाला बदबाद करायचे असेल विदर्भाची आठवण होते. सरकारचे असे वागणे बरोबर नाही.

सभापती महोदय, वैनगंगा प्राणहिता प्रकल्पामध्ये 380 अब्ज घनफूट पाणी आहे, परंतु त्या पाण्याचा वापर अजिबात झालेला नाही. पैनगंगा प्रकल्पामध्ये 104 अब्ज घनफूट पाणी आहे. वर्धा 111 अब्ज घनफूट,इंद्रावतीमध्ये 141 अब्ज घनफूट, निम्न गोदावरीमध्ये 1 अब्ज घनफूट आणि खडकपूर्णामध्ये 10 अब्ज घनफूट पाणी अशी एकूण 677 अब्ज घनफूट पाण्याची विदर्भातील सिंचनाची क्षमता आहे. परंतु या प्रकल्पांचे अजून नियोजन झालेले नाही, त्या प्रकल्पांना मंजुरी मिळालेली नाही.

सभापती महोदय, आज महाराष्ट्राची सिंचन क्षमतेच्या पिकाखालील क्षेत्रातील टक्केवारी 54.48 टक्के आहे. ही टक्केवारी अमरावती विभागात 25.82 टक्के, नागपूर विभागात 55.09 टक्के आणि पुणे विभागात 96.37 टक्के आहे. आपण विदर्भातील सिंचन क्षमतेची बेरीज केली तरी ती पुणे विभागाएवढी येत नाही.

सभापती महोदय, 1994 च्या राज्य सरासरीच्या तुलनेत 35.11 टक्के विभागवार अनुशेष आहे. या अनुशेषापैकी जून 2008 मध्ये शिल्लक असलेला फक्त अमरावती विभागाचा अनुशेष 2 लाख 90 हजार 600 हेक्टर इतका आहे. आम्ही अजूनही त्या पुढे गेलो नाही.

सभापती महोदय, 600 कोटी रुपयांचे कर्ज घेऊन प्रकल्प उभे करण्यात येतील अशी राज्य सरकारने घोषणा केली होती. अशा प्रकारचे धोरण आखताना ते विदर्भाच्या फायद्याचे नाहीत याचा देखील विचार झाला नाही. चंद्रपूर जिल्ह्यात 13 हजार कोटी रुपयांचे प्रकल्प मंजूर आहेत. परंतु आम्ही अजूनही वन विभागाच्या कायद्यात अडकलो असल्यामुळे ते प्रकल्प पूर्ण होऊ शकत नाही. त्यामध्ये भर म्हणून आपण बफर झोन, इको झोन या नावाखाली हळूहळू गळफास आवळण्यास सुरुवात केलेली आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

सभापती महोदय, विदर्भाला 48 अब्ज घनफूट पाणी उलण्याचा अधिकार आहे. आपण आजपर्यंत फक्त पाच धरणांची कामे पूर्ण केली आणि त्यातील फक्त 19.74 टक्के पाणी वापरत आहोत.

सभापती महोदय, वन विभागाने नाकारलेल्या प्रस्तावातील प्रकल्पातून 533 दक्षलक्ष घनमीटर पाणी वापरता येणार नाही. या पाण्यामुळे 60 हजार 665 हेक्टर जमीन ओलिताखाली येणार आहे. त्यासाठी फक्त 2 हजार 798 हेक्टर जमिनीची आवश्यकता आहे. विदर्भात 54.48 टक्के जंगल आहे. आमची मागणी आहे की, आपण आम्हाला फक्त पाच टक्के जंगल दिल्यास आमचे सर्व प्रकल्प होऊ शकतात. विदर्भ आबादी आबाद होऊ शकतो आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या देखील थांबतील. पण या गोष्टी करण्यासाठी जी मानसिकता लागते ती सरकारकडे नाही आणि पश्चिम महाराष्ट्राची तर नाहीच नाही. विदर्भाला काहीही द्यायचे असेल तर त्यासाठी हात आखडता घेतला जातो असे मला येथे खेदाने नमूद करावेसे वाटते.

सभापती महोदय, विदर्भाला 3 हजार 993 दक्षलक्ष घनमीटर पाणी उचलण्याचा अधिकार आहे. त्यातील 2 हजार 594 दक्षलक्ष घनमीटर पाणी म्हणजे 65 टक्के पाणी आम्ही वापरतो. म्हणजे 35 टक्के पाणी अजूनही उचलू शकलो नाही.

सभापती महोदय, राज्यात उपलब्ध असलेला आणि विदर्भाच्या वाट्याला येणारा 2 हजार 733 दक्षलक्ष घनमीटर पाण्यावर आमचा हक्क आहे. त्यातील फक्त 806 दक्षलक्ष घनमीटर पाणी आम्ही वापरतो म्हणजे फक्त 29 टक्के पाणी वापरतो. म्हणजे आम्ही 71 टक्के पाणी उचलू शकलो नाही. वन कायदा आणि वन अधिकाऱ्यांचा आडमुठेपणामुळे विदर्भाचा विकास थांबला आहे. तसा तो महाराष्ट्राच्या मानसिकतेतून देखील थांबला आहे असे मला म्हणायचे आहे.

सभापती महोदय, गोसीखुर्द प्रकल्प 1988 मध्ये मंजूर झाला. आता सन 2013 हे वर्ष संपत आले आहे. परंतु अजून तो प्रकल्प पूर्ण झालेला नाही. कारण काय तर अजून तीन गावांचे पुनर्वसन व्हावयाचे आहे. वन विभागाच्या जमिनीवरील गावे हटविताना तहसीलदारापासून ते पोलीस फोर्सपर्यंत सर्व हजर असतात. आदिवासींना जबरदस्तीने उचलून त्यांना ट्रकमध्ये टाकून गावाच्या बाहेर नेऊन ठेवले जाते. तशी पध्दत या ठिकाणी का वापरली जात नाही ? गोसीखुर्द प्रकल्पाची

..3..

श्रीमती शोभा फडणवीस....

किंमत 10 हजार कोटी रुपयांपर्यत गेली आहे. पुढील दहा वर्षे एक-एक हजार कोटी रुपये देणार असाल तर त्या प्रकल्पाची किंमत 20 हजार कोटी रुपयांपर्यंत जाईल. खर्चात वाढ होत आहे हे जर सरकारला माहीत आहे तर त्या तीन गावांचे पुनर्वसन लवकर का करण्यात येत नाही ? आजही तेथील पाणी वाया जात आहे याचा सरकार केव्हा अभ्यास करणार आहे याचे उत्तर सरकारने दिले पाहिजे. तेव्हा त्या गावांचे ताबडतोब पुनर्वसन करावे. आपण त्या गावांना किती पैसे द्यायचे हे ठरविले आहे. पुनर्वसनाची पूर्ण तयारी झालेली आहे. यासाठी आपण पोलिसांचे सहकार्य घ्यावे आणि त्या तीन गावांचे पुनर्वसन करुन आम्हाला पाणी द्यावे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, गोसीखुर्द प्रकल्पाच्या खाली जादाचे पाणी असल्याचे सांगितले जाते. अधिकाऱ्यांनी 49 वर्षापूर्वी तसा रिपोर्ट दिलेला आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

गेल्या 49-50 वर्षांपासून आम्ही त्या ठिकाणी उन्हाळ्यात पाणी देऊ शकत नाही. त्या ठिकाणी जादा पाणी नाही अशा पध्दतीचा अहवाल आलेला आहे. तरी सुध्दा शासन त्या भागात जादा पाणी आहे असे भासवून मोठमोठे प्रकल्प उभे करण्याच्या मन:स्थितीत आहे. वैनगंगा-नळगंगा हा प्रकल्प नद्याजोड प्रकल्पाच्या माध्यमातून करण्याचे ठरविण्यात आले आहे. मेळघाट येथून नळगंगा प्रकल्पाला पाणी देण्याचे ठरविले आहे. मेळघाटमधील तापी नदीचे 191 दलघमी पाणी खान्देश घेऊन गेले आहे. त्यामुळे आज मेळघाटमध्ये एखादा प्रकल्प उभा करावयाचा झाल्यास तो करता येत नाही. कारण मेळघाटचे सर्व पाणी खान्देशने पळविले आहे आणि त्या माध्यमातून तो विभाग पुढे गेला आहे. परंतु विदर्भातील आदिवासी मात्र दारोदार फिरतो आहे. आम्ही वारंवार त्यांच्या कुपोषणाचा विषय मांडत आहोत. परंतु परिस्थितीत फरक पडत नाही. त्या भागातील आदिवासींच्या जगण्याचा अधिकार असलेले पाणी अन्य विभागाकडून पळविले जात आहे. अशा प्रकारे त्या भागातील पाणी पळवून हे सरकार त्यांच्या शेतीचे सिंचन थांबवित आहे. यापेक्षा दुसरे पाप कोणते असू शकत नाही, असे मला वाटते. मुळात नद्यांमध्ये पाणी थांबवून ठेवण्याची क्षमता या भागातील नद्यांमध्ये नाही. असे असताना पाणी पळविण्याचा आणि चोरी करण्याचा प्रकार आज या भागात सुरु आहे. नॅशनल वॉटर डेव्हलपमेंट एजन्सीने वैतरणा-मांजरा प्रकल्प फिजीबल होऊ शकत नाही म्हणून तो नाकारला आहे. तरी सुध्दा त्या प्रकल्पाला मंजुरी मिळविण्याचा प्रयत्न राज्य सरकारच्या माध्यमातून केला जात आहे. आमच्या हक्काचे असलेले वैनगंगेचे पाणी इतरांना देण्याचे दुटप्पी धोरण शासनाने स्वीकारले आहे. कन्हान-वर्धा लिंक, वैनगंगा-पूर्णा लिंक, इंद्रावती वर्धा-पैनगंगा पूर्णा लिंक या उपसा सिंचन योजनांखाली 80 मीटर पाणी जास्त ठेवून उर्वरित 4 लाख 13 हजार 650 हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचा सरकारचा डाव आहे. किंबहुना त्यातील पाणी पळवून नेण्याचा सरकारचा डाव आहे. अशा प्रकारे नव्याने होत असलेली पाणी चोरी थांबविण्याचे काम विदर्भाला करावे लागणार आहे आणि त्यासाठी सरकारला सुध्दा मदत करावी लागणार आहे.

महोदय, वर्धा-वैनगंगा उप नदीवर 7 बॅरेक बांधण्याचे निश्चित करण्यात आले. वारंवार सांगूनही ढिंढोरा, मारडा, धानोरा, अडस्ती, नांदवडगांव, आमडी, आर्णीधनु या बॅरेकच्या घोषणा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

करण्यात आल्या. प्रत्यक्षात या बॅरॅकचे पाणी उद्योगाला देण्याचे शासनाचे धोरण आहे. वर्धा नदीवर 9 पॉवरप्लांट उभे राहिले आहेत. परंतु शेतकऱ्यांचे पाणी त्यांना देण्याचे धोरण शासनाकडून ठरविण्यात आले आहे. त्यामुळे ते बॅरॅक सुध्दा बंद होण्यास सुरुवात झाली आहे.

महोदय, महाराष्ट्रात भरपूर पाऊस पडतो. पण ते पाणी अडविण्याची क्षमता महाराष्ट्रातील नद्यांमध्ये नाही. उत्तर प्रदेश राज्यातील नद्या 50-55 टक्के पाणी अडवितात. परंतु आपल्या राज्यात ते प्रमाण केवळ 5 ते 9 टक्के आहे. त्यामुळे जलसंधारणाच्या योजना मोठ्या प्रमाणावर राबविण्याची गरज आहे.

महोदय, माननीय मंत्री महोदय, धरणाचे पाणी उद्योगाला द्यावयाचे झाल्यास काही नियम आहेत. धरणातील सिंचनाचे पाणी उद्योगाला दिल्यास शेतकऱ्यांचे सिंचन कमी होणार आहे. सिंचनाचे पाणी उद्योगाला दिल्यास शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाई आणि पुन:स्थापनेचा खर्च कायद्याने उद्योजकांकडून घेतला जातो. या निमित्ताने मी विचारु इच्छिते की, आपण एनटीपीसी, लॅम्को दाब वीज केंद्र, वर्धा पॉवरप्लांट, सोफिया, जीएमआर, धारिवाल यांच्याकडून किती रक्कम घेतली ? यांच्याकडून शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाचा खर्च घेतलेला नाही. केवळ उद्योजकांचे लाड करायचे आणि शेतकरी मेला तर त्याच्यासाठी केवळ हळहळ व्यक्त करणार असाल तर ते योग्य नाही.

महोदय, 1 मे.वॅ. वीज तयार करण्यासाठी किती पाणी लागते याचा विचार सरकारने केलेला नाही. कोणी 45 दलघमी मीटर पाणी मागतो, कोणती 10 दलघमी पाणी मागतो. परंतु प्रकल्पांना पाणी देण्याबाबतचे कोणतेही नियोजन या सरकारकडे नाही. प्रकल्पाला पाणी देत असताना शासनाने नियोजन करावे अशी मी मागणी करते.

महोदय, राज्यातील विहिरीचे सिंचन आणि कृषी पंप हा अनुशेषाचा आणि विद्युत वापर किती झाला याचा भाग आहे. पुणे विभागामध्ये 1,33,336 विहिरी आहेत. उपयोगात असणाऱ्या 1 लाख 25 हजार विहिरी आहे. ओलिताखालील क्षेत्र 406.80 हजार हेक्टर आहे. कृषी विद्युत पंप 9,33,465 आहेत. प्रत्यक्षात त्या विभागात 7 लाख 26 हजार कृषी पंपांची आवश्यकता आहे. परंतु पुणे विभागात 2,69,228 वीज पंप अतिरिक्त आहेत. त्या विभागात विजेचा वापर 62.71 मे.वॅ. इतका आहे. परंतु नागपूर विभागात काय स्थिती आहे ? महोदय, नागपूर विभागात 2,309 विहिरी

..2..







असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे.  उपयोगात असणाऱ्या विहिरी 916 आहेत. ओलिताखालील क्षेत्र 0.65 हजार हेक्टर आहे. नागपूर विभागात 2,58,667 कृषी विद्युत पंप आहेत.  याचाच अर्थ पुणे विभागात जेवढे कृषी पंप जास्त आहेत तेवढे नागपूर विभागात कमी आहेत.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ....

3,90,581 पंप आवश्यक आहेत, 1,46,902 पंप कमी आहेत. विद्युत वापर मात्र 12.84 मे.वॅ. आहे. अमरावती विभागात फक्त 34,993 विहिरी आहेत, त्यातील 21,490 विहिरी उपयोगात येणाऱ्या आहेत. सिंचनाखालील क्षेत्र 44.85 हेक्टर आहे. विद्युत पंप 4,19,000 आहेत. आवश्यक 6,22,000 आहेत, कमी 2,10,000 आहेत. विद्युत वापर मात्र 8.94 मे.वॅ. आहे. आता यामध्ये विदर्भाचा विकास कुठे आला, ते तरी सांगा. पूर्ण विदर्भाच्या ओलिताच्या विहिरींची बेरीज केली तर ती एकट्या सोलापूरएवढी येते. सोलापूरमध्ये पूर्ण विदर्भाचा विकास गेला. अनुशेष म्हटल्यानंतर त्यामध्ये रस्ते आहेत, सिंचन आहे, दवाखाने आहेत, शेती आहे, विकास आहे, उच्च शिक्षणाचा दर्जा आहे, शिक्षणाचा दर्जा आहे, नोकरीचा दर्जा आहे. महाराष्ट्रात 25 टक्के लोकसंख्या विदर्भाची आहे. मग विदर्भाला 25 टक्के विकासाचा वाटा का मिळू नये ? आम्ही त्याकरिता बोलत असताना देखील आमच्यावर नियंत्रण येत असेल तर विदर्भातील लोकांनी कोणाकडे पहायचे ? आम्हाला बोलता येत नाही. माननीय मंत्री बोलत नाहीत. आमच्यावर सतत अन्याय सुरू आहे. आम्ही कुठे जायचे ? आत्महत्या होत आहेत, याचे कोणालाही काहीही नाही. रोज मरे त्याला कोण रडे, या प्रमाणे आपण रोज पेपर वाचता आणि ठेवून देता. मृत पावलेल्या व्यक्तींच्या विधवांना काहीही देत नाही.

सभापती महोदय, खेडी रस्त्यांनी जोडण्याचा कार्यक्रम आहे. अजून 144 खेडी एकाही रस्त्याने जोडलेली नाहीत. ही विदर्भाची अवस्था आहे. उर्वरित महाराष्ट्रातील 109 खेडी अशी आहेत, जी अद्यापपर्यंत विदर्भाला जोडलेली नाहीत. मी त्याच्या पुढे जात नाही. ही न जोडलेली खेडी कोणती आहेत ? ही सर्व खेडी नलक्षग्रस्त भागातील आहेत. मी नेहमी सांगते की, गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया, येथील 50 टक्के खेडी अजूनही जोडलेली नाहीत. नक्षलवादी लोक आदिवासींना त्यांच्यामध्ये नेतात. आदिवासींनी नक्षलवादात जाऊ नये, असे आपल्याकडून सांगितले जाते. मग शासन आमच्यासाठी काय करते ? शासन आमचा विकास करीत नाही. आम्हाला मार्गदर्शन करीत नाही. आम्हाला पैसे देत नाही. आम्हाला वाचविण्यासाठी प्रयत्न करीत नाही. नक्षलाकडे वळू नये असे आपण म्हणत असाल तर आमचा विकास करणे हे अत्यंत आवश्यक आहे.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ....

सभापती महोदय, माननीय राज्यपालांना रस्त्यांच्या अद्ययावत अनुशेषाबाबत दिनांक 14.04.2010 ला मंडळाने अहवाल पाठविला. माननीय राज्यपालांच्या सचिवांनी तो अहवाल सार्वजनिक बांधकाम विभागाला मागितला. सन 1981 ते सन 2000 पर्यंतचा रस्त्यांचा अनुशेष 5052.75 कोटी रूपयांचा आहे. सन 2001 ते सन 2008 पर्यंतचा रस्त्यांचा अनुशेष 6996.30 कोटी रूपयांचा आहे. एकूण रस्त्यांचा अनुशेष 12,49,005 कोटी रूपयांचा आहे. परंतु, सन 2008 ते सन 2013 पर्यंतचा सुध्दा अनुशेष आहे. तुम्ही आमचा कोणता अनुशेष भरणार ? जो काही अनुशेष भरला तो तरी बरोबर आहे का ? मी माझ्या भाषणाच्या शेवटी फक्त 4 ओळी सांगते.

"यह कातिल की फितरत तो देखो, वह क्या मांगते हैं,
मय्यत में आये बुरखा पहनकर, हमारी उम्र की दुआ मांगते हैं."

एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करते.

----

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी म.वि.प. नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर बोलण्यासाठी उभा आहे. या प्रस्तावाचे अनुशेषामध्ये रूपांतर झाले आहे. विदर्भातील प्रश्नांवर अधिवेशन सुरू आहे. अनुशेषाच्या संदर्भातील हा प्रस्ताव सत्तारूढ पक्षाकडून उपस्थित केला, याचे आम्हाला बरे वाटते. आम्ही त्याचे स्वागत करतो. नेहमीच विरोधी पक्षाने का ओरडावे म्हणून सत्तारूढ पक्षाकडून हा प्रस्ताव आणण्यात आला आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष आदरणीय श्री. माणिकराव ठाकरे यांनी हा प्रस्ताव आणला आहे. ते सरकारला निदेश देऊ शकतात, आदेश देऊ शकतात, सरकारकडून काम करून घेऊ शकतात, एवढी ताकद त्यांच्याकडे आहे. अध्यक्ष म्हणून अशी ताकद असलीच पाहिजे. शासनाला पायउतार व्हावे म्हणून दम देखील देऊ शकतात. अशा आदरणीय श्री. माणिकराव ठाकरे यांनी हा प्रस्ताव मांडला आहे.

सभापती महोदय, माननीय मंत्री हसत असल्याचे माझ्या लक्षात आले. त्यांच्या आदेशाला आम्ही कशाला भीक घालू, असे त्यांना वाटत असावे. माननीय मंत्र्यांच्या हसण्यातील उपहास माझ्या लक्षात आला. शेवटी राष्ट्रीवादी पक्ष व काँग्रेस पक्ष यांची काय जुंपायची ती जुंपू दे. प्रदेशाध्यक्षांचे अधिकार सांगताना असे मिश्किल हसणे किती गंभीर आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस या अनुशेषाच्या संदर्भात विषय मांडत होत्या. विदर्भाचे हे कायमचेच रडगाणे झाले आहे का ? या संदर्भात मी काही गंभीर विषय मांडणार आहे, जे दुर्दैवाने आतपर्यंत कोणी मांडले नाहीत. माझ्या हातात माननीय राज्यपालांची अनुशेषाच्या संदर्भातील माहिती आहे. ही माहिती मी संपूर्ण वाचणार नाही. सर्वांची गोळाबेरीज केली तर असे दिसते की, उर्वरित महाराष्ट्रात नाशिक, धुळे, नंदुरबार, अहमदनगर, सांगली, सातारा, कोल्हापूर या सर्व जिल्ह्यांचा सिंचनाचा अनुशेष एकत्र केला तर तो फक्त 353.45 कोटी रूपयांचा आहे.

( नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

विदर्भातील सिंचनाचे दोन भाग होतात. नागपूर व अमरावती विभाग असे दोन विभाग आहेत. मराठवाडा व विदर्भ एकत्रित केले तर 1770.54 हेक्टरचा अनुशेष असल्याचे दिसून येते. हे गणित मांडल्यानंतर विदर्भ व मराठवाड्यामध्ये सिंचनाचा पाचपट अनुशेष असल्याचे राज्यपाल महोदयांनी तयार केलेल्या तक्त्यामध्ये दिसून येते. ते कौतुकास्पद आहे किंवा नाही याचा विचार मंत्री महोदयांनी जरुर करावा.

सभापती महोदय, मला एक गोष्ट अत्यंत नम्रपणे निदर्शनास आणावयाची आहे. हे शासन कोणाचे ऐकते ? या देशाच्या पंतप्रधानांचे, अर्थमंत्र्यांचे हे शासन ऐकणार आहे की नाही ? प्रचार करीत असताना केंद्रात व राज्यात एकाच पक्षाचे सरकार असेल तर तुम्हाला सुविधा देता येतील असे लोकांना सांगितले जाते. तो प्रचाराचा भाग असतो. विदर्भात झालेल्या आत्महत्येचा विषय वारंवार मांडल्यामुळे त्या विषयाचा आम्हाला आता उबग आलेला आहे. आता आपणच आत्महत्या कराव्यात अशी विदर्भाच्या संदर्भात परिस्थिती निर्माण झालेली आहे. सरकारला त्याचा ना खेद ना खंत वाटते. अमरावती विभागाला वर्धा जिल्हा जोडण्यात आल्यामुळे त्या विभागातील 6 जिल्ह्यांमधील आत्महत्येचा विषय आहे. विदर्भातील एकही मंत्री मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये या आत्महत्यांबाबत आक्रमकतेने बोलतात असे मी ऐकलेले नाही. त्याची आम्हाला खंत व खेद वाटतो.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये कोणत्या विषयावर चर्चा होते हे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना कसे कळते ? जेव्हा जेव्हा विदर्भातील विषय मंत्रिमंडळासमोर येतात तेव्हा विदर्भातील मंत्री आपापली भूमिका मांडत असतात. सभागृहाच्या पटलावर चुकीचे येणे योग्य नाही.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे म्हणणे तपासून काढून टाकण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : मंत्रिमंडळाच्या बैठकीच्या बातम्या वर्तमानपत्रात छापून येतात. मंत्रिमंडळाच्या बैठकीत कोणते मंत्री भांडले, कोणाचा किती आवाज चढला होता, मुख्यमंत्री कसे बसले होते ते छापण्यासाठी पत्रकारांना कोण टीप देतो त्याची माहिती घ्यावी. त्या बैठकीतील सर्व वर्णन वर्तमानपत्रातून व्यवस्थित छापून येते. फक्त व्हिडिओ शूटिंग होत नाही इतकेच.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, मंत्री महोदय श्री.अनिल देशमुख विदर्भाच्या प्रश्नाबाबत गंभीर आहेत. परंतु ते या प्रश्नाबाबत मंत्रिमंडळाच्या बैठकीत आक्रमकतेने का बोलत नाहीत, असे माझे म्हणणे आहे. ते मांजरीच्या आवाजात बोलले असतील. त्यामुळे त्याचा परिणाम होत नाही. त्यांना कोणी मोजत नाहीत किंवा त्यांची कोण गणती करीत नाहीत. दुर्दैवानी त्यांनी आता खुलासा केल्यामुळे त्यांच्या बोलण्याकडे कोणी लक्ष देत नाहीत असा त्याचा अर्थ होतो.

या राज्यामध्ये 10 हजारापेक्षा अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. हे मी परवाही सभागृहात मांडलेले आहे.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्यांनी मंत्री महोदयांना उद्देशून ते मांजरीच्या आवाजात बोलले असतील असे बोलणे योग्य नाही.

श्री.दिवाकर रावते : मी त्यांना उद्देशून बोलल्यानंतर मंत्री महोदय उभे राहिलेले नाहीत. मांजरीच्या नाही तर मग मांजरीच्या आवाजात म्हणजे लहान आवाजात बोले असतील असा त्याचा अर्थ आहे. मांजरीच्या नाही तर उंदराच्या, झुरळाच्या आवाजात, बकरीच्या आवाजात असे म्हणू का ?

श्री.अनिल देशमुख : सभागृहात अतिशय गंभीर विषयावर चर्चा चालू आहे. जेव्हा जेव्हा विदर्भाचे प्रश्न निर्माण होतात तेव्हा विदर्भातील आमदार, मंत्री आपली मते मांडत असतात. सन्माननीय सदस्यांनी चुकीचे रेकॉर्डवर आणू नये. त्यांनी या विषयावर आपले मत मांडावे.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय,....

श्री.दिवाकर रावते : या सभागृहात आता उपमा, अलंकार वापरुन बोलावयाचे नाही का ? मंत्री महोदय, मंत्रिमंडळाच्या बैठकीत आवाजात बोलतात असेही मी म्हणालो आहे. मी त्यांचा मान वाढविला आहे.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य हे ज्येष्ठ सदस्य आहेत. शेतकऱ्यांसाठी ते चांगले काम करतात. त्यांनी पदयात्राही काढलेली आहे. मला दुसरी एक खंत व्यक्त करावयाची आहे की, ते विदर्भातील सिंचनाच्या अनुशेषावर बोलत असताना, आपले विचार मांडत असताना शिवसेना पक्षातील एकही सन्माननीय सदस्य त्यांच्या पाठीशी उभा नाही. या विषयावर सन्माननीय सदस्य तळमळीने बोलत आहेत. त्यांनी याच विषयाला प्राधान्य द्यावे अशी मी त्यांना विनंती करतो.

नंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी विदर्भातील माननीय मंत्री महोदयांबद्दल बोलत आहे. परवा या सभागृहामध्ये जो आक्षेप घेण्यात आला त्याबद्दल मला फार वाईट वाटले. "मोघम" हा मराठीतील चांगला शब्द आहे. या सभागृहामध्ये भाषण करीत असताना उपमा, अलंकार वापरायचे नाहीत काय असा प्रश्न निर्माण होतो. विरोधी पक्षाच्या बाजूने असे बोलले गेले की, माननीय मंत्री महोदय श्री. शिवाजीराव मोघे आपण मोघम बोलू नका. या विधानास आक्षेप घेण्यात आला आणि माननीय सभापतींनी "मी तपासून पहातो" असे सांगितले. या सभागृहामध्ये बोलताना उपमा, अलंकार वापरायचे नाहीत काय ? उपमा, अलंकारातून मराठी भाषा समृद्ध होत असते म्हणून अशा उपमा, अलंकारांचा आपण गौरव केला पाहिजे. ही समृद्धी काही वेळा चुकीचीही असू शकते आणि ती गौरवाची देखील असू शकते. विदर्भातील शेळया,मेंढ्या आणि बकऱ्यांना माळरानावर सिंचनाची सोय नसल्यामुळे, पाऊस न पडल्यामुळे गवत मिळत नाही म्हणून काय करायचे ? शेळी-मेंढीचे शेपूट असे आहे की त्याने लाज झाकू शकत नाही आणि माशीही हाकू शकत नाही असे मी म्हणणार नाही....

श्री. अनिल देशमुख : राजकीय भाषण करण्यासाठी बाहेर राजकीय व्यासपीठ आहे. त्या ठिकाणी ते बोलू शकतात. सन्माननीय सदस्यांनी विषयावर बोलावे अशी माझी त्यांना विनंती आहे.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, सभागृहामध्ये गंभीर विषयावर चर्चा चालू आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य आहेत. परंतु त्यांना थट्टामस्करी शिवाय दुसरे काही सूचत नाही. सन्माननीय सदस्यांनी शेळया-मेंढयांचा उल्लेख केला. त्यांना शेळ्या-मेंढया खाल्ल्या शिवाय चैन पडत नाही. त्याबद्दल त्या प्राण्यांप्रती कृतज्ञता बाळगण्या इतकी त्यांनी जाण ठेवावी.

श्री. दिवाकर रावते : विदर्भातील माळरानावर सिंचन होत नसल्यामुळे गवत उगवत नाही त्यामुळे शेळया-मेंढयांना चरता येत नाही असा विषय मी मांडला. मी विदर्भाच्या बाहेर गेलो नाही. मी आत्महत्येवर बोलत होतो. मंत्री मंडळामध्ये आमचा आवाज क्षीण आहे असा विषय मी मांडला आणि तो मी पुन्हा पुन्हा मांडणार आहे. या चर्चेचे गांभीर्य लक्षात घेऊन सरकारने सावरकारी विरोधी विधेयक आणून सावकारांचा बंदोबस्त करण्याचे जाहीर केले. पण सावकाराला वाचविण्यासाठी सरकारला कोर्टामध्ये दंड भरावा लागला. त्या दंडाची रक्कम 20 पट झाली. कोर्टाने ताशेरे मारल्यानंतर 2005मध्ये विधेयक संमत करुन केन्द्र सरकारकडे पाठविले. केन्द्र





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ ST/ पूर्वी श्री खंदारे 10:25

श्री. दिवाकर रावते...

सरकारने 5-6 वर्षे या सरकारला अडवले. सभापती महोदय, आपणास कल्पना आहे की, या विधेयकांच्या संबंधात आपल्या दालनामध्ये चर्चा झाली. त्या चर्चेमध्ये आदरणीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री उपस्थित होते. त्यावेळी माननीय उप मुख्यमंत्र्यांनी मंत्री महोदयांना सांगितले की, केन्द्रामध्ये आताच्या आता फोन करुन विधेयक का अडले आहे ते विचारा. तेथील चहल नावाच्या अधिकाऱ्यांशी थेट संपर्क साधून आजच्या आज निर्णय द्या असे सांगितले. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी इतकी आत्मीयता त्या बैठकीमध्ये दाखविली. परिणाम काय झाला ? ते विधेयक पास झाले, रद्द झाले आणि त्यानंतर मी उपोषण केले. गांधीजींचा संदेश आपणास कळतो म्हणून मी विदर्भामध्ये एक दिवसाचे उपोषण केले आणि या संदर्भात तातडीने अध्यादेश काढा असे सरकारला सांगितले. अध्यादेश काढण्यासंबंधी मंत्रिमंडळामध्ये चर्चा झाल्यानंतर अध्यादेश काढण्यात आला. त्यानंतर मी आदरणीय मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले की, जो अध्यादेश काढलेला आहे त्यासबंधी येत्या अधिवेशनामध्ये विधेयक आणून ते संमत करा. आजपर्यंत त्या संदर्भात काहीही झालेले नाही. हा अध्यादेश काढल्यानंतर या आठवड्यामध्ये विधेयक सभागृहामध्ये येणार आहे की नाही याची आम्हाला कोणतीही कल्पना नाही. म्हणून अतिवृष्टीवर झालेल्या चर्चेच्या वेळी मी माझ्या भाषणामध्ये यासंबंधीची आठवण करुन दिली होती. अद्यापही त्या विधेयकासंबंधी काही माहिती नाही. शेतकरी आत्महत्या करीत आहेत. तरीही सरकारच्या जाणिवा जाग्या होत नसतील, विदर्भातील मंत्री महोदय मंत्रिमंडळामध्ये त्याबाबत बोलत असतील आणि त्याचे गांभीर्य जर मंत्रिमंडळ घेणार नसेल तर त्याचा आम्ही या ठिकाणी निषेध नोंदवायचा नाही काय ?

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, या गोष्टी किती गंभीर आहेत, ते आपणच पहावे. यांनी विदर्भात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत या संदर्भातील माहिती जाणून घेण्याकरिता आदर्श मिश्रा यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. त्या फॅक्ट फायडींग समितीने असे नमूद केले की, "The Finance Minister felt that the need of the Vidarbha area can be met only by augmenting the flow of funds through Central Grant." केंद्र सरकारने मदत केल्याशिवाय विदर्भातील अनुशेष दूर होणार नाही, असे माननीय अर्थमंत्री म्हणाले. "They felt that the State Government is handicapped by the need to create the capacity to absorb the award for the Krishna Water." अशा प्रकारची माहिती फॅक्ट फायडींगमध्ये दिलेली आहे. त्याच अहवालाची नोंद केंद्र शासनाने घेतली आहे. या सरकारच्या बाबतीत काय म्हटले आहे ते ऐकून कोणी सदस्यांनी उठून जाऊ नये. त्यात जो शब्द नमूद करण्यात आला आहे, तो माझा नाही. हा शब्द मिश्रा समितीचा आहे. त्या समितीने असे म्हटले आहे की, "The team felt that there was inadequate explanation for the lackadaisical attitude in the implementation of the projects for the Vidarbha and that there was ample reason to suspect the collusion and connivance in not sanctioning the funds for the irrigation and later to move for the supplementary budget mostly for the irrigation in the Western Maharashtra."

यात एक गंभीर शब्द वापरला गेला आहे. तो शब्द असा आहे की, 'lackadaisical attitude' म्हणजे 'घमेंडखोर प्रवृत्ती'. घमेंडखोर प्रवृत्तीने राज्यकर्ते विदर्भाकडे पाहत आहेत. समितीने इंग्रजीतून घमेंडखोर असा शब्द वापरला आहे. हा काही माझा शब्द नाही. राज्यकर्त्यांची मराठवाडा आणि विदर्भाकडे पाहण्याची प्रवृत्ती घमेंडखोर अशी आहे. हा अहवाल आल्यानंतर या देशाच्या पंतप्रधानांनी अहवालातील गोष्टी गांभीर्याने घेतल्या. दिनांक 30 जून, 2006 रोजी त्यांनी विदर्भाचा दौरा केला. दिनांक 1 जूलै, 2006 रोजी त्यांनी अधिकृत वृत्तपत्राकडे एक प्रेस नोट पाठविली. त्या प्रेस नोटमध्ये शेतकरी करीत असलेल्या आत्महत्येचे कारण असे नमूद केले आहे की, "The causes of the crisis seem to be many but the primary one seems to be poor irrigation."

2...



श्री.दिवाकर रावते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशा प्रकारची माहिती त्यांनी प्रेस नोटमध्ये नमूद केली. सिंचनाच्या बाबतीत खात्रीलायक सुविधा निर्माण व्हाव्यात या करिता माननीय पंतप्रधानांनी विदर्भात शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्या या अनुषंगाने 2177 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. देशाच्या पंतप्रधानाना शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्ये संदर्भात संवेदना होत्या, जाणिवा होत्या, विदर्भात होत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी मत व्यक्त केले, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी आपले मत व्यक्त केले. ते या विषयावर अतिशय तळमळीने बोलले. ते तळमळीचे मत कुठे प्रकट झाले. कोठे व्यक्त झाले. या ठिकाणी श्री.दिवाकर रावते हे टीकात्मक बोलतात, उपहासात्मक बोलतात, त्या गोष्टीचा तुम्हाला राग येतो. सत्ताधारी पक्षावर टीका करणे, त्यांना उपहासात्मक बांलणे हे विरोधी पक्षाचे काम आहे. तुम्ही असे समजू नका की, आम्ही तुम्हाला हिणवण्यासाठी बोलतो. ज्यावेळी तुम्ही विरोधी पक्षाच्या बाकांवर बसाल त्यावेळी तुम्हाला तसे बोलावे लागेल. सरकारला ठोकून जागे करावे लागते.

सभापती महोदय, देशाचे पंतप्रधान माननीय डॉ.मनमोहन सिंग यांनी आमच्या वेदना समजावून घेतल्या या गोष्टीबद्दल मला त्यांच्याबद्दल अभिमान वाटतो. या सरकारने घमेंडखोर प्रवृत्तीतून मराठवाडयाची देखील दुर्दशा केली या गोष्टीचे मला खूप दुःख आहे. विदर्भातील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची गंभीर दखल घेतली व त्यांच्यासाठी पॅकेज जाहीर केले त्यांचा मला सार्थ अभिमान आहे. यानंतर देशाचे पंतप्रधान माननीय डॉ.मनमोहन सिंग यांनी दिनांक 15 ऑगस्ट,2006 रोजी लाल किल्ल्यावर ध्वजवंदन केल्यानंतर भाषण केले. लाल किल्ला येथून देशातील जनतेसाठी भाषण केले. त्या भाषणात त्यांनी असा उल्लेख केला की, घमेंडखोर राज्यकर्त्यांनो मी जे सांगतो आहे, त्याची एवढी तरी जाण ठेवणार आहात काय हा प्रश्न घेऊन मी या ठिकाणी उभा आहे?

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

घमेंडखोर हा शब्द माझा नाही. माननीय पंतप्रधान लाल किल्ल्यावरच्या भाषणामध्ये असे म्हणाले की, "जब मैं विदर्भ में गया था तो वहां के किसानों की हालत ने मुझ पर गहरा असर डाला. इन्ही हालत की वजह से किसान खुदकुशी करने के लिए मजबूर हो रहे हैं. हमें सोचना होगा कि हम इनकी दिक्कतों को कैसे दूर करें और उन्हें बेहतर आमदनी कैसे दिलाए." पंतप्रधान विदर्भाच्या व्यथा 15 ऑगस्टच्या भाषणामध्ये लाल किल्ल्यावरुन मांडतात हे भाषण राज्य सरकारला भूषणावह आहे का? संबंधित मंत्र्यांच्या न कर्तृत्वाचा तो डांगोरा होता. विदर्भ आणि मराठवाड्याचा डांगोरा लाल किल्ल्यावरुन पिटला जातो त्यावेळी कोणत्या तोंडाने आमच्याशी बोलणार आहात? पंतप्रधान ज्यावेळी महाराष्ट्राच्या राज्यकर्त्यांचे पाप लाल किल्ल्यावरुन मांडतात त्यावेळी कोणत्या भाषणाने उभे राहणार आहात.

सभापती महोदय, तत्कालीन केंद्रीय अर्थमंत्री आणि सध्याचे आदरणीय राज्यपाल श्री.प्रणव मुखर्जी यांनी त्यानंतर व्यक्त केलेले भाष्य अतिशय गंभीर आहे. देशाचे तत्कालीन अर्थमंत्री आणि सध्याचे राष्ट्रपती यांनी सिंचनाच्या दुरवस्थेबाबत विदर्भाचा उल्लेख केला आणि 16 मार्च, 2012 रोजी सुरु झालेल्या संसदेच्या अधिवेशनात केंद्रीय अर्थसंकल्प मांडताना राष्ट्रीय कृषी विकास अंतर्गत विदर्भात सिंचनाच्या सुविधा निर्माण करण्याकरिता मी 300 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देतो अशा प्रकारचा उल्लेख केला. हे गौरवास्पद आहे का?

सभापती महोदय, विदर्भाच्या अनुशेषाबद्दल चर्चा करीत असताना जो उल्लेख केला आहे तो अत्यंत गंभीर आहे. या ठिकाणी वीज कंपनीबद्दल भाष्य केले गेले. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र थांबत नाही. पंतप्रधानांनी एआयबीपी अंतर्गत दिलेले पॅकेज होते. तुमच्या राज्यकर्त्यांना पंतप्रधानांनी कसे गृहित धरले पहा? तुमच्या राज्यकर्त्यांबद्दल पंतप्रधानांचे मत काय आहे हे महत्वाचे आहे. माननीय पंतप्रधानांनी 2170 कोटीचा केंद्रीय निधी दिला, हा निधी देत असताना केंद्र शासनाला महाराष्ट्र शासनावर भरवसा नाही, विश्वास नाही त्यामुळे केंद्रीय जलसंपदा विभागाने महाराष्ट्र राज्याच्या जलसंपदा विभागाबरोबर सामंजस्य करार केला. त्यांना खात्री आह की धरण बांधले जाईल आणि पाणी भलतीकडे देतील. किती तुमच्यावर विश्वास बघा. त्यामुळे विदर्भ पाटबंधारे मंडळ आणि राज्य शासनाने केंद्र शासनाला लेखी हमी दिली. यांनी दिलेल्या निधीतून निर्माण करण्यात आलेल्या धरणाचे पाणी शेतकऱ्यांच्या शेतीच्या सिंचनाकरिता वापरण्यात

....2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

येईल असा लेखी करार जलसंपदा विभागाला करुन द्यावा लागला. तरच आम्ही निधी देऊन असे केंद्र सरकारने सांगितले होते. पण आमचे राज्यकर्ते कसे आहेत बघा. आम्हाला वाईट वाटते की, राज्यकर्ते कसेही असले तरी महाराष्ट्राचे आहेत. आपण भिंतीआड भांडू. परंतु आपली अब्रू चव्हाट्यावर दिल्लीपर्यंत मांडली जाणे आपल्याला भूषणावह ठरणार नाही.

सभापती महोदय, असा करार केल्यानंतर सुध्दा lackadaisical attitude has continued. पंतप्रधानांच्या पॅकेज अंतर्गत ज्या सहा जिल्हयांच्या प्रकल्पांचा समावेश होतो, त्या प्रकल्पातील शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी अप्पर वर्धा, निम्न वर्धा आणि बेंबळा प्रकल्पाचे पाणी इंडिया बूल्स कंपनीच्या वीज प्रकल्पाला दिले गेले. 45 हजार हेक्टरचे सिंचन मारुन टाकण्यात आले. या प्रश्नावर किती वेळा चर्चा करायची हा एक प्रश्न निर्माण होतो. मी माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना धन्यवाद देतो. त्यांनी आपल्या प्रस्तावामध्ये मराठवाड्याचा उल्लेख केला आहे.

नंतर आय.1....

श्री.दिवाकर रावते...

श्री.माणिकराव ठाकरेजी, आपण महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे अध्यक्ष आहात. आपण महाराष्ट्रातील जनतेकडे लक्ष असल्याचे वक्तव्य केल्याबद्दल मी आपला आभारी आहे. आपल्याला धन्यवाद देतो.

सभापती महोदय, गेल्या वेळी आपण मराठवाड्यातील दुष्काळ पाहिला. त्या दुष्काळावर आपण सभागृहामध्ये चर्चा केली. त्याची भीषणता आपण अनुभवली आहे. भ्रष्टाचार मांडण्याचा अधिकार आम्ही माननीय विरोधी पक्ष नेत्यांना दिला होता. त्यांनी तो भ्रष्टाचार मांडला होता. आपण जलसंपत्ती संबंधातील एक कायदा मंजूर केला आहे. या कायद्यानुसार आपण नियमावली केली आहे. त्यानुसार पाणी वाटप होईल अशा प्रकारचे निदेश दिले. जायकवाडी प्रकल्पाच्या वर बंधारे आहेत. जायकवाडी प्रकल्पाला गोदावरीचे 186 टीएमसी पाणी उपलब्ध झालेले आहे. त्यातील 86 टीएमसी पाणी वर आणि 100 टीएमसी पाणी मराठवाड्याला देण्याचे वाटप झाले आहे. वर कितीही धरणे बांधली तरी 100 टीमएसी पाणी जायकवाडी प्रकल्पाला मिळावे ही त्या मागची भूमिका होती. या धरणाच्या वर राहणाऱ्या आमच्या राज्यकर्त्यांनी घमेंडखोर प्रवृत्तीने काय केले ? जायकवाडीच्या वरच्या बाजूला मोठी व मध्यम मिळून एकूण 22 धरणे बांधली. त्यापैकी 14 धरणांमध्ये 21 ऑक्टोबर पर्यंत 66 अब्ज घनफूट पाणी उपलब्ध झाले. वर 6672 छोटे व मध्यम बंधारे बांधण्यात आले. एकूण उपलब्ध पाणी 186 टीएमसी आहे. असे असताना धरणाच्या वरच्या भागाच्या बाजूल 250 ते 300 घनफूट पाणी अडविण्याचा बंदोबस्त करण्यात आला व मराठवाड्याच्या वाट्याला एक थेंब पाणी येणार नाही अशी व्यवस्था करण्यात आली. नांदूर मधमेश्वरच्या भागात देखील मुकणे धरण बांधण्यात आले. नांदूर-मधमेश्वर प्रकल्पासंबंधी मोठे आंदोलन झाले. त्यात मी स्वतः सहभागी होतो. युती शासनाच्या काळात कालवा बांधून तयार झाला होता. पण धरणाचे पाणी काही येत नव्हते. शेवटी धरणतोड आंदोलन केल्यानंतर ते पाणी आमच्यासाठी सोडण्यात आले. यात वैजापूर, गंगापूर सह तीन तालुक्यांचा प्रश्न होता. मुकणे धरणाचे पाणी सिंचनाकरिता असताना पुन्हा वरच्या लोकांना घाट घालून ते नाशिकला पिण्याकरिता देण्याचे ठरविले. अशाने या भागामध्ये अनुशेष निर्माण करण्याची प्रवृत्ती निर्माण केली.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

मराठवाड्यातील धरणे कोरडी पडतील अशी तजवीज करण्यात आली. विधिमंडळाने सभागृहात महाराष्ट्र जलसंपत्ती प्राधिकरणासंबंधीचा कायदा केला. या कायद्यातील कलम बारा सहा मधील ग मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, खोऱ्यातील पाण्याची तूट समप्रमाणात विभागून मोजावी. यासाठी खोऱ्यातील सर्व धरणातील पाणी साठे दरवर्षी ऑक्टोबर अखेर अशा तऱ्हेने नियंत्रित केले जातील की, वर्षातील वापरासाठी उपलब्ध असलेल्या पाण्याची खरीप वापरासाठी तरतूद सर्वसाधारणपणे सारखी राहील. वर तुमच्याकडे जास्त पाणी असेल तर ते येथे समप्रमाणात पाठवा व सर्वांची पातळी एक ठेवावी, अशा प्रकारे पाण्याच्या वाटपाच्या हिशोबा संबंधी कायदा आहे. पण आज तो कायदा अंमलात येत नाही. वरचे लोक कायदा मानत नाही माणिकरावजी, मला एका गोष्टीचे वाईट वाटते. मराठवाड्यातील जनता ही बाहेरची नाही. मराठवाड्यातील जनता विदर्भातील लोकांसारखी स्वतंत्र मराठवाड्याची मागणी देखील करत नाही. ते निजामाच्या जाचातून, कचाट्यातून कसेबसे सुटलेले आहेत. ते आपल्या महाराष्ट्रात, देशात आले आहेत. वरच्या भागातील आमदारच नव्हे तर माननीय मंत्री देखील दमदाटीने उभे राहतात. मला आठवते की, त्यावेळी श्री.राधाकृष्ण विखे-पाटील हे पालक मंत्री होते. आम्ही त्यांना चलेजाव सांगितले. नगरचेच पालक मंत्री तेथे येतात. आता आमचे महसूल मंत्री हे पालक मंत्री आहेत. दोघांनी घोषणा केली होती. श्री.राधाकृष्णा विखे-पाटील म्हणाले होते की, पाणी दिल्यास मी राजीनामा देईन. म्हणजे माननीय मंत्री आपल्या वाट्याचे पाणी मराठवाड्याला देण्यात येऊ नये म्हणून राजीनाम्याची घोषणा करतात. एवढ्या घमेंडखोर प्रवृत्तीने आपण मराठवाडा आणि विदर्भाकडे पहात असाल तर मग या सदनाचा उपयोग काय ?

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

या विधानमंडळाचा उपयोग काय आहे ? माननीय राज्यपाल महोदयांनी दिलेले निदेशही आपण पायदळी तुडवणार असाल तर कोणत्या घटनेची अंमलबजावणी येथे होत आहे हा प्रश्न उपस्थित होतो. विदर्भाच्या जनतेला कशासाठी आपण दोष देता ? आम्हाला वेगळा विदर्भ द्या असे म्हणण्याची त्यांच्यावर तुम्ही पाळी का आणली ? कै.यशवंतराव चव्हाणांची जन्म शताब्दी आपण साजरी करीत असतांना कै.यशवंतराव चव्हाणांचा शब्द पाळण्याची आपल्यामध्ये हिंमत नसेल, कुवत नसेल,सुसंस्कृतता नसेल तर कै.यशवंतराव चव्हाणांचा शब्द न पाळणाऱ्या सरकारने पायउतार होण्याची आवश्यकता आहे. हे सरकार विदर्भावर अन्याय करीत असतांना विदर्भातील जनतेने वेगळया विदर्भाची मागणी का करु नये ? विदर्भ तसेच मराठवाडयाचे प्रश्न फार गंभीर आहेत. माझ्या विदर्भाला आणि मराठवाडयाला दु:शासनासारखी आपण वागणूक देणार असाल तर येथील जनता तुम्हाला त्याच पध्दतीने अनुशेषग्रस्त करुन पायउतार केल्याशिवाय राहणार नाही हे आपण लक्षात घ्यावे. यामुळे पुढील काळात मराठवाडा आणि विदर्भामध्ये काँग्रेसला फार मोठा फटका बसल्याशिवाय राहणार नाही. मराठवाडा आणि विदर्भातील जनता सत्ताधारी पक्षाच्या मागे उभी राहणार नाही. या ठिकाणच्या जनतेमध्ये सरकार विरोधी चीड निर्माण झालेली आहे. सत्ताधारी पक्षाच्या मग्रूर प्रवृत्तीमुळे महाराष्ट्रातील जनता तुमच्या बाजूने उभी राहणार नाही असा मी आज आपल्याला इशारा देत आहे.

सभापती महोदय, काल या ठिकाणच्या जनतेने माननीय मुख्यमंत्री महोदयांनाही पळताभूई थोडी केली होती. काल विदर्भामध्ये मंत्री महोदयांच्या गाडया अडवल्या गेल्या होत्या ही सरकारच्या दृष्टीने चांगली गोष्ट आहे काय ? विदर्भामध्ये अधिवेशन सुरु असतांना विदर्भामध्ये मंत्र्यांच्या गाडया अडवल्या जातात ही चांगली गोष्ट नाही. "मी आता मरु का" ? असे शेतकरी तुम्हाला विचारीत आहेत. मा.मुख्यमंत्री,मा.उपमुख्यमंत्र्याना येथील जनतेने "चले जाव" म्हणून सांगितलेले आहे. त्यावेळेस माननीय मंत्री महोदय श्री. नारायण राणे गाडीच्या खाली उतरुन हात जोडून सांगत होते की, "नागपूरच्या अधिवेशनात या." येथील जनता नागपूरमध्ये आपली आरती ओवाळण्यासाठी येणार आहे काय ? विदर्भ, मराठवाडा येथील जनता आपल्या विरुध्द संतापली

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

आहे. सतत व सातत्याने न्याय लढा विधानमंडळात तसेच रत्यावर देऊन सुध्दा आम्हाला तुम्ही न्याय देणार नसाल तर तुम्हाला पायउतार केल्याशिवाय स्वस्थ बसू देणार नाही असा इशारा त्यांच्या माध्यमातून मी आज देतो आहे. काल अधिवेशन सुरु असतांना मंत्र्यांच्या गाडया अडविण्यात आल्या, भविष्यात या भागात तुमच्या गाडया सुध्दा फिरु दिल्या जाणार नाहीत एवढा इशारा देतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी )** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आपल्या भाषणात मंत्री महोदय श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांचा उल्लेख केला होता त्यावेळी या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी याच सभागृहात त्यासंदर्भात खुलासा केलेला असल्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. रावते यांनी सन्माननीय मंत्री महोदय, श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या संदर्भात जो उल्लेख केला होता तो कामकाजातून काढून टाकण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी जे काही वक्तव्य केले आहे ते काढून टाकू नका. उलट यावर माननीय मंत्री महोदयांनी जो खुलासा दिलेला आहे तो देण्यात यावा.

**तालिका सभापती** : सन्माननीय मंत्री महोदय श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी तुम्ही उपस्थित केलेल्या मुद्याच्या संदर्भात याच सभागृहात त्यावेळेस खुलासा केला होता तो तपासून घेतला जाईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदय, श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या संदर्भात जे वक्तव्य केले आहे ते कामकाजातून काढून टाकण्यात येऊ नये.

**तालिका सभापती** : आता सन्माननीय सदस्य श्री. राजेंद्र जैन यांनी भाषणाला सुरुवात करावी.

----

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री राजेंद्र जैन (भंडारा-गोंदिया स्थानिक प्राधिकारी संस्था): सभापति महोदय, मैं सम्माननीय सदस्य श्री माणिकराव ठाकरे द्वारा नियम 260 के अंतर्गत प्रस्ताव विदर्भ के सिंचन और बिजली के अनुशेष के प्रस्ताव पर बोलने के लिए खड़ा हुआ हूं.

सभापति महोदय, विदर्भ में जब भी शीतकालीन सत्र होता है तब शीतकालीन सत्र के दौरान केवल विदर्भ के प्रश्नों पर चर्चा होती है, विदर्भ के प्रश्नों पर बातचीत होती है. लेकिन विदर्भ को क्या देना है इस बारे में कभी निर्णय नहीं होता. विदर्भ जब संयुक्त महाराष्ट्र में विलिन हुआ, उसके बाद एक नागपुर करार हुआ. नागपुर करार के संबंध में सम्माननीय सदस्य श्री माणिकराव ठाकरे और अन्य सम्माननीय सदस्यों ने प्रकाश डाला. एक छोटीसी बात मैं आपके ध्यान में लाना चाहता हूं. उस समय यह तय हुआ कि 16 शासकीय कार्यालय नागपुर में लाए जाने चाहिए. इस बारे में शासन पर कोई बोझ पड़ने वाला नहीं था. 1960 में नागपुर में केवल मुख्य वन संरक्षण का एक कार्यालय आया. इसके अलावा सरकार ने कोई कदम नहीं उठाया. विदर्भ के प्रति कोई संजीदगी नहीं दिखायी. हमेशा विदर्भ के पिछड़ेपन की बात की जाती है. नागपुर में दो सप्ताह का जो सत्र होता है, इस सत्र में हम चर्चा करते है. लेकिन सही मायने में इसका कोई सही निर्णय हम तक नहीं पहुंच पाता है. 1984 में विदर्भ के पिछड़ेपन का अभ्यास करने के लिए दांडेकर समिति बनी. दांडेकर समिति ने विदर्भ के सिंचन, रास्ते, आरोग्य और शिक्षा का अनुशेष निकाला. 1994 तक का अनुशेष 2013 तक नहीं निकालने का मतलब यह है कि विदर्भ आज भी 1994 में ही जी रहा है. हमारी तरफ किसी का ध्यान नहीं है. हम 60 प्रतिशत बिजली निर्माण करते है. महाराष्ट्र में बिजली का जो निर्माण होता है उसमें 60 प्रतिशत बिजली विदर्भ में निर्माण होती है. विदर्भ में खनिज संपदा 100 प्रतिशत है. वन क्षेत्र 58 प्रतिशत है. लोह 80 प्रतिशत है. 60 प्रतिशत बिजली निर्माण करने के बाद भी विदर्भ के हिस्से की बिजली अन्य हिस्सों में दी जाती है. 60 प्रतिशत बिजली का निर्माण करने के बाद विदर्भ के 32 लाख किसानों को 11 प्रतिशत बिजली और पश्चिम महाराष्ट्र को 65 प्रतिशत बिजली की पूर्ति होती है.

....2.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री राजेंद्र जैन.......

एक समाचार पत्र में दिए गए आँकड़ों के मुताबिक पुना विभाग को मंजूर बिजली पूर्ति 512 दशलक्ष युनिट्स है. प्रत्यक्ष में वापर 1957 दशलक्ष युनिट्स है. हम 11 प्रतिशत बिजली का वापर करते है.

सभापती महोदय, एका वर्तमानपत्रात आलेली बातमी मी वाचून दाखवितो. पश्चिम महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना 65टक्के वीज पुरवठा होतो. पुणे विभागाला 512 दशलक्ष युनिट वीज पुरवठा असताना प्रत्यक्षात 1957 दशलक्ष युनिट वीज वापरली जाते. पुणे विभागासाठी पंपसेट वापरावरील सबसिडी 144 कोटी रुपये दिली आहे. पश्चिम महाराष्ट्राला 560 कोटी रुपये मिळाले. विदर्भाने फक्त 985 दशलक्ष युनिट वीज वापरल्यामुळे विदर्भाला 420 कोटी रुपयांची सबसिडी मिळाली नाही. सन 2006-07 च्या अहवालानुसार विदर्भाचा अनुशेष वाढत गेला त्याचा फायदा पश्चिम महाराष्ट्राला मिळाला. पश्चिम महाराष्ट्रातील आणि उत्तर महाराष्ट्रातील प्रभावशाली नेत्यांनी हा निधी पश्चिम महाराष्ट्राकडे वळविला. त्यांनी माननीय राज्यपालांना चकवून विदर्भाचा 70 टक्के निधी पश्चिम महाराष्ट्राकडे वळविला असे स्पष्ट व परखड मत या वर्तमानपत्रात व्यक्त करण्यात आले आहे.

सभापति महोदय, जहां तक विदर्भ का प्रश्न है, विदर्भ में सिंचन का अनुशेष, उद्योग का अनुशेष है. हमारे पास खनिज संपदा ज्यादा है. हम बिजली का निर्माण ज्यादा करते है. पर्यावरण को संभालने के लिए वन को सम्हालकर रखते है. लेकिन इसके बावजूद भी विदर्भ को सब से ज्यादा नुकसान उठाना पड़ता है. सभी ने सिंचन प्रकल्प की ओर ध्यान आकर्षित किया है. मैं भी एक-दो बातें सम्माननीय श्री तटकरे साहब से कहना चाहूंगा. बिजली विभाग के राज्यमंत्री यहां पर उपस्थित है. वे विदर्भ के है. मेरा उनसे अनुरोध है कि यह जो सबसिडी का मसला है और पुना में जो मान्य बिजली है, उससे ज्यादा वापर होता है. इससे विदर्भ पर अन्याय होता है, इस ओर ध्यान देना चाहिए. मैं आपको कल की एक घटना बताता हूं. सड़कअर्जुनी तालुका में एक बोथली गांव है. आदिवासी नक्सलग्रस्त इलाके में वह गांव है. एक ट्रान्सफार्मर पर आठ किसानों के आठ कनेक्शन है. सात लोगों ने बिल का पेमेंट कर दिया है. केवल एक किसान अपना बिल नहीं भर पाया. एक के कारण आठों लोगों को

.....3.



AJIT/ नितनवरे/ ST/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 10:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री राजेंद्र जैन........

बिजली की पूर्ति नहीं हो रही है. अब रबी की फसल लगानी है. यह कौनसा कानून है कि यदि सात आदमी लगातार व्यवस्थित रुप से पैसा भर रहे है और एक किसान पैसा नहीं भर पा रहा है तो भी आठों लोगों की बिजली पूर्ति बंद कर दो, यह कौनसा न्याय है ? इस तरह से विदर्भ के किसानों के प्रति अन्याय हो रहा है. धान उत्पादक किसान है, उसकी स्थिति वैसे भी खराब है. धान उत्पादक किसान को यहां पर बहुत कम दर मिलता है. हमारे पड़ोसी राज्यों में धान उत्पादक किसानों को 250 रुपये प्रति क्विंटल का बोनस मिलता है. इसके लिए भी सरकार के पास कोई व्यवस्था नहीं है. इस साल अतिवृष्टि हुई, इसको धान में रखते हुई कानून में कहीं न कहीं संशोधन होना चाहिए. जो आदमी नियमित रुप से पेमेंट करता है उस पर अन्याय नहीं होना चाहिए. यदि किसी ट्रान्सफार्मर पर बिजली की चोरी हो रही है तो अतिरिक्त आकारणी लगायी जाती है. बिजली की चोरी रोकने का काम किसी उपभोक्ता का नहीं है. यह काम किसी जनप्रतिनिधि का है. बिजली की चोरी रोकने का काम शासन का है. शासन बिजली की चोरी नहीं रोक सकती तो यह शासन की जिम्मेदारी है. शासन बिजली की चोरी नहीं रोकती है. बिजली विभाग में अनागोंदी कारभार है. उसका भुगतान हमारे किसानों को भोगना पड़ता है. विदर्भ 60 प्रतिशत बिजली का उत्पादन करता है तो विदर्भ के किसानों के साथ न्याय होना चाहिए. विदर्भ के किसानों की ओर अच्छे दृष्टिकोन से देखना चाहिए. उनके विद्युत कनेक्शन नहीं तोड़े जाने चाहिए और अन्य नुकसान नहीं होने चाहिए. पूरे विदर्भ में बिजली की स्थिति के साथ साथ उद्योगों की स्थिति भी बहुत खराब होती जा रही है. उद्योग कितने पिछड़ रहे है ? हजारों लोग बेरोजगार हो रहे है. इस ओर भी मैं शासन का ध्यान आकर्षित करना चाहता हूं.

सभापती महोदय, मध्यप्रदेश और छत्तीसगढ के अलावा महाराष्ट्र से लगे हुए पांच राज्य है वहॉ उद्योगों को दी जाने वाली बिजली की दर और महाराष्ट्र में दी जाने वाली बिजली की दर, इसमें बहुत बड़ा अंतर है. हमारे यहाँ औद्योगिक बिजली की दर प्रति युनिट 10.60 रुपये के हिसाब से है. मध्य प्रदेश में 6.60 रुपये है. छत्तीसगढ में 5.25 रुपये है.

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

....भाषण जारी,इसके बाद श्री अग्रवाल

श्री राजेंद्र जैन.....

सभापति महोदय, महाराष्ट्र में 904 राईस मिल हैं. मध्य प्रदेश में 300 राईस मिल हैं. छत्तीसगढ़ में 1700 राईस मिल हैं. इस विद्युत दर की वजह से करीब 300 राईस मिल बंद हैं. भंडारा, गोंदिया, चंद्रपुर और नागपुर का जो भाग है, वहां पर आने वाले दिनों में राईस मिलों का उत्पादन बंद हो जायेगा. हमारे यहां पर नये उद्योग लगते नहीं हैं. बड़ी मुश्किल से किसी तरह से भेल की एक यूनिट यहां पर लगी है. अदानी पॉवर प्रोजेक्ट की एक यूनिट यहां पर आई है. हम इस तरह की यूनिट यहां लाने का प्रयत्न करते हैं लेकिन विद्युत दरों में इतना अंतर रहेगा तो विदर्भ का विकास कैसे होगा, विदर्भ की प्रगति एवं उन्नति कैसे होगी ? इस बात पर गौर करने की आवश्यकता है.

सभापति महोदय, सरकार की नीति की वजह से करोड़ों रुपये का धान पिछले वर्ष राईस मिलों को मिलिंग करने के लिए नहीं दिया गया. सरकार की व्यवस्थित प्रणाली नहीं होने की वजह से धान का इतना बड़ा नुकसान हुआ. 200-300 करोड़ रुपये से ज्यादा का धान बाहर पड़ा रहकर खराब हो गया परन्तु शासन ने इस पर कोई ध्यान नहीं दिया. हमारा विदर्भ यदि 60 प्रतिशत विद्युत का उत्पादन करता है तो विदर्भ में उद्योगों को आगे लाने के लिए विद्युत दर के संदर्भ में सरकार को सोचना चाहिए.

सभापति महोदय, आदरणीय मुख्यमंत्री जी ने एडवांटेज विदर्भ का कार्यक्रम आयोजित किया. एडवांटेज विदर्भ का बहुत प्रचार-प्रसार किया गया. एडवांटेज विदर्भ के बड़े-बड़े विज्ञापन आये. एडवांटेज विदर्भ के माध्यम से हमें यह बताया गया कि अब विदर्भ में सुराज्य आने वाला है. विदर्भ में उद्योग आने वाले हैं लेकिन अगर विद्युत दर में फर्क रहेगा और विद्युत दरों की स्थिति यही रहेगी तो कोई भी उद्योगपति विदर्भ में उद्योग नहीं लगायेगा. इसकी केवल नागपुर सत्र में चर्चा होगी. नागपुर सत्र में बातचीत होगी. हम यहां पर दो हफ्ते के लिए आयेंगे. सभी पक्ष के लोग विदर्भ के विकास की बात करेंगे. इसके बाद फिर अगले साल के सत्र का इंतजार करेंगे. हमारा कहना है कि ऐसा नहीं होना चाहिए.

सभापति महोदय, सभी सम्माननीय सदस्यों ने सिचंन प्रकल्पों के संबंध में अपनी-अपनी बात यहां पर रखी. मैं आपको केवल यह बताना चाहता हूं कि हमारे विदर्भ की सबसे बड़ी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री राजेंद्र जैन.......

परियोजना गोसीखुर्द की है. महाराष्ट्र में केवल यही एक परियोजना राष्ट्रीय प्रकल्प के रुप में मंजूर हुई है. आदरणीय मुख्यमंत्री जी, आदरणीय श्री तटकरे साहब, आदरणीय श्री मुळक जी ने इस प्रकल्प का दौरा किया. पुनर्वसन के लिए 1200 करोड़ रुपये के पैकेज की घोषणा हुई. इसके बाद पुनर्वसन का काम व्यवस्थित रुप से होना चाहिए. गोसीखुर्द प्रकल्प को पूरा करने के लिए शासन को पूरी ताकत लगाने की आवश्यकता है. गोसीखुर्द प्रकल्प विदर्भ के 3-4 जिलों की काया पलट कर सकता है, परन्तु गोसीखुर्द प्रकल्प की परिस्थिति क्या है ? गोसीखुर्द प्रकल्प में उप अभियंता की 5 जगह हैं, उसमें से 3 जगह खाली हैं. कनिष्ठ अभियंता की 20 जगह हैं, उसमें से 10 जगह खाली हैं. सर्किल अभियंता के 147 पद मंजूर हैं परन्तु केवल 46 पद भरे गये हैं. इस तरह से प्रकल्प कैसे पूरा होगा ? प्रकल्प को पूरा करने के लिए गति कहां से आयेगी ? 2-4 साल के बाद फिर इस प्रकल्प की कीमत बढ़ेगी. इसके बाद फिर इस प्रकल्प की सुधारित प्रशासकीय मान्यता की बात होगी एवं अन्य नई-नई कारवाई करनी पड़ेंगी.

सभापति महोदय, सुधारित प्रशासकीय मान्यता की हालत तो इतनी खराब है कि राज्य सरकार ने 20-25-30 साल पहले जिस प्रकल्प को मान्यता दी, जिस प्रकल्प को निधि उपलब्ध करायी, जिसका पंप हाउस बन गया, उस पंप हाउस का माननीय श्री शरद पवार एवं अन्य मंत्रियों के हाथों से उद्घाटन करवा दिया गया परन्तु उस प्रकल्प की कैनाल का पता नहीं है. सुपरिन्टेंडेंट इंजीनियर एवं कार्यकारी अभियंता से पूछते हैं कि यह काम आगे क्यों नहीं बढ़ रहा है तो उनका कहना है कि विदर्भ पाटबंधारे विभाग में 1800 करोड़ रुपये रखे हैं लेकिन सरकार सुधारित प्रशासकीय मान्यता नहीं देती है. सचिव महोदय से पूछते हैं तो वे कहते हैं कि माननीय मंत्री जी के पास फाईल गई है. मंत्री महोदय से इस बारे में पूछते हैं तो वे कहते हैं कि मुख्यमंत्री महोदय के पास फाईल गई है. इन सबसे पूछते हैं तो कहा जाता है कि यह फाईल केबीनेट में जायेगी. केबीनेट में हमारे पूर्व विदर्भ के केवल एक ही मंत्री हैं. इस तरह का सुधारित प्रशासकीय मान्यता का मसला है.

सभापति महोदय, भंडारा जिले में करचखेडा और सूरेवाडा प्रकल्प है. वहां पर बरसों तक सिंचन नहीं हो सकता है. वहां पर पंप हाउस बन गये हैं. अब इसमें एक नया मसला आ गया है. सरकार की ओर से निधि की उपलब्धता हुई. निधि उपलब्ध होने के बाद जब प्रकल्प आगे बढ़

..3..



SJB/AKA/ KTG/ इससे पूर्व श्री नितनवरे 10:55

श्री राजेंद्र जैन.......

रहा है, प्रकल्प फायनल स्टेज पर आ रहा है, जैसा कि सम्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस ने कहा कि अचानक इसमें फोरेस्ट का मसला आ गया कि वह नागझीरा के टायगर कोर में आ रहा है. आज से 7 साल पहले करचखेडा प्रकल्प का पंप हाउस बन गया. जिस करचखेडा की नहरों के लिए पैसे दिये गये और वह प्रकल्प अंतिम स्वरुप में आ रहा है तो वह प्रकल्प सुधारित प्रशासकीय मान्यता के लिए अटक गया है. मैंने कल इस प्रकल्प की जानकारी प्राप्त की तो एक अधिकारी ने मुझे बताया कि उसका एक किलोमीटर का हिस्सा फोरेस्ट के बफर झोन में आ रहा है. अब यह प्रकल्प फिर कई सालों के लिए अटक जायेगा. सरकार को इस मामले का हल निकालना चाहिए. सरकार के निर्णय में विषमता नहीं होनी चाहिए. जिस प्रकल्प को प्रशासकीय मान्यता सरकार ने दी, जिस प्रकल्प के लिए सरकार ने 5 साल तक निधि उपलब्ध करायी, यदि उस प्रकल्प की कीमत बढ़ी है या उसके काम में कोई अड़चन आयी है तो उसकी सुधारित प्रशासकीय मान्यता के संबंध में दो-ढाई साल तक प्रश्न विचाराधीन क्यों रहते हैं ? प्रश्नों का समाधान क्यों नहीं किया जाता है ? यह सब बातें होने की वजह से प्रकल्प की कीमत बढ़ती जाती है. कभी फोरेस्ट या अन्य कारण बताकर विदर्भ के प्रकल्पों को पीछे कर दिया जाता है. इस तरह से विदर्भ का बहुत भारी नुकसान होता है.

सभापति महोदय, सिंचन प्रकल्पों को पूरा करके आज विदर्भ को ऊपर लाया जा सकता है. विदर्भ की प्रगति एवं उन्नति केवल एक ही माध्यम से हो सकती है और वह केवल सिंचन का माध्यम है. विदर्भ के तमाम सिंचन प्रकल्प सुधारित प्रशासकीय मान्यता की वजह से अटके हुए हैं. मेरी जानकारी के मुताबिक महाराष्ट्र में सुधारित प्रशासकीय मान्यता के लिए जो प्रकल्प अटके हुए हैं, उनमें सर्वाधिक प्रकल्प हमारे विदर्भ के हैं. क्या यह विदर्भ पर अन्याय एवं अत्याचार नहीं है ? क्या विदर्भ के मामलों पर शासन को ध्यान नहीं देना चाहिए ? इस तरह की परिस्थिति होने से प्रकल्पों की कीमत बढ़ती है जिसकी वजह से हमारे विदर्भ का बहुत नुकसान होता है. सभापति महोदय, मेरा मंत्री महोदय से निवेदन है कि विदर्भ के अनुशेष, विदर्भ की प्रगति और उन्नति के संबंध में सरकार को जरुर गौर करना चाहिए. इतना कहते हुए मैं अपनी बात यहीं समाप्त करता हूं. धन्यवाद.

--------

...यानंतर श्री कांबळे

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे साहेबांनी म.वि.प. नियम 260 अन्वये अत्यंत महत्त्वाच्या विषयावर प्रस्ताव आणला आहे, त्यावर विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, विदर्भातील ज्वलंत प्रश्नांची जंत्री सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे साहेबांनी सभागृहात ठेवली आहे. महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर आजतागायत विदर्भाचा व मराठवाड्याचा अनुशेष शिल्लक आहे. शासनाविषयी चांगल्या प्रकारचा संदेश जावा, लोकांच्या मनातील संभ्रम दूर व्हावा, ही प्रमुख भावना सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे साहेबांची आहे. त्यामुळे अत्यंत विषण्ण अंत:करणाने त्यांनी हा प्रस्ताव मांडला आहे. निसर्गाचे एक चक्र आहे. सृष्टीचक्रात अनेकदा दुष्काळ पडत असतो, अतिवृष्टी येत असते,

( नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले....

आणि मोठ्या प्रमाणावर गारपीट नेहमी होत असते. त्याचा परिणाम हा त्या त्या विभागामध्ये झाल्याशिवाय राहत नाही. विदर्भात कधी अतिवृष्टी होते तर कधी दुष्काळसदृश परिस्थिती असते. या सर्व गोष्टींचे पर्यवसान अनुशेषात होते. राज्यकर्ते आपले आहेत, माती आपली आहे. आपली माती, आपली माणसे आहेत. त्यांच्या माध्यमातून या मातीचा उत्कर्ष होणे अभिप्रेत आहे. तो जर राज्यकर्त्यांनी हेतूत:, जाणीवपूर्णक केला तर मला खात्री आहे की, मराठवाडा व विदर्भाचा अनुशेष निश्चितपणे दूर झाल्याशिवाय राहणार नाही.

मंगळावर गेलेले यान हे काही दिवसांनी स्थिरस्थावर होणार आहे. या यानाच्या माध्यमातून तेथील मातीचे काही परीक्षण, अनुमान भविष्यामध्ये सादर होणार आहे. मंगळवरील मातीचे परीक्षण आपल्या हाती पडणार आहे. या पार्श्वभूमीवर विदर्भातील मातीचे परीक्षण करण्याचे काम कृषी खात्याने केले आहे काय, हा सगळ्यात महत्वाचा प्रश्न निर्माण होतो. म्हणून मातीचे परीक्षण करणे आवश्यक आहे. त्यामुळे मातीचा पोत, प्रतवारी समजू शकेल. कोणत्या भागात कोणते पीक घेतले पाहिजे याचा निष्कर्ष काढणे सोपे होईल. विदर्भातील विक्रमी उत्पादन वाढल्याशिवाय राहणार नाही. म्हणून मातीचे परीक्षण करण्यासाठी व शेतीचे पीक वाढण्यासाठी तालुकानिहाय, जिल्हानिहाय प्रयोगशाळा निर्माण केल्या तर त्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळू शकेल. शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती होऊ शकेल. पिकाची प्रतवारी व गुणवत्तेनुसार दर शेतकऱ्यांच्या हातामध्ये पडतील अशी मला खात्री आहे.

कृषी विभागाच्या माध्यमातून अनेक योजना मराठवाडा व विदर्भात राबविल्या जातात. त्यामध्ये शेत तळ्यांच्या योजनेचा समावेश आहे. मला शासनाला विनंती करावयाची आहे की, विदर्भातील शेत तळ्यांचा जो अनुशेष आहे तो तालुकानिहाय व जिल्हानिहाय काढला पाहिजे. हे समजून घेणे आवश्यक आहे. शेत तळ्यांचा फायदा अवर्षण व प्रवण क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात होतो. ज्यावेळी दुष्काळसदृश परिस्थिती व पाणी टंचाई असेल त्यावेळी या शेत तळ्यांचा फायदा अंतिमत: शेतकऱ्यांना होतो. विदर्भात ही योजना राबविली असेल तर शेतकऱ्यांना किती फायदा झ ाला आहे त्याची आकडेवारी शासनाने दिली पाहिजे.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

प्रा.सुरेश नवले.....

सन्माननीय जलसंपदा मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या माध्यमातून विदर्भातील 153 लघुपाटबंधारे प्रकल्पांची कामे अपूर्ण आहेत. हे सर्व प्रकल्प पूर्ण करण्यासाठी 2060 कोटी रुपयांची आवश्यकता आहे. हे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखला असेल तर या सभागृहाच्या माध्यमातून त्याची माहिती विदर्भातील जनतेला होणे जरुरीचे आहे.

नंतर श्री.शिगम.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले..

विदर्भ पाटबंधारे सिंचन विकास महामंडळाच्या योजना पूर्ण करावयाच्या असतील तर त्यासाठी 50 हजार कोटी रुपयांची आवश्यकता आहे. पुढील 5 वर्षामध्ये या योजना राज्य शासन पूर्ण करु शकले नाही तर 5 वर्षानंतर या योजना पूर्ण करण्यासाठी 1 लाख कोटी रुपयापेक्षाही अधिक निधी लागू शकेल. (घंटा वाजते).. सभापती महोदय, मी विदर्भातील प्रतिनिधी आहे. मला बोलण्यासाठी थोडा वेळ द्यावा.

सभापती महोदय, केन्द्र शासनाने भूसंपादनाचा कायदा केलेला आहे. त्यामुळे नवीन योजनांचा मार्ग अवघड होऊ बसलेला आहे. या भूसंपादन कायद्याचा फायदा शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर होणार आहे. परंतु गेल्या 15-20 वर्षापासून भूसंपादनाची रक्कम किती शेतकऱ्यांच्या हातात पडलेली नाही, किती शेतकऱ्यांना भूसंपादनाची रक्कम देणे बाकी आहे, किती प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत, किती प्रकरणामध्ये न्यायालयाने मोबदला वाढवून देण्याचे निर्देश दिलेले आहेत याची माहिती सभागृहाला मिळणे आवश्यक आहे. गोसीखुर्द प्रकल्पाला 27 वर्षे होऊ गेली आहेत. राज्य शासनाकडून शेतकऱ्यांना वीज जोडण्या दिल्या जातात. या वीज जोडण्यासाठी लागणारे ट्रान्सफॉर्मर, तारा तसेच आनुषंगिक साधने यासाठी शेतकरी स्वत:चे पैसे खर्च करतात. परंतु दुर्दैवाने शेतकऱ्यांनी केलेला हा खर्च विभागाने केलेला आहे असे अधिकारी दाखवितात. शेतक-यांच्या घामाचा पैसा, शेतकऱ्याच्या निढळाचा पैसा अशा प्रकारे अधिकारी घेत असतील तर अशा अधिकाऱ्यांना ताबडतोबीने बडतर्फ केले पाहिजे. महाराष्ट्रामध्ये अशा चार-दोन अधिकाऱ्यांवर कारवाई झाली तर या गोष्टींना निश्चितपणे आळा बसू शकेल.

तप उलटून गेलं
ताप कमी नाही झाला
गोट्या बदलत गेल्या
डाव नाही बदलला
चाल वजिराची होते
जीव प्याद्यांचा जातो

शेवटी मी एवढेच म्हणेन की,

प्रा. सुरेश नवले....

अधांरल्या झोपडीले

दुरून हसे बंगला

आमच्या अंधारल्या झोपडीला हे बंगले हसतात म्हणून अंधाऱ्या झोपडीचे रुपांतर बंगल्यामध्ये करण्यासाठी हा अनुशेष आपण दूर करावा अशी आग्रहाची विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ D/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 11:10

डॉ. रणजित पाटील (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी फार विस्ताराने बोलणार नाही. परंतु पाच-सात मिनिटामध्ये मी माझे विचार मांडणार आहे. अकोला करार झाला. त्यानंतर नागपूर करार झाला. आम्ही सेंट्रल प्रॉव्हिन्स आणि बेरार रिजनमध्ये राहात होतो. आमची राजधानी नागपूर होती. आम्हाला संयुक्त महाराष्ट्रामध्ये सामील करण्यात आल्यानंतर आमची राजधानी मुंबई झाली. या भागातील मराठी भाषिक माणसे आता आपण महाराष्ट्राच्या सामाजिक आणि आर्थिक प्रवाहात सामील होऊ या दृष्टीने मुंबइकडे पाहू लागली.वंदनीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले होते की, कोणतेही राजकीय स्वातंत्र्य हे सामाजिक किंवा आर्थिक स्वातंत्र्याशिवाय अपूर्ण रहाते. याची प्रचिती आम्हाला येऊ लागली. राजकीय स्वातंत्र्यामध्ये विदर्भ हा महाराष्ट्रामध्ये सामील झाला. पण सामाजिक आणि आर्थिकदृष्टया आम्ही मुख्य प्रवाहात नाही, आम्हाला सावत्र भावाची वागणूक दिली. आम्ही अजून या मुख्य प्रवाहात सामील होऊ शकलो नाही याची सल आमच्या मनामध्ये राहिली. हे मी का बोलतो. राज्याच्या दरडोई उत्पन्नाचा आपण विचार केला तर आपणास याची प्रचिती येईल. विदर्भ, मराठवाडयाच्या दरडोई उत्पन्नाचा राज्याच्या दरडोई उत्पन्नाच्या तुलनेत विचार केला तर आपणास हे समजून येईल. विदर्भाचे सरासरी दरडोई उत्पन्न 55 ते 60 हजार रुपयाच्या आसपास आहे. त्यातही अमरावती विभागातील जिल्ह्यांचे दरडोई उत्पन्न 50 ते 55 हजार रुपयाच्या आसपास आहे. एकीकडे 45 ते 50 हजार रुपयाच्या दरम्यान दरडोई उत्पन्न असणारे जिल्हे आणि दुसरीकडे 70 हजार ते सव्वालाख रुपयापर्यंत दरडोई उत्पन्न असणारे जिल्हे यांचा विचार केला तर...

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील....

कोठे तरी समाजिक आणि अर्थिक प्रगती दिसून येते. अशाच प्रकारची प्रचिती आपल्याला केसरी आणि पिवळे कार्ड धारकांची सरासरी काढली तर तेथे सुध्दा ही गोष्ट प्रतिबिंबित होते. इकडचे 65 टक्के लोकांची उपजीविका शेती किंवा शेतीपूरक उद्योगावर चालत होती. परंतु आता त्या शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत हालाखीची झालेली आहे. आपण नुकतेच राज्याचे सुवर्ण महोत्ववी वर्ष साजरे केले. आपल्याला स्वातंत्र्य मिळून सहा दशके झाली आहेत. विदर्भात अकोला, वाशिम, यवतमाळ, बुलढाणा, अमरावती, वर्धा हे जिल्हे शेतकऱ्यांचे आत्महत्याग्रस्त जिल्हे म्हणून उदयास आलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. राजेंद्र जैन यांनी मघाशी सांगितले की, विदर्भात साधन संपत्ती आहे, वन मोठया प्रमाणात आहे, मोठ-मोठ्या नद्या आहेत. खनीज मोठया प्रमाणात आहेत. तरी विदर्भाची परिस्थिती का चांगली होत नाही याचा विचार करणे खूप आवश्यक आहे. अमरावती विभागातील उत्तरेकडील अर्धाअधीक पट्टा हा खारपाणपट्टा म्हणून संबोंधला जातो. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी सांगितले की, अमरावतीकडील उत्तरेचा भाग, अकोला जिल्हयातील बराचसा भाग, बुलढाणा जिल्हयातील उत्तरेकडचा भाग हा खारपाणपट्टयामध्ये येतो. या खारपाणपट्टयामध्ये जमिनीचा भूस्तर अतिशय मऊ आहे. तेथील जमिनीमधील पाणी पिण्यालायक नाही. परंतु त्या विभागातून पूर्णा आणि तापी खोरे गेलेले आहेत. या खोऱ्यामधून पूर्णा नदी वाहते. तेथील जमिनीचा भाग अतिशय सुपीक आहे. ब्लॅक कॉटन सॉईल म्हणून या भूभागाला संबोधले जाते. या भूभागामध्ये चांगला कापूस उत्पादित होतो. या ठिकाणची जमीन कापूस पिकासाठी अतिशय पोषक आहे हे सिध्द झालेले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात या भूभागाला "वऱ्हाड-सोन्याची कुऱ्हाड" म्हणून संबोंधले जावयाचे. त्याच विदर्भातील शेतकऱ्यांची अत्यंत हालखीची परिस्थिती निर्माण झालेली आहे. दुर्देवाने असे दिसून येते की, या खारपाणपट्टयामध्ये स्वातंत्र्यानंतर सिंचनासाठी कोणत्याही प्रकारचे प्रयत्न झालेले नाहीत.

सभापती महोदय, या विभागात पाणी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने माननीय श्री.अजितदादा पवार यांच्याकडे जलसंपदा खाते असताना त्यांनी प्रथम प्रयत्न केला. त्यांना मी धन्यवाद देतो. पूर्णा खोरे आणि तापी खोरे येथे बॅरेजेस करण्यासाठी पहिला प्रयत्न त्यांनी केला आणि साखळी पध्दतीने पूर्ण खोऱ्यांमध्ये बॅरेजेस् व्हावीत या दृष्टीने पेढी, उमा, काटेपूर्णा, पूर्णा,

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील....

नेरधामणा या ठिकाणी बॅरेजेस् उभारण्याचे प्रयत्न केले. नेर धामणा येथील बॅरेजला माननीय राज्यपालांनी गेल्या वर्षी भेट सुध्दा दिली आहे. ही सगळी बॅरेजेस् अतिशय कमी खर्चात होणारी आहेत. या ठिकाणच्या बॅरेजेस् साठी जमीन अतिशय अल्प प्रमाणात लागते. 50 कोटी पासून 175 कोटी रुपयांपर्यंतच्या किंमतीत ही बॅरेजेस् पूर्ण होणारी होती. ती बॅरेजेस् 2012 पर्यंत पूर्ण व्हावयाची होती. परंतु आता 2014 हे वर्ष उजाडले तरीही ती कामे अद्याप पूर्ण झालेली नाहीत. काही ठिकाणी भूभाग मऊ आहे. काही बॅरेजची संकल्पचित्रे चुकीची तयार केली गेली. काही बॅरेजेसच्या कामांमध्ये विलंब झाला आहे.सुधारित प्रशासकीय मान्यता इत्यादीमुळे बॅरेजेसची कामे अपूर्ण अवस्थेत आहेत. 75 कोटी रुपयांपर्यंतचे जे प्रकल्प होते त्या प्रकल्पांच्या किंमती 500 ते 600 कोटी रुपयांपर्यंत गेलेल्या आहेत. या प्रकल्पांसाठी ज्या शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी उपलब्ध करुन दिल्या आहेत ते प्रकल्पग्रस्त शेतकरी गेल्या पाच ते सात वर्षापासून प्रकल्प कधी पूर्ण होतील याकडे पहात आहेत. एखादाच प्रकल्प या विभागात पूर्ण झाला असेल. अप्पर वर्धा प्रकल्पाचे उदाहरण देऊ इच्छितो. या प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे पण लहान व थोडीशी मोठी कामे अपूर्ण आहेत, त्यामुळे त्या प्रकल्पातील पाणी शेतकऱ्यांना वापरता येत नाही. त्या शेतकऱ्यानी त्या प्रकल्पासाठी जमिनी दिलेल्या आहेत, त्या ठिकाणी पाणी साठलेले आहे. शेतकऱ्यांनी दिलेल्या जमिनीचा मोबदला दिला गेला गेलेला नाही. सरकारच्या धोरणाप्रमाणे एकेक उद्योग सुरु झालेले आहेत. अपर वर्धा प्रकल्पावर इंडिया बुल्स कंपनीने सोफिया नावाचा वीज निर्मितीचा प्रकल्प सुरु केलेला आहे.

सभापती महोदय, मी या सभागृहामार्फत माननीय मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, शेतकऱ्यांनी वीज बील भरले नाही तर त्याचे वीज कनेक्शन कापले जाते. शेतकऱ्यांनी पाणीपट्टी भरली नाही तर त्याचे पाणी बंद केले जाते.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील.....

आमची अशी माहिती आहे की, सोफिया प्रकल्पाकडून 132 कोटी रुपये जलसंपदा विभागारा करापोटी येणे बाकी आहेत. या सभागृहाला या संदर्भात सद्य:स्थिती काय आहे याची सविस्तर माहिती मिळाली पाहिजे. दिरंगाईमुळे कंपनीने कोर्टात दावा दाखल केला आहे. मॅटर सबज्युडिस झालेले आहे. त्यांनी करार केला असेल व त्या करारापोटी त्यांचे जे देणे असेल ते कंपनी देत नसेल तर शासनाने या कंपनीवर जरब बसविण्याची गरज आहे.

सभापती महोदय, हीच परिस्थिती वीज पुरवठ्याबाबतची आहे. माननीय सदस्य श्री.राजेंद्र जैन यांनी सविस्तरपणे मुद्दा मांडला आहे. ॲडव्हान्स पेड पेंडिंग आणि ॲडव्हाईज पेड पेंडिंग यामध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. आमच्या विभागामध्ये 50 हजार कनेक्शन्स पेंडिंग आहेत. वृत्तपत्रात काल अशी बातमी प्रसिध्द झाली की, फक्त 127 रोहित्रांची गरज आहे. एका जिल्हयाची ही परिस्थिती नाही. एका रोहित्रामधून कॅपॅसिटीपेक्षा जास्त वीज पुरवठा न करता रोहित्रांची संख्या वाढवावी लागेल. स्थानिक जनतेचा वीज पुरवठा मागण्याचा सांविधानिक अधिकार आहे. मागणी केल्यानंतर पुरवठा दिला जात असल्यामुळे त्याचा परिणाम रोहित्रावर होतो. परिणामी त्यांची चूक नसताना त्यांना रस्त्यावर उतरुन आपल्या भावना प्रकट कराव्या लागतात आणि त्यामध्ये शासनाचे नुकसान होते. ही परिस्थिती निर्माण होणार नाही याबाबत शासनाने प्रयत्न करावा.

सभापती महोदय, केंद्र शासनाने एआयबीपी ही एक चांगली योजना आणली आहे. अकोला येथे अमरावती विभागासाठी बैठक घेण्यात आली. लघुपाटबंधारे विभागामार्फत कृषीकरिता 1750 कोटी रुपयांच्या योजनेमध्ये सुरुवातीला 5 जिल्हयांचा समावेश होता, आता 11 जिल्हयांचा समावेश केला आहे. हे सर्व आत्महत्याग्रस्त जिल्हे आहेत. याची एक यादी माझ्याकडे आहे. त्या बैठकीला तत्सम अधिकारी उपस्थित होते म्हणून मी त्यांच्याकडे सहज विचारणा केली होती. अधिकाऱ्यांची एक यादी आम्ही तयार केली आहे. त्यामध्ये 99 टक्के अधिकारी प्रभारी किंवा अतिरिक्त पदभार असलेले कार्यरत आहेत. 3250 कोटी रुपयांचा खर्च कालमर्यादेत करण्यासाठी पुरेसे सक्षम अधिकारी नेमले जात नसतील तर मला वाटते या योजनेला गतिमानता येणार नाही आणि योजनेचा निधी वेळेवर खर्च होणार नाही. 3250 कोटी रुपयांचा खर्च झाल्यास या भागाचा कायापालट होऊ शकतो. खास करुन खारपाण पट्ट्याला ही योजना लागू झाली आहे. आपल्याला

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील.....

या विभागाची प्रगती करावयाची असेल, या विभागाला कुपोषित बालक म्हणून काही जास्त द्यावयाचे असेल तर कालबध्द मर्यादेत विकास साधावा लागेल एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे (जलसंपदा {कृष्णा खोरे महामंडळ वगळून} मंत्री) : सभापती महोदय, विदर्भाच्या दृष्टिकोनातून संवेदनशील असलेल्या महत्वाच्या विषयावर सभागृहाचे ज्येष्ठ माननीय सदस्य सर्वश्री माणिकराव ठाकरे, मोहन जोशी, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री रमेश शेंडगे, भाई जगताप, संजय दत्त, हेमंत टकले, सुभाष चव्हाण यांनी विधानपरिषद नियम 260 अन्वये या ठिकाणी प्रस्ताव मांडला आहे.

सभापती महोदय, हा प्रस्ताव उपस्थित करताना सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे त्याचबरोबर माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस, शिवसेना पक्षाचे ज्येष्ठ नेते माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, माननीय सदस्य श्री. राजेंद्र जैन, प्रा.सुरेश नवले, डॉ.रणजित पाटील यांनी या ठिकाणी चर्चेमध्ये भाग घेतला. आजच्या चर्चेच्या माध्यमातून या ठिकाणी बोलत असताना मी आकडेवारीच्या तपशीलात जाणार नाही. गेली अनेक वर्षे सातत्याने विदर्भाच्या या महत्वपूर्ण विषयावर चर्चा होत असताना अनुशेषाच्या संदर्भात राज्य सरकारने वेळोवेळी पावले उचलली असून सभागृहात प्रदीर्घ चर्चा झालेली आहे.

नंतर आर.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे...

नागपूर करार होत असताना स्वर्गीय श्री.यशवंतराव चव्हाण साहेबांनी वैदर्भीय व मराठवाड्यातील जनतेला अभिवचने दिली होती. त्याची पूर्तता करण्याच्या दृष्टीने काय काय पावले उचलली गेली याचा अनेक वेळा वेगवेगळ्या पातळीवर सखोलपणाने विचार निश्चितपणाने झाला. 1980 ते 1985 च्या दरम्यान विदर्भातील जनतेमध्ये खूप मोठ्या प्रमाणावर भावना वाढीस लागली होती. त्यावेळी स्व.श्री.वसंतदादा पाटील हे मुख्यमंत्री असताना त्यांनी दांडेकर समितीची नियुक्ती केली. या समितीला वैधानिक अधिकार नव्हता, ही वस्तुस्थिती आहे. विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, खानदेश या परिसरासह मी ज्या कोकण प्रांताचे प्रतिनिधी करतो तेथील सिंचन, आरोग्य, शिक्षण, दळणवळण, उद्योग इत्यादी वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये काय परिस्थिती आहे याचा आढावा घेण्यासाठी दांडेकर समितीची नियुक्ती झाली. त्या काळातील आकडेवारी पाहिली तर कोकणातील अनुशेष 38.82 टक्के होता. उत्तर महाराष्ट्रामध्ये 39 टक्के होता. पुणे परिसरात 23 टक्के होता. उर्वरित महाराष्ट्रामध्ये कोकण, उत्तर महाराष्ट्र व पुणे यांचा समावेश होतो. मराठवाड्यामध्ये 106 टक्क्यांच्या आसपास अनुशेष होता. नागपूर व अमरावती परिसरामध्ये 114 टक्क्यांच्या आसपास अनुशेष होता. 1994 साली अनुच्छेद 371 (2) अन्वये वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्याचा निर्णय झाला.

नेहमी असेच बोलले जाते की, पश्चिम महाराष्ट्राच्या नेतृत्त्वाने विदर्भ, मराठवाड्याकडे दुर्लक्ष केले. दांडेकर समितीची नियुक्ती केली तेव्हा श्री.वसंतदादा पाटील मुख्यमंत्री होते. 1994-95 मध्ये वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला तेव्हा आदरणीय श्री.शरद पवार मुख्यमंत्री होते. सन 1994 साली मा.राज्यपाल महोदयांच्या मार्गदर्शनातून सदर वैधानिक महामंडळे निर्माण करण्याचा निर्णय झाला. माननीय राज्यपालांच्या दिनांक 8.11.1995 रोजीच्या आदेशान्वये वैधानिक विकास मंडळासाठी एकत्रित आणि निर्देशांक अनुशेष समिती गठित करण्यात आली. आधी दांडेकर समिती निर्माण करण्यात आली होती. या समितीला वैधानिक अधिकार नव्हता. परंतु, 1995 साली जी समिती नेमण्यात आली होती तिला वैधानिक अधिकार निश्चितपणे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे...

होता. त्यामुळे अनुशेषाच्या संदर्भातील निश्चित आकडेवारी राज्याच्या जनतेसमोर यावी असा प्रामाणिकपणे हेतू त्या कालखंडामध्ये होता. एका बाजूला त्या समितीचा अहवाल आला. त्याच वेळी वैधानिक विकास मंडळाबरोबर वेगवेगळी विकास महामंडळे स्थापन करण्याचा निर्णय घेतला गेला. पाटबंधारे विभागाला गती देण्याच्या दृष्टीकोनातून 1996 ते 1998 या कालखंडामध्ये पाच पाटबंधारे विकास महामंडळांची स्थापना करण्यात आली. यापैकी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, तापी खोरे विकास महामंडळ, या दोन महामंडळांना प्रशासकीय व सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार कायद्यान्वयेच त्या कालखंडामध्ये देण्यात आले होते. त्या आधी विदर्भामध्ये कायद्यान्वये अधिकार नव्हते. गोदावरी खोऱ्यामध्ये देखील हे अधिकार कायद्यान्वये देण्यात आले नव्हते. कोकणामध्ये देखील कायद्यान्वये अधिकार दिले गेले नव्हते. परंतु, या दोन महामंडळांना कायद्यान्वये अधिकार दिले होते. सन 2000 च्या आसपास माननीय राज्यापालांच्या निदेशनानुसार सूत्र ठरविण्याचा निर्णय राज्याच्या मंत्रिमंडळाने घेतला. लोकशाही आघाडीचे सरकार पहिल्यांदा राज्याच्या सत्तेवर आले तेव्हा श्री.विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली नागपूर अधिवेशनामध्ये माननीय राज्यपालांचे सूत्र मान्य करून समन्यायी निधीचे वाटप करण्यात आले. एवढेच नव्हे तर अनुशेष निर्मूलनासाठी ठोस पावले उचलण्यासंबंधी कार्यवाही करण्यासंबंधीचा निर्णय त्या कालखंडामध्ये झाला. त्यावेळी माननीय राज्यपाल महोदयांनी दिनांक 15.12.2001 रोजी एकंदरीत रूपये 5501 कोटी शिल्लक अनुशेषासंबंधी निदेश प्रसृत केले. हे करीत असताना प्रकल्पांना सुधारित मान्यता देण्यासंबंधीच्या अधिकाराचे देखील विकेंद्रीकरण करावे, महामंडळाना काही प्रमाणात अधिकार द्यावेत अशा प्रकारे देखील आदेशित केले होते. हे सांगण्याचा मथितार्थ एवढाच आहे की, या प्रश्नावर विदर्भातील लोकांच्या भावना खूप तीव्र झाल्या होत्या. राज्य सरकारने निर्धारित कालावधीमध्ये विदर्भ, मराठवाड्यातील सिंचनाचा अनुशेष दूर करण्यासाठी वैधानिक स्वरूपाची निग्रहपूर्वक ठोस पावले उचलली आहेत.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे.....

2001 पासून सांविधानिक अधिकार प्राप्त झाल्यानंतर सन 2010-2011पर्यंत तुम्ही काय केले अशी विचारणा आम्हाला केली जाते. गेल्या 10 वर्षामध्ये विदर्भ विकास महामंडळाला मिळालेला निधी कृष्णा खोरे विकास महामंडळाकडे वळवला गेला असा आरोप आमच्यावर केला जातो. गेल्या दोन वर्षापासून या विषयावर विधानसभा, विधान परिषदेत चर्चा झालेली असून या संदर्भात नागपूर येथे बैठक आयोजित करण्यात आली होती त्यावेळेस हा प्रश्न लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून तसेच पत्रकार परिषदेतही उपस्थित करण्यात आला होता.

सभापती महोदय, मी विधान परिषदेच्या मार्फत वैदर्भिय जनतेला नम्रपणे सांगू इच्छितो की, गेल्या 10 वर्षात एक पैसा देखील कृष्णा खोरे महामंडळाकडे किंवा इतर महामंडळाकडे वळविण्यात आलेला नाही. माननीय राज्यपाल महोदयांच्या सूत्रानुसार विदर्भ महामंडळांला जो निधी आला तो विदर्भ महामंडळामध्येच राहिला आहे. विदर्भ महामंडळातील किती निधी खर्च झाला तसेच किती प्रकल्पाची कामे पूर्ण झाली याचे मी सविस्तर विवेचन करणार आहे. परंतु विदर्भ महामंडळाचा निधी दुसऱ्या महामंडळात वळविण्यात आला, दुसरीकडची कामे करण्यावर साठी भर देण्यात आला असे जे चित्र निर्माण केले जाते ते अतिशय चुकीचे आहे. राजकीय अभिनिवेशासाठी आपल्याला अशा प्रकारे बोलावे लागत असेल परंतु राज्यातील जनतेसमोर वस्तुस्थिती येणे अत्यंत महत्वाचे असल्यामुळेच मी सुरुवातीलाच यासंदर्भात खुलासा करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सभापती महोदय, सन 2002-2003 मध्ये विदर्भाला 354 कोटी रुपये, मराठवाडयाला 320 कोटी रुपये तर उर्वरित महाराष्ट्राला 1194 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता. सन 2003-2004 मध्ये विदर्भाला 501 कोटी रुपये,मराठवाडयाला 350 कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात आले होते. सन 2004-2005 मध्ये विदर्भाला 536 कोटी रुपये तर सन 2005-2006 मध्ये विदर्भाला 1348 कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात आले. सन 2006-2007 मध्ये विदर्भाला 1647 कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात आले होते. सन 2007-2008 मध्ये विदर्भाला 2161 कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात आले होते. (अडथळा) श्वेत पत्रिकेमध्ये विदर्भ तसेच मराठवाडयाला किती निधी देण्यात आलेला आहे याची वर्ष निहाय माहिती देण्यात आलेली आहे.

..2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे.....

विदर्भ विकास महामंडळ, गोदावरी विकास महामंडळ तसेच कृष्णा खोरे विकास महामंडळ, तसेच उर्वरित महामंडळाला मिळालेला निधी तसेच तापी खोरे पाटबंधारे विकास महामंडळ तसेच कोकण विकास महामंडळाला मिळालेला निधी याची सविस्तर माहिती श्वेतपत्रिकेमध्ये देण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, गेल्या 10 वर्षामध्ये विदर्भ विकास महामंडळाला 20252 कोटी रुपये तर मराठवाडा विकास महामंडळाला 10556 कोटी रुपये मिळालेले आहेत व उर्वरित महाराष्ट्राला 21804 कोटी रुपये मिळालेले आहेत. तापी खोरे महामंडळ तसेच कोकण सिंचन महामंडळाचाही यामध्ये समावेश आहे.

सभापती महोदय, गेल्या 10 वर्षामध्ये अमरावती विभागात 63 प्रकल्प पूर्ण करण्यात आले व त्यातून चांगल्या प्रकारे सिंचन क्षमता निर्माण झाली. नागपूर विभागात 22 प्रकल्प पूर्ण झाले आहे. यासंदर्भातील सर्व माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास तयार आहे.

सभापती महोदय, प्रकल्प अपूर्ण का राहिले याची कारणमीमांसा सर्वांनी समजून घेण्याची आवश्यकता आहे. काही धरणांची कामे पूर्ण झाली, काही कालव्यांची कामे पूर्ण झाली तर काही ठिकाणी वितरण व्यवस्था प्रणाली प्रगतीपथावर असून त्यांचीही माहिती मी देणार आहे. अमरावतीमध्ये 22 तर नागपूर प्रदेशात 19 असे एकंदरीत 41 प्रकल्पांचे काम प्रगतीपथावर आहेत. अमरावती मध्ये एकंदर 127 तर नागपूर प्रदेशात 33 कामे प्रगतीपथावर असून जवळपास 107 प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत. वन जमिनीच्या अडचणीमुळे एकंदर 34 प्रकल्प अडचणीत आलेले आहेत. अमरावती परिसरातील 216 प्रकल्प प्रत्यक्षात सुरु असून 104 प्रकल्प नागपूर प्रदेशात सुरु आहेत. एकंदर 320 प्रकल्प महामंडळाची स्थापना झाल्यापासून सुरु आहेत.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे...

सभापती महोदय, एकूण किती प्रकल्प पूर्ण झाले त्याची माहिती देतो. एकूण तीन मोठे प्रकल्प, 13 मध्यम प्रकल्प आणि 80 लघु प्रकल्प पूर्ण झाले. या प्रकल्पांची नावे सांगायची झाली तर ती खूप मोठी यादी होईल. तरी देखील मी काही नावे वाचून दाखवितो. उमरेड मधील निम्नवणा प्रकल्प, अकोलामधील वाण प्रकल्प, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांच्या दिग्रसमधील अरुणावती प्रकल्प या प्रकल्पांची कामे पूर्ण झाली आहेत. मध्यम प्रकल्पाची व लघु प्रकल्पांची यादी पटलावर ठेवण्यास तयार आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर कामे झालेली आहेत.

सभापती महोदय, 84 प्रकल्पांच्या माध्यमातून 105 अब्ज दक्षलक्ष घनमीटर साठवण क्षमता निर्माण झाली आहे. लघु प्रकल्पांच्या माध्यमातून किती साठवण क्षमता झाली त्याची आकडेवारी देखील माझ्याकडे आहे. या माध्यमातून 11 उपसा सिंचन योजना कार्यान्वित करण्याचा प्रयत्न झ ााला. अशा प्रकारे या विभागामध्ये सिंचनाचे काम करण्याचा प्रयत्न झाला.

सभापती महोदय, महामंडळाच्या स्थापनेनंतर एकंदरीत 3 लाख 92 हजार हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली. मागील तीन वर्षात 63 हजार हेक्टर क्षेत्रावर सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली. हे सर्व करीत असताना आम्हाला जरुर काही अडचणी आल्या.

सभापती महोदय, आपण महत्वाचे प्रकल्प हाती घेतो, त्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करुन देतो, त्यावेळी त्यातून किती उपलब्धी झाली, किती साठवण क्षमता निर्माण झाली, प्रत्यक्षात किती सिंचन झाले असे प्रश्न आपणास पडणे स्वाभाविक आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करुन दिल्यानंतर जे काही अपेक्षित होते ते पूर्ण करण्याच्या दृष्टीने निश्चितपणे पावले उचलली गेली. परंतु आम्हास अपेक्षित असलेले यश आले नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्याची सुध्दा काही कारणे आहेत.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी कायद्याचा वापर करुन सन 2003 मध्ये विदर्भ सिंचन विकास महामंडळाला प्रशासकीय अधिकार देण्यात आले. मला येथे सांगितले पाहिजे की, तापी खोरे विकास महामंडळ आणि कृष्णा खोरे विकास महामंडळाला अधिकार होते. परंतु विदर्भ सिंचन विकास महामंडळाला अधिकार देण्यात आले नव्हते. तेव्हा त्या संदर्भात येथे चर्चा झाली.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे...

वित्त विभागाने पाच कोटी रुपयांपर्यंत अधिकार सीमित केले आहेत अशी चर्चा सभागृहात झाली. त्यावेळी चर्चेत सहभागी असणारे सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी हे येथे उपस्थित नाहीत. तत्कालीन सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी सुध्दा अनुशेषासंबंधी सरकारला नेहमीच धारेवर धरले होते. आकडेवारीच्या माध्यमातून विदर्भाच्या प्रश्नाला सातत्याने वाचा फोडली. या प्रश्नावर त्यांनी खूप पोटतिडिकीने आपले विचार मांडले होते. त्यावेळी सभागृहात एकमुखाने भूमिका मांडण्यात आली की, इतर महामंडळाला कायद्याने अधिकार दिलेले असतील, विदर्भाचा अनुशेष मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे समन्यायी वाटप करायचे असेल तर विदर्भ सिंचन महामंडळाला देखील अधिकार दिले पाहिजेत. आपण ही भूमिका सभागृहात मांडली आणि माननीय राज्यपालांकडे देखील मांडली. आपली ही भूमिका मंत्रिमंडळाने मान्य केली. सन 2003 नंतर विदर्भ सिंचन विकास महामंडळाला आणि इतर महामंडळाला सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार प्राप्त झाले.

सभापती महोदय, या ठिकाणी असे सांगण्यात आले की, सन 2006 ते 2008 या कालावधीत अनेक प्रकल्पांना सुधारित मान्यता देण्यात आली. आपण काही वेळेला दोन्ही बाजूने बोलतो. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी मघाशी जे येथे सांगितले ते सांगतो. मी त्यांच्यावर टीका करीत नाही. त्यांनी सुरुवातीला सांगितले की, विदर्भात औष्णिक प्रकल्प बंद पडत आहेत आणि त्या ठिकाणी वीज निर्मिती होऊन देखील वीज घेतली जात नाही. त्यानंतर त्यांनी असे वक्तव्य केले की, विदर्भातील बहुतांश पाणी औष्णिक प्रकल्पासाठी दिले गेले. एका बाजूला प्रकल्प होत नाही असे सांगण्यात आले तर दुसऱ्या बाजूला प्रकल्प थांबले आहेत, प्रकल्पातील वीज घेतली जात नाही असे सांगण्यात आले. त्यांनी पुढे असेही सांगितले की, विदर्भातील पाणी पळवून ते औष्णिक प्रकल्पाला दिले. त्यांनी विरोधाभासाची भूमिका मांडली. आठ-दहा वर्षापूर्वी अधिकार नव्हते त्यावेळी अधिकार देण्याच्या बाबतीत बोललो आणि अधिकार दिल्यानंतर अधिकाराचा वापर करुन सुधारित प्रशासकीय अधिकार देण्याचा चांगला निर्णय श्री.अजित पवार साहेबांच्या कालावधीत घेतला गेला. ज्यांच्या हेतूबद्दल शंका घेण्यात आली त्यांनी

श्री.सुनील तटकरे...

अधिकार दिले, त्याचा वापर केला तरी सुध्दा बोलायचे. अधिकार देऊन त्याचा वापर केला नाही तर निष्क्रियतेने तुम्ही या भागाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करता अशा प्रकारच्या राजकीय भावना राजकीय अभिनिवेश व्यक्त करुन बोलायचे हे योग्य नाही. अशी दुटप्पीपणाची भूमिका घेऊन विदर्भाच्या प्रश्नाला न्याय देता येणार नाही.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे....

माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांच्याकडे जलसंपदा विभाग असताना त्यांनी जरुर विदर्भातील प्रकल्पांना जास्तीत जास्त न्याय देण्याचा प्रयत्न केला. 10 वर्षांच्या कालखंडात विदर्भातील प्रकल्पांसाठी 20 हजार कोटी रुपये मिळाले. 2003 मध्ये मान्यता देण्याबाबतचे अधिकार आले त्यावेळी प्रकल्पांची संख्या नगन्य होती. अधिकार देऊनही त्या भागात प्रकल्प कमी होते. त्या वेळी मराठवाड्यात अधिक प्रकल्प असतील, कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळात अधिक प्रकल्प असतील, तापी खोरे पाटबंधारे महामंडळात अधिक प्रकल्प असतील आणि विदर्भात प्रकल्प नसतील तर ते योग्य ठरणारे नव्हते. त्यामुळे अमरावती, नागपूर विभागातील काही प्रकल्प तातडीने हाती घेण्याच्या दृष्टिकोनातून त्या वेळी गती देण्याचा प्रयत्न झाला. त्यातून सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रयत्न करण्यात झाला. मी सांगू इच्छितो की, कोणत्याही प्रकल्पाचा प्रस्ताव एकाच दिवशी तयार होत नाही. त्याची खूप मोठी प्रक्रिया आहे. त्या प्रकल्पाचे सर्वेक्षण, अन्वेक्षण केले जाते. कनिष्ठ अभियंता प्रकल्पाच्या जागेची पाहणी करुन अंदाजपत्रक तयार करतात. उप अभियंता, कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता, मुख्य अभियंता यांच्याकडून तो प्रस्ताव महामंडळाकडे सादर केला जातो. ही दीर्घकालीन प्रक्रिया आहे. एकाच वेळी विदर्भातील सर्व प्रकल्प हाती घेता यावेत हा आमचा उद्देश होता. माननीय पंतप्रधान आणि केंद्रीय कृषी मंत्र्यांनी विदर्भातील आत्महत्याग्रस्त भागाला भेट दिल्यानंतर त्या शेतकऱ्यांना न्याय देता यावा म्हणून माननीय पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी पंतप्रधान पॅकेज जाहीर केले. माननीय पंतप्रधानांनी पॅकेज दिल्यानंतर किंबहुना ते पैसे मिळाल्यानंतर प्रकल्पाची कामे गतीने सुरु करण्यासाठी धाडसी निर्णय घेण्याची आवश्यकता होती. दरम्यान प्रशासकीय आणि सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचे अधिकार देण्याचा निर्णय घेण्यात आला. परंतु त्याचे पुढे काय झाले ? सरकारने मोठ्या प्रमाणावर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ते हाती घेतले. या बाबतचा अचूक उल्लेख सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस आणि सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी केला. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

महोदय, वन विभागाच्या जमिनीच्या अडचणींमुळे विदर्भातील 25-30 टक्के प्रकल्पांची कामे थांबली आहेत. काही मोजक्याच प्रकल्पांना वन विभागाकडून मान्यता मिळाली आहे. वन विभागाच्या जमिनीवर जे प्रकल्प आहेत त्या प्रकल्पासाठी एनपीव्हीपोटी अंदाजे 450-500 कोटी





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे....

रुपये भरले आहेत. वन विभागाची परवानगी मिळण्यात जाणारा कालावधी किमान 4-5 वर्षांचा असतो. वन विभागाकडून प्रकल्पाला मान्यता मिळाल्यानंतर एनपीव्हीची रक्कम भरली जाते. ती रक्कम भरल्यानंतर अंतिम मान्यता मिळण्यासाठी पुन्हा एक-दोन वर्षांचा कालावधी जातो. त्यानंतर पुन्हा नवीन वर्षाच्या दराने एनपीव्हीची रक्कम वाढवून येते. राज्याकडून एवढ्या मोठ्या प्रमाणावर एनपीव्हीची रक्कम भरुन सुध्दा निम्म्यापेक्षा जास्त प्रकल्प वन विभागाच्या जमिनीमुळे रखडलेले आहेत. वन विभागाच्या अडचणींमुळे जवळपास 30-35 प्रकल्पांना मान्यताच मिळणार नाही असे केंद्रीय वन विभागाने राज्य सरकारला कळविले आहे. मुळात हे मोठे प्रकल्प आहेत. या प्रकल्पांची एनपीव्हीची रक्कमही मोठी आहे. त्यामुळे या संदर्भात काही तरी धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल.

विदर्भातील किती प्रकल्प अपूर्ण राहिले आहेत, किती प्रकल्पांचे प्रस्ताव प्रस्तावित आहेत ही आकडेवारी ठेवावयाची झाल्यास, जे प्रकल्प वन विभागाच्या धोरणामुळे कधीच होऊ शकणार नाहीत ते प्रकल्प कागदावर ठेवणे उचित होणार नाही. परंतु सरकारला तसे बोलून चालणार नाही. हे प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने निर्धारपूर्वक पावले उचलणे गरजेचे आहे. वन जमिनीवरील प्रकल्पांच्या बाबतीत मी आणि इतर मान्यवरांनी अनेकदा बैठका घेतल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे हे ज्येष्ठ सदस्य आहेत. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आपल्या भाषणात उल्लेख केला की, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस पक्षाच्या प्रदेशाध्यक्षांनी हा प्रस्ताव मांडलेला आहे. महोदय, आमच्या विभागाच्या ज्या अडचणी आहेत त्या सोडविण्यासाठी सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांची आम्हाला नक्की मदत होईल, असा विश्वास मला वाटतो. वन विभागाच्या अडचणींबाबत मी त्यांना विनंती करतो की, त्यांनी याबाबत माननीय वन मंत्री डॉ.पतंगराव कदम यांच्यासोबत सुध्दा चर्चा करावी. मी सुध्दा माननीय वन मंत्र्यांशी चर्चा केलेली आहे. कदाचित माझ्यापेक्षा त्यांच्या शब्दाला जास्त वजन आहे. वन विभागाकडून विलंबाने परवानगी मिळत असल्यामुळे प्रकल्पाची किंमत वाढते. प्रकल्पाची किंमत वाढल्यानंतर पुन्हा त्यावर वेगळा आक्षेप घेण्याची आपली नेहमीची सवय आहे. त्यातून राजकीय हेतू साध्य केला जातो की काय अशी शंका अनेक वेळा निर्माण केली जाते.

महोदय, वन जमिनीचा प्रश्न हा अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यापेक्षा अतिशय महत्त्वाचा प्रश्न हा भूसंपादन आणि पुनर्वसनाचा आहे. गेल्या काही वर्षांत भूसंपादनामुळे रखडलेल्या प्रकल्पांची संख्या खूप जास्त आहे. नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे ....

अनुशेष निर्मूलन कार्यक्रमांतर्गत असणाऱ्या प्रकल्पांची संख्या मोठी आहे. 102 प्रकल्प अनुशेष निर्मूलन कार्यक्रमात आहेत. सन 2012-13 मध्ये 33 प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजित होते. आजमितीस जवळपास 10 प्रकल्प प्रक्रियावस्थेत आहेत. वाशिम जिल्ह्यातील धामणी, मिर्झापूर, गोरेगाव, कवठण, खडकी, कुंतरशेत, बांगडाबंदी प्रकल्प बुलढाण्यातील खडकपूर्णा प्रकल्प, अमरावती जिल्ह्यातील काही प्रकल्प यांच्या भूसपांदनाच्या बाबतीत लोकांचा विरोध असल्याने भूसंपादनाची प्रक्रिया स्थगित करावी लागली. उंबरी हा वाशिम जिल्ह्यातील एक महत्त्वाचा प्रकल्प आहे. या प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात तफावत आढळल्याने भूसंपादन स्थगित केले आहे. इतरही प्रकल्पांची आकडेवारी माझ्याकडे आहे. शासनाने भूसंपादनाच्या कामासाठी प्राधान्य दिले आहे. निधीची उपलब्धता सुध्दा आहे. पण यासाठी उपलब्ध असलेल्या अधिकाऱ्यांची संख्या कमी आहे, ज्याचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. राजेंद्र जैन यांनी देखील केला. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी देखील या संदर्भात सांगितले.

सभापती महोदय, गोसीखुर्द प्रकल्पाला 3 वेळा महामंडळ स्तरावर पॅकेज देण्यात आले. तत्कालीन मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण साहेब असताना देखील 155 कोटी रूपयांचे एक पॅकेज देण्यात आले. गेल्या वर्षी मी व माननीय मुख्यमंत्री, आम्ही स्वत: भेट दिली आणि त्यावेळी 1200 कोटी रूपयांचे पॅकेज दिले. केंद्र सरकारकडून या वर्षी या राष्ट्रीय प्रकल्पाला निधी आला. 1200 कोटी रूपयांचे पॅकेज ज्यातील 700 कोटी रूपयांचा निधी पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून मान्य झालेला निधी, असा सर्व जवळपास 1200 कोटी रूपयांचा निधी पुनर्वसन व भूसंपादनाच्या कामासाठी वर्ग केला. हा प्रकल्प एकूण 40 टीएमसी क्षमतेचा आहे. सन 2010 मध्येच या प्रकल्पाचे काम पूर्ण झाले. सन 2010 मध्ये जेव्हा मी जलसंपदा खात्याचा मंत्री म्हणून आलो, त्यावेळी या प्रकल्पाची साठवणूक क्षमता पूर्ण झाली होती. त्यावेळी मोर्चे निघाले. 234 मीटर पर्यंतच पाणी अडविण्याच्या बाबतीत निर्णय झाला. याचा परिणाम असा झाला की, 40 टीएमसी क्षमता असलेल्या या धरणातील 32 टीएमसी पाणी 237 तलांकाच्या वर आम्ही वाढवू नये म्हणून आम्हाला सोडून





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे ....

द्यावे लागले. सन 2010-11 मध्ये असे केले, सन 2011-12 मध्ये असे केले, सन 2012-13 मध्ये केले. गेली 3 वर्षे गोसीखुर्द प्रकल्प पूर्ण होऊन सुध्दा 32 टीएमसी पाणी आज आम्हाला सोडावे लागत आहे, ज्याचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी देखील केला. जायकवाडी प्रकल्प, अहमदनगर, नाशिक या संदर्भात त्यांनी जे काही शब्द वापरले, त्यामध्ये मी जाऊ इच्छित नाही. माननीय मंत्री श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याबद्दल ते काय बोलले, त्या बाबत माननीय मंत्री उत्तर देतील.

सभापती महोदय, पाण्याच्या एक-एक थेंबासाठी इतक्या मोठ्या प्रमाणावर संघर्ष होत असेल तर दरवर्षी 32 टीएमसी पाणी आम्हाला सोडावे लागते, याचाही विचार करावा लागेल. हे आपल्या कोणालाही भूषणावह नाही. याचे कारण काय आहे, हे देखील आपण लक्षात घेतले पाहिजे. पुनर्वसनाच्या कामाच्या बाबत झालेली दिरंगाई हे देखील एक कारण आहे. 1200 कोटी रूपयांचा नियतव्यय देऊन सुध्दा या संदर्भात काही होत नसेल तर याचा जरूर विचार करावा लागेल. आता आम्ही 239 मीटर पर्यंत पाणी थांबविले. सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे साहेब, मला तुमची मदत आवश्यक आहे. आपण यावर्षी 242 मीटर पर्यंत पाणी अडविले. अजून 60 हजार हेक्टर सिंचनाची क्षमता एका वर्षात वाढीस लागू शकते, इतके या प्रकल्पाच्या माध्यमातून काम झाले आहे. केवळ एका गावाचे स्थलांतर न झाल्यामुळेच हा प्रश्न निर्माण झाला आहे. आम्ही येथील विभागीय आयुक्तांना सर्व अधिकार दिले आहेत. पुर्नसवन पॅकेज राबविण्याारठी अधिकारी नसल्यामुळे ते खाजगी तत्वावर घेऊन त्यांना द्यावे लागणारे मानधन सुध्दा या पॅकेजमध्ये देण्याची तयारी आमच्या विभागाने दाखविली आहे. जेणेकरून, पुनर्वसनामुळे दीर्घकाळ रखडलेला हा प्रकल्प पूर्ण होईल. गोसीखुर्द हा राष्ट्रीय प्रकल्प युपीए सरकारने घोषित केला, या प्रकल्पाला मोठ्या प्रमणात निधी दिला. या प्रकल्पामुळे विदर्भातील शेती व इतर अनेक गोष्टींना मोठ्या प्रमाणात चालना मिळणार आहे. हा महत्त्वाचा प्रकल्प कार्यान्वित झाला तर विदभातील सामाजिक, आार्थिक व कृषी विषयक चित्र बदलू शकते. या कामात बदलाची आवश्यकता आहे. मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करीन की, आता विभागीय आयुक्तांना सूचना देण्याची आवश्यकता आहे. पाणी अडविल्याने किंवा न अडविल्याने जलसंपदा विभागावर टीकाटिप्पणी होईल, तो भाग वेगळा. पण

..3



MSK/ D/ KTG/ पूर्वी श्री. बोर्डे 11:45

श्री. सुनील तटकरे ....

आज आपण विदर्भात 60 हजार हेक्टर सिंचनाचा नव्याने अनुशेष निर्माण करीत आहोत. आपण पाणी साठवून सुध्दा पाणी देत नसू तर हा आम्ही निर्माण केलेला वेगळा अनुशेष आहे, असे म्हटले तर ते चुकीचे ठरू शकणार नाही. या बाबतीत सुध्दा ठामपणाची भूमिका घेणे अत्यंत आवश्यक आहे. वेगवेगळ्या प्रकल्पांची देखील गरज आहे. मी सन्मननीय सदस्य श्री. माणिकरावजी ठाकरे यांना नम्रपणे सांगेन की, आपण या कामात पुढाकार घ्यावा. गोसीखुर्द प्रकल्पाच्या पुनर्वसनासाठी अधिकारी नेमले जाणार आहेत तसे उरलेल्या प्रकल्पासाठी सुध्दा अधिकारी नेमण्यासाठी निधी देण्याची माझ्या विभागाची तयारी आहे. फक्त त्यांनी मान्यता आणावी.

( नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे...

एकाच वेळी मर्यादित काळामध्ये भूसंपादन व पुनर्वसन आपण करु. निधीची उपलब्धता आहे असे या प्रस्तावात नमूद केलेले आहे. अनेक कारणांमुळे 1800 कोटी रुपयांचा निधी शिल्लक राहिलेला आहे. हे खरे आहे. यासाठी अनेक कारणे आहेत, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन व भूसंपादन त्यापैकी एक कारण आहे. विदर्भात महत्वाकांक्षी प्रकल्प आहेत, त्यात मोठ्या व मध्यम प्रकल्पांचा समावेश आहे. ते प्रकल्प विशिष्ट कालावधीत पूर्णत्वाकडे नेऊ शकतो. परंतु दुर्दैवाने शासन ते पूर्ण करु शकत नाही. त्यातून अनुशेष निर्माण होत आहे, त्यातून निर्माण झालेली परिस्थिती जणू काही जलसंपदा विभागाने निर्माण केली आहे असे साप साप म्हणून भुई धोपटण्याचा जो प्रकार होत आहे, तो योग्य नाही. वस्तुस्थिती काय आहे ती विदर्भातील जनतेला समजली पाहिजे आणि ते सांगण्याचा मी नम्रपणे प्रयत्न करीत आहे. भूसंपादन व वन जमीन या दोन गोष्टींबाबत आग्रहपूर्वक काम करण्याची सरकारची तयारी आहे. जलसंपदा विभागाचाही कालबध्द कार्यक्रम आहे. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी जी बाब सांगितली होती ती मी तपासून पाहिली आहे. त्यामध्ये मला वस्तुस्थिती आढळली आहे. काही ठिकाणी धरणात पाणी साठत आले आहे. कालव्याची कामे पूर्ण झाली आहेत. काही ठिकाणी चाऱ्याची कामे राहिली आहेत. ज्या धरणांची व कालव्यांची कामे पूर्ण झालेली आहेत. त्यांच्या चाऱ्यांची व पोट चाऱ्यांची कामे अपूर्ण असतील ती कामे त्यांनी वर्षभरात पूर्ण केली पाहिजेत असे आदेश मी अधिकाऱ्यांना दिलेले आहेत. हे मी सभागृहात नमूद करु इच्छितो.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, जे प्रकल्प पूर्ण झालेले आहेत त्याबाबत मंत्री महोदयांनी बोलावे. जीगावच्या प्रकल्पाच्या एकाही गावाच्या पुनर्वसनाच्या कामाला सुरुवात झालेली नाही. तो प्रकल्प खूप मोठा आहे. त्या प्रकल्पाची किंमत 360 कोटी रुपयांवरुन 4 हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. कर्मचारी व अधिकाऱ्यामुळे भूसंपादन होत नसेल तर ते सरकारचे अपयश आहे.

श्री.सुनील तटकरे : मी विदर्भातील प्रकल्पांची नावे घेतलेली नाहीत. विदर्भातील प्रकल्प भूसंपादन व पुनर्वसनाच्या कामाअभावी कसे रखडले आहेत ते मी सांगितले आहे. या प्रकल्पांमध्ये जीगांव प्रकल्पाचाही समावेश आहे. हे सर्व प्रकल्प भूसंपादन व पुनर्वसनामुळे रखडलेले आहेत.





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे....

या प्रकल्पासाठी निधी आहे. परंतु अनेक कारणांमुळे कामे थांबलेली आहेत. काही प्रकल्प वन जमिनीमुळे थांबलेले आहेत. काही प्रकल्प कर्मचारी व अधिकाऱ्यांअभावी थांबलेले आहेत. (अडथळा) जी वस्तुस्थिती आहे ती मी आपल्याला सांगत आहे काही कर्मचारी व अधिकारी एकाच वेळी सेवानिवृत्त झाले असतील तर त्यांना मानधनावर शासन घेऊ शकते. शासनाने भूसंपादन व पुनर्वसनाचा कालबध्द कार्यक्रम एकाच वेळी हाती घेतल्याशिवाय ही कामे लवकर पूर्ण होणार नाहीत. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे व सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी हा प्रस्ताव मांडताना ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्याची पूर्तता करावयाची असेल तर अधिकाऱ्यांची नेमणूक करणे आवश्यक आहे. म्हणून मी त्यांची मदत मागितली आहे. (अडथळा) या विषयासंबंधी मी तोकडा पडत असल्यामुळे मी सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांची मदत मागितली आहे. मी कमी पडत असल्याचे मी मान्यच केलेले आहे. (अडथळा)

श्री.पांडुरंग फुंडकर : केवळ कर्मचाऱ्यांच्या नेमणुका झाल्या नाहीत म्हणून या विदर्भात प्रकल्पांवर खर्च झाला नाही, पुनर्वसन झालेले नाही हे शासनाचे अपयश आहे हे मंत्री महोदयांनी मान्य करावे.

श्री.विनोद तावडे : मंत्री महोदय वस्तुस्थिती लपवत आहेत.

श्री.सुनील तटकरे : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.तावडे यांना त्यांच्या नावाप्रमाणे विनोद करण्याची सवय आहे. विदर्भातील या गंभीर विषयाबाबत सभागृहात चर्चा चालू आहे. अशा वेळी त्यांनी विषयांतर करुन बोलणे उचित नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय,........

श्री.सुनील तटकरे : सरकारच्या वतीने मी गंभीरपणे सभागृहात उत्तर देत आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या विषयाकडे अत्यंत गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य श्री.राजेंद्र जैन यांनी सुधारित प्रशासकीय मान्यतेचा विषय उपस्थित केला आहे. गेल्या दीड वर्षात काही हजार कोटी रुपये खर्च केल्यानंतर महाराष्ट्रात सिंचन क्षमता किती टक्के वाढली असा प्रश्न गेल्या वर्षी निर्माण केला होता. मागील दीड वर्ष यामध्येच गेले आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, दीड वर्षामध्ये शासनाने काही निर्णय घेतलेले आहेत.

नंतर श्री.शिगम......

अध्यक्षांच्या/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KTG/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 11:55

श्री. सुनील तटकरे....

मला या बाबतीत देखील सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांचे सहकार्य अभिप्रेत आहे. कारण ते महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष आहेत. त्यांच्या शब्दाला वजन आहे. नियमाप्रमाणे सुधारित प्रशासकीय मान्यता ईपीसी कमिटी देत होती. मधल्या काळामध्ये सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या हेतू बद्दलच शंका निर्माण झाली. पुनर्वसन आणि भूसंपादनाच्या किंमती वाढल्या.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी जिगाव प्रकल्पाचा उल्लेख केला. त्यांना देखील जिगांव प्रकल्पाची मूळ किंमत किती होती, भूसंपादनाची आणि पुनर्वसनाची मूळ किंमत किती होती आणि आता त्या प्रकल्पाची किंमत किती वाढलेली आहे, आता पुनर्वसन व भूसपांदनाच्या रकमेत किती मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे हे सन्माननीय सदस्यांना माहीत आहे. ते वस्तुस्थिती नाकारत नाहीत. किंमतमध्ये वाढ झाल्यामुळे जलसंपदा विभागामध्ये सगळी काही गफलत आहे अशा प्रकारचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्याचा परिणाम असा झाला की, दीड वर्षापासून सर्व प्रकल्प रखडले, विदर्भातील प्रकल्प देखील रखडले. किंमतीमध्ये कती वाढ झालेली आहे ? या ठरावामध्येच 1800 कोटी रुपयाचा उल्लेख करण्यात आलेला आहे. या 1800 कोटी रुपयांचा ब्रेकअप मी देऊ शकतो. आज केवळ सुधारित प्रशासकीय मान्यता नसल्यामुळे प्रकल्पाची 80 ते 90 टक्क्या पर्यंत कामे होऊन देखील ते प्रकल्प पूर्ण होऊ शकलेले नाहीत. अपेक्षा अशी आहे की, येत्या महिन्याभरामध्ये मंत्रिमंडळाच्या पातळीवर निर्णय होईल. मंत्रिमंडळाच्या स्तरावर 16 ते 17 प्रस्ताव गेलेले आहेत. या प्रस्तावाला मान्यता मिळू शकेल. इतरही काही प्रस्ताव प्रक्रियेमध्ये आहेत. हा प्रश्न विदर्भामध्ये उपस्थित झालेला असल्यामुळे कामाची नेमकी स्थिती काय आहे हे वैदर्भीय जनतेला समजावे म्हणून मी हे विस्ताराने सांगत आहे. या बाबतीत मी माननीय मुख्यमंत्री महोदयांशी चर्चा करीन, माननीय उप मुख्यमंत्री महोदयांशी चर्चा करीन, आवश्यकता भासली तर सर्वांचे सहकार्य घेईन पण निर्धारित कालावधीत निर्णय झाला तर हे प्रकल्प कार्यान्वित होऊ शकतील.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी सांगितले की, खूप मोठ्या प्रमाणावर सिंचनाचे पाणी बिगर सिंचनासाठी वळविले आहे. औष्णिक प्रकल्पाला खूप मोठ्या प्रमाणावर पाणी दिले आहे. कुणाच्या कालावधीमध्ये हा निर्णय घेतला गेला अशीही विचारणा सन्माननीय सदस्यांनी केली. मध्यंतरीच्या काळामध्ये उच्चाधिकार समिती होती. त्या समितीमध्ये हे

..2..

श्री. सुनील तटकरे....

निर्णय घेण्यात आले. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे हे त्यावेळी मंत्रिमंडळामध्ये होते. ते आणि मी आम्ही दोघांनी सोबत काम केलेले आहे. पण महाराष्ट्रामध्ये भारनियमन नावाचा शब्द प्रयोग पहिल्यांदा करण्यात आला, 1995 पर्यंत वीज उत्पादनामध्ये आपले राज्य स्वयंपूर्ण होते. परंतु त्यानंतर 7-8 वर्षाच्या कालावधीमध्ये आपण वीज उत्पादन केले नाही. त्यामुळे आपल्याला विजेचा तुटवडा भासू लागला. या विजेच्या तुटीमुळे आपल्याला विजेचे नवनवीन प्रकल्प हातामध्ये घेणे आवश्यक होते. त्यावेळी विलासराव देशमुख साहेबांचे सरकार होते. त्यांनी महाराष्ट्राला पुन्हा एकदा वीज उत्पादनाच्या बाबतीत स्वयंपूर्ण करण्याच्या मार्गावर नेण्याचा निर्णय घेतला. ज्यांचा उल्लेख सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी केला ते खाजगी उद्योजक देखील वीज उत्पादनाच्या क्षेत्रामध्ये सहभागी झाले. वीज क्षेत्रामध्ये महाराष्ट्राला प्रगतीच्या दिशेने नेता यावे यासाठी विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखालील सरकारने कॉन्शस निर्णय घेतला. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी सांगितले की, विदर्भामध्ये कोळसा आहे, विदर्भामध्ये कारखाने उभे राहू शकतात. एकीकडे आपण खूप घेतले म्हणून टीका करतो आणि दुसरीकडे नाही घेतले म्हणूनही टीका करतो. हा विरोधाभास आहे..(अडथळा).. हा निर्णय राज्याच्या हिताच्या दृष्टीने घेण्यात आला होता. सन 2012मध्ये आपण महाराष्ट्र जल प्राधिकरणासंबंधीचा कायदा केला....

**तालिका सभापती ( श्री. मोहन जोशी )** : सभागृहाची वेळ 10 मिनिटे वाढविण्यात येत आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय,शेतकऱ्यांचे सिंचनाचे पाणी काढून आपण पॉवर प्लॅन्टला दिले, पॉवर प्लॅन्टची वीज न घेतल्यामुळे ते बंद झाले आहेत. यामुळे शेतकऱ्यांवर आणि प्रकल्पांवर मोठ्या प्रमाणात अन्याय होतो आहे. प्रकल्प सुध्दा बंद झाले असे माझे म्हणणे आहे. शेतकऱ्यांना पाणीही मिळाले नाही आणि वीजही मिळाली नाही असे दुहेरी नुकसान झालेले आहे. शेतकऱ्यांसाठी असलेल्या धरणांचे पाणी पॉवर प्लॅन्टला देतो, त्यांच्याकडून शेतकऱ्यांच्या पुनस्थापनार्थ नुकसान भरपाई घ्यावी लागते. ती नुकसान भरपाई शासनाने अद्याप घेतलेली नाही अशा प्रकारचा माझा मुद्दा होता. शेतकऱ्यांना पाणी न देता ते पाणी पॉवर प्लॅन्टला का दिले असा माझा मुद्दा नाही. यात शासनाने शेतकऱ्यांचे आणि उद्योजकांचे देखील नुकसान केले आहे, त्या पॉवर प्लॅन्टची वीज देखील आपण खरेदी करीत नाहीत. असा माझा खरा आक्षेप आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, त्यांनी जी भूमिका मांडली आहे त्या भूमिकेचे मी समर्थन करीत होतो. राज्याच्या हिताच्या दृष्टीकोनातून जे करणे आवश्यक होते ती गोष्ट राज्य शासनाने केलेली आहे. राज्यात विशेषत: विदर्भात विजेची तूट भरुन काढावयाची असेल आणि ज्या विभागात कोळसा मोठया प्रमाणात उपलब्ध असेल, त्या ठिकाणी औष्णिक प्रकल्प होऊ शकतात असे तुम्ही सांगता आहात, त्या गोष्टीलाच मी समर्थन देत आहे. या पेक्षा मी वेगळे काही सांगितलेले नाही.

सभापती महोदय, हे जे काही निर्णय त्यावेळेला घेतले गेले आहेत. मी सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, 2012 मध्ये यासंबंधीचा कायदा झाला. हा कायदा रात्रीच्या वेळी करण्यात आला असे मत कोणी तरी सदस्यांनी व्यक्त केले, त्यामुळे हा कायदा दिवसा तयार करुन तो विधानसभेत आणि विधान परिषदेमध्ये आणला. दोन्ही सभागृहात सखोल चर्चा झाली. त्यावेळेला या कालावधीत जे काही निर्णय घेतलेले आहेत, ते कायद्यानुसारच प्रोटेक्ट केले आहेत. मी जे काही सांगतो आहे, त्यासंबंधीचा उल्लेख कायद्यामध्येच करण्यात आलेला आहे. त्यामुळे ते निर्णय कोणी केले, कशासाठी घेतले हा प्रश्न उद्भवत नाही. त्यावेळी निर्णय घेतल्यामुळे धापेवाडा येथील वीज प्रकल्प पूर्ण होऊन 1800 मे.वॅ.वीज या राज्यास मिळत आहे. विजेची तूट, विजेचे भारनियमन असे प्रश्न राज्यामध्ये निर्माण झाले होते. त्याच





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वेळेला 1800 मे.वॅ.वीज धापेपाडा वीज प्रकल्पातून शासनास मिळते आहे ही गोष्ट मी सर्वांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. अनेक वेगवेगळे प्रश्न निर्माण झालेले आहेत, त्या प्रश्नांची सोडवणूक मर्यादित कालावधीत करणे अत्यंत कठीण काम आहे. सर्वांसाठी हा प्रश्न संवेदनशील आहे. या ठिकाणी निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे, परंतु तो अखर्चित राहिला. म्हणून या ठिकाणच्या प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाल्या पाहिजेत. त्याचप्रमाणे मराठवाडा, कृष्णा खारे महामंडळ, इतर सिंचन विकास महामंडळे आहेत, यामध्ये जो पाणीसाठा झालेला आहे, त्याबद्दल देखील विचार करणे गरजेचे आहे. गेल्या वर्षी दुष्काळ पडला, त्यामुळे आपण सर्वांनी पाण्याची गंभीर परिस्थिती पाहिलेली आहे. आपण कौतुक केले ते खरे आहे. जलसंधारणाचा कार्यक्रम हातात घेतल्या खेरीज पर्याय असू शकत नाही. पण जलसंधारणाचा कार्यक्रम हा एक भाग झाला. छोटे छोटे प्रकल्प आहेत, त्यातून नेमकी सिंचन क्षमता किती झाली. किती गावांना आम्ही पाणी देऊ शकलो, हा एक वेगळा मुद्दा आहे. काही वेळेला लहान गोष्टीतून यशस्वीता लाभते. आपण लहान लहान पाझर तलाव केले. सर्वांना माहिती आहे की, लहान लहान पाझर तलावांमध्ये फेब्रुवारी महिन्यापर्यंत पाणी राहू शकते. त्या पाण्यातून एखाद्या गावाची पाणी पुरवठा योजना तयार करु शकत नाही म्हणून तसे करावयाचे नाही काय ? ते करणे आवश्यकच आहे. कारण भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी ते करणे आवश्यक आहे. गेल्या 60 वर्षात महाराष्ट्र शासनाने 1300 टी.एम.सी. एवढे पाणी अडविले आहे.किती पाणी अडविले, गेल्या दहा वर्षात शासनाने 250 टी.एम.सी.च्या आसपास पाणी अडविले आहे. गेल्या दहा वर्षात 250 टी.एम.सी.पाणी अडविण्यामध्ये जलसंपदा विभागास निश्चितपणे यश आलेले आहे. वन जमीन, भूसंपादन आणि पुनर्वसन,सुप्रमा यासंबंधीचे प्रश्न सुटले तर येत्या वर्षभरात 70 ते 75 टी.एम.सी. पाणी जलसंपदा विभाग अडवू शकते हे सुध्दा मी या सभागृहात ठामपणे सांगू इच्छितो. काही प्रश्न निश्चितपणे राहिले आहेत. त्या प्रश्नाची सोडवणूक करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत.

सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी बेंबळा प्रकल्पाचा उल्लेख केला. त्यांच्यात देहळणी उपसा सिंचन आहे. देहळणी उपसा सिंचन योजना सुक्ष्म सिंचन योजनेच्या माध्यमातून करण्याचे प्रस्तावित आहे. सभापती महोदय, मला आठवते की, मी अर्थमंत्री असताना आम्ही ठिबक

3...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे....

सिंचन योजनेचा पुरस्कार केला. या योजनेसाठी 50 टक्के अनुदान दिले जाते. सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी मुद्दा काढला आहे. माननीय कृषी मंत्री श्री.राधाकृष्ण विखे पाटील हे मागे बसलेले आहेत. त्यांनी या योजनेकडे अधिक लक्ष घातले तर बरे होईल. या योजनेसाठी माझे सहकार्य आहे असे सभागृहात लगेच जाहीर करुन टाकतो. ठिबक सिंचन योजनेची मूळ कल्पना कृषी विभागाची आहे.

श्री.भोगले......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, बेंबळा प्रकल्पाची उपसा सिंचन योजना ही ठिबकवरच असून 20 हजार एकरला पाणी देणारी संपूर्ण संगणकीकृत अशी योजना आहे. ही योजना सिंचन विभागाने तयार केली आहे. शेवटच्या पोर्शनमधील शेतकऱ्यांची ठिबकची मागणी होती. 75 टक्के अर्थसहाय्य शासनाचे आणि 25 टक्के शेतकऱ्यांचे असणार आहे. सर्वच शेतकरी ठिबक योजनेसाठी पैसे भरु शकत नाहीत. 350 कोटी रुपये आतापर्यंत जलसंपदा विभागाने खर्च केले आहेत. आणखी 10 कोटी रुपये दिले गेले तर योजना पूर्ण होईल. 10 कोटी रुपये मिळाले नाही तर 350 कोटी रुपयांचा खर्च वाया जाणार आहे. 10 कोटी रुपये देण्याबाबत जलसंपदा विभागाने निर्णय घ्यायचा आहे. ती जलसंपदा विभागाची अंतर्गत बाब आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी सांगितलेल्या प्रश्नाची वस्तुस्थिती अशी आहे की, ठिबक सिंचनाद्वारे किंवा पाईपद्वारे विशिष्ट भागापर्यंत पाणी आणणे हे जलसंपदा विभागाचे काम आहे. तेथून प्रत्येक शेतक-याच्या शिवारापर्यंत पाणी नेणे ही योजना कृषी विभागांतर्गत आहे. मी या गोष्टीचा तपशीलवार अभ्यास केला आहे. माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे आणि माझे 1985 पासूनचे घनिष्ठ संबंध आहेत. माननीय कृषी मंत्री श्री.राधाकृष्ण विखे पाटील यांनी या प्रश्नाबाबत मनाचा मोठेपणा दाखवावा. ही योजना त्यांच्या विभागामार्फत आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, ही योजना सिंचन विभागाची असून आतापर्यंत 350 कोटी रुपये त्या विभागाने खर्च केलेले आहेत. पुढील पोर्शनच्या संदर्भात ठिबक योजना राबविण्याचा संबंध कृषी विभागाशी येतो असे त्यांचे म्हणणे आहे. कृषी विभागाकडून 75:25 प्रमाणात राज्यभरात ठिबक योजना राबविली गेली आहे. 25 टक्के अर्थसहाय्य सर्व शेतकरी देऊ शकत नाहीत. 5000 शेतकरी या योजनेवर अवलंबून आहेत. सगळयाच शेतकऱ्यांना तेवढी रक्कम देणे शक्य होणार नाही. 1 वर्ष लागला तर योजना फेल होईल. म्हणून 15 ते 40 टक्के पोर्शन पाटबंधारे विभागाने करावा आणि तो त्या विभागाला करता येतो. कारण पूर्ण योजना त्या विभागाकडे आहे. त्यामुळे जलसंपदा विभागाने 10 कोटी रुपयांची तरतूद करण्याची गरज आहे. कृषी विभाग त्यांच्या वाट्याची तरतूद करील. परंतु जलसंपदा विभाग तरतूद करणार की नाही?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, ही वस्तुस्थिती आहे की, शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतामध्ये ठिबक योजनेद्वारे पाणी देत असताना 75 टक्के कृषी विभाग आणि 25 टक्के सहाय्य शेतकऱ्यांनी द्यायचे आहे. माननीय सदस्य म्हणत आहेत की, उर्वरित शेतकरी अर्थसहाय्य भरु शकत नाहीत. ही वस्तुस्थिती आहे की, ठिबक योजना शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत जाते ही योजना माझ्या विभागाची नाही हे मी ऑन रेकॉर्ड सांगू इच्छितो. कृषी विभागाची ही योजना असून 75:25 प्रमाणात योजना राबविली जाते. माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे आणि मी एकत्रितपणे काम केलेले आहे. मी जिल्हयाचा अध्यक्ष होतो, माननीय मंत्री श्री.राधाकृष्ण विखे पाटील जिल्हयाचे अध्यक्ष होते आणि ते प्रदेशाध्यक्ष होते. मी महामंडळाचा 10 कोटी रुपयांचा ठराव करुन तो शासनाकडे पाठवून देतो. माननीय मुख्यमंत्र्यांची मान्यता तुम्ही आणावी. 10 कोटी रुपयांचा ठराव पाठवून देतो, त्यात तांत्रिक अडचण राहणार नाही. ती मान्यता लवकरात लवकर आणावी म्हणजे हा प्रश्न तातडीने सोडविता येईल एवढेच या ठिकाणी सांगतो.

सभापती महोदय, अत्यंत महत्वाची चर्चा या ठिकाणी उपस्थित करण्यात आली, विदर्भात प्रलंबित असलेले जे प्रकल्प आहेत त्या प्रकल्पाच्या संदर्भातील वेगवेगळ्या प्रश्नांबाबत माहिती दिली आहे. पेंच प्रकल्पाचे पाणी नागपूर शहराला दिले जाते. नागपूर ग्रामीण भागातील सिंचनाचे क्षेत्र कमी करुन नागपूर शहराला पेंच प्रकल्पातून पाणी देतो. माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांच्या काळात हा निर्णय झाला आहे. काही वेळेला माणुसकीच्या दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक असते. त्या दृष्टिकोनातून गोसीखूर्द प्रकल्प पूर्ण केला जावा अशी विनंती करतो. जे जे प्रश्न मांडले आहेत त्या प्रत्येक प्रश्नाची विभागाकडून सोडवणूक करण्याचा प्रयत्न केला जाईल एवढे नम्रपणे सांगतो. अडथळे आणि अडसर मर्यादित कालावधीत दूर झाले तर दरवर्षी 2 लाख हेक्टर सिंचनाचे क्षेत्र महाराष्ट्रामध्ये निर्माण होईल. त्यातील 50 टक्के क्षेत्र विदर्भामध्ये निर्माण करु असे या माध्यमातून सांगतो आणि माझे विचार थांबवितो.

-----------

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर 2ए.1...

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी )** : सभागृहाच्या कामकाजाची वेळ 10.00 मिनिटे वाढविण्यात येत आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या प्रस्तावामध्ये जलसिंचन आणि विद्युत असे दोन विषय आहेत. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे आणि माननीय मंत्री श्री.सुनील तटकरे यांनी बरीच वर्षे एकत्रितपणे काम केले आहे. त्यांचे एकमेकांचे काही प्रश्न असतील तर ते आम्हाला माहीत नाही. आमचे फक्त दोनच प्रश्न आहेत. महाराष्ट्र जल संपत्ती प्राधिकरणाने आपल्या अहवालामध्ये नमूद केले आहे की, विदर्भातील सिंचनाचा अनुशेष 85 हेक्टरने वाढला आहे. यात अमरावतीतील 81 व नागपूर मधील 4 हेक्टर क्षेत्र आहे, हे खरे आहे काय ? सन्माननीय सदस्य डॉ. रणजित पाटील यांनी सोफिया प्रकल्पाने 138 कोटी रूपये थकविले आहेत असे सांगितले आहे. त्यांना आपल्या अधिकाऱ्यांनी कोर्टात जाण्याचा सल्ला दिला आहे व त्यानुसार ते कोर्टात गेले. असे असतानाही आपण त्यांना अजून पाणी देत आहोत. तेव्हा यासंबंधी शासन कोणती उपाययोजना करणार आहे ? त्या संबधातील आम्हाला स्पेसिफिक माहिती हवी होती. माननीय श्री.शरद पवार साहेब सीएम साहेबांच्या बाबतीत म्हणाले होते की, निर्णयावर सही करण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्याचा हात लकवा मारल्या सारखा थरथरतो. पण सीएम साहेबांचे लकवा आणि राष्ट्रवादीला चकवा असे काही धोरण आहे काय ? एवढेच आम्हाला जाणून घ्यायचे आहे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक (ऊर्जा राज्य मंत्री) : सभापती महोदय, या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री माणिकराव ठाकरे, दिवाकर रावते, राजेंद्र जैन, प्रा.सुरेश नवले, डॉ.रणजित पाटील, श्रीमती शोभाताई फडणवीस इत्यादी सन्माननीय सदस्यांनी सहभाग घेतला आहे.

कृषि पंपाचे ऊर्जीकरण करण्यासंबंधी सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी चर्चा घडवून आणली आहे. सन 2011-12 मध्ये एकूण 352784 इतक्या कृषि पंपांची जोडणी झाली आहे. सन 2012-13 मध्ये 1 लाख 58 हजार कृषि पंपांची जोडणी झाली आहे. या वर्षी ऑक्टोबर अखेर पर्यंत 50078 कृषि पंपांना वीज जोडणी देण्यात आली आहे.

काही सन्माननीय सदस्यांनी अमरावती जिल्ह्यासंबंधातील स्पेसिफिक माहिती मागितली आहे. अमरावती जिल्ह्यामध्ये इन्फ्रा वन व टु कार्यक्रम निश्चित करण्यात आला आहे. त्यात अमरावती जिल्ह्यातील बऱ्याच प्रकरणांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. अमरावती जिल्ह्यात सन 2013 अखेर विद्युतीकरणाची 6626 कामे प्रलंबित होती. त्यापैकी विद्युत पुरवठा केलेल्या ग्राहकांची संख्या सन 2013-14 पर्यंत 1832 आहे. तसेच, विद्युतीकरणाची निविदा स्तरावर 1678 कामे आहेत.

आपला पायाभूत आराखडा एक होता. त्यावर साधारणपणे 10710 कोटी रूपये खर्च झाले आहेत. त्यामध्ये नवीन उपकेंद्र 606, क्षमतावाढ केंद्राची संख्या आहे 375 आणि उप केंद्र क्षमता वाढ केल्याची संख्या 490 असून इन्फ्रा वन मध्ये 67879 ट्रान्सफॉर्मर उपलब्ध करून दिलेले आहेत. अनेक सन्माननीय सदस्यांनी इन्फ्रा टू चा कार्यक्रम कसा राबविला जाणार आहे, त्याची उद्दिष्टे काय आहेत, अशी विचारणा केली आहे. साधारणत: रूपये 8300 कोटींचा इन्फ्रा टू हा प्रकल्प आहे. त्यामध्ये 20 टक्के म्हणजे रूपये 1660 कोटींचे भागभांडवल हे राज्य शासनाचे राहणार आहे आणि रूपये 6640 कोटी ग्रामीण विद्युतीकरण मंडळाच्या माध्यमातून प्राप्त होणार आहेत. यामध्ये विदर्भासाठी किती वाटा आहे असे अनेक सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. नागपूर व अमरावती विभाग मिळून एक हजार कोटी रूपयांचा कार्यक्रम आपण इन्फ्रा टू मध्ये समाविष्ट केला आहे. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरेसह अन्य काही सदस्यांनी यवतमाळ जिल्ह्यांचा उल्लेख केला आहे.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक ....

सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून सभागृहाला सांगू इच्छितो की, इन्फ्रा टू कार्यक्रमाअंतर्गत जी कामे शिल्लक होती ती जाणीवपूर्वक समाविष्ट करण्यात आली आहेत. त्यामध्ये यवतमाळ,अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, नागपूर, गडचिरोली, भंडारा, वर्धा,चंद्रपूर आणि गोंदियाची कामे जाणीवपूर्वक इन्फ्रा टू मध्ये 1000 कोटी रुपयांचे कार्यक्रम घेऊन समाविष्ट करण्यात आलेली आहेत.

सभापती महोदय, नवीन कनेक्शन तसेच ट्रान्सफॉर्मर्स देण्यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी उल्लेख केला असून त्यांसदर्भात मी सांगू इच्छितो की, जेथे इन्फ्रास्ट्रक्चर्सची गरज नाही तेथे तातडीने कनेक्शन द्यावयाचे व ज्या ठिकाणी इन्फ्रास्ट्रक्चर्सची आवश्यकता आहे त्या ठिकाणी समजा 10 पोलची तसेच ट्रान्सफॉमर्सची आवश्यकता असेल तर अशी कामे इन्फ्रा वन मध्ये घेऊन पूर्ण करण्यात आली असून काही शिल्लक कामे आज प्रगतीपथावर आहेत. विदर्भातील इन्फ्रास्ट्रक्चर्सची कामे मोठया संख्येने इन्फ्रा टू मध्ये घेतलेली असल्यामुळे ही सर्व कामे देखील तातडीने पूर्ण होतील.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राजेंद्र जैन यांनी उल्लेख केला आहे की, एका गावातील 7 लोकांनी ट्रान्सफॉर्मर्सवरील वीज बिले भरली होती परंतु एका व्यक्तीने बिल भरले नव्हते असे असतांनाही त्या ठिकाणचा ट्रान्सफॉर्मर बंद करण्यात आला. यासंदर्भातील माहिती घेऊन ट्रान्सफॉर्मर सुरु करण्याच्या सूचना तातडीने देण्यात आल्या असून ज्या अधिकाऱ्याने चूक केलेली आहे त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल.

सभापती महोदय, या ठिकाणी काही सन्माननीय सदस्यांनी लोडशेडींगच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. आपल्याकडे पूर्वी लोडशेडींग होत होते, ही वस्तुस्थिती आहे. परंतु गेल्या 7-8 वर्षामध्ये आपले जे काही वीज निर्मितीचे प्रकल्प आहेत त्या सर्व प्रकल्पांच्या क्षमतेमध्ये वाढ करण्यात आली आहे. राज्य शासनाची थर्मल,विंड,हायड्रो आणि गॅसची मिळून एकंदर वीज क्षमता 10,000 मेगा वॅटची झालेली आहे. मी मान्य करतो की, काही वेळेस एका मंडळींच्या हातामध्ये सत्ता होती त्यावेळी त्यांनी एन्रॉन प्रकल्प बंद केला होता. परंतु आमचे शासन सत्तेवर आल्यानंतर पुन्हा एन्रॉन प्रकल्प सुरु करण्यात आला.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय,माझा हरकतीचा मुद्दा एवढाच आहे की, एन्रॉन प्रकल्प या शासनाने कधी सुरु केला याची माहिती माननीय मंत्री महोदय देतील काय ?

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, एन्रॉन प्रकल्प पुन्हा सुरु कधी झाला याची माहिती मी थोडयाच वेळात देतो. त्या काळात एकही मेगावॅट वीज क्षमता वाढविण्यात आली नव्हती. विजेच्या क्षमतेची वाढ ही कॉंग्रेस-राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या सरकारमध्येच झालेली आहे. आज जे काही लोडशेडींग होत आहे ते वीज कमी असल्यामुळे होत नाही. एबीसीडी या कॅटीगरीजमध्ये बिलकूल लोडशेडींग होत नाही. आज जी काही लोडशेडींग केली जाते ती डीसीएल लॉसेसमुळे केली जात आहे. यासंदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, यासंदर्भात राणे समिती कार्यरत असून आजच या समितीची बैठक होणार असून कृषी पंपाच्या संदर्भात किंवा औद्योगिक टॅरिफच्या संदर्भातील सर्व निर्णय आम्ही घेतल्याशिवाय राहणार नाही. राज्यातील शेतकऱ्यांना वेळेवर,मुबलक तसेच दिवसा वीज मिळसली पाहिजे यासंदर्भातील सर्व निर्णय घेतले जाणार आहे. औद्योगिक टेरिफच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, पूर्ण देशात केवळ महाराष्ट्र राज्यामध्येच 24 तास वीज उद्योग क्षेत्राला दिली जाते.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक....

या राज्यामध्ये कृषी पंपाना 8 तास आणि हप्त्यातून दोन वेळा दहा तास वीज उपलब्ध करुन दिली जाते आणि असे करणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : प्रस्ताव मांडणारे सन्माननीय सदस्य यांचे उत्तरादाखल भाषण होईपर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, पूर्वीच्या स्थितीमध्ये आणि आताच्या स्थितीमध्ये आमुलाग्र बदल झालेला आहे. आपल्या राज्याची विजेच्या बाबतीतील परिस्थिती इतर राज्यांच्या तुलनेत अधिक चांगली आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी कोळशाच्या संदर्भात उल्लेख करण्यात आला. आज देशामध्ये कोळशाच्या संदर्भात पाहिजे तशी परिस्थिती नाही. आपल्याला जो कोळसा पुरविण्यात येतो तो आपल्याला पूरक ठरत नाही. तेव्हा आपणास पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक आहे. आपण जैतापूर येथे अणुऊर्जा प्रकल्प उभारण्याचा विचार केला. पुढील काळ हा अणुऊर्जेचा आहे आणि ती गोष्ट आपणास स्वीकारावी लागणार आहे. कारण खनिज संपत्ती दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. तेव्हा आपण नवीन टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून वीज कशी निर्मिती करु शकतो याचा विचार करावा लागणार आहे. कारण त्या शिवाय आपल्यापुढे दुसरा पर्याय नाही.

सभापती महोदय, या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडले. विदर्भातील कृषी पंपाच्या ऊर्जीकरणासंदर्भातील विषय असो किंवा ट्रान्सफॉर्मरच्या संदर्भातील विषय असो किंवा मेन्टनन्स किंवा मॅनेजमेंटच्या संदर्भातील विषय असो,मी येथे जाणीवपूर्वक सांगू इच्छितो की, इन्फ्रा-टू कार्यक्रमामध्ये ही सर्व प्रकरणे अंर्तभूत केलेली आहेत. इन्फ्रा-टू कार्यक्रमाच्या निविदांची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून कार्यारंभाचे आदेश दिल्यानंतर ही सर्व कामे पूर्ण करण्यात येतील एवढेच मी या चर्चेच्या माध्यमातून सभागृहाला सांगून माझे भाषण पूर्ण करतो.

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सिंचन आणि ऊर्जा विभागाच्या संदर्भात येथे चर्चा उपस्थित करण्यात आली आणि त्या अनुषंगाने माननीय मंत्री महोदयांनी उत्तरे दिली. एक-दोन प्रश्नासंबंधी मला जलसिंचन मंत्री महोदयांना प्रश्न विचारावयाचे आहेत. माननीय राज्यपालांनी कलम 371 नुसार भौतिक आधारावर अनुशेष काढण्याचे अधिकार दिलेले आहेत. विदर्भाचा भौतिक आधारावर किती अनुशेष आहे आणि तो अनुशेष दूर करण्यात येईल काय ? माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, आम्ही दहा कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार करुन वित्त विभागाकडे पाठविणार आहोत. त्यांनी येथे जे सांगितले त्याची पूर्तता होईल अशी मी अपेक्षा येथे व्यक्त करतो. काही प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणे आवश्यक आहे हे मी मान्य करतो. परंतु सुधारित प्रशासकीय मान्यता न मिळाल्यामुळे पैसे खर्च करता येत नाही असे नाही. जे इतर प्रकल्प आहेत त्यांच्यावर पैसे खर्च करु शकता. दुसरे म्हणजे 1800 कोटी रुपयांचा खर्च मार्च महिन्याच्या आत होईल यादृष्टीने काळजी घेण्यात येईल काय ? विदर्भ आणि मराठवाड्यातील सिंचन वाढविण्यासाठी पावले उचलली आहेत ही चांगली गोष्ट आहे. माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले की, मागील दहा वर्षात एकही पैसा इतरत्र दिलेला नाही ही निश्चितच आनंदाची बाब आहे. आपले भौतिक आधारावर नियोजन करण्याचे नियोजन नसले तर ती बाब निरर्थक आहे. तेव्हा भविष्याच्या दृष्टीने काही नियोजन करणार आहात काय ?

सभापती महोदय, माननीय ऊर्जा मंत्री महोदयांनी उत्तर देताना दोन-तीन विषय बाजूला ठेवून उत्तर दिले. ट्रान्सफॉर्मरच्या बाबतीत सेकंड टप्पा घेत आहोत असे त्यांनी सांगितले. वीज देण्यासाठी जी काही साधने लागतात ती उपलब्ध करुन देण्यात येतील असे त्यांनी सांगितले. परंतु आज आपण लोडशेडींगच्या बाबतीत जे निकष लावले आहेत ते पुन्हा एकदा तपासून घेण्याची गरज आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

काही ठिकाणी लोकांनी 80 टक्के रक्कम भरल्यानंतरच त्यांना विजेचे कनेक्शन देणे योग्य नाही. सन्माननीय सदस्य श्री.राजेंद्र जैन यांनी उल्लेख केला की, एखाद्या शेतकऱ्याने वीज बिल भरले नाही तर त्याचे कनेक्शन कापणे इथपर्यंत ठीक आहे. परंतु समूह असलेल्या 25 शेतकऱ्यांचे एकाच वेळी कनेक्शन कापणे योग्य नाही. समूहातील 10 शेतकऱ्यांनी वीज बिल भरलेले असले तरी त्यांचे कनेक्शन कापणे योग्य नाही. बऱ्याच ठिकाणी शेतकरी विहिरीतून कमी-जास्त पाणी घेतो. एखादा शेतकरी पूर्णत: विहिरीतून पाणी घेऊन आपली 10 एकर शेती ओली करतो. परंतु अन्य एखादा शेतकरी 10-15 गुंठे असलेल्या भाजीपाल्याच्या शेतीला पाणी देतो. त्यातून तो चांगले उत्पादन घेतो, तो पैसे देण्यासाठी तयार असतो. परंतु इतरांनी वीज बिल भरले नाही म्हणून त्या शेतकऱ्याचे कनेक्शन कापणे चुकीचे आहे. या निमित्ताने एवढेच सांगू इच्छितो की, 80 टक्के रक्कम भरण्याचा निकष चुकीचा आहे. तो निकष बदलण्याची गरज आहे. या पुढे शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन पुन्हा तोडले जाणार नाही या संदर्भात राज्य सरकार ठोस निर्णय घेणार काय ?

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या प्रस्तावावर मला आणि सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांना बोलावयाचे होते. परंतु वेळेची मर्यादा लक्षात घेता आम्हाला बोलू दिले नाही. आपण माननीय मंत्र्यांना 11.00 वाजता उत्तरास सुरुवात करण्यास सांगितले. माननीय मंत्र्यांनी दीड तास उत्तर दिले आहे. या बाबतची या ठिकाणी नोंद आहे. हे अधिवेशन दोन आठवड्यांचे आहे याची मला जाणीव आहे. वेळेची मर्यादा लक्षात घेता आम्ही बोलण्याचा आग्रह धरला नाही. आपण माननीय मंत्री महोदयांना उत्तर देण्यासाठी जास्त वेळ दिला. परंतु विरोधी पक्षातील सदस्यांना बोलण्यासाठी दोन-तीन मिनिटांपेक्षा जास्त वेळ दिला जात नाही. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. कारण आता तशी प्रथा सभागृहात सुरु झाली आहे. पुढील प्रस्तावावरील चर्चेच्या वेळी ही संधी आम्हाला मिळाली पाहिजे, हे मी आपल्या लक्षात आणून देतो.

श्री.सुनील तटकरे : महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी भौतिक अनुशेषाच्या बाबतीत प्रश्न विचारला आहे. 2009 मध्ये आर्थिक अनुशेष संपुष्टात आला आहे. त्यानंतर माननीय राज्यपाल महोदयांनी दर वर्षी आर्थिक अनुशेषाच्या संदर्भात 650 कोटी रुपयांची

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ठोस तरतूद करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर राज्य सरकारने भौतिक आणि आर्थिक अनुशेषाच्या संदर्भात अभ्यास करण्यासाठी डॉ.विजय केळकर समिती गठीत केली. त्या समितीचा अहवाल राज्य सरकारला प्राप्त झाला आहे. आज राज्यातील एकंदर 13 लाख 83 हजार 240 हेक्टर रब्बी समतुल्य भौतिक अनुशेषापैकी 11 लाख 43 हजार 390 हेक्टर इतका अनुशेष दूर झाला आहे. परंतु अमरावती विभागातील अमरावती, अकोला, वाशिम व बुलढाणा या जिल्ह्यांत 2 लाख 39 हजार 840 हेक्टर रब्बी समतुल्य भौतिक अनुशेष 2011 अखेर आहे. हा भौतिक अनुशेष दूर करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखण्यात आला आहे. प्रकल्प पूर्ण होण्यात असलेल्या भूसंपादन, वन जमीन, पुनर्वसन, प्रकल्पग्रस्तांचा विरोध इत्यादी अडचणी दूर करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखत आहोत. मी मघाशी समरीमध्ये सांगितले की, या चार जिल्ह्यांमध्ये असलेला भौतिक अनुशेष दूर करण्याचा प्रयत्न सुरु आहे. एकंदर भौतिक व आर्थिक अनुशेषाच्या संदर्भात डॉ.विजय केळकर समितीचा अहवाल सभागृहात सादर झाल्यानंतर वस्तुस्थिती स्पष्ट होईल. त्यानंतर माननीय राज्यपालांच्या निर्देशानुसार दरवर्षी तो कार्यक्रम हातामध्ये घेण्यात येईल.

श्री.राजेंद्र मुळक : महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी भारनियमनाच्या बाबतीत उल्लेख केला. मुळात या बाबतीत मी अगोदरच उत्तर दिलेले आहे. परंतु अधिक खोलात जाऊन सांगू इच्छितो की, विदर्भात एकूण 1,263 फिडर आहेत. त्यापैकी 1,049 फिडर भारनियमनमुक्त आहेत. सध्याच्या परिस्थितीत 214 फिडरवर भारनियमन सुरु आहे. त्या भागात 42 टक्क्यांपेक्षा जास्त तूट असल्यामुळे भारनियमन करावे लागत आहे. खरीप हंगामात अतिवृष्टी झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले. तद्‌नंतर त्या शेतकऱ्यांनी रब्बी पीक घेण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या विहिरीमध्ये पाणी असताना भारनियमनामुळे त्यांना शेतीला पाणी देता येत नाही. भारनियमन होत असल्यामुळे शेतकऱ्यांना त्रास होत आहे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक ....

राणे समितीच्या दोन बैठका झाल्या आहेत. आज शेवटची बैठक आहे. सर्व विषयांवर चर्चा झाली आहे. एका ट्रान्सफॉर्मरवर 80 टक्के पैसे भरले असतील तरच ते भारनियमनमुक्त ठेवावे, असा निर्णय झाला आहे. त्यापेक्षाही कसे कमी येता येऊ शकेल, या संदर्भात आजच्या बैठकीत निर्णय होणार आहे. मी सन्माननीय सदस्य श्री. माणिकरावजी ठाकरे व सभागृहाला सांगू इच्छितो की, या संदर्भात नक्कीच निर्णय घेतला जाईल.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून घोषणा देत असतात.)

**तालिका सभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे. सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.45 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.31 ते 12.45 पर्यंत स्थगित झाली.)

----

( नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**राजवडी (ता.इंदापूर,जि.पुणे) परिसरातील कदमवस्ती येथे एका महिलेवर झालेला बलात्कार**

**(1) * 45684 ॲड.जयदेव गायकवाड , श्री.रमेश शेंडगे , डॉ.नीलम गोऱ्हे , श्री. शरद रणपिसे , श्रीमती दिप्ती चवधरी , श्री.संजय दत्त , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राजवडी (ता.इंदापूर, जि.पुणे) परिसरातील कदमवस्ती येथील भटक्या समाजाच्या महिलेस विवस्त्र व मारहाण करुन झाडाला बांधून ठेवल्याची तसेच विजेचा शॉक देवून बलात्कार केल्याची घटना दिनांक 14 ऑगस्ट, 2013 रोजी वा त्या सुमारास घडली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार महिलेस विवस्त्र करुन मारहाण करणाऱ्यांवर कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच भविष्यात अशा घटना घडू नये म्हणून कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (1) होय, हे खरे आहे.

तथापि, सदरची घटना दिनांक 14 ऑगस्ट, 2013 रोजी मौजे गागरगावचे हद्दीत कदमवस्ती येथे घडलेली आहे.

(2) व (3) होय, प्रस्तुत प्रकरणी पीडीत महिलेने तिला मारहाण झालेबाबत दिनांक 14/8/2013 रोजी पोलीस ठाणे, इंदापूर, पुणे ग्रामीण येथे दिलेल्या फिर्यादीवरून अदखलपात्र गु.र.क्र.1016/2013, भा.दं.वि.कलम 323, 504 प्रमाणे तक्रार दाखल करून तिला औषधोपचार होवून वैद्यकिय प्रमाणपत्र मिळणेसाठी यादी देण्यात आली होती.

सदर पीडीत महिलेने वैद्यकीय प्रमाणपत्र हजर केल्याने व तिने घडला प्रकार सांगितल्याने तिचा पुरवणी जबाब नोंदवून पोलीस ठाणे, इंदापूर, पुणे ग्रामीण येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक 258/2013, भा.दं.वि. कलम 307, 354 (ब), 324, 341, 342, 323, 504, 506, 34 अन्वये दिनांक 16/8/2013 रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात पीडीत महिलेवर बलात्कार करण्याचा प्रयत्न झालेला नसून तिचा विनयभंग झाल्याचे निष्पन्न झाल्याने, सदर गुन्ह्यात 02 आरोपींना दिनांक 16/8/2013 रोजी अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचे तपासात गुन्ह्यास लावलेले भा.दं.वि.कलम 307 दिनांक 20/8/2013 रोजी कमी केलेले आहे. सदर गुन्ह्याचा तपास पूर्ण करून आरोपी विरुद्ध दिनांक 13/11/2013 रोजी मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, यांचे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले असून, सदर खटला न्यायप्रविष्ट आहे. तसेच भविष्यात अशा घटना घडू नयेत याकरिता अशा प्रकारच्या तक्रारी/खबर येताच त्यामध्ये तत्काळ लक्ष पुरवून दोषींवर योग्य ती ठोस कायदेशीर प्रतिबंधक कारवाई करून अशा घटना घडणार नाहीत याची दक्षता घेण्यात येत आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45684.........

ॲड.जयदेव गायकवाड : सभापती महोदय, पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातील राजवडी गावातील कदमवस्ती या गावामध्ये स्वातंत्र्य दिनाच्या आदल्या दिवशी म्हणजे दिनांक 14 ऑगस्ट, 2013 रोजी हा गुन्हा घडलेला आहे. भटक्या समाजातील एक महिला फणी, सुया विकण्यासाठी त्या वस्तीमध्ये गेली असताना तिच्यावर चोरीचा आळ घालून दोन आरोपींनी अतिशय अमानवी प्रकारे तिचा छळ केला आहे. मुलाच्या मनगटावरील दागिना चोरल्याचा तिच्यावर आळ घेऊन तिला विवस्त्र करुन मारहाण करण्यात आली, तिचा छळ केला आहे. बाहेरुन सायकलवरुन आलेल्या व्यक्तीने तिची सुटका केली होती. ती महिला पोलीस स्टेशनमध्ये गेल्यानंतर तिच्यावरील छळाची पोलिसांनी गंभीरपणे चौकशी करावयास पाहिजे होती. परंतु पोलिसांनी केवळ भा.दं.वि.मधील 323 व 506 कलमाद्वारे या गुन्ह्याची नोंद केली आहे. त्यानंतर त्या गावात चळवळ व आंदोलन झाले होते. प्रत्यक्षात त्या महिलेच्या अंगावर जखमा दिसत होत्या. तिच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. याबाबत त्या महिलेची तक्रार असताना केवळ भा.दं.वि.कलम 323 व 506 नुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. त्यानंतर दिनांक 16 ऑगस्ट, 2013 रोजी कलम 307 व इतर कलमे लावण्यात आली आहेत. ज्या पोलिसांनी पहिल्यांदा गुन्ह्याची नोंद योग्य कलमांद्वारे केली नाही त्यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, या घटनेबाबत पोलिसांनी योग्य दखल घेऊन सकृतदर्शनी जे पुरावे आढळले होते त्याप्रमाणे गुन्हा नोंदविलेला आहे. त्यानंतर वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर उर्वरित कलमे लावण्यात आली आहेत. यामध्ये पोलिसांनी निष्काळजीपणा दाखविलेला नाही. या गुन्ह्यातील आरोपींना अटकही केलेली आहे.

श्री.रामनाथ मोते : दिनांक 14 ऑगस्ट, 2013 म्हणजे स्वातंत्र्य दिनाच्या पूर्व संध्येला ही घटना घडलेली आहे. या गुन्ह्यांबाबत सुरुवातीला कलम 307 नुसार गुन्हा नोंदविला होता. पण दिनांक 20.8.2013 रोजी हे कलम मागे घेण्यात आले आहे. हे कलम कमी करण्याचे कारण काय ?

2...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45684.....

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, जीव घेणे, हल्ला करणे या गुन्ह्यांसाठी भा.दं.वि.मधील कलम 307 लावले जाते. या आरोपींनी त्या महिलेला जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला होता असा जबाब दिल्यामुळे कलम 307 नुसार गुन्हा नोंदविला होता. परंतु नंतर वैद्यकीय अहवाल आल्यानंतर तिच्या अंगावर सिंपल स्वरुपाच्या जखमा आढळल्या होत्या. त्यामुळे विनयभंगाची कलमे लावण्यात आली आहेत. वैद्यकीय प्रमाणपत्र व सर्व परिस्थितीजन्य पुरावे लक्षात घेऊन व सर्व साक्षीदारांची तपासणी केल्यानंतर कलम 307 रद्द केलेले आहे.

श्री.रमेश शेंडगे : या महिलेस विवस्त्र करुन तिला झाडाला बांधून, विजेचा शॉक दिला होता. इतके निर्दयीपणे तिच्याशी त्यांनी वर्तन केले होते. या राज्यात एससी.एसटी.साठी ॲट्रॉसिटी कायदा लागू आहे. ही महिला भटक्या समाजामधील आहे.

नंतर श्री.शिगम.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 12:50

ता.प्र.क्र.45684... श्री. रमेश शेंडगे...

भटक्या विमुक्त जाती या ओबीसीमध्ये नाहीत. त्यांना विशेष मागास प्रवर्ग दिलेला आहे. तेव्हा ज्याप्रमाणे एससी आणि एसटीसाठी ॲट्रासिटी कायदा वापरला जातो त्याप्रमाणे भटक्या विमुक्त जातीसाठी ॲट्रॉसिटी कायदा वापरला जाईल काय ?

श्री. आर.आर.पाटील : या बाबतीत ॲट्रासिटी कायदा लागत नव्हता. सुरुवातीला छोटी घटना होती. लहान मुलाच्या हातात दागिना होता. सुया, कंगवे विकणारी गरीब महिला तेथून गेली होती. मुलाच्या हातामध्ये दागिना नव्हता तो त्या महिलेने घेतला असा संशय आला. त्या महिलेला विचारपूस झाली, थोडीशी मारझोड झाली, विनयभंग झाला. आरोपींना योग्य कलमे लावलेली आहेत, कोणत्याही आरोपीला स्पेअर केलेले नाही. आरोपींना अटक करुन त्यांच्यावर कारवाई देखील केलेली आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : केन्द्राने कायद्यातील कलम 354 मध्ये सुधारणा केली. विवस्त्र करणे, नग्न करणे हा फौजदारी गुन्हा आहे. या महिलेला विवस्त्र केलेले असताना आरोपींना 354 कलम का लावण्यात आले नाही ?

श्री. आर.आर.पाटील : आरोपींना 354(ब), 324, 341, 342, 323, 504, 506, 34 इत्यादी कलमे लावलेली आहेत.

श्रीमती विद्या चव्हाण : त्या महिलेला विवस्त्र करुन, झाडाला बांधून शॉक देण्यात आले. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, त्या महिलेच्या शरिरावर जखमा नव्हत्या. परंतु या प्रकारामुळे तिच्या मनावर किती जखमा झालेल्या आहेत याचा विचार मंत्री महोदयांनी केलेला आहे काय ? अशा प्रकारच्या घटना घडू नयेत म्हणून कोणत्या उपाययोजना करण्यात येणार आहेत ?

श्री. आर.आर.पाटील : महिलेला विवस्त्र केले, तिची धींड काढली असा उल्लेख या ठिकाणी करण्यात आला. मी स्वत: या घटनेची माहिति घेतलेली आहे. अशा प्रकारची कोणतीही कारवाई आरोपीवर झालेली नाही. गरीब महिला सुया, कंगवे विकायला गेली होती, लहान मुलाच्या हातील दागिना नाही, तो या महिलेले घेतला असावा असा संशय आल्यामुळे तिची विचारपूस करण्यात आली, तिला मारण्यात आले ही गोष्ट खरी आहे. त्या महिलेला मारहाण झाल्यानंतर तक्रार करण्यात आली. त्यानुषंगाने कलमे लावण्यात आली. सर्व चौकशी केल्यानंतर आणि सर्व साक्षीदारांकडून माहिति घेतल्यानंतर पोलिसांनी कलमे लावलेली आहेत. ही कलमे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45684...

श्री.आर.आर.पाटील....

कडक आहेत. आरोपींना स्पेअर केलेले नाही, त्यांना पोलीस कोठडी, न्यायालयीन कोठडी दिलेली आहे. आरोपींवर पोलिसांनी कडक कारवाई केलेली आहे.

डॉ. नीलम गो-हे : या महिलेशी मी स्वत: दूरध्वनीवरुन बोलले आहे. पुणे जिल्ह्यामध्ये तरी अशी परिस्थिती आहे की वैदू समाजाचे लोक गावागावामध्ये जात असतात. ते तेथे गेल्यानंतर भांडणे होतात किंवा चोरी होते अशातला भाग नाही. ती महिला त्या गावामध्ये गेल्यानंतर चोरीचा संशय आला आणि त्या कुटुंबाने स्वत: कायदा हातात घेतला. इंदापूरमध्ये घटना घडल्यानंतर या वैदू समाजाच्या महिलेवर आमचा संशय आहे अशी तक्रार त्यांनी पोलीस स्टेशनला दाखल करायला पाहिजे होती. त्या ऐवजी या शेलार पती-पत्नीने तिला मारले. ही घटना घडल्यानंतर दोन दिवसांनी गुन्हा दाखल झाला. या संदर्भात वाघमोडे सारख्या सामाजिक कार्यकर्त्यांना आंदोलन करावे लागले. मी मनोज लोहियांना सांगितले की, तथ्य असेल तर आंदोलन करा. हा दबावाचा प्रश्न नाही. तंटा मुक्त समित्या आहेत. या घटनेमध्ये तंटामुक्त समितीचे काय झाले आणि त्याबाबतीत त्या समितीने काय कारवाई केली ? हा गावातील तंटा आहे. प्रकरण मारहाणीपर्यंत जाईपर्यंत तंटामुक्त समितीने या प्रकरणी का हस्तक्षेप केला नाही ? आंदोलन केल्यानंतर गुन्हे दाखल झालेले आहेत. तेव्हा तंटामुक्त समित्या कागदोपत्री आहेत काय ?

श्री. आर.आर.पाटील : गुन्हे नोंद झाले आणि दोन्ही पाटर्या तंटामुक्त समितीकडे आल्यानंतर तडजोड करण्याचे काम तंटामुक्त समित्या करीत असतात. या घटनेमध्ये चोरीचा संशय आला म्हणून तंटामुक्त समितीकडे न जाता अगोदरच मारहाण करण्यात आली. महिलेने तक्रार केल्यानंतर पोलिसांनी गुन्हा नोंदविला, आरोपींना अटक करण्यात आली. मेडिकल सर्टिफिकेट आल्यानंतर 307 कलम लावले पाहिजे होते. परंतु पोलिसांनी पूर्ण चौकशी केल्या नंतर 307 कलम लावण्यात आले.

...नंतर श्री. गिते...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ D/ ST/ KTG/ प्रथम श्री.शिगम 12:55

ता.प्र.क्र.45684...

कलम 307 हे कोर्टामध्ये टिकले नसते. महिलेचा विनयभंग करणे, मारहाण करणे इत्यादी सर्व कलमे आरोपींवर लावण्यात आलेली आहेत.

श्री.रामनाथ मोते : या प्रकरणी सुरुवातीला कलम 323 आणि कलम 504 लावण्यात आले होते. माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी असे सांगितले की, वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे जखमा किरकोळ स्वरुपाच्या होत्या म्हणून आम्ही 307 हे कलम कमी केले. या उत्तरात स्पष्ट म्हटले आहे की, सदर गुन्हयात दोन आरोपींना दिनांक 16 ऑगस्ट, 2013 रोजी अटक करण्यात आली. तसेच सदर गुन्हयाचे तपासात गुन्हयास लावलेले भा.दं.वि.कलम 307 कमी केलेले आहे. वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर सदर आरोपींना कलम 307 लावण्यात आले. सुरुवातीला कलम 307 का काढण्यात आले? वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे सदर गुन्हयातील गुन्हेगारांना 308 कलम लावण्यात आले होते. नंतरच्या काळात 307 कलम का काढण्यात आले या गोष्टीचा माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

श्री.आर.आर.पाटील : या प्रश्नाचे पूर्वीच उत्तर देण्यात आले आहे. ठार मारण्याचा प्रयत्न केला असा जबाब दिल्यानंतर आपण हे कलम लावले होते. परंतु या प्रकरणाचा संपूर्ण तपास पूर्ण झाल्यानंतर अशा पध्दतीचा प्रयत्न झालेला नव्हता. विनयभंग झालेला आहे, विचारपूस केलेली आहे, मारहाण झालेली आहे. त्या अनुषंगातील कलमे ठेवलेली आहेत. ठार मारण्याचा प्रयत्न तपासात कोठेही दिसून आलेला नाही.

------------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कुडाळ उद्यमनगर (जि.सिंधुदुर्ग) शहरातील लक्ष्मीनारायण होंडा**

**शोरुममधील गाड्या जाळल्याबाबत**

**(२) * ४७०१४ श्री.विजय सावंत , श्री.विनायक राऊत , ॲड.अनिल परब** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडाळ उद्यमनगर (जि.सिंधुदुर्ग) शहरातील लक्ष्मीनारायण होंडा शोरुममधील तब्बल १९ दुचाकी गाड्या अज्ञात इसमाकडून जाळण्यात आल्याची घटना दिनांक ९ ऑक्टोबर, २०१३ रोजी वा त्या सुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मालवण (जि.सिंधुदुर्ग) दांडी शाळेलगतच्या मोकळ्या जागेत लावण्यात आलेल्या तीन दुचाकी गाड्या अज्ञात इसमांनी ज्वालाग्राही पदार्थ ओतून माहे ऑक्टोबर, २०१३ मध्ये वा त्या दरम्यान जाळल्याची घटना घडली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कुडाळ व मालवण येथे वाहने जाळण्याच्या घडलेल्या घटनेमुळे शहरात प्रचंड दहशतीचे वातावरण पसरलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणातील दोषींना त्वरित अटक करावी अन्यथा येत्या २१ ऑक्टोबरला जिल्हा पोलिस अधीक्षकांच्या कार्यालयातच ठिय्या आंदोलनाचा इशारा लोकप्रतिनिधींनी पत्रकार परिषदेत दिला आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय व तद्नुषंगाने संबंधितांना अटक करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास, उपरोक्त घटनेतील किती दोषींना अटक केली व त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) आजपर्यंत या घटनेच्या अनुषंगाने कोणतेही दहशतीचे वातावरण अथवा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला नाही.

(४) होय, हे खरे आहे. तथापि दिनांक २१ ऑक्टोबर, २०११ रोजी आंदोलन कार्यकर्त्यांना उपरोक्त दोन्ही गुन्ह्यामध्ये आरोपी निष्पन्न करण्याचे दृष्टीने पोलिसांनी केलेल्या सखोल तपासाची तसेच

3...



ABG/ D/ D/ ST/ KTG/ प्रथम श्री.शिगम 12:55

कारवाईची योग्य ती माहिती दिल्याने आंदोलकांनी आपले ठिय्या आंदोलन लगेचच मागे घेतलेले आहे.

(५) उपरोक्त कुडाळ येथील घटनेबाबत कुडाळ पोलीस ठाणे गु.र.नं.९२/२०१३ भादविक ४३५ प्रमाणे तसेच मालवण येथील घटनेबाबत मालवण पोलीस ठाणे येथे गु.र.नं.८४/२०११ भादविक ४३५ प्रमाणे गुन्हे दाखल असून दोन्ही गुन्ह्यांचा तपास सुरू आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

(७) सदर प्रकरणी अद्यापही आरोपी निष्पन्न झालेले नाहीत. सदरचा गुन्हा तपासाधीन आहे.

श्री.विजय सावंत : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयात मोठ्या प्रमाणात गुन्हेगारी वाढलेली आहे. या वाढत्या गुन्हेगारीवर आळा घालण्यात तेथील पोलीस यंत्रणा अपयशी ठरलेली आहे. तेथील पूर्ण पोलीस यंत्रणा एखाद्याच्या नोकरासारखी वागते आहे. त्यामुळे तेथील गुन्हेगारीमध्ये वाढ होत आहे. मी जो तारांकित प्रश्न उपस्थित केलेला आहे, त्या अनुषंगाने विचारु इच्छितो की, कुडाळ येथे श्री.प्रदीप दिनानाथ देसाई यांचा होंडा शोरुम जाळला, त्या संदर्भात पोलीस स्टेशनकडून त्यांना पत्र आलेले आहे, त्या पत्रात पोलीस स्टेशनकडून श्री.देसाई यांना जे प्रश्न विचारण्यात आले आहेत ते मी या ठिकाणी सांगितले तर सभागृह देखील अवाक होईल. पोलीस स्टेशन अशा प्रकारचे पत्र पाठवू शकते काय याचे मला देखील आश्चर्य वाटते. गुन्हा दाखल करणाऱ्या व्यक्तीस पत्र पाठवू शकतात काय, यांना पत्र पाठविले गेले. पोलीस स्टेशनने पाठविलेल्या पत्रात जे प्रश्न विचारण्यात आले आहेत, ते प्रश्न या ठिकाणी मी थोडक्यात नमूद करु इच्छितो. जे प्रश्न या ठिकाणी सांगणार आहेत, त्यावर अनेक उप प्रश्न या सभागृहात विचारले जाणार आहेत. सदर पोलीस स्टेशनने एकूण २० प्रश्नांची शोरुम धारकास विचारणा केली आहे, त्यातील काही प्रश्न मी ठिकाणी वाचून दाखविणार आहे. त्या प्रश्नावरुन पोलीस यंत्रणेला त्यासंबंधीचा तपास करावयाचा नाही असे स्पष्ट होते. माननीय गृहमंत्र्यांना आपली पोलीस यंत्रणा कशा प्रकारे काम करीत आहे याची माहिती असणे गरजेचे आहे. पोलीस यंत्रणेकडून व्यवस्थितपणे चौकशी होत नाही, ही गोष्ट आपल्या निदर्शनास यावी म्हणून मी पोलिसांनी पाठविलेल्या प्रश्नातील

4..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

काही प्रश्न वाचून दाखविणार आहे. लक्ष्मीनारायण होंडा शोरुम कधीपासून सुरु केला आहे, लक्ष्मीनारायण होंडा शोरुमची जागा स्वत:च्या मालकीची, भाडयाची अथवा इतर कोणाकडून घेतली आहे काय, सदरची जागा करारासाठी ठरली होती की, इतर कारणासाठी होती, शोरुमची जागा विक्रीस निघाली आहे काय, आपण चालू वर्षाचे रिटर्न भरले आहे काय

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.विजय सावंत यांना सांगू इच्छितो की, आपण या संदर्भात पाच ते सहा प्रश्न विचारलेले आहेत. कृपया सन्माननीय गृहराज्यमंत्र्यांनी सुरुवातीच्या दोनच प्रश्नांना उत्तरे द्यावीत.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : एखादी घटना झाल्यानंतर संबंधित पोलीस स्टेशनला संपूर्ण माहिती घेणे क्रमप्राप्त असते. ती जागा कोठली आहे, कोणाची आहे, त्यांचे कोणाशी वैर आहे काय, इत्यादी प्रश्न सदर घटनेमागचे मूळ शोधण्यासाठी पोलीस स्टेशनकडून विचारले जातात. अशी माहिती घेण्यासाठी प्रश्न विचारले जातात. त्यांची उत्तरे गुन्हा शोधण्यास उपयुक्त ठरू शकतात.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.47014......

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात आला आहे. या घटनेमध्ये शोरूममधील 19 दुचाकी जाळण्यात आल्या. मालवण येथे काही गाड्या जाळण्यात आल्या. कुडाळ येथील सोने चांदीच्या दुकानदाराची हत्या झाली. मालवणमधील रमेश गोवेकर यांची हत्या इतिहासजमा झाली आहे. कणकवली येथील एस.एम.हायस्कूलमध्ये रमेश मणचेकर याची हत्या झाली, अंकुश राणे यांची जाळून हत्या करण्यात आली. या सर्व घटनांचा तपास सुरु आहे. सिंधुदुर्ग जिल्हयात एवढ्या हत्या होत असताना अद्याप आरोपी निष्पन्न झालेले नाहीत. सदरील गुन्हे तपासाधीन आहेत. या सर्व गुन्हयांची उकल केव्हा होणार आहे हे सभागृहाला कळले पाहिजे. आतापर्यंत त्या जिल्हयात जेवढे गुन्हे घडले त्यांचा तपास पूर्ण होऊन आरोपी केव्हा पकडले जातील?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, ज्या घटनेची माहिती दिली त्या संदर्भात लेखी उत्तर दिले आहे, इतर जे प्रश्न उपस्थित केले आहेत त्याचे निश्चितपणे उत्तर दिले जाईल.

श्री.विनायक राऊत : सभापती महोदय, कुडाळ येथील लक्ष्मीनारायण होंडा शोरुमला आग लावून 19 दुचाकी वाहने जाळण्यात आल्याच्या घटनेला अडीच महिने उलटून गेले आहेत. आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील अनुक्रमांक 80 वरील प्रश्न हा कणकवली येथील रमेश मणचेकर याच्या खुनासंबंधी असून त्या घटनेला साडेतीन महिने उलटून गेले आहेत. मागील एक वर्षात सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये जाळपोळ आणि खुनाच्या अनेक घटना घडल्या आहेत. त्यापैकी एकाही घटनेचा अद्याप तपास लागलेला नाही. सर्व गुन्हे तपासाधीन आहेत. ज्यांच्यावर अन्याय झाला त्यांना चोर समजायचे आणि पोलिसांनी 19 प्रश्नांचा खुलासा मागणारे पत्र द्यायचे असे प्रकार सुरु आहेत. तुम्ही इन्कम टॅक्स भरता का अशी पोलिसांकडून विचारणा करण्याचा गुन्हयाशी संबंध आहे का? सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये ज्या घटना घडतात त्यामागे जिल्हयातील राजकीय व्यक्तीचे हितसंबंध गुंतले असल्यामुळे तेथील पोलीस अधीक्षकांकडून गुन्हयाचा तपास होणे अशक्य आहे. त्यामुळे सिंधुदुर्ग जिल्हयातील जनता आणि उद्योजक भयभीत झालेले आहेत. या संपूर्ण घटनेचा तपास तेथील पोलीस अधीक्षकांऐवजी सीआयडीकडे देण्यात येईल काय?

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.47014..................

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, पोलीस तपास करीत आहेत. वेळ लागला हे मान्य करीन. सन्माननीय सदस्यांना वाटत असेल की, तपास सीआयडीने करावा तर सीआयडीने तपास करण्यास सरकारची हरकत नाही. कोणताही राजकीय हस्तक्षेप नाही. पोलिसांनी केलेल्या कामाची मी माहिती घेतली. या घटनेमध्ये 68 साक्षीदार पोलिसांनी तपासले आहेत. पहाटे 4.00 वाजता कोणीतरी अज्ञात इसमाने मोटार सायकलींना आग लावली. कोणीही साक्ष द्यायला पुढे आलेले नाही. मालकाला विचारले असता तो काही सांगायला तयार नाही. त्याचाही कोणावर संशय नाही. अशा स्थितीत पहाटे 4.00 वाजता तेथे कोणीही नाही अशा ठिकाणी घडलेल्या घटनेचा तपास पोलीस करीत आहेत. साक्षीदार, त्या भागात राहणारे लोक, मोबाईल डाटा तपासून बघितला आहे. अद्याप आरोपी सापडलेले नाहीत. कोणीतरी अज्ञात इसमाने आग लावली आहे. आग लावण्याचे कारण निष्पन्न झालेले नाही.

सभापती महोदय, स्थानिक पोलीस तपासाचे काम करीत आहेत. मी स्वत: आय.जी.ना तेथे पाठविले होते. त्यांनी काही सूचना दिलेल्या आहेत. आणखी 15 दिवस स्थानिक पोलीस तपास करतात का हे बघू. त्यांनी तपास सुरु केलेला आहे. नाही तर आम्ही तपास सीआयडीकडे देऊ.

नंतर 2जे.1......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ D/ KTG/ भोगले... 13:05

ता.प्र.क्र.47014...

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्व गुन्ह्यांची यादी सन्माननीय सदस्य सर्वश्री.किरण पावसकर,विजय सावंत, विनायक राऊत व आदरणीय श्री.रामदास कदम यांनी सांगितली आहे. तरी देखील गुन्हेगारांचा शोध लागत नाही. या घटनेतील वास्तव सर्वांना माहिती आहे. माननीय मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी या घटनेचा उल्लेख सांगलीतील महापलिकेच्या निवडणुकीत ठिकठिकाणी केला आहे. आपण मस्ती उतरवली नाही पण बाजूच्या राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री.पर्रिकर यांनी मस्ती उतरवली आहे. त्यांच्यामध्ये ताकद, हिंमत आहे. श्री.आर.आर.पाटील यांच्या गृह विभागामध्ये माझा एस.पी.कुणाचाही बटीक होऊन काम करणार नाही अशी ताकद आहे काय ? तो कसा लाठीमार करत होता हे आपण सर्वांनी पाहिले आहे. त्याच्या विरोधात आपण ॲक्शन घेतली का ? हे सर्व कोणी केले आहे हे स्पष्ट आहे. ते सर्वांना माहिती देखील आहे. तेव्हा या विषयामध्ये जिल्ह्याच्या बाहेरचा चांगला माहितगार अधिकारी जो कोणाच्याही राजकीय दबावाला बळी पडणार नाही अशाची नेमणूक आपण करणार आहात काय ? या सर्व गुन्ह्यांचा तपास तपास आपण प्रामाणिकपणे लावणार आहात की, यात आपल्याला राजकीय आश्रय द्यायचा आहे हे येथे स्पष्ट करावे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, येथे गोवाचे कोणीही फार कौतुक सांगण्याची आवश्यकता नाही. महाराष्ट्रामध्ये गुन्हामध्ये सत्ताधारी पक्षाचे किंवा अन्य कोणी सापडले असतील तर त्यांना सोडण्यात आलेले नाही. तेवढ्याच कठोरपणाने महाराष्ट्रात देखील कारवाया करण्यात आलेल्या आहेत आणि करत राहणार आहोत. येथे 2-3 घटनांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. श्री.रमेश गोवेकर यांच्या प्रकरणाचा तपास स्थानिक पोलीस करीत होते. परंतु, हा तपास सीबीआय मार्फत करण्यात यावा अशा प्रकारची मागणी करण्यात आली. त्यामुळे तो तपास सीबीआयकडे दिला. दरम्यान हायकोर्टामध्ये रिट दाखल झाले होते की, सीबीआयकडे तपास द्यावा. सरकारचे प्रतिज्ञापत्र बघितले तर आम्ही दाखवून देऊ की, त्यात आम्ही फार हरकत घेतली नाही. तपास पोलीस करीत आहे हे जनतेला पटले पाहिजे म्हणून तो तपास सीबीआयकडे देण्यासाठी फार विरोध केला नाही. हा तपास सीबीआयकडे दिला. या प्रकरणाचा तपास दोन वर्षापासून सीबीआय करीत आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ D/ KTG/

ता.प्र.क्र.47014...                                                श्री. आर.आर.पाटील...

सभापती महोदय, गाड्या जाळण्याच्या घटनेची मी गांभीर्याने दखल घेऊन तेथे आय.जी.ना पाठविले होते. या प्रकरणाचा तपास लावण्याचा प्रयत्न स्थानिक पोलीस करीत आहे. मी फार आढेवेढे घेतलेले नाहीत. आपणास या प्रकरणाचा तपास सीआयडी मार्फत व्हायला पाहिजे असेल तर तो देण्याची माझी तयारी आहे, असे या पूर्वीच सांगितले आहे. आता स्थानिक पोलीस काम करीत आहेत. या प्रकरणाचा तपास सीआयडीकडे दिला तर पुन्हा पहिल्या पासून तपास करावा लागेल. त्यासाठी काही वेळ लागू शकतो. या प्रकरणासंबंधी स्थानिक पोलीस काही क्ल्यू मिळतो का हे पहात आहेत. त्यामुळे त्यांना मी अजूनही 15 दिवसांची मुदत देतो. स्थानिक पोलिसांनी पाहिजे तसा तपास केला नाही तर या प्रकरणांचा तपास आपोआप सीआयडीकडे जाईल असे आदेश आजच देतो. हा तपास सीआयडीकडे देण्यास माझी कुठलीही हरकत नाही. या प्रकरणाचा तपास लागला पाहिजे असे आपल्याला वाटते तसेच शासन म्हणून, राज्याचा गृहमंत्री म्हणून मला देखील वाटते.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आपल्या माध्यमातून मला माननीय गृह मंत्र्यांना एक प्रश्न विचारावयाचा आहे. त्यांनी श्री.रमेश गोवेकर यांच्या संबंधी माहिती सांगितली. माननीय गृह मंत्र्यांनी आम्हाला एक माहिती सांगावी की, श्री.रमेश गोवकर यांचा खून झाला की, मृत्यू झाला की ते गायब झाले. निवडणुकीच्या दिवशी ते गायब असल्यासंबंधाची तक्रार झाल्यानंतर समुद्र किनारी पाचव्या दिवशी एक बॉडी मिळाली. ती बॉडी वाळूमध्ये घातली होती. त्या बॉडीचे पाय फक्त वर होते. ते पाय कावळे खात होते. त्या पन्नास कि.मी.च्या परिसरामध्ये एकही माणूस गायब झाल्याची तक्रार त्यावेळी नव्हती. मग ती बॉडी नेमकी कोणाची होती, याचा शोध आपल्या पोलिसांनी लावला आहे काय, नसल्यास, त्याचे कारण काय आहे ? येथील पोलीस कोणाचे तरी बटीक म्हणून काम करीत आहेत असे सांगितले गेले आहे. बॉडी सापडली होती. पण निवडणूक होईपर्यंत दाबून ठेवली होती. ती उजेडात आणली नाही. निवडणूक संपल्यानंतर सायंकाळी 6.00 च्या नंतर ती बॉडी आणली गेली. वैद्यकीय तपासणी झाली. खोटे आणि चुकीचे पेपर आणले गेले. नसेल तर मग ती बॉडी कोणाची होती हे सांगावे. या प्रकरणासाठी सीबीआयची आवश्यकताच नाही

..3

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.47014...

**सभापती** : सभागृहासमोर असलेल्या प्रश्नामध्ये एखाद्या बाबीचा उल्लेख असला तर त्या बाबीच्या अनुषंगाने संबंधित मंत्री महोदयांना प्रश्न विचारणे, उप प्रश्न विचारणे व प्रश्नाची उकल करणे हे बरोबर आहे. पण मूळ प्रश्नाशी संबंधित नसलेल्या अन्य प्रकरणांचा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केला तर संबंधित मंत्री हा प्रश्न वेगळा आहे असे उत्तर देऊ शकतात.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :47014......

**सभापती** .....

संबंधित मंत्री महोदयांना प्रश्न विचारुन किंवा अन्य उप प्रश्न विचारुन जास्तीत जास्त प्रश्नाची उकल करणे ही बाब बरोबर आहे. परंतु अन्य काही प्रकरणाचा उल्लेख या प्रश्नाच्या संबंधाने केला तर संबंधित मंत्री महोदय उत्तर देऊ शकतात की, हा प्रश्न वेगळा असल्यामुळे या प्रश्नाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी वेगळा प्रश्न विचारावा. माझे मत असे आहे की, एका विशिष्ट बाबीच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री. विजय सावंत यांनी प्रश्न विचारला असल्यामुळे त्यासंदर्भात मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे. या प्रश्नामध्ये जर 4 प्रकरणाचा उल्लेख केला गेला असता तर त्यावेळेस माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देणे योग्य ठरले असते. आता आपण जो प्रश्न विचारलेला आहे त्यासाठी आपल्याला वेगळा प्रश्न द्यावा लागेल. आपला प्रश्न अत्यंत गंभीर असला तरी मी मंत्री महोदयांना सांगेन की, त्यांनी या प्रश्नामध्ये योग्य ते लक्ष घालावे.

श्री. आर.आर.पाटील :सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात जरुर लक्ष घातले जाईल परंतु गोवेकरांच्या संदर्भात सीबीआय कडून माहिती प्राप्त करुन, आतापर्यंत यासंदर्भात पोलिसांनी काय तपास केलेला आहे यासंदर्भात हे अधिवेशन संपण्यापूर्वी निवेदन केले जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

--------

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्य शासनाने मंजूर केलेले व मंजुरीसाठी केंद्र शासनाकडे पाठविलेल्या महाराष्ट्र सावकारी नियंत्रण विधेयकाबाबत**

**(३) * ४६९७७ डॉ.नीलम गोऱ्हे , श्री.विनायक राऊत , श्री.विनोद तावडे , ॲड.आशिष शेलार , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.पांडुरंग फुंडकर : दिनांक २२ मार्च, २०१३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्र.८ मधील प्रश्न क्रमांक ३३८९७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने मंजूर केलेले व मंजुरीसाठी केंद्र शासनाकडे पाठविलेले महाराष्ट्र सावकारी नियंत्रण विधेयक राज्यातील अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे केंद्र शासनाने फेटाळून लावले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, विधेयक तयार करणाऱ्या संबंधित विभागातील अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, राज्यातील सावकारावर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,

(५) अद्याप यासंदर्भात कोणतीच कार्यवाही व उपाययोजना केली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री.हर्षवर्धन पाटील :** (१) नाही.

राज्य शासनाने मंजूर केलेले व मंजुरीसाठी केंद्र शासनाकडे पाठविलेले महाराष्ट्र सावकारी नियमन विधेयक राज्यातील अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे केंद्र शासनाने फेटाळून लावलेले नाही. तथापि केंद्र शासनाच्या दिनांक ८ ऑगस्ट, २०१३ च्या पत्रानुसार राज्य शासनाने सादर केलेले विधेयक परत घेऊन त्यात केंद्र शासनाच्या सूचनेनुसार आवश्यक त्या सुधारणा करून त्यास राज्य विधीमंडळाची मंजुरी घेऊन विधेयक नव्याने मंजुरीसाठी केंद्र शासनाकडे पाठविण्याबाबत सूचित केले आहे.

(२), (३), (४) व (५) दिनांक ३०/१०/२०१३ रोजी झालेल्या मा.मंत्री मंडळ बैठकीत महाराष्ट्र सावकारी (नियमन) विधेयक, २०१० च्या संदर्भात केंद्र शासनाने सुचविलेल्या दुरूस्तीसह नवीन अध्यादेश जारी करण्यास मा.मंत्री मंडळाने मान्यता दिली असून अध्यादेशाचा मसुदा मा.राष्ट्रपती महोदयांच्या मान्यतेसाठी मा.राज्यपाल यांच्यामार्फत दिनांक १८/११/२०१३ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, विदर्भाच्याच नाही तर सर्व महाराष्ट्रातील जनतेच्या दृष्टिकोनातून सावकारी विधेयक पास होणे आवश्यक होते. सावकारी विधेयकाच्या संदर्भात काही भाषणे भूमिकेमुळे आणि नंतर झालेल्या टीकेमुळे महत्वाची ठरली आहेत. सावकारांना " कोपरापासून ढोपरापर्यंत सोलून काढले जाईल"असे माननीय मंत्री महोदय श्री.आर.आर.पाटील यांनी २००८ मध्ये सांगितले होते परंतु त्या विधेयकाची अंमलबजावणी अद्याप पर्यंत झाली नाही. या विधेयकाचा २०१४ पर्यंतचा प्रवास आपण या ठिकाणी मांडलेला आहे.

..३...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :४६९७७......

डॉ. नीलम गोऱ्हे ......

सभापती महोदय, यासंदर्भात माझा प्रश्न असा आहे की, सन २००८ मध्ये या विधेयकाच्या संदर्भात अध्यादेश काढण्यात आला, २००९ मध्ये हे विधेयक मंजूर झाले, २०१० मध्ये या विधेयकावर माननीय राज्यपाल महोदयांची सही झाली परंतु सन २०१३ मध्ये हे विधेयक माननीय राष्ट्रपती महोदयांकडून परत आले. या विधेयकामध्ये एकंदर ५ वर्षे निघून गेलेली आहेत. या विधेयकामध्ये त्रुटी असल्यामुळे माननीय राष्ट्रपती महोदयांनी या विधेयकावर सही केली नाही. ज्या कारणासाठी माननीय राष्ट्रपती महोदयांनी हे विधेयक फेटाळले होते त्यासंदर्भातील त्रुटी आपण दूर केल्या आहेत अशी माहिती मिळालेली आहे. परंतु हे विधेयक माननीय राष्ट्रपती महोदय, परत फेटाळणार नाही यासंदर्भात शासनाने कोणती दक्षता घेतलेली आहे ? या विधेयकामध्ये सुरुवातीला ज्या त्रुटी आल्या त्याला जबाबदार कोण होते ? आता हे विधेयक पुन्हा माननीय राष्ट्रपती महोदयांच्या सहीसाठी पाठविलेले आहे. परंतु या विधेयकामध्ये आपण ज्या कंपन्याचा समावेश केला होता त्याबाबत आपल्याकडे माहिती आली होती की, हे विधेयक टिकणार नाही. केंद्र सरकारच्या अंतर्गत कंपन्या असल्यामुळे हे विधेयक टिकणार नाही याची माहिती आपल्याला मिळाली होती. या विधेयकावर माननीय राष्ट्रपती महोदयांची सही न झाल्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान झालेले आहे. त्यामुळे या विधेयकातील त्रुटींची पूर्तता आपण कशा पध्दतीने केली आहे ? या विधेयकाला ६ वर्षाचा विलंब का लागला ? यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी माहिती देण्याची आवश्यकता आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, हे विधेयक अनेक वर्षापासून प्रलंबित असून हे विधेयक तातडीने मंजूर व्हावे अशी राज्यातील जनतेची इच्छा आहे. या विधेयकाच्या संदर्भात विभागाने केंद्राशी वारंवार संपर्क साधला असून केव्हा केव्हा संपर्क करण्यात आला होता त्याच्या तारखा सांगून मी सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही. केंद्र सरकारने मागच्या काळात विभागाला पत्र पाठवून सांगितले होते की, तुम्ही कशा पध्दतीने त्रुटी काढणार आहात ? यासंदर्भात आम्ही केंद्राला सविस्तर कळवले होते व त्यानंतर त्यांनी सांगितले की, राज्य सरकारच्या वतीने आम्हाला अभिप्राय पाठविण्यात यावा. उत्तरामध्ये नमूद केल्या प्रमाणे दि. १८/११/२०१३ रोजी



अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :४६९७७......

श्री. हर्षवर्धन पाटील .....

यासंदर्भात मंत्री मंडळाचा ठराव करुन त्यांना दोन्ही बाबींची पूर्तता करुन देण्यात आली आहे. सचिवांमार्फत मी दिल्लीवरुन माहिती घेतली असून केंद्रीय गृहमंत्रालयांने यासंदर्भात जे ओपिनियन मागितले होते त्यामध्ये कॉर्पोरेट अफेअर डिपार्टमेंट, लिगल डिपार्टमेंट तसेच फायनांस डिपार्टमेंटचे अभिप्राय त्यांनी मागवले होते. आज सकाळी माझ्याकडे जी माहिती प्राप्त झाली त्यामध्ये कॉर्पोरेट अफेअर डिपार्टमेंट व  लिगल डिपार्टमेंटने याला संमती दिलेली आहे. आता केवळ फायनांस डिपार्टमेंटच्या संमतीचा प्रश्न राहिला आहे. या विषयाच्या संदर्भात विभागाचे सचिव दिल्ली येथे जाऊन आले तसेच माननीय मुख्यमंत्र्यांच्या मार्फत सुध्दा यासंदर्भात पाठपुरावा  करण्यात आला होता. मी सभागृहाला आश्वासित करु इच्छितो की, आता या विधेयकामध्ये आवश्यक ते बदल झ ालेले आहेत. फायनांस डिपार्टमेंटची संमती मिळताच माननीय राष्ट्रपती महोदयांची या विधेयकाला संमती मिळेल व त्यामध्ये कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही व तातडीने सावकारी कायदा राज्यात अंमलात आणला जाईल.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.46977...

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, राज्यामध्ये सावकारी कायदा का आला याचा विचार केला पाहिजे. सन 2004 ते 2009 या काळात सावकाराच्या जाचामुळे राज्यात पाच हजार पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. हा विषय टोकाला गेल्यामुळे सन्माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी सावकारी कायदा आणला जाईल आणि जाच करणाऱ्या सावकाराला सोडले जाणार नाही असे सांगितले. त्यानुसार सन 2009 मध्ये सावकारी संदर्भातील विधेयक मांडण्यात आले. महाराष्ट्रामध्ये विधानसभा अस्तित्वात आल्यापासून एखादे विधेयक इतकी वर्षे माननीय राष्ट्रपतींकडे मान्यतेसाठी पडून राहिले असे कधी झालेले नाही. सन 2009 पासून सावकारी संदर्भातील विधेयक माननीय राष्ट्रपतींकडे मान्यतेसाठी पडून आहे. हे विधेयक दोन्ही सभागृहाने एकमताने मंजूर करुन ते माननीय राष्ट्रपतींच्या मान्यतेसाठी पाठविले. हे विधेयक 8 ऑगस्ट 2013 पर्यंत त्यांच्याकडे पडून होते. माझा प्रश्न आहे की हे विधेयक मागील चार वर्षे माननीय राष्ट्रपतींच्या मान्यतेसाठी का पडून होते, हे विधेयक लवकर मंजूर व्हावे यासाठी राज्य सरकारने काय प्रयत्न केले ? या विधेयकाच्या संदर्भात केंद्र सरकारकडून काय सूचना करण्यात आल्या, जर सूचना केल्या असतील तर त्या तातडीने अमलात का आणल्या नाहीत, असे अनेक प्रश्न उपस्थित होतात. चार वर्षात सावकारांच्या दबावामुळे केंद्र सरकारने किंवा महाराष्ट्र सरकारने हे विधेयक दाबून ठेवले असा अर्थ आम्ही काढायचा काय ? माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, आम्ही दिनांक 18.11.2013 रोजी पत्र पाठविले. आपणास दिनांक 8 ऑगस्ट 2013 रोजी केंद्र सरकारकडून पत्र आले. ऑगस्ट महिन्यात पत्र आल्यानंतर आपण नोव्हेंबर महिन्यात मंत्रिमंडळाची मान्यता घेऊन माननीय राज्यपालांमार्फत अध्यादेश जारी करण्याचा निर्णय घेत आहात. माझा प्रश्न आहे की, आपण जुने सावकारी विधेयक मंजूर करणार आहात की नवीन सुधारित सावकारी विधेयक पुन्हा सभागृहात आणून ते मंजूर करणार आहात ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, राज्य सरकार सावकारांच्या दबावाखाली काम



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.46977...

श्री.हर्षवर्धन पाटील.....

करीत आहे असा येथे जो आक्षेप घेण्यात आला तो पूर्णत: चुकीचा आहे. हे विधेयक एका विभागापुरते मर्यादित नाही. या विधेयकामध्ये गृह विभाग, वित्त विभाग, कॉपॉर्रेट विभाग अशा विविध विभागांचा समावेश आहे. कारण ही इम्मुव्हेबल प्रॉपर्टी आहे. इम्मुव्हेबल प्रॉपर्टीचे गहाणखत बेकायदेशीर असेल तर ते संपूर्ण गहाणखत शेतकऱ्यांच्या नावावर करुन द्यावे अशा प्रकारचा मोठा बदल या विधेयकामध्ये आहे. यास लीगल स्टेटस देण्याच्या संदर्भात आपण हे बदल केलेले आहेत. आता कोणत्याही प्रकारची अडचण राहिलेली नाही. फक्त त्यास फायनान्स विभागाची कन्सेन्ट मिळाल्यानंतर माननीय राष्ट्रपती महोदयांची मान्यता मिळेल. ती मान्यता मिळाल्यानंतर सुधारणा सहित.. (अडथळा).

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकाचेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आपण मला माझे उत्तर पूर्ण करु द्यावे. हे विधेयक तातडीने मंजूर करण्यासाठी वित्त विभागाची मान्यता घेण्यासाठी राज्य शासन तातडीने प्रयत्न करील. कोणत्याही परिस्थितीत नवीन कायद्याचा राज्यामध्ये अंमल करण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे.

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, राज्य शासन नवीन विधेयक आणणार आहे काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझी माननीय सहकार मंत्री महोदयांना विनंती आहे की, त्यांनी खरे बालावे. केंद्र सरकारने हे विधेयक चार वेळा आपल्याकडे दुरुस्तीसाठी पाठविले.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 13:20

ता.प्र.क्र.46977....

श्री.विनोद तावडे....

सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी त्या काळात 5 हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे सांगितले. त्यावेळी दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी एकमताने सावकारी प्रतिबंधक विधेयक संमत केले. हे विधेयक संमत झाल्यानंतर देखील आजच्या घडीला आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची संख्या 9894 वर गेली आहे. आपण सावकारी प्रतिबंधक विधेयक केंद्राकडून संमत करुन आणू शकला असता तर पुढील 4894 आत्महत्या थांबविता आल्या असत्या. या विषयी माननीय सभापतींनी माननीय उप मुख्यमंत्र्यांबरोबर बैठक घेतली होती. त्या बैठकीत या विधेयकाचा पाठपुरावा करण्यासाठी केंद्र सरकारकडे एक अधिकारी पाठविण्याचा निर्णय घेतला. दुर्दैवाने त्या बाबतीत राज्य सरकारकडून पुढील कोणतीच हालचाल झाली नाही. केंद्र सरकारने विधेयकातील काही किरकोळ तरतुदींबाबत राज्य सरकारकडे विचारणा केल्यानंतर सुध्दा राज्य सरकारकडून त्या बाबतचा खुलासा चार-चार महिने झाला नाही. आम्ही कामकाज सल्लागार समितीमध्ये या विषयी नव्याने अध्यादेश काढण्याची मागणी केल्यानंतर कार्यवाही झाली. हे विधेयक संमत करुन न आणण्यामध्ये राजकीय नेतृत्वाचा हलगर्जीपणा आहे की, अधिकाऱ्यांचा हलगर्जीपणा आहे ? ज्यांनी या बाबतीत हलगर्जीपणा केला असेल त्या अधिकाऱ्यांवर शासन कारवाई करणार आहे काय ? वित्तीय कंपन्या आरबीआयच्या रेग्युलेशनखाली असतात. त्यांना वेगळे करु शकत नाही अशा किरकोळ बाबी होत्या. सुरुवातीला तर हे विधेयक स्पेलींग मिस्टेकमुळे परत आले होते. परंतु त्या बाबतची पूर्तता करण्यात आली नाही. ज्या अधिकाऱ्यांनी या प्रकरणी हलगर्जीपणा केला त्यांना सरकार पाठीशी घालत आहे. या निमित्ताने विचारु इच्छितो की, ज्या अधिकाऱ्यांनी या प्रकरणी हलगर्जीपणा केला आहे त्या अधिकाऱ्यांवर 4894 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याप्रकरणी खुनाचा खटला दाखल करणार काय, तसेच ज्यांनी या प्रकरणी दिरंगाई केली त्यांच्यावर कारवाई करणार काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, सावकारी प्रतिबंधक विधेयकासंदर्भात केंद्र सरकारने केलेल्या सूचना किरकोळ स्वरुपाच्या होत्या. पण तसे नाही. या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, केंद्र सरकारने राज्य सरकारला कळविले की, या विधेयकातील कलम-2 च्या 4 मध्ये उपकलम (A) आणि (G) अंतर्गत बँकींग संस्थेची व्याख्या अधिक स्पष्ट करावी.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 13:20

ता.प्र.क्र.46977....

श्री.विनोद तावडे : मी सन्माननीय मंत्र्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी केंद्र सरकारकडून या विधेयकासंदर्भात ज्या त्रुटी आल्या होत्या त्यांच्या पूर्ततेचा घटनाक्रम सांगावा.

श्री.हर्षवर्धन पाटील : महोदय, या विधेयकाबाबत राज्य मंत्रिमंडळाने दिनांक 21 एप्रिल, 2008 रोजी निर्णय घेतला. त्यानंतर विधेयकाचा मसुदा केंद्र सरकारला दिनांक 27 ऑगस्ट, 2008 रोजी पाठविला. केंद्रीय वित्त मंत्रालयाने दिनांक 26 डिसेंबर, 2008 रोजी विधेयकाच्या प्रारुपाबाबत काही निरीक्षणे नोंदविली. केंद्रीय गृह मंत्रालयाने या निरीक्षणावर राज्य सरकारचा अभिप्राय दिनांक 17 जुलै, 2009 मागितला. केंद्रीय गृह मंत्रालयाने निरीक्षणाबाबत जे मुद्दे मांडले होते त्या बाबतचे उत्तर राज्य सरकारने दिनांक 20 सप्टेंबर, 2009 रोजी पाठविले. त्यानंतर विधेयकामध्ये काही बदल करण्यात यावा असे सुचविले. त्यामुळे राज्य सरकारने सन 2010 च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात हे विधेयक मान्यतेसाठी ठेवले. सभागृहात हे विधेयक मान्य झाल्यानंतर दिनांक 7 मे, 2010 रोजी माननीय राष्ट्रपतींच्या मान्यतेसाठी पाठविले. दिनांक 11 नोव्हेंबर, 2011 रोजी केंद्रीय वित्त मंत्रालयाने विधेयकाच्या अनुषंगाने पुन्हा काही शंका उपस्थित केल्या. त्यानंतर दिनांक 11 डिसेंबर, 2011 रोजी केंद्रीय गृह मंत्रालयाने या संदर्भात पुन्हा अभिप्राय मागविला. तो अभिप्राय दिनांक 30 जानेवारी, 2012 रोजी पाठविला. केंद्रीय गृह मंत्रालयाने इतर विभागांची सुध्दा माहिती मागविल्यामुळे हा विलंब झाला. त्यानुसार राज्य सरकारने माहिती पाठविली. त्यानंतर दिनांक 24 एप्रिल, 2012 रोजी केंद्रीय वित्त विभागाने या संदर्भात काही मुद्दे उपस्थित केले. त्या मुद्यांच्या पूर्ततेबाबत राज्य सरकारने तीन दिवसात तातडीने म्हणजेच दिनांक 11 मे, 2012 रोजी डी.ओ. लेटर पाठवून कळविले. दिनांक 4 जून, 2012 रोजी वित्त मंत्रालयाने पुन्हा केंद्रीय गृह मंत्रालयाच्या संदर्भात सुधारित अभिप्राय मागविले. तदनंतर केंद्र सरकारने मागविलेल्या मुद्यांची माहिती राज्य सरकारने दिनांक 11 जून, 2012 रोजी सर्व फॉर्मेटमध्ये केंद्र सरकारला परत पाठविली. केंद्र सरकारने दिनांक 1 सप्टेंबर, 2012 रोजी पुन्हा माहिती मागविली. ती माहिती सुध्दा दिनांक 4 डिसेंबर, 2012 रोजी केंद्र सरकारकडे पाठविली.

नंतर श्री.कांबळे....

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 46977 ....**

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य जागेवर बसून मोठ्याने बोलत असतात.)

श्री. हर्षवर्धन पाटील ....

सभापती महोदय, मला उत्तर देऊ द्यावे. विधी व न्याय विभागाने ....

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, माननीय मंत्री उत्तर देत आहेत. त्यांचे उत्तर झाल्यानंतर आपण प्रश्न विचारू शकता.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, केंद्रीय गृहमंत्री महाराष्ट्रातील आहेत. अशा पध्दतीने कायद्याबाबत होत असेल तर ते योग्य नाही.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी सदनाला सांगितले आहे की, केंद्र शासनाकडे पाठविलेली इतर खात्याची विधेयके वेगळ्या कॅटेगरीचे असतात. या विधेयकाचा केंद्र शासनातील 6-7 खात्यांशी संबंध येतो. या विधेयकाचा संबंध फक्त केंद्रीय गृह विभागाशी नाही.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, या विधेयकाशी केंद्र शासनाच्या 6-7 विभागांचा सबंध कसा येत आहे, हे देखील आपण सांगावे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य मोठ्याने बोलतच असतात.)

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना बोलू द्यावे, मी खाली बसतो.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, शेतकरी आत्महत्या करीत आहेत. विधेयकाचा कोणत्या 7 केंद्रीय विभागांशी संबंध आहे, ते सांगावे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी तेच सांगत आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना एवढी घाई का आहे ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आम्हाला घाई यासाठी आहे की, राज्यातील शेतकरी आत्महत्या करीत आहेत.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, विधी व न्याय विभाग, अर्थ विभाग, गृह विभाग, कॉर्पोरेट अफेयर्स विभाग या विभागांचा विधेयकाशी संबंध येतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नगरविकास विभागाचा संबंध या विधेयकाशी येत नाही.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>ता.प्र.क्र. 46977 ....</u>**

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन मोठ्याने घोषणा देतात.)

**उप सभापती** : विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य उत्तर ऐकण्याच्या मन:स्थितीत नाहीत का ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आपण आम्हाला संरक्षण द्यावे.

**उप सभापती** : मी आपणास कसे संरक्षण देणार ? माननीय मंत्री उत्तर देत आहेत. परंतु, आपण ते उत्तर ऐकूण घेण्यास तयार नाही. माननीय मंत्री उत्तर देताना आपण शांत बसून उत्तर ऐकणे आवश्यक आहे. ही पध्दत बरोबर नाही.

(विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य घोषणा देत सभात्याग करतात.)

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी आता सांगितलेला सर्व कम्प्लायन्स करण्यासाठी विलंब झाला आहे. मघाशी संगितल्याप्रमाणे, यामध्ये वित्त विभाग आहे. सरकारची भावना स्पष्ट आहे. हे विधेयक मंजूर करण्याकरिता सर्व फॉर्मलिटिज पूर्ण झालेल्या आहेत. विधेयकाला तातडीने केंद्र शासनाची मान्यता मिळावी याकरिता राज्य सरकारने पुढाकार घेतला आहे. सभागृहात माननीय गृहमंत्री उपस्थित आहेत, त्यांनीही यामध्ये पुढाकार घेतला आहे. राज्यात कोणत्याही परिस्थितीत अशा पध्दतीने बेकायदेशीर सावकारी खपवून घेणार नाही, असे सरकारने ठरविले आहे. बेकायदेशीर सावकारीला प्रतिबंध करण्याकरिता कायदा आणण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्याकडे सन 1946 चा जुना कायदा होता. त्या नुसार केसेस होऊ शकत नव्हत्या. अनेक बेकायदेशीर सावकार कोर्टातून जामीन घेत होते. त्यामुळे आता आपण सर्वसमावेशक कायदा केला आहे. विधेयकास अनेक विभागांची मान्यता मिळण्यास विलंब झाला आहे, ही गोष्ट खरी आहे. सर्व मान्यता मिळालेल्या आहेत. फक्त वित्त विभागाची मान्यता बाकी आहे. वित्त विभागाकडूनही मान्यता तातडीने घेतली जाईल. आवश्यकता असेल तर, मी स्वत:, सचिव दिल्लीला जाऊ. माननीय मुख्यमंत्री देखील आहेत. केंद्र शासनात आपले केंद्रीय गृहमंत्री आहेत.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 46977 ....**

श्री. हर्षवर्धन पाटील ....

राज्य सरकारचे गृहमंत्री वगैरे आम्ही सर्वजण दिल्लीला जाऊ. विधेयकाला तातडीने मान्यता मिळाल्यानंतर बेकायदेशीर सावकारीला प्रतिबंध करण्याकरिता नवीन सुधारित कायदा राज्यामध्ये आणू, हेच मला सांगायचे आहे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, शासन या कायद्याच्या संदर्भात आग्रही आहे. हा कायदा झालाच पाहिजे. सदर कायद्याची सुरूवात अशी झाली होती की, राज्यात अनेक सावकारांवर कारवाई केल्या होत्या. राज्यात 2100 सावकारांना अटक केली होती. कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांनी त्यांच्या जमिनी गहाण टाकल्या होत्या. सावकारांना अटक करून गहाण टाकलेल्या जमिनींचा प्रश्न संपत नव्हता. पोलीस सावकारांना अटक करून तुरुंगात टाकत होते. पण गहाण ठेवलेल्या जमिनी मूळ मालकाला परत देता येत नव्हता. त्या संदर्भातील प्रोव्हिजन करणारा हा महत्त्वपूर्ण कायदा राज्य सरकारने केला. विलंब झाला, ही गोष्ट मान्य केली पाहिजे. परंतु, एकाच वेळी क्विरीज आल्या असत्या तर कदाचित राज्य सरकारने, विधानसभेने, विधानपरिषदेने या क्विरीजचे उत्तर एकाच वेळी दिले असते.

( नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.46977.... श्री.आर.आर.पाटील....

परंतु प्रत्येक वेळी केंद्र सरकारकडून एकेक त्रुटी काढली जाते. राज्य सरकारचे व केंद्र सरकारचे संबंध चांगले रहावेत यासाठी घटनात्मक बदल करण्याची भूमिका घेतलेली आहे. त्यासाठी केंद्र सरकारने राज्य सरकारचे अभिप्राय मागविलेले आहेत. राज्य सरकारने राणे समिती नेमलेली आहे. राज्याला कारभार गतीने करता यावा यासाठी काही अधिकार वाढविण्याची गरज आहे. याबाबत धोरणात्मक निर्णय घेऊन सरकारच्या भावना कळविण्यात येतील. मोटार वाहन कायद्यान्वये एखाद्या वाहनाने हॉर्न वाजविल्यास त्यासाठी किती दंड केला पाहिजे यासाठी केंद्र सरकारची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही असे सरकारचे मत आहे. पण आज आयपीसी, सीआरपीसीमधील कलमात बदल करण्यासाठी केंद्र सरकारची मान्यता घ्यावी लागते. त्यामुळे राज्य सरकारला सोपविलेल्या जबाबदाऱ्या गतीने व नीटपणे पार पाडता येत नाहीत. म्हणून या समितीमार्फत शिफारस करण्यात येईल. पण या कायद्याबाबत राज्य सरकार आग्रही आहे. सरकार सावकाराच्या दबावाखाली काम करीत नाही. मागील महिन्यामध्ये सांगलीमध्ये एका सावकाराला मोक्काखाली अटक केलेली आहे. मोक्का कायद्यातील तरतुदीनुसार त्यांना अटक करण्यास सरकार कमी पडलेले नाही. 21 सावकारांवर कारवाई केलेली आहे. विरोधी पक्षातील सदस्यांनी व्यक्त केलेल्या एका मताशी मीही सहमत आहे. आज महाराष्ट्रात अनेक सावकार आहेत. ज्यांनी शेतकऱ्यांच्या हजारो एकर जमिनी बेनामी घेतलेल्या आहेत. शेतकऱ्यांना न्याय देण्याची आवश्यकता आहे. म्हणून या कायद्याची नितांत आवश्यकता आहे. राज्य शासनाकडून केंद्र सरकारकडे आग्रही भूमिका मांडण्यात येईल. माननीय सहकार मंत्री या संदर्भात चांगले काम करीत आहेत. कोणत्याही सभागृहात किंवा सभागृहाबाहेर या कायद्याचा उल्लेख करीत असताना "कोपरापासून ढोपरापर्यंत" या माझ्या एका वाक्याचा नेहमी वापर केला जातो. या वाक्याच्या पाठीमागच्या भावना विरोधी पक्षाने लक्षात घेतल्या पाहिजेत. माझ्या वाक्याचा अर्थ असा आहे की, आम्ही या या गोष्टी गांभीर्याने घेऊ.

काही वर्षांपूर्वी विरोधी पक्षाच्या काही सन्माननीय सदस्यांनी एन्रॉन प्रकल्पाला समुद्रामध्ये बुडवू असा उल्लेख केला होता. त्यांच्या बोलण्याप्रमाणे ते एन्रॉन प्रकल्पाला समुद्रात बुडविणार होते का ? त्या पाठीमागची भावना व स्पिरीट लक्षात घेतले पाहिजे. कोपरापासून ढोपरापर्यंत

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

आम्ही सोलून काढू याबाबत आपला गृह मंत्री फार आग्रही आहे. मराठी भाषेला यामुळे एक शब्दप्रयोग मिळाला आहे त्याबद्दल माझे आभार मानण्याऐवजी सातत्याने तोच तोच शब्द उकरुन काढून हा कायदा सभागृहासमोर आल्यानंतर निवडणुकीच्या प्रचाराच्या वेळी जाहीर सभेमध्ये हा शब्द वापरला जातो. सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांच्या भावना आम्ही समजू शकतो. विदर्भात सहकार क्षेत्राचा सेटअप नसल्याने लोकांना खाजगी सावकाराकडून कर्ज घ्यावे लागते. या कायद्याला विलंब झालेला आहे हे मान्य आहे. पण या सावकारांना हे सरकार सोडणार नाही. ज्यांनी गोरगरीब शेतकऱ्यांच्या जमिनी घेतलेल्या आहेत त्या सावकारांच्या 7/12 वरील जमिनी कमी करुन मूळ मालकांच्या नावावर केल्याशिवाय हे शासन स्वस्त बसण्याची भूमिका घेणार नाही.

श्री.विजय सावंत : सभापती महोदय, माझा पॉईन्ट ऑफ ऑर्डर आहे. दोन्ही सभागृहात विधेयक मंजूर केले जाते. त्यानंतर राष्ट्रपतींच्या मंजुरीसाठी पाठविण्यात आल्यावर त्याला संमती मिळत नाही. हा दोन्ही सभागृहाचा अवमान आहे. यापूर्वी अशी पध्दत नव्हती. तेथे विधेयके गेल्यानंतर कनिष्ठ वर्गातील कर्मचाऱ्यांनी छोट्या छोट्या त्रुटी काढणे हे योग्य नाही. यापूर्वी विधेयकाचा नमुना त्यांच्याकडे पाठविला जाई. त्यांच्या मंजुरीनंतर ते विधेयक दोन्ही सभागृहात मंजुरीसाठी येत होते. आता मात्र दोन्ही सभागृहांनी मंजूर केलेल्या विधेयकांमध्ये केंद्र सरकारकडून त्रुटी काढल्या जातात. हे विधेयक पाठविण्यापूर्वी तेथील मंत्र्यांनी राज्य सरकारला सांगितले पाहिजे. पण दोन्ही सभागृहांनी मंजूर केलेल्या विधेयकांमध्ये ते सुधारणा कसे करु शकतात ? हा दोन्ही सभागृहांचा अपमान आहे. तो बंद झाला पाहिजे.

पूर्वी विधेयक तयार झाल्यानंतर ते केंद्र सरकारकडे पाठवित होतो. त्यानंतर त्यांच्याकडील विभाग ते विधेयक तपासून परत पाठवित होते. त्यानंतर दोन्ही सभागृहामार्फत ते विधेयक मंजूर होत होते. ती पध्दत पुन्हा सुरु करण्यात यावी असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सन्माननीय सदस्य श्री.विजय सावंत आणि माननीय गृह मंत्री यांनी म्हटल्या प्रमाणे इंटरस्टेट रिलेशनशिपसंबंधी एक समिती गठित झालेली आहे. स्टेट कन्करन्ट लिस्ट, सेंट्रल कन्करन्ट लिस्ट आणि काही कॉमन इश्यूज आहेत. यासंबंधी काही बदल करण्याचे केंद्र सरकारचेही धोरण आहे.

नंतर श्री.शिगम.......

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 13:35

ता.प्र.क्र.46977....

श्री. हर्षवर्धन पाटील....

केन्द्र व राज्य सरकारच्या यादीमध्ये असे विषय आहेत की त्यामध्ये लाँग टर्मसाठी मार्ग काढावा लागेल. यामध्ये कॉर्पोरट अफेअर्स, गृह विभाग, वित्त विभाग, विधी व न्याय विभाग, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचा देखील या बिलाशी संबंध आहे. माननीय गृह मंत्र्यांनी सांगितल्या प्रमाणे एक विशेष अधिकारी नेमला जाईल. त्याचप्रमाणे माननीय मुख्यमंत्री, माननीय गृहमंत्री तसेच राज्याचे केंद्रातील मंत्री आम्ही सर्व केन्द्र शासनाकडे पाठपुरावा करुन केन्द्राने हे विधेयक मंजूर करावे यासाठी पाठपुरावा करु.

श्री. आर.आर.पाटील : राज्य सरकारतर्फे प्रस्ताव दिल्यानंतर केन्द्रातील विरोधी पक्षाचे खासदार काय करीत आहेत ? केन्द्र सरकारला ते जाब विचारत नाहीत. ते येथेही काम करीत नाहीत आणि केन्द्रातही काम करीत नाहीत.

श्री. हेमंत टकले : महाराष्ट्र सावकारी नियंत्रण विधेयकबाबत गेल्या कित्येक वर्षापासून उद्‌भवणा-या अडचणी, त्यावर राज्याचे शासनकर्ते करीत असलेली मात, केन्द्राने हे बिल लवकरात लवकर मंजूर करण्यासाठी राज्य शासन करीत असलेले प्रयत्न, या गोष्टी एका बाजूला होत असताना अशा प्रकारची सावकारी राज्यामध्ये झाली तर मोका लावायला सरकार मागेपुढे पहाणार नाही असे माननीय गृहमंत्र्यांनी सांगितले. अशा पध्दतीने सावकारी पध्दतीवर नियंत्रण आणता येईल. अशा प्रकारचा कायदा करणारे महाराष्ट्र राज्य हे देशातील पहिले राज्य आहे काय ? अशा प्रकारची सावकारी पध्दत इतर राज्यामध्ये चालू असेल तर त्या राज्यामध्ये कोणत्या कायद्यानुसार कोणती कलमे लावून या पध्दतीवर नियंत्रण आणता येईल या संबंधीची माहिती इतर राज्यांकडून प्राप्त करुन घेतलेली आहे काय ? शेतक-यांच्या जमिनी गहाण खत करुन सावकारी करणाऱ्या लोकांवर नियंत्रण अशा प्रकारचा हा कायदा आहे. यामध्ये नगरविकास खात्याची प्रॉपर्टी देखील येते. अशा प्रकारची सावकारी केवळ शेतकऱ्यांपुरती मर्यादित राहिलेली नाही. शहरी भागामध्ये देखील अशा प्रकारची अवैध सावकारी मोठया प्रमाणावर सुरु आहे. यानुषंगाने या कायद्यामध्ये काही सुधारणा करण्याच्या प्रयत्न करण्यात येईल काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सावकारीला आळा घालण्याचा प्रयत्न करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. इतर राज्यांनी देखील आपलेच अनुकरण केलेले आहे. त्यांनी आपल्याकडून ड्राफ्टची





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 13:35

ता.प्र.क्र.46977....

श्री. हर्षवर्धन पाटील....

कॉपी घेतलेली आहे. काही राज्यांनी हा कायदा आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न केलेले आहेत.

दुसरे असे की, आपण खूप बारकाईने अभ्यास करुन कलमांचा अंतर्भाव केलेला आहे. वेळेअभावी सर्वच कलमांचा उल्लेख मी या ठिकाणी करु शकणार नाही. बेकायदेशीरपणे कोणतेही गहाणखत करता येणार नाही. कलम 18 मध्ये असे स्पष्टपणे म्हटलेले आहे की, दस्तऐवज असल्यास ते घोषित करण्याचा व अशा मालमत्तेचा ताब मूळ कर्जदारांकडे अथवा त्याच्या वारसाकडे देण्याचा आदेश देण्याचे अधिकार निबंधकास देण्याची तरतूद कायद्यामध्ये केलेली आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, आता सर्व फॉर्म्यालिटीज पूर्ण झालेल्या आहेत. केंद्राच्या मान्यतेनंतर तातडीने हा कायदा अमलात आणण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री. जयंत प्र. पाटील : या कायद्याला राष्ट्रपतींची मान्यता मिळेपर्यंत अध्यादेश काढून या कायद्याची अंमलबजावणी राज्य सरकार करणार आहे काय ? बिहार राज्यामध्ये फार कमी विधानसभा चालते. त्या ठिकाणी विधानसभा सुरु झाली की काढलेला वटहुकूम लॅप्स होतो आणि विधानसभा संपली की ताबडतोब वटहुकूम काढला जातो. या पध्दतीने राज्यामध्ये अध्यादेश काढण्यात येईल काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : काही गोष्टींचा केंद्राशी संबंध असल्यामुळे माननीय राष्ट्रपतींची मान्यता असल्या शिवाय अध्यादेश काढता येत नाही. आता सर्व फॉर्म्यालिटीज पूर्ण झालेल्या आहेत.केन्द्राच्या मान्यते नंतर हा कायदा लवकरात लवकर अंमलात आणता येईल.

श्री. जयवंतराव जाधव : परळीच्या एका राजकीय नेत्याला सावकारीच्या गुन्ह्याखाली अटक झालेली आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 46977....

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, परळीची बाब असल्यामुळे मला माहिती प्राप्त करुन घ्यावी लागेल. त्यानंतर ती माहिती सभागृहाला सांगण्यात येईल.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मिरा-भाईंदर (जि.ठाणे) येथे बंद असलेला पोलीस नियंत्रण कक्ष सुरु करण्याबाबत**

**(४) * ४६२६९ श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री.संजय दत्त , श्री.चरणसिंग सप्रा , श्रीमती अलका देसाई , श्री.मनीष जैन , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.एम.एम.शेख :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर (जि.ठाणे) येथील वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलिसांना घटनास्थळी त्वरित पोहचण्यासाठी व गुन्ह्याची माहिती त्वरित मिळण्यासाठी मिरा-भाईंदर येथे सुरु करण्यात आलेले अत्याधुनिक पोलीस नियंत्रण कक्ष एका वर्षातच बंद पडला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बंद असलेला पोलीस नियंत्रण कक्ष त्वरित सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, भाईंदर ते विरार या क्षेत्रात गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलीस नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात आली होती. भाईंदर, विरार, पालघर, डहाणू या परिसरातील लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात शहरीकरण झालेले आहे. या शहरांच्या परिसरामध्ये हत्या, किडनॅपींग, चेन स्नॅचिंग, दुचाकी व चारचाकी वाहनांच्या चोऱ्या अशा प्रकारची गुन्हेगारी वाढत आहे. त्या परिसरात अशा प्रकारांवर नियंत्रण ठेवण्याचे काम पोलीस यंत्रणा करीत आहे. मिरा-भाईंदर या ठिकाणी पोलीस नियंत्रण कक्ष स्थापन करण्यामागचा हेतूच असा होता की, या संपूर्ण परिसरातील गुन्हेगारीवर आळा घालावयाचा आहे. सदरचे नियंत्रण कक्ष काही दिवस कार्यरत होते. त्यानंतर ते बंद पडले. तेथील एस.पी. यांनी सुध्दा अशा प्रकारचे स्टेटमेंट दिले की, हा नियंत्रण कक्ष आता बंद झालेला आहे परंतु तो त्वरित सुरु करण्यात येणार आहे. सदर नियंत्रण कक्ष कधीपर्यंत सुरु करण्यात येईल ? या परिसरातील वाढत्या लोकसंख्येमुळे गुन्हेगारीचे प्रमाण वाढलेले आहे. या प्रश्नाच्या निमित्ताने एक बाब निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, तीन वर्षापूर्वी मिरा-भाईंदर येथील एक डी.वाय.एस.पी. करप्शनमध्ये सस्पेंड झाले. त्या डी.वाय.एस.पी.ची जागा आजपर्यंत रिक्त आहे. ती जागा अद्याप भरण्यात आलेली नाही. त्याचा ॲडिशनल चार्ज इकॉनॉमिक अफेअर्सचे डी.वाय.एस.पी. यांच्याकडे

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 46269 .... श्री. मुझफ्फर हुसेन...

देण्यात आलेला आहे. मागच्या वर्षी पालघर येथील फेसबूक प्रकरणात पोलीस अधीक्षक, ग्रामीण सस्पेंड झालेले आहेत. ती जागा सुध्दा अद्याप भरण्यात आलेली नाही. पोलिसांच्या अनेक जागा रिक्त आहेत. त्या जागा सुध्दा भरण्यात आलेल्या नाहीत. मिरा-भाईंदर येथील डी.वाय.एस.पी. व ठाणे पोलीस अधीक्षक, ग्रामीण या जागा कधीपर्यंत भरल्या जातील ? त्याचबरोबर आचोळे व तुळीज या परिसरात दोन पोलीस स्टेशन्स निर्माण करण्याचा प्रस्ताव गृह विभागाकडे प्रलंबित आहे. त्या प्रस्तावांना कधीपर्यंत मान्यता देण्यात येणार आहे ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : मिरा-भाईंदर येथील नियंत्रण कक्ष बंद करण्यात आलेला नाही. त्या ठिकाणी जीआयएस आणि जीपीएस सिस्टीम कार्यान्वित केली होती. ती सिस्टीम मार्च महिन्यामध्ये कार्यरत केल्यानंतर सप्टेंबरमध्ये जीआयएस आणि जीपीएस सिस्टीम त्या इमारतीतून दुसरीकडे शिफ्ट केल्यामुळे महिनाभरासाठी तो नियंत्रण कक्ष बंद आहे. परंतु आपली वायरलेस कंट्रोल रुम आहे, ती बंद नाही. ती व्यवस्थितपणे चालू आहे. त्यामुळे पोलीस यंत्रणेस कायदा व सुव्यवस्था व्यवस्थित ठेवण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या अडचणी नाहीत. जीआयएस आणि जीपीएस सिस्टीमच्या माध्यमातून गाड्यांचे ट्रॅकींग होत असते. जीआयएस आणि जीपीएस सिस्टीम येत्या महिनाभराच्या काळात सुरु होणार आहे. भविष्य काळातील बदल्यांच्या वेळी ठाणे डी.वाय.एस.पी., पोलीस अधीक्षक, ग्रामीण ही पदे निश्चितपणे भरण्यात येतील.

श्री. मुझफ्फर हुसेन : हा परिसर झपाट्याने वाढत आहे. ठाणे ग्रामीणची या परिसरातील लोकवस्ती 50 ते 60 लाख एवढी झालेली आहे. त्या परिसरात रेल्वे स्टेशन्स आहेत. गुजरातकडे जाणारा हायवे आहे. या परिसरात कोठेही गुन्हा केला तरी त्या गुन्हेगारास कोठेही पळण्याचा मार्ग आहे. पोलिसांचे संख्याबळ कमी आहे. मिरा-भाईंदर परिसरातील डी.वाय.एस.पी., ठाणे पोलीस अधीक्षक ही पदे गेल्या अनेक दिवसांपासून रिक्त आहेत. अशा महत्वाच्या शहरामध्ये तीन-तीन वर्षे महत्वाच्या अधिकाऱ्यांची पदे रिक्त ठेवत आहात ही गोष्ट कितपत योग्य आहे, ही पदे किती दिवसात भरण्यात येणार आहेत ?

...4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ KTG/

ता. प्र. क्र. 46269 .....

श्री. आर. आर. पाटील : त्या परिसरात मोठ्या प्रमाणात घरे बांधली जात असल्यामुळे लोक त्या परिसरात वास्तव्यासाठी जात आहेत. मुंबईतील ताण आणि गर्दी यामुळे लोक त्या ठिकाणी राहण्यासाठी जात आहेत. त्यामुळे लोकसंख्या गतीने वाढत आहे. परंतु तुलनेत पोलिसांची संख्या वाढलेली नाही.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.......... ता.प्र.क्र.46269......

61000 नवी पदे भरण्याचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात आहे. कदाचित हे अधिवेशन संपण्यापूर्वी येणाऱ्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत याचा निर्णय होईल. त्यातून नवीन पोलीस स्टेशन आपण निर्माण करणार आहोत. त्याचबरोबर आपण ज्या भागाचा उल्लेख केला तेथील वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन सागरी आयुक्तालयाचा निर्णय सुध्दा विचाराधीन होता. त्या जिल्हयाचे विभाजन होणार आहे किंवा नाही हा प्रश्न असल्यामुळे त्यावर विचार करण्यात आला नव्हता. आता गृह विभागाने सागरी आयुक्तालय करण्याचा निर्णय घेतला आहे. मी त्या प्रस्तावाला तत्वत: मान्यता दिलेली आहे. लवकरच आम्ही त्याबाबत कार्यवाही करु.

----------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांना ठिंबक व तुषार संच विकत घेण्याकरिता अनुदान देण्याबाबत**

**(५) * ४५८४८ डॉ.रणजित पाटील , श्री.प्रवीण पोटे-पाटील :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांना ठिबक व तुषार संच विकत घेण्याकरिता राज्य शासनाच्या कृषि विभागामार्फत अनुदान देण्यात येते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याकरिता केद्र स्तरावरुन कोटयवधी रुपयांचा निधी सदर कार्यालयास प्राप्त झालेला आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ऑनलाईन पध्दतीचे कारण पुढे करुन कृषी विभागाने सन २०१२-१३ व सन २०१३-१४ या वर्षाकरिता ठिबक संचांचे प्रस्ताव स्वीकारण्यास नकार दिल्याचे नुकतेच आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यामुळे अमरावती जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांना उपरोक्त योजनेपासून वंचित रहावे लागत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(६) असल्यास, तद्नुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत तसेच शेतकऱ्यांना ठिबक व तुषार संचाचे अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) योजनेत पारदर्शकता आणण्यासाठी सन २०१२-१३ पासून संगणक प्रणाली (ऑनलाईन ई-ठिबक) अवलंबण्याचे निश्चित केले आहे. त्यानुसार अमरावती जिल्ह्यात सन २०१२ - २०१३ मध्ये ठिबक व तुषार सिंचनासाठी ९४९४ लाभार्थ्यांच्या क्षेत्रावर संच बसविण्यात आले असून त्यांना अनुदानाचे वाटप करण्यात आले आहे. सन २०१३ - १४ मध्ये ४७२५ लाभार्थ्यांचे ऑनलाईन प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.

(४), (५), (६) व (७) प्रश्न उद्‌भवत नाही.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, अनुक्रमांक ३ च्या प्रश्नाला शासनाने 'नाही' असे उत्तर दिले आहे. १२ मार्च पासून ११ ते १५ ऑगस्ट, २०१३ पर्यंत प्रस्ताव स्वीकारण्यात आले नव्हते. ऑनलाईन प्रक्रिया ॲक्टिव्हेट व्हायची होती असे सांगण्यात आले. मी दोन वेळा तेथे गेलो असता अनेक शेतकऱ्यांनी माझी भेट घेतली होती. विभागीय कृषी सहसंचालक श्री.लोखंडे यांची शेतकऱ्यांनी भेट घेतली असताना तुम्ही प्रस्ताव स्वीकारु नका असे त्यांनी तोंडी आदेश दिले होते. हे खरे असेल तर त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई करणार आहात? २०११-२०१२ मधील लाभार्थ्यांना अनुदान देणे बाकी आहे हे खरे आहे काय? विदर्भातील सिंचनाच्या अनुशेषाकरिता केंद्र सरकारने विदर्भ इन्टेन्सिव्ह इरिगेशन डेव्हलपमेंट प्रोग्रॅम सुरु केलेला आहे. सिंचन पुनर्स्थापित व्हावे, नवीन

..३...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील........ ता.प्र.क्र.४५८४८....

योजना व्हाव्यात यासाठी निधी दिलेला आहे. मूळ योजनेवर या योजनेचा निधी खर्च केला जात आहे. एखाद्या कुपोषित बालकाला हाय प्रोटीन डाएट देण्यासाठी कोणी अनुदान दिले असेल तर ते रेग्युलर डाएटसाठी उपयोगात आणणे योग्य होणार नाही. अल्प भूधारकांना ७५ टक्के सबसिडी मिळते, त्याऐवजी व्हीआयडीपी अंतर्गत ९० टक्के सबसिडी मिळण्यासाठी उपलब्ध झालेला निधी खर्च केला जाईल काय?

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, २०१२-२०१३ मध्ये ऑनलाईन प्रस्ताव स्वीकारण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. ऑलरेडी ते प्रस्ताव स्वीकारले गेले आहेत. राज्यामध्ये २,०६,७५६ अर्ज २०१२-२०१३ साठी स्वीकारण्यात आले आहेत. व्हीआयडीपी अंतर्गत ९६५६९ अर्ज होते. त्यातील १०० टक्के अनुदान व्हीआयडीपी अंतर्गत वितरित करण्यात आले. त्यासाठी स्वतंत्र निधी आलेला आहे. राज्यस्तरीय अनुदान राज्याच्या अन्य विभागासाठी देणे आहे ही वस्तुस्थिती आहे. २०१२-२०१३ साठी १०० टक्के अनुदान वितरित केले आहे. व्हीआयडीपी क्षेत्र सोडून उर्वरित भागाच्या अनुदानाकरिता ४०० कोटी रुपयांची आवश्यकता आहे. ते तातडीने आरकेवायमधून उपलब्ध करुन वितरित करण्याची व्यवस्था करीत आहोत.

२०१३-२०१४ मधील अर्ज ऑनलाईन स्वीकारण्यासंबंधी कार्यवाही अद्याप सुरु केलेली नाही. ऑनलाईन प्रक्रिया थांबली आहे. याचे कारण असे की, मिळणारी रक्कम व्हीआयडीपी सोडून राज्याच्या अन्य योजनेसाठी मिळणारा केंद्राचा हिस्सा वगळता राज्य सरकारची तरतूद झालेली नाही. त्याठी ही प्रक्रिया थांबली आहे. व्हीआयडीपी अंतर्गत २०१३-२०१४ करिता ३८७५३ शेतक-यांना १०० कोटी रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

नंतर २एस.१...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45848 .... श्री.राधाकृष्ण विखे-पाटील...

अन्य राज्यामध्ये 50 टक्के अनुदानाची योजना आहे. ती व्हीआयडीपीमध्ये 75 टक्के करण्यात आली आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, आपण आधी पासूनच 75 टक्के अनुदान देत आहोत. आजूबाजूच्या राज्यामध्ये 90 टक्के सबसिडी दिली जाते. आपण जास्त सबसिडी देण्यासाठी निधी वापरणार आहात काय असा माझा मूळ प्रश्न होता.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, व्हीआयडीपी हा केंद्र सरकारचा प्रकल्प असून त्यात त्यांचा 100 टक्के हिस्सा आहे. त्यामुळे आपण 75 टक्के अनुदान दिलेले असून 2 हेक्टरची मर्यादा आहे. राज्यातील अन्य भागांमध्ये व्हीआयडीपी व्यतिरिक्त शेतकऱ्यांना 50 टक्केच अनुदान देतो व अल्पभूधारकांना 60 टक्के अनुदान देतो. विदर्भातील अनुशेषाचा विचार करता त्या भागातील शेतकऱ्यांना अधिक क्षेत्र सिंचनाखाली येण्याकरिता केंद्र शासनाने साडेतीन हजार कोटी रुपयांचा प्रकल्प मंजूर केला आहे. त्या अंतर्गत विशेष बाब म्हणून 75 टक्के अनुदान देण्यात आले असून निधीची देखील तरतूद झालेली आहे. त्यामुळे व्हीआयडीपी अंतर्गत अनुदान न देण्याचा, बॅकलॉग राहण्याचा प्रश्नच नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन 2012-13 संबंधी सांगितले आहे. सन 2013-14 संबंधी ऑनलाईन प्रस्ताव मागविले आहेत. त्यासाठी आपण निधी प्राप्त करून दिला. प्रस्तावाच्या तुलनेमध्ये तो निधी अपुरा आहे. जे प्रस्ताव आले ते वर खाली करून उशिरा आलेल्या प्रस्तावांना आधी मदत देण्याचा व आधीच्या प्रस्तावांना नंतर मदत देण्याचा एक प्रयोग बुलढाणा जिल्ह्यात इ ाालेला आहे. त्याची आपण चौकशी करणार आहात काय ?

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, मी यासंबंधी असे सांगू इच्छितो की, जिल्हा पातळीवर अर्ज घेताना बऱ्याच भानगडी व्हायच्या म्हणून ऑनलाईन प्रक्रिया राबविण्याचा निर्णय घेतला आहे. अनुदानाच्या अनुलपब्धतेमुळे काही काळ आपण अर्ज स्वीकारण्याची पद्धत स्थगित केली होती. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेली बाब अतिशय गंभीर आहे. यासंबंधातील चौकशी करण्याचे आदेश कृषी आयुक्तांना निश्चितपणे दिले जातील.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, सध्या पाण्याची तीव्र टंचाई आपण पहात आहोत. ठिबक सिंचन हे शेतकऱ्यांच्या दृष्टीने हिताचे आहे. आपण सर्वसाधारण शेतकऱ्यांसाठी 50 टक्के आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी 60 टक्के अनुदान देतो. सदर अनुदान 90 टक्के देण्याचा शासनाचा विचार आहे काय ?

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, अनुदान वाढवून देण्यापेक्षा ठिबक सिंचनाचे महत्त्व शेतकऱ्यांचा पटलेले आहे. ठिबक सिंचनामुळे उत्पादकता 40 टक्के वाढलेली आहे. अन्य राज्याच्या तुलनेने आपल्या राज्यामध्ये ठिबक सिंचनाखाली येणाऱ्या क्षेत्राची व्याप्ती जास्त आहे. याबाबत विचार करण्याची सरकारची निश्चितपणे तयारी आहे. पण अनुदान उपलब्ध होण्यामध्येच अडचणी येतात. मी मघाशीच सन 2013-14 चा उल्लेख केला आहे. अनुदान मिळण्यामध्ये विलंब झाल्यामुळे आम्ही ऑनलाईन प्रकिया सुरू करू शकलो नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये विनाकारण असंतोष वाढला. या परिस्थितीला सर्वांनाच सामोरे जावे लागते. उपलब्ध अनुदानाने शेतकरी समाधानी आहेत, असे माझे मत आहे. अनुदान वाढविण्यापेक्षा जे अनुदान आपण मंजूर केले आहे ते वेळेत मिळावे असा प्रस्ताव आमच्या विभागामार्फत वित्त विभागाला पाठविलेला आहे. अनुदान मिळण्यासंबंधीचा प्रस्ताव गेल्यानंतर दीड वर्षाचा कालावधी लागतो. सदर अनुदान 90 दिवसांमध्ये मिळण्यासंबंधीची विनंती माननीय मुख्यमंत्र्यांना करण्यात आली आहे.

**उप सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

.....

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ D/ KTG/

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवणे

अतिरिक्त सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने दिनांक 9 डिसेंबर 2013 रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवीत आहे.

**उप सभापती** : दिनांक 9 डिसेंबर 2013 रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी )

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेबाबत.**

**उप सभापती** : आज सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत पाटील, सुमंतराव गायकवाड, चंद्रकांत पाटील, डॉ.दीपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री विजय ऊर्फ भाई गिरकर, रामनाथ मोते, ॲड. आशिष शेलार, डॉ. रणजीत पाटील, सर्वश्री नागो पुंडलिक गाणार, भगवानराव साळुंखे, यांनी "बृहन्मुंबई महानगरपालिकेचे सुमारे 28 हजार सफाई कामगार गेल्या अनेक वर्षापासून जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतीमध्ये करीत असलेले वास्तव्य, त्यांच्यासाठी आयुक्तांनी माहे फेब्रुवारी, 2013 मध्ये घोषित केलेली आश्रय योजना, या योजनेअंतर्गत नियोजन, प्राथमिक आराखडा व इमारत प्रस्ताव विभागाची मंजुरी नसणे, तसेच आर्थिक तरतूद तुटपुंजी असणे, तसेच मुंबईसह राज्यात जैविक व घन कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची व्यवस्था नसल्याने कचरा उचलणाऱ्या व्यक्तींच्या विशेषत: महिलांच्या आरोग्यावर होणारा विपरीत परिणाम, जैविक कचऱ्याचे विघटन करताना कामगारांना हॅपेटायटीस वा एचआयव्ही या गंभीर आजाराची बाधा होण्याची शक्यता, त्यामुळे उत्पादक कंपन्यांनी जैविक कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी बायोडिग्रेडेबल रॅपर्स पुरविण्याची आवश्यकता तसेच महिलांना अशा नॅपकिन्स हाताळणी आणि विल्हेवाट लावण्यसाठी मोहीम राबविण्याची गरज, उक्त प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपायोजना," या विषयावर म.वि.प. नियम 289 अन्वये चर्चा करावी तसेच सभागृहाचे सर्व कामकाज बाजूला ठेवण्यात यावे असे सूचनेत नमूद केले आहे. हा विषय नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेचा कसा होतो याबाबत सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

श्री. भाई गिरकर : सभापती महोदय, महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे. मुंबई महानगरपालिका स्थापन झाल्यापासून गेल्या 40 वर्षात 28 हजार सफाई कर्मचारी काम करीत आहेत. या 28 हजार सफाई कर्मचाऱ्यांचा ज्या प्रमाणे घरांचा प्रश्न आहे तसाच तो आरोग्याचाही आहे. या कर्मचाऱ्यांना आता स्थलांतरित करण्याचा प्रयत्न चालविला आहे. महाराष्ट्र शासनाने 22 ऑक्टोबर, 2008 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजना जीआर काढून घोषित केली होती. दुर्दैवाने त्या ठिकाणी एक सुध्दा घर बांधण्यात आलेले नाही. दिनांक 2 ऑगस्ट, 2013 रोजी या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी हा प्रश्न उपस्थित केला होता.





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : आपण नियम 289 अन्वयेची सूचना दिली आहे ती लक्षवेधी सूचनेमध्ये वर्ग करण्यात येईल. ही सूचना लक्षवेधी सूचनेमध्ये वर्ग केली तर या प्रश्नाच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडता येतील.

श्री. भाई गिरकर : सभापती महोदय, नियम 289 च्या प्रस्तावाची सूचना एक दोन दिवसात लक्षेवधी सूचनेत वर्ग करुन सभागृहात मांडली गेली तर न्याय मिळू शकेल.

--------------

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.:कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे**

श्री. संजय सावकारे (सामाजिक न्याय मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित मुंबई यांचा सन 2000-2001, 2001-2002, 2002-2003, 2003-2004, 2004-2005 व 2005-2006 चा अनुक्रमे सत्तावीसावा, अठ्ठावीसावा, ऐकोणतीसावा,तीसावा, एकतीसावा व बत्तीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** :वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, आपण आसनावरुन वारंवार निर्देश देत असताना सुध्दा मागासवर्गीय महामंडळाचा 12 वर्षापूर्वीचा अहवाल आज सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे. 10-10 वर्षापर्यंत अहवाल सादर केला जात नाही त्यामुळे महामंडळात काय चालले आहे हे काही समजत नाही.

श्री. संजय सावकारे : सभापती महोदय, अहवाल सादर करण्यामध्ये निश्चितपणे विलंब झालेला आहे. सन 2000 ते 2004 या वर्षीच्या लेखा परीक्षणाची नेमणूक महापालांनी 2006 मध्ये केली होती. सन 2005 मध्ये वांद्रे येथे अतिवृष्टीचे पाणी घुसले होते त्यामध्ये सर्व कागदपत्रे खराब झ ाली होती. पुढच्या अधिवेशनापर्यंत सर्व अहवाल येण्याच्या संदर्भात सूचना देण्यात आलेल्या आहेत.

---

श्री. संजय सावकारे (सामाजिक न्याय मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "महाराष्ट्रातील जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांचे सन 2009-2010 व 2010-2011 या वर्षाचे एकत्रित वित्तीय व महसुली लेखे" सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** :एकत्रित वित्तीय व महसुली लेखे सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विदर्भ व मराठवाडा विभागामध्ये दूध उत्पादन वाढीसाठी करण्यात आलेला करार

**मु.शी.**: विदर्भ व मराठवाडा विभागामध्ये दूध उत्पादन वाढीसाठी करण्यात आलेला करार यासंबंधी माननीय दुग्धव्यवसाय मंत्र्यांचे निवेदन.

श्री. संजय सावकारे (सामाजिक न्याय मंत्री ) : सभापती महोदय,मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

सभापती महोदय, आज दिनांक 16 डिसेंबर, 2013 रोजी विदर्भ व मराठवाडा विभागामध्ये दूध उत्पादन वाढीसाठी तसेच गोवे भिवंडी, जि.ठाणे येथे अद्यावत दुग्धशाळा उभारणे याकरिता राष्ट्रीय दुग्धविकास मंडळाचे सहकार्य करण्यासाठी ऐतिहासिक करार विभागामार्फत करण्यात आलेला आहे.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय सावकारे....

पशुगणनेनुसार या विभागात उपलब्ध असलेल्या 22 लाख 46 हजार 779 दुधाळ गायी/म्हशींची संख्या लक्षात घेता प्रतिदिन 65 लाख लीटर दूध उत्पादित होणे अपेक्षित आहे. परंतु या विभागात निर्माण केलेले सहकारी दूध संस्थांचे जाळे कमकुवत झालेले आहे. या विभागात 9829 प्राथमिक सहकारी दूध संस्था नोंदणीकृत असून त्यापैकी 7040 प्राथमिक दुग्धविकास संस्था बंद आहेत. यामुळे ग्रामीण पातळीवर दूध संकलन व्यवस्था कमकुवत झालेली आहे. या भागात संघटित क्षेत्रामार्फत प्रतिदिन 10 लाख लीटर दूध संकलित करण्यात येते. या उलट पश्चिम महाराष्ट्रात ग्रामीण पातळीवर दूध संकलनाची उत्तम व्यवस्था असल्याने त्याठिकाणी संघटित क्षेत्रामार्फत एकूण संकलन होणाऱ्या 100 लक्ष लीटर प्रतिदिन दूधापैकी 90 लीटर दूध संकलित करण्यात येत आहे. दूध उत्पादकांना सक्षम अशी दूध संकलन व्यवस्था निर्माण करण्याकरिता गुजरात व राजस्थान राज्यात सक्षम व्यवस्था निर्माण करण्याचा ज्यास अनुभव आहे अशा राष्ट्रीय दुग्धविकास मंडळाचे सहकार्य घेऊन विदर्भ व मराठवाड्यामध्ये न्यू जनरेशन को-ऑपरेटीव्हच्या धर्तीवर सक्षम व्यवस्था ग्रामीण पातळीवर निर्माण करण्यासाठी आज सामंजस्य करार शासनामार्फत करण्यात आला आहे.

तसेच गोवे भिवंडी, जिल्हा ठाणे येथे 5 लक्ष लीटर क्षमतेची दुग्धशाळा उभारण्यासाठी राष्ट्रीय दुग्धविकास महामंडळासमवेत आज सामंजस्य करार करण्यात आला आहे.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याच्या मुद्याबाबत**

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, आज 16 डिसेंबर आहे. दिल्लीमध्ये एका मुलीवर जो अत्याचार झाला त्यास आज एक वर्ष पूर्ण झाले.

नागपूर शहरामध्ये आज सकाळी मी एका कार्यक्रमाला जाऊन आलो. नागपूर मधील युवतींच्या सक्षमीकरणा संदर्भात मार्शल आर्टस् चा प्रात्यक्षिकांचा कार्यक्रम झाला. त्या कार्यक्रमासाठी 25 हजार मुली उपस्थित असल्याचे पहावयास मिळाल्या.

सभापती महोदय, आजच्या दैनिक सकाळमध्ये "नागपूर अधिवेशन काळात देहविक्रीसाठी एका रात्रीसाठी 15 हजार रुपयापर्यंत दर आणि मुंबईहून 800 बारबाला नागपूरला दाखल झाल्या आहेत अशी बातमी आली आहे." या वृत्तांकनामध्ये अनेक गोष्टी मांडण्यात आल्या आहेत. त्यामध्ये दलाल कसा धंदा करतात, शनिवार आणि रविवार अशी जोडून सुट्टी आल्यावर या व्यवसायाने कसा उच्चांक गाठला, हॉटेल्स, रिसॉर्ट आणि लॉज या ठिकाणी कसा पुरवठा केला जातो अशी एक धक्कादायक बातमी मोठ्या स्वरुपात या अधिवेशनाच्या निमित्ताने आलेली आहे. एखाद्या उद्योगाची दरवर्षी कशी वाढ होत असते. गेल्या वर्षीच्या तुलनेपेक्षा या वर्षी किती वाढ झाली आहे, अशाप्रकारचे अत्यंत लाजीरवाणे आणि अत्यंत किळसवाणे वृत्त वाचायला मिळाले. नागपूरला अधिवेशन होत असताना अशाप्रकारची वृत्तांकने येतात, तेव्हा मला माननीय गृह मंत्री महोदयांना विनंती करायची आहे की, या बातमीमध्ये खरोख्र तथ्य असेल तर त्या बाबतीत जरुर चौकशी करावी. अन्यथा अधिवेशनासाठी येणारे सर्वच लोकप्रतिनिधी एका संशयाच्या भोवऱ्यात कायम फिरत राहतील आणि हे राज्याच्या दृष्टीने भूषणावह आहे असे मला वाटत नाही. तेव्हा आपण या संदर्भात तातडीने पावले उचलावीत अशी मी आपणास कळकळीची विनंती करीत आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी येथे जो औचित्याचा मुद्दा मांडला आहे त्या विषयाच्या संदर्भात मी नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे.

सभापती महोदय, विदर्भामध्ये हिवाळी अधिवेशन होत आहे. विदर्भाच्या बाहेर आणि विदर्भात सर्वसाधारण अशी प्रतिक्रिया येते की, आता अधिवेशन सुरु असल्यामुळे मजा असणार आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

बाहेरील लोकांना असे वाटते की, येथे खाणे, पिणे आणि मजा करयासाठी येतात. अशाप्रकारचे वृत्त वर्तमानपत्रात येते तेव्हा त्या बातमीची खोलवर जाऊन त्याची माहिती घेणे आवश्यक आहे. प्रत्यक्ष अशा घटना घडू नयेत आणि या काळात लैगिंक व्यापाराचे केंद्र बनत असेल तर ते फार भयंकर आहे असे मला वाटते.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

महोदय, माजी न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीच्या अहवालाची अंमलबजावणी व्हावी म्हणून माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी अनेक बैठका घेतल्या आहेत. या संदर्भात अँटी ट्रॅफिकींग आणि इतरही अनेक मुद्दे आहेत. उक्त समितीच्या अहवालाची अंमलबजावणी लवकर सुरु झाली किंवा त्या बाबतची माहिती सभागृहाला लवकर अवगत झाली तर त्या बाबत प्रचार आणि प्रसार होऊन अंमलबजावणी करणे सोपे होऊ शकेल.

महोदय, नागपूरच्या संदर्भात वर्तमानपत्रात आलेले वृत्त, दिल्लीत घडलेल्या निर्भया प्रकरणी 16 डिसेंबर या दिवशी जनजागृती करण्याची गरज आणि त्या संदर्भात सरकारने केलेली अंमलबजावणी या संदर्भातील पुढचे पाऊल म्हणून सरकारने सकारात्मक काम करावे, अशी मी विनंती करते.

श्री.आर.आर.पाटील : महोदय, नागपूर येथील घटनेबाबतची माहिती मी वर्तमानपत्रात वाचल्यानंतर त्या संदर्भात वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडे विचारणा केली. त्यांना मी या घटनेचा तपास केला आहे काय हे देखील विचारले. ही बातमी नुकतीच आली होती. त्यामुळे पोलीस अधिकाऱ्यांनी त्या बाबतचा तपास केला नव्हता. महोदय, असा प्रकार होत असेल तर ती गंभीर बाब आहे. शिवाय ही बातमी सन्माननीय सदस्य, कार्यकर्ते आणि अधिकाऱ्यांची बदनामी करणारी आहे. अशा प्रकारचा व्यवसाय करणारे कोणी नागपूरात आले काय, कोणाला आणण्यात आले काय, कोणी ट्रॅफिकींग करते काय, या बाबतची गांभीर्याने चौकशी करण्यात येईल.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, सध्या राज्यामध्ये ग्रामपंचायतीच्या निवडणुका सुरु आहेत. अलिबाग तालुक्यात सुध्दा 40 ग्रामपंचायतीच्या निवडणुका सुरु आहेत. अलिबाग तालुक्यातील थळ ग्रामपंचायतीमध्ये एका दलित तरुणाने अपक्ष म्हणून फॉर्म भरल्यामुळे त्याला काल गुंडांकडून जबरदस्त मारहाण करण्यात आली. त्याची मोटारसायकल तोडण्यात आली. त्या व्यक्ती बरोबर असलेल्या इतरही दोन-तीन कार्यकर्त्यांना मारहाण करण्यात आली. महोदय, ज्या गुंडाकडून ही मारहाण करण्यात आली त्या गुंडाबाबत माननीय गृह मंत्र्यांनी मागे सभागृहात उत्तर देताना सांगितले होते की, त्या गुंडाला हद्दपार करण्यात येईल. त्यानुसार त्याच्या हद्दपारीबाबत कार्यवाही सुरु आहे. महोदय, त्या गुंडावर अनेक गुन्हे दाखल आहेत. काल गुन्हा करण्यापूर्वीच तो पोलीस स्टेशनमध्ये गेला आणि त्याने सांगितले की, माझ्याकडे पिस्तूल आहे. मी संबंधिताला बंदुकीने मारेन. ही बाब सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यामध्ये नोंद झालेली आहे. मी आज सकाळी कालच्या घटनेची माहिती घेण्यासाठी पोलीस स्टेशनमध्ये फोन केला होता. परंतु आता या बाबतीत दबाव आणून त्या आरोपीचे नाव घटनेतून कमी करुन पोलीस तपासात तथ्य नाही असे पोलीस यंत्रणा सांगत आहेत. त्या आरोपीवर जो गुन्हा दाखल झाला आहे त्या बाबत त्यांच्यावर ताबडतोब कारवाई झाली पाहिजे. त्या गुंडाबाबत हद्दपारीची जी कार्यवाही सुरु आहे त्या बाबत शासन तातडीने कार्यवाही करणार आहे ?

महोदय, काल रिपब्लिकन पक्षाच्या 200-300 कार्यकर्त्यांनी आरोपीवर कारवाई करण्यासाठी पोलीस स्टेशनला घेराव घातला होता. या बाबत मी पोलीस अधिकाऱ्यांशी बोललो. पोलिसांनी सांगितले की, आम्ही या प्रकरणी तपास करीत आहोत.

महोदय, माझी विनंती आहे की, हा तपास जलद गतीने करुन, संबंधितांवर तत्परते कारवाई करण्याची आवश्यकता आहे. या अनुषंगाने आरोपीवर कारवाई करण्याबाबतचे अधिकार माननीय मंत्री महोदयांनी द्यावेत, अशी मी विनंती करतो.

श्री.आर.आर.पाटील : महोदय, शासनाच्या वतीने या विषयी जिल्हा पोलीस अधीक्षकांना तपासात लक्ष घालण्याच्या सूचना देण्यात येतील. पुरावे बघून कायद्याच्या अनुषंगाने जी कारवाई करणे आवश्यक आहे ती सर्व कारवाई केली जाईल.

---------

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**उप सभापती** : माझ्याकडे आज दिनांक 16 डिसेंबर, 2013 रोजी नियम 93 अन्वये ज्या सूचना प्राप्त झाल्या होत्या त्या संदर्भातील माझे निर्णय अतिरिक्त सचिव वाचून दाखवतील.

अतिरिक्त सचिव : माननीय सभापतींच्या अनुमतीने मी आज दिनांक 16 डिसेंबर, 2013 रोजी प्राप्त झालेल्या नियम 93 च्या सूचनांबाबत माननीय सभापतींचे निर्णय वाचून दाखावितो.

सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी "अकोट (जि.अकोला) तालुक्यातील चोहोटा बाजार येथील जिल्हा परिषदेचे मोडकळीस आलेले विश्रामगृह पाडून नवीन विश्रामगृह बांधण्याच्या प्रस्तावास मंजुरी मिळून मागविण्यात आलेल्या निविदा तसेच कामासंबंधीच्या नस्ती गहाळ झाल्याने बांधकाम प्रक्रिया ठप्प होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, डॉ.रणजित पाटील, श्री.चंद्रकांत पाटील यांनी "शासनाने नव्याने टी.ई.टी. परीक्षा पध्दती लागू केल्याने सी.ई.टी. दिलेल्या व पात्र ठरलेल्या सुमारे 1994 शिक्षकांचे भवितव्य धोक्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील, श्री.नागो पुंडलिक गाणार यांनी "अकोला जिल्ह्यातील वाढत्या गुन्हेगारीमुळे नागरिकांमध्ये पसरलेले दहशतीचे वातावरण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.विनायक राऊत यांनी "मुंबईतील शीव-चुनाभट्टी येथील सोमय्या मेडिकल रुग्णालयात दि.12.12.2013 रोजी सायंकाळच्या सुमारास लिफ्ट कोसळून झालेला अपघात " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..4..

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी "मौजे पागोटे (ता.उरण, जि.रायगड) येथील शासकीय गुरचरण जमिनीवर झालेले अतिक्रमित जमीन क्षेत्र दूर न झाल्याने जनतेमध्ये पसरलेला असंतोष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अतिरिक्त सचिव ....

यानंतर सर्वश्री. चंद्रकात पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे, वि.प.स. यांनी "शिक्षक भरतीवरील बंदी उठविण्यासह शिक्षकांच्या असलेल्या विविध मागण्या पूर्ण करण्यासाठी करावयाची कार्यवाही", या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री. रामदास कदम, वि.प.स. यांनी "मुंबई महानगरपालिकेने उप.प्र.अ.अ.जी.श.ए. काळे यांच्याविरूध्द पेट्रोल आर्थिक घोटाळा सिध्द झाल्यामुळे त्यांना सेवेतून निलंबित करण्यात येऊनही श्री. काळे आपल्या पदाचा दुरूपयोग करीत असणे", या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर डॉ. नीलम गोऱ्हे वि.प.स. यांनी "नागपूर येथे हिवाळी अधिवेशन काळात शहरातील अनेक युनिसेक्स सलून, ब्युटी पार्लरमध्ये मसाजच्या नावाखाली देहविक्रीचा व्यवसाय सुरू असल्याचे उघडकीस येणे", या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री. विनोद तावडे, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. चंद्रकांत पाटील, भाई गिरकर, वि.प.स. यांनी "सामान्य प्रशासन विभागातून स्वातंत्र्यसैनिक म्हणून मान्यता दिलेल्या 150 फाईल्स गायब झाल्या असल्याची घटना डिसेंबर, 2013 च्या तिसऱ्या आठवड्यात उघडकीस येणे", या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री. भाई गिरकर, विनोद तावडे, ॲड. आशिष शेलार, वि.प.स. यांनी "सेंट जोसेफ अेव्हेन्यू, सांताक्रुझ (पश्चिम) मुंबई येथील सोसायटीतील रहिवाशांना पाईपलाईनद्वारे गॅस मिळण्याबाबत", या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवदेन करावे.

----

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## <u>विशेष उल्लेख</u>

**पृ.शी./मु.शी.** : महाराष्ट्रातील किनारपट्टीवर दारूगोळ्याची तस्करी व अतिरेक्यांची घुसखोरी सुरू असून याबाबत पोलीस व गुप्तचर संघटनांनी लक्ष घालून उपाययोजना करण्याची आवश्यकता याबाबत श्री. विजय सावंत, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. विजय सावंत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"महाराष्ट्राला 720 किलोमीटरची किनारपट्टी लाभली असून, या किनारपट्टीवर 1 मोठी आणि 8 छोटी बंदरे असून नौदल, तटरक्षक दल आणि सागरी पोलिसांकडून कोणतेही काम व्यवस्थितरित्या न होणे, गुप्तचर विभागही पुरेसा सक्षम नसणे, सन 1993 च्या मुंबईतील बॉम्ब हल्ल्यानंतर ऑपरेशन ताशा, नौदल, तटरक्षक दल, पोलिसांनी सुरू करण्यात आलेले ऑपरेशन ताशा पूर्णपणे अयशस्वी ठरणे, शस्त्रे, दारूगोळ्याची तस्करी व अतिरेक्यांची घुसखोरी किनारपट्टीवर सुरू असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक जनतेत पसरलेली भीती व चिंतेचे वातावरण, पोलीस आणि गुप्तचर संघटनांनी याकडे तत्काळ लक्ष घालून कार्यवाही व उपाययोजना करण्याची आवश्यकता, सदर विषय सार्वजनिक महत्त्वाचा असल्याने विशेष उल्लेखाद्वारे मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो."

माननीय गृहमंत्र्यांनी या संदर्भात कार्यवाही करावी, अशी माझी विनंती आहे.

----

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : कोल्हापूर जिल्ह्यातील दूधगंगा नदीवर असलेल्या काळम्मावाडी धरणास "राजर्षी शाहू महाराज" नाव देणे याबाबत श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ा मांडतो.

"कोल्हापूर जिल्ह्यातील भोगावती नदीवर सन 1920 मध्ये बांधण्यात आलेल्या धरणाचे राजर्षी शाहू महाराजांच्या मातोश्री लक्ष्मीबाई तलाव म्हणून नामकरण झालेले आहे. राधानगरी तालुक्यात सन 1969 मध्ये दूधगंगा नदीवरील काळम्मावाडी धरणाचे बांधकाम पूर्ण झाले असून तालुक्यात मोठ्या प्रमाणात या धरणाचा उपयोग होत आहे. दूधगंगा नदीवर असलेले हे धरण आज काळम्मावाडी या नावाने ओळखले जात आहे. तरी दूधगंगा नदीवर असलेल्या या काळम्मावाडी धरणास "राजर्षी शाहू महाराज" यांचे नाव देण्यासाठी व तसे शासनाने नामकरण करावे म्हणून शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे."

----

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : आरोग्य वर्गातील वर्ग 1 ते 4 पर्यंतची रिक्त पदे भरणे याबाबत श्री. प्रकाश बिनसाळे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"राज्यात आरोग्य विभागाचा सचिव हा डॉक्टर असावा असे बाराव्या वित्त आयेगाच्या पंचवार्षिक योजनेत नमूद असतानाही आरोग्य विभागाचा सचिव हा सनदी अधिकारी असणे तसेच आरोग्याचा कारभार मुंबईतील सेंट जॉर्जेस रूग्णालयाच्या आवारातील आरोग्य भवनातून चालत असून तेथेही अतिरिक्त आरोग्य संचालक, सह संचालक, उप संचालकांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असल्याने विद्यमान अधिकाऱ्यांना तीन चार विभागांचा कारभार सांभाळावा लागणे, जिल्हा रूग्णालये, ग्रामीण आरोग्य केंद्रापर्यंत आरोग्य विभागाचे जाळे पसरलेले असताना परिणामकारक आरोग्य सेवा देण्यासाठी अनेक ठिकाणी डॉक्टर तसेच विशेषज्ञ उपलबध नसल्यामुळे राज्याची आरोग्य व्यवस्थाच रूग्ण शय्येवर पडली असणे, याबाबत आरोग्य विभागातील वर्ग 1 ते 4 पर्यंतची रिक्त पदे तातडीने भरण्यात यावीत, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

----

..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : प्रत्यक्षात नेटसेट नसणाऱ्या हजारो उमेदवारांच्या नियुक्त्या नेटसेट उत्तीर्ण होण्याच्या अटीवर करण्यात येणे याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

"विद्यापीठ अनुदान आयोगाने केंद्र शासनाच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अनुसरून महाविद्यालये/विद्यापीठे येथील प्राध्यापकांच्या नियुक्तीसाठी पदव्युत्तर परीक्षेत किमान 55 टक्के गुण आणि नेट परीक्षा उत्तीर्ण असणे, अशा दोन अटी निश्चित करणे, सदरच्या अटी केंद्र शासनाने राजपत्रात प्रसिध्द केल्यानंतर दिनांक 19.9.1991 पासून देशभरात लागू करणे, या नियमांना राज्य शासनाने मान्यता दिली. परंतु, प्रत्यक्षात नेटसेट नसणाऱ्या हजारो उमेदवारांच्या नियुक्त्या नेटसेट उत्तीर्ण होण्याच्या अटीवर करण्यात येणे, अशा नियुक्त्यांना मान्यता व सेवासंरक्षण देण्यात येणे, अशा बेकायदेशीर नियुक्त्यांना नियमित करण्यासाठी प्राध्यापक संघटनांनी दबाव निर्माण करण्यात येणे, तथापि हा प्रश्न राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा संदर्भ देत मानव संसाधन विकास मंत्रालयाने पीएचडी धारकांव्यतिरिक्त कोणासही नेटसेटमधून सरसकट सूट देऊ नये, असे स्वयंस्पष्ट निर्देश दिनांक 12.11.2008 रोजी युजीसीला देण्यात येणे, तसेच याचिका क्रमांक 4266/2006 मध्ये नागपूर उच्च न्यायालयाने सदरचे केंद्र शासनाचे आदेश वैध ठरवित सदर आदेशाची अंमलबजावणी करण्याचे आदेश युजीसीला देणे, केंद्र शासनाच्या आदेशाच्या विरोधात सन 2010 मध्ये युजीसीने महाराष्ट्रातील हजारो प्राध्यापकांना नेटसेमध्ये सूट दिली. परंतु, सदरची सूट केंद्र शासनाने लागलीच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या विरोधात असल्याने ती दिनांक 30.03.2010 रोजी रद्दबातल

..6



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

करणे, पुनश्च: प्राध्यापक संघटनेच्या अर्जाच्या अनुषंगाने युजीसीने अध्यापकाला संबंधित विद्यापीठाने युजीसी अधिनियम 1991 व 1998 च्या तरतुदीनुसार नेटसेट मधून सूट दिलेली असावी व सदर अध्यापकांचा प्रस्ताव नेटसेट सूटसाठी युजीसीकडे सादर केलेला असावा, अशा अटीच्या अधीन राहून ही सूट देण्यात येणे, याच अनुषंगाने राज्य मंत्री मंडळाने दिनांक 06.03.2013 रोजी दिनांक 19.09.1991 ते दिनांक 03.04.2000 या कालावधीत बिगर नेटसेट अधिव्याख्यात्यांना अटी व शर्तीच्या अधीन राहून शासन निर्णय निर्गमित दिनांकापासून पुढील सेवा सर्व प्रयोजनार्थ धरणे, मान्यता देण्यात येणे, मात्र उक्त निर्णयाच्या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालयाने दिनांक 26.06.2013 रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयात सदर अध्यापकाला संबंधित विद्यापीठाने युजीसी अधिनियम 1991 व 1998 च्या तरतुदीनुसार नेटसेटमधून सूट दिलेली असावी, असे जाणूनबुजून वगळण्यात येणे, तसेच नेटसेट सूटच्या अंमलबजावणीची तारीख दिनांक 19.01.1991 ऐवजी परस्पर दिनांक 23.10.1992 अशी करण्यात येणे, या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या फेरबदलामुळे दिनांक 19.09.1991 ते दिनांक 23.10.1992 या कालावधीत नियुक्त बिगर नेटसेट अधिव्याख्यात्यांना 1991 ते 2013 या कालावधीत देय 22 वर्षांच्या थकबाकीपोटी 100 कोटी रूपयांपेक्षा जास्त बोजा पडणार असून प्राध्यापकांच्या वेतनात दरमहा प्रत्येकी 25 हजार ते 40 हजार रूपयांची भरघोस वाढही द्यावी लागणे, अशा प्रकारे शासन निर्णयात तसेच युजीसीच्या अधिनियमांची लागू करण्याची तारीख बदलून परस्पर फेरबदल करण्याआधी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने राज्य मंत्रिमंडळाची मान्यता घेणे आवश्यक असताना तशी मान्यता घेण्यात न येणे, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा सदरचा निर्णय संशयास्पद असून या प्रकरणी शासनाने तातडीने चौकशी करण्यात येऊन कार्यवाही करावी, अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे विनंती करीत आहे."

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये प्राध्यापकांसाठी नेटसेट परीक्षांमधून सूट देण्याचा निर्णय दिनांक 6 मार्च, 2013 ला घेण्यात आला. दिनांक 19 सप्टेंबर, 1999 पासून प्राध्यापकांना नियुक्तीच्या वेळी नेटसेट परीक्षा पास होण्याची अट लागू केली होती. त्यानंतर सन 1999 ते सन 2000 दरम्यान प्राध्यापक नेटसेट परीक्षेला बसले नसले तरी सन 2013 पासून त्यांना सर्व आर्थिक



MSK/ D/ ST/ पूर्वी श्री. बोर्डे 14:10

डॉ. नीलम गोऱ्हे ....

लाभ देण्याच्या निर्णयाला वित्त विभागाने मान्यता दिली आहे. सातत्याने अनेक प्राध्यापक संघटना त्यासाठी काम करीत होत्या. परंतु, उच्च व तंत्र शिक्षण विभागाने मात्र वित्त विभागाच्या सूचनांच्या पुढे जाऊन काही पावले उचलली आणि दिनांक 19 सप्टेंबर, 1991 ते दिनांक 23 ऑक्टोबर, 1992 या वर्षात नेटसेट परीक्षेला न बसलेल्या प्राध्यापकांना सुध्दा सरसकट आर्थिक लाभ देण्याचा निर्णय घेतला.

( नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

त्यामुळे 90 कोटी रुपयांची तरतूद नसताना सुध्दा परस्पर पत्रक काढलेले आहे. त्यासंबंधी राज्यपालांकडे नेटसेट धारक संघटनेमार्फत लेखी निवेदन दिलेले आहे.

एक तर यासाठी आर्थिक तरतूद केली पाहिजे. परस्पर निर्णय बदलले गेले तर सामान्य प्राध्यापकांना या गोष्टीचा फटका बसत असतो. नेटसेट पात्रताधारक समन्वय समितीने केलेल्या मागणीबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाने तपासणी करुन निर्णय घ्यावा अशी मागणी या विशेष उल्लेखाद्वारे मी करीत आहे.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

**पृ.शी./मु.शी.**: :पुणे शहरात नवीन पोलीस ठाणी व पोलीस चौक्या निर्माण करण्याबाबत श्री.मोहन जोशी,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.मोहन जोशी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"पुणे शहरात दिवसेंदिवस गुन्हेगारीच्या संख्येत वाढ होत आहे. गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी शहरात पुरेशा प्रमाणात पोलीस चौकी व स्वतंत्र पोलीस ठाणे सुरु करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींची मागणी अनेक महिन्यांपासून प्रलंबित आहे. शहरातील वाढती लोकसंख्या व झपाट्याने होत असलेले नागरीकरण त्यामुळे गुन्हेगारी वाढत असून पोलीस चौक्यांच्या अभावामुळे अल्पवयीन मुलींवर अत्याचार आणि इतर गुन्ह्यांचे प्रमाण वाढले आहे. गुन्हेगारी रोखण्यात पोलिसांना अडचणींना सामोरे जावे लागते, पिंपरी-चिंचवड येथे स्वतंत्र आयुक्तालय स्थापण्याच्या मागणीकडे शासनाचे दुर्लक्ष झालेले आहे, वडगाव-धायरी आणि चंदननगर चारडी परिसरात स्वतंत्र पोलीस ठाणे सुरु करण्याची नागरिकांकडून होत असलेली मागणी, ग्रामीण पोलिसांच्या हद्दीतील 25 गावे शहर पोलीस आयुक्तालयांकडे समाविष्ट करण्याचे प्रस्ताव अद्यापही प्रलंबित आहेत. शहर आयुक्तांच्या हद्दीत 107 पोलीस चौक्या कार्यरत आहेत. परंतु लोकसंख्येच्या प्रमाणात त्या पुरेशा नाहीत. पुणे शहर आयुक्तालयातील पोलीस चौक्या तसेच पोलीस कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्याची नितांत आवश्यकता असल्याने यात वाढ करण्यात यावी अशी विनंती मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे करीत आहे."

------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: मुलुंड (पूर्व) म्हाडा वसाहत ते पूर्व द्रुतगती मार्गाला जोडणाऱ्या पुलाचे बीम तुटलेल्या स्थितीत असणे याबाबत श्री.रमेश शेंडगे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.रमेश शेंडगे ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ा मांडतो.

"मुंबईतील मुलुंड (पूर्व) म्हाडा वसाहत ते पूर्व द्रुतगती मार्गाला जोडणाऱ्या मार्गावरील पादचारी पुलाचे बीम माहे ऑगस्ट, 2013 मध्ये तुटलेले आहेत. मात्र नोव्हेंबर, 2013 अखेर सदर तुटलेल्या पुलाच्या बीमची दुरुस्ती करण्यात न येणे, सदर पुलाच्या तुटलेल्या बीमवरुन मुलुंड म्हाडा वसाहतीतून पूर्व द्रुतगती मार्ग ओलांडून वामनराव मुरांजन, होली एन्जल शाळा, इंडियन एज्युकेशन सोसायटी हायस्कूल, दोंडे विद्यालय तसेच लक्ष्मीबाई इंग्लिश मिडीयम स्कूल व इतर विद्यालयातील हजारो विद्यार्थी नित्याने प्रवास करीत असल्याने सदर तुटलेल्या पुलाच्या बीमची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशी शिफारस या विशेष उल्लेखाद्वारे मी करीत आहे."

-----

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

**पृ.शी./मु.शी.**:पुणे जिल्ह्यातील सर्व अपंगांना इंदिरा गांधी राष्ट्रीय निवृत्ती योजनेंतर्गत पेन्शन योजनेचा लाभ मिळण्याबाबत श्री.अनिल भोसले,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.अनिल भोसले ( पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

"केंद्र शासनामार्फत अपंग लाभार्थ्यांसाठी इंदिरा गांधी राष्ट्रीय निवृत्ती योजना राबविली जात असून सदर लाभार्थ्यांना दर महिना प्रति लाभार्थी 600 रुपये पेन्शन देण्यात येणे, मात्र गत सहा वर्षात केवळ 128 लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यात येणे, पुणे जिल्हा परिषदेचा आरोग्य विभाग आणि समाजकल्याण विभागामार्फत केलेल्या सर्वेक्षणात 23 हजारापेक्षा अधिक व्यक्ती अपंग असल्याचे आढळून येणे, याबाबत पुणे जिल्ह्यात असलेल्या सर्व अपंगांना सदर पेन्शन योजनेचा लाभ देण्यात यावा अशी मागणी मी विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित करीत आहे."

5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

**पृ.शी./मु.शी.**:बीड जिल्ह्यातील ऊसतोडणी मजुरांना धान्य वितरण करण्याबाबत श्री.धनंजय मुंडे,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.धनंजय मुंडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ा मांडतो.

"बीड जिल्ह्यातून लाखो ऊसतोड कामगार ऊस तोडणीच्या कामासाठी राज्यभर जात असणे, ऊस तोडणच्या हंगामात साधारणत: सहा महिने त्यांचे संपूर्ण कुटुंब घराबाहेर असणे, हे सर्व ऊस तोडणी कामगार दारिद्र्य रेषेखालील व गरीब कुटुंबातील असणे, या कामगारांना स्वतस्त धान्य दुकानातून मिळणाऱ्या धान्याची ते घराबाहेर असल्याने काळ्या बाजारात विक्री होत असणे, मागील वर्षी एकाही मजुराला धान्य न मिळणे, तथापि, त्यांच्या नावावर आलेल्या सर्व धान्याचे वितरण झाले असल्याची नोंद पुरवठा खात्यात असणे, मजूर गावात नसताना त्यांच्या नावावरील धान्य काळ्या बाजारात विक्री झालेले असणे, मजुरांच्या नावावर होणाऱ्या धान्याच्या काळ्या बाजाराला आळा घालण्यासाठी आणि मजुरांना त्यांच्या हक्काचे धान्य मिळावे यासाठी हंगामापूर्वी या मजुरांना पाच महिन्याचे आगाऊ धान्य वितरण करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

--------

नंतर श्री.शिगम.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी /मु. शी.** : 1 नोव्हेंबर 2005 पूर्वी लागलेल्या शिकक्ष/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत श्री. विक्रम काळे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"राज्यामध्ये 1 नोव्हेंबर 2005 पासून नवीन अंशदायी पेन्शन योजना लागू करण्यात आलेली आहे. परंतु 1 नोव्हेंबर 2005 पूर्वी शिक्षण सेवक म्हणून लागलेल्या सर्व शिक्षण सेवकाना 1 नोव्हेंबर 2005 नंतर ते कायम वेतनश्रेणीत आल्यामुळे त्यांना सुध्दा जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय नुकताच महाराष्ट्र शासनाने घेतलेला आहे. परंतु 1 नोव्हेंबर 2005 पूर्वी ज्या अंशत: अनुदानाच्या टप्प्यावर असलेल्या शाळांतील आणि 1 नोव्हेंबर पासून 100 टक्के अनुदानावर आलेल्या शाळेतील शिक्षक आणि कर्मचारी यांची 1 नोव्हेंबर 2005 पूर्वी प्रथम नियुक्ती झालेली असताना सुध्दा त्यांना नवीन पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय घेतल्यामुळे त्यांच्यावर फार मोठा अन्याय झालेला आहे. तेव्हा 1 नोव्हेंबर 2005 पूर्वी लागलेल्या सर्व शिक्षक/कर्मचा-यांना जरी ते अंशदायी अनुदानावर असले तरी त्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करतो."

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>राज्यपालांच्या निर्देशांची अंमलबजावणी करण्याबाबत</u>**

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, पुरवणी मागण्या चर्चेला घेण्यापूर्वी मला एक मुद्दा आपल्या निदर्शनास आणून द्यावयाचा आहे. तो म्हणजे आता आपण या पुरवणी मागण्या मांडल्या तर त्या घटनाबाह्य होतील आणि माननीय राज्यपालांच्या निदेशांचा अवमान करण्यासारखे होईल. माननीय राष्ट्रपती यांनी 9 मार्च 1994 रोजी भारतीय घटनेच्या अनुच्छेद 371 प्रमाणे महाराष्ट्रासाठी विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी माननीय राज्यपालांवर विशेष जबाबदारी सोपवली. त्याप्रमाणे विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी विकास महामंडळे स्थापन झाली. माननीय राज्यालांनी 5 ऑगस्ट 1994 रोजी The Development Boards of Vidharbha, Marathwada and Rest of Maharashtra Order 1995 निर्गमित केली. अधिनियमाच्या कलम 7मधील अनेक्चर II मध्ये असे म्हटलेले आहे की, "The Governor may issue directives to the State Government allocating funds to various areas under the different Boards and further, such directives of the Governor may indicate allocation to each sector of sub-sector as deemed fit by the Governor."

मुद्दा असा आहे की, शासन जे काही बजेट मांडेल त्यामध्ये मागास भागासाठी किती तरतूद करावयाची यासंबंधीचे निर्देश माननीय राज्यपाल देतील. बजेट मांडताना कोणकोणत्या विभागामध्ये किती खर्च झालेला आहे याची माहिती हिरव्या पुस्तिकेमध्ये, ग्रीन बुकमध्ये दिली पाहिजे. माजी सदस्य प्रा. बी.टी.देशमुख, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी याबाबतचा आग्रह धरला होता. त्यानुसार बजेटमध्ये तरतूद करण्यात येऊ लागली. परंतु प्रश्न असा आहे की, बजेटमध्ये तरतूद केली जाते आणि पुरवणी मागण्यामध्ये ती फिरविली जाते. हे विरोधकांनी माननीय राज्यपालांची भेट घेऊन त्यांना आकडेवारीनिशी पटवून दिले आणि सांगितले की, आपण निर्देश देऊन देखील मागास भागाचा अनुशेष वाढत चाललेला आहे. मग माननीय राज्यपालांनी नियम 7 अन्वये निर्गमित केलेल्या सन 2011-12मध्ये दिलेल्या निदेशांच्या परिच्छेद 4मध्ये असे नमूद केलेले आहे की, "According to draft of new Development Boards, order has been prepared in consultation with the State Government and is likely to be issued by the Governor shortly."

..3..





श्री. विनोद तावडे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

राज्य सरकार बरोबर चर्चा करुन नवीन ऑर्डर देतो असे माननीय राज्यपाल महोदयांनी सांगितले. त्यानंतर अनेक्चर 4मध्ये माननीय राज्यपालांनी असे स्पष्ट केले की, "Allocation of funds to be reflected in Annual Financial Statements, the allocation of funds or outlays made by the Governor shall be reflected in the Annual Financial Statement including Supplementary Budget." म्हणजे पुरवणी मागण्यांमध्ये देखील हे रिफ्लेक्ट झाले पाहिजे.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.तावडे....

हे रिफ्लेक्ट होणारे कोठलेही ग्रीन बुक आम्हाला प्राप्त झालेले नाही. पुरवणी मागण्या सभागृहासमोर मांडताना फायनान्शियल स्टेटमेंट देणे बंधनकारक असताना आम्हाला ते दिलेले नाही. तशा प्रकारचे स्टेटमेंट आम्हाला दिलेले नसेल तर त्याच्याशिवाय पुरवणी मागण्यांवर चर्चा आम्ही करु शकत नाही. आताच्या पुरवणी मागण्यांामध्ये शिक्षण विभागाने 650 कोटी रुपये शिक्षकांच्या पगारासाठी दिले. त्यांनी त्यांच्या ओरिजनल बजेटमधून दिले. त्या ओरिजनल बजेटमध्ये 4 कोटी रुपये विदर्भातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाकरिता होते. ते इकडे आले. त्यामुळे पुन्हा तरतुदीत इम्बॅलन्स झाला. कशा प्रकारे तरतुदी इम्बॅलन्स झालेल्या आहेत यासंबंधीची माहिती आम्हाला ग्रीन बुकातून स्पष्ट होते, परंतु ती माहिती आम्हाला आता स्पष्ट होत नाही. ही माहिती मी अभ्यास करुन काढलेली आहे. जोपर्यंत ग्रीन बूक येत नाही तो पर्यंत या विषयावर आम्ही चर्चा करु शकत नाही. विदर्भाचा पैसा कोठे जात आहे, कोठे गेला, मराठवाडयाचा पैसा कोठे वळता होत आहे, पैशांचे वाटप कशा पध्दतीने करावे यासंबंधी माननीय राज्यपालांनी घटनेच्या अधीन राहून निर्देश काढलेले आहेत, माननीय राज्यपालांच्या निर्देशाचे पालन न करता या विषयावर सभागृहात चर्चा करणे योग्य नाही. म्हणून माझी विनंती आहे की, माननीय राज्यपालांच्या कार्यालयाकडून या विषयाचा खुलासा आल्यानंतर त्या विषयाच्या बाबतीत माननीय अर्थमंत्र्यांनी चर्चा करावी. तो पर्यंत या विषयावर सभागृहाता चर्चा करु नये. अन्यथा या सभागृहात अनावधानाने माननीय राज्यपालांचा अवमान होऊ शकतो.

**उप सभापती** : ठीक आहे. या संदर्भात लवकरच खुलासा करण्यात येईल. तो पर्यंत आपण विधेयकावरील चर्चेस सुरुवात करु.

------------

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत विधेयक

**L. A. BILL NO. XXXV OF 2013**

(A BILL TO BRING SOCIAL AWAKENING AND AWARENESS IN THE SOCIETY AND TO CREATE A HEALTHY AND SAFE SOCIAL ENVIRONMENT WITH A VIEW TO PROTECT THE COMMON PEOPLE IN THE SOCIETY AGAINST THE EVIL AND SINISTER PRACTICES THRIVING ON IGNORANCE, AND TO COMBAT AND ERADICATE HUMAN SACRIFICE AND OTHER INHUMAN, EVIL, SINISTER AND AGHORI PRACTICES PROPAGATED IN THE NAME OF SO CALLED SUPERNATURAL OR MAGICAL POWERS OR EVIL SPIRITS COMMONLY KNOWN AS BLACK MAGIC BY CONMEN WITH SINISTER MOTIVE OF EXPLOITING THE COMMON PEOPLE IN THE SOCIETY AND THEREBY DESTROYING THE VERY SOCIAL FIBRE OF THE SOCIETY; AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.) AND MOTION FOR REFERRING THE BILL TO THE JOINT COMMITTEE

श्री.शिवाजीराव मोघे ( सामाजिक न्याय मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने सुधारणांसह संमत केल्याप्रमाणे सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक-35 अज्ञानावर पोसल्या जाणाऱ्या अनिष्ट व दुष्ट प्रथांपासून समाजातील सर्वसामान्य लोकांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने, आणि समाजातील सर्वसामान्य लोकांचे शोषण करण्याच्या व त्याद्वारे समाजाची घडीच विस्कटून टाकण्याच्या दुष्ट हेतूने भोंदू लोकांनी सर्वसामान्यत: जादूटोणा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तथाकथित अलौकिक शक्तीच्या किंवा अद्‌भूत शक्तीच्या किंवा भूतपिशाच्च यांच्या नावाने निर्माण झालेल्या नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट, दुष्ट व अघोरी प्रथांचा मुकाबला करुन त्यांचे समूळ उच्चाटन करण्याच्या दृष्टीने, समाजामध्ये जनजागृती व सामाजिक जाणीव निर्माण करण्याकरिता तसेच समाजात निकोप व सुरक्षित वातावरण निर्माण करण्याकरिता ; आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक मांडतो.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने सुधारणांसह संमत केल्याप्रमाणे सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक-35 अज्ञानावर पोसल्या जाणाऱ्या अनिष्ट व दुष्ट प्रथांपासून समाजातील सर्वसामान्य लोकांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने, आणि समाजातील सर्वसामान्य लोकांचे शोषण करण्याच्या व त्याद्वारे समाजाची घडीच विस्कटून टाकण्याच्या दुष्ट हेतूने भोंदू लोकांनी सर्वसामान्यत: जादूटोणा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तथाकथित अलौकिक शक्तीच्या किंवा अद्‌भूत शक्तीच्या किंवा भूतपिशाच्च यांच्या नावाने निर्माण झालेल्या नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट, दुष्ट व अघोरी प्रथांचा मुकाबला करुन त्यांचे समूळ उच्चाटन करण्याच्या दृष्टीने, समाजामध्ये जनजागृती व सामाजिक जाणीव निर्माण करण्याकरिता तसेच समाजात निकोप व सुरक्षित वातावरण निर्माण करण्याकरिता ; आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, हे अतिशय महत्वाचे विधेयक आहे. " महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष,अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत विधेयक असे त्याचे नाव आहे. यात श्रध्दा व अंधश्रध्दा या बाबतीत काही गैरसमज होते. अमानुष, अनिष्ट व अघोरी, जादूटोणा अशा काही पध्दती आहेत. श्रध्दा व अंधश्रध्देच्या बाबतीत कोणीही सदस्यांनी गैरसमज करुन घेऊ नये.

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे........

त्यात स्पेसिफिक गोष्टी नमूद केलेल्या आहेत. मला सांगण्यास आनंद वाटतो की, मागील 14 वर्षापासून हे विधेयक प्रलंबित होते. गेल्या आठवड्यात विधानसभा सभागृहात चर्चा झाली आणि शुक्रवारी विधानसभेने हे विधेयक मंजूर केले. सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती पी.बी.सावंत, न्या.चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी या विधेयकाच्या संदर्भात सहभाग घेतला आहे. या बिलाच्या प्रारुपामध्ये अनेकदा सुधारणा होऊन विधानभेत हे विधेयक मंजूर झालेले आहे. मागील वेळी विधानसभेत गोंधळामध्ये विधेयक मंजूर झाले होते, त्यानंतर विधानपरिषदेत विधेयक सादर झाल्यानंतर ते संयुक्त समितीकडे पाठविण्यात आले, तेथून ते विधेयक परत आले आणि 2011 मधील पावसाळी अधिवेशनात सभागृहात पुन्हा विधेयक मांडण्यात आले. मध्यंतरीच्या काळात कॅबिनेटने मे महिन्यात निर्णय घेऊनही पावसाळी अधिवेशनात शेवटच्या दिवसापर्यंत विधेयक मांडता आले नाही. त्यानंतर ऑगस्ट महिन्यामध्ये पुन्हा विधेयक पुर:स्थापित केले होते. दरम्यान डॉ.नरेंद्र दाभोळकर यांचा खून झाला. हे लक्षात घेऊन राज्य सरकारने दिनांक 26.8.2013 रोजी अध्यादेश काढला. त्याची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने आणि अध्यादेशाचे कायद्यात रुपांतर करण्यासाठी हे विधेयक मांडण्यात आले आहे, हे विधेयक सभागृहाने मंजूर करावे अशी विनंती करतो.

सभापती महोदय, या विधेयकान्वये गुन्हा घडल्यास तो अजामीनपात्र राहील अशी तरतूद केली आहे. गुन्हयाची चौकशी पोलीस शिपायाच्या माध्यमातून केली जाणार नसून पोलीस निरीक्षकाच्या वरच्या दर्जाच्या अधिकाऱ्याकडून चौकशी करण्यात येईल अशी व्यवस्था केली आहे.

सभापती महोदय, संपत्ती मिळविण्यासाठी, गुप्त धन मिळविण्यासाठी, मुलगा किंवा मुलगी होण्यासाठी नरबळी देण्याचे प्रकार घडत आहेत. महाराष्ट्रात आतापर्यंत अशी अनेक प्रकरणे उजेडात आली आहेत. वृत्तपत्रातून अशा प्रकारच्या घटना उघडकीस आलेल्या आहेत. अशा प्रकारच्या गुन्हयावर नियंत्रण ठेवण्यासाठी इंडियन पिनल कोड लागू असले तरी त्याकरिता उद्देश सिध्द करावा लागतो. अशा घटनेमध्ये समोरच्या पक्षाची संमती असते. त्यामुळेच अशा प्रकारच्या विधेयकाची आवश्यकता होती.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे........

सभापती महोदय, ग्रामीण भागाचे जीवन ज्यांनी जवळून पाहिले आहे त्यांना माहिती असेल की, आदिवासी किंवा रिमोट भागात राहणाऱ्या लोकांचे अज्ञानापोटी खूप नुकसान होत असते, त्यांचा मानसिक छळ होत असतो. किंबहुना मोठया प्रमाणात बळी गेले आहेत. एखाद्या व्यक्तीला

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)**

ताप आल्यास ती व्यक्ती वायफळ बडबड करते, याचा आधार घेऊन त्याच्याविरुध्द अघोरी प्रकार केल्यामुळे मृत्यू होत असतो. मंत्र तंत्राचा वापर केला जात असल्यामुळे देखील मृत्यू होत असतो. त्याची नोंद केली जात नाही. या दृष्टिकोनातून अशा प्रकारच्या विधेयकाची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, भारतीय राज्य घटनेने श्रध्दा व्यक्त करण्यासाठी, प्रार्थना करण्यासाठी, पूजा करण्यासाठी मुभा दिलेली आहे. तंत्र मंत्र केले तरी भावना जर चांगली असेल तर हरकत नाही, परंतु तंत्र मंत्राचा वापर दुष्ट भावनेने करणे, पैसे लुबाडण्यासाठी करणे, मूठ मारणे हे प्रकार अवैध आहेत. ग्रामीण भागात एखाद्या व्यक्तीला पक्षाघाताचा झटका आला तर मूठ मारली असे सांगितले जाते. माझ्या मतदारसंघात आणि नागपूर जिल्हयात दोन घटना घडलेल्या आहेत. कोलाम हा आदिवासी समाज मागासलेला आहे. या समाजातील लोकांना असे सांगितले जाते की, तुम्हाला सुखशांती हवी असेल तर मुलीचा बळी द्यावा लागेल. माझ्या जिल्हयामध्ये आजोबा आणि आजीने स्वतःच्या नातीचा नरबळी दिला. हे कृत्य करण्यास तिचे नातेवाईक देखील सहभागी झाले होते. सहा महिने होऊनही प्रकरण उघडकीस आले नव्हते. या मुलीच्या आई वडिलांना याची माहिती नव्हती. जवळच्या नातेवाईकांनी हे कृत्य केले होते. इंडियन पिनल कोड नुसार आवश्यक ती कारवाई होईल. परंतु अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी यावर कायद्याचा वचक असला पाहिजे, हा विधेयक आणण्यामागचा मुख्य उद्देश आहे.

सभापती महोदय, देवी अंगात येणे हा गुन्हा नाही. परंतु एखाद्याच्या अंगात देवी आली आणि तिने सांगितले की, तुझ्यावर करणी केली आहे तर ते मान्य होणार नाही.

नंतर 3 बी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे...

सभापती महोदय, नागपूर येथे दीड वर्षापूर्वी घडलेली घटना मी आपल्याला सांगतो. आदिवासी मजूर माणसाच्या घरात घडलेली घटना आहे. आम्ही स्वत: तेथे भेट दिली आहे. एका बाईच्या अंगात देवी आली आणि तिने सांगितले की, तुझ्या घरावर करणी केली आहे. ही करणी दोन म्हाताऱ्या माणसांनी केली असे सांगितले. गावकऱ्यांनी त्या दोघांनाही काहीही कारण नसताना मारून टाकले. अशा गोष्टींपासून लोकांना प्रवृत्त करण्यासाठी आपण हा कायदा करीत असून तो सपोर्टींग आहे. असा प्रयोग महाराष्ट्रच करू शकतो. या दृष्टीनेच आपल्याला ही दोन उदाहरणे दिलेली आहेत.

चमत्कार करणे हा देखील गुन्हा आहे. आता आपण पूर्वीच्या संतांनी केलेल्या चमत्काराचे उदाहरण द्याल. संत ज्ञानेश्वरांनी रेड्यामुखी वेद वदवून घेतले असे म्हणाल. त्याला हा कायदाच लागू नाही. पूर्वीच्या संतांनी काय म्हटले आहे त्याला हा कायदा लागूच नाही. पण भोंदू बाबांनी चमत्काराच्या नावाखाली गैर उपयोग करू नये म्हणून इन्स्पेक्टर लेव्हलच्या व्यक्तीने गुन्हा नोंदवायला पाहिजे हा त्या मागचा उद्देश आहे. चमत्कार हा कधी गुन्हा ठरणार आहे ? चुकीचे चमत्कार करून दाखविणे, चमत्काराच्या नावाखाली फसवणूक, लुबाडणूक केली असेल तर गुन्हा दाखल होईल. त्यामुळे हे बिल अतिशय महत्त्वाचे आहे. या बिलावर विधानसभेमध्ये अतिशय चांगली चर्चा झाली. या विधेयकावर 22 सन्माननीय सदस्यांनी सविस्तर चर्चा केली आहे. खरे म्हणजे या बिलाला आम्हीच सुधारणा आणणार होतो. परंतु, माननीय सदस्यांनी आम्हाला बोलायला संधी मिळाली पाहिजे अशी विनंती केली व दोन्ही बाजूकडील सन्माननीय सदस्यांनी लेखी सुधारणा दिल्या. त्यातील 90 टक्के सुधारणा आम्ही मान्य केल्या आहेत. या कायद्याची ताबडतोब अंमलबजावणी करावयाची आहे. या कायद्यात एक महत्त्वाचा क्लॉज असा आहे की, यात काही त्रुटी असतील तर नोटीफिकेशन काढून त्यात सुधारणा करता येईल. तसे अधिकार महाराष्ट्र शासनाने स्वत:कडे घेतलेले आहेत. या कायद्याची अतिशय आवश्यकता होती. सर्व वर्तमानपत्रांनी इलेक्ट्रॉनिक मीडियांनी त्याचे स्वागत केले आहे. महाराष्ट्रात नव्हे तर देशामध्ये या कायद्याचे स्वागत करण्यात आले आहे. अंधश्रद्धेमध्ये शिकली सवरलेली माणसे देखील भाग घेतात. कोणाला

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे...

दु:ख असले की, ते मांत्रिकाच्या नादी लागतात. यात जास्तीतजास्त गरीब आणि पिढ्यानपिढ्या दबलेली माणसे भरडली जातात. त्यामुळे हे बिल आणलेले आहे. हे अतिशय महत्त्वाचे बिल आहे. या बिलावर आपण जरूर चर्चा करावी. यामध्ये आवश्यक त्या गोष्टी समाविष्ट करावयाच्या असतील तर त्या आम्ही पुढच्या काळामध्ये देखील समाविष्ट करण्याचा प्रयत्न करणार आहोत हे देखील मी आपणाला सांगू इच्छितो. श्री.दाभोळकर यांनी हौतात्म्य पत्करले आहे. त्यामुळे तातडीने अध्यादेश काढून आपण या सर्व गोष्टी केल्या आहेत. या विधेयकासंबंधी विधी व न्याय विभागासोबत अनेक वेळा चर्चा करण्यात आली आहे. एवढेच नव्हे तर हा कायदा बेकायदेशीर ठरेल काय यासंबंधी ज्येष्ठ वकिलांशी देखील चर्चा करण्यात आली. एखाद्याने खून केला तर त्याच्यावर 302 चे कलम लावण्यात येते. नरबळी घेतला तर 7 वर्षाच्या शिक्षेची तरतूद या विधेयकामध्ये करण्यात आली आहे. नबरळीद्वारे किंवा अन्य अंधश्रद्धेच्या माध्यमातून एखाद्याचा मृत्यू झाला असेल तर फक्त हाच कायदा लागू होणार नसून आय.पी.सी.देखील लागू होणार आहे. ॲस्ट्रॉसिटीमध्ये फक्त ॲस्ट्रॉसिटीचा कायदा लागत नाही तर अन्य कायद्यातील कलम देखील लागतात. इंडियन पीनल कोड देखील सपोर्टींग म्हणून लागणार आहे. तेव्हा यात कोणतेही कन्फ्यूजन करता कामा नये. हे अतिशय महत्त्वाचे बिल आहे. महाराष्ट्रात जे पिढ्यानपिढ्या दबलेले, दुर्लक्षित माणसे आहेत त्यांना न्याय देणारे हे विधेयक आहे. जनतेला न्याय देणारे विधिमंडळ आहे. या राज्याचे नाव महा-राष्ट्र आहे. आपण काही तरी वेगळे आगळे करतो म्हणूनच आपल्या राज्याचे नाव महा-राष्ट्र आहे. शेवटच्या माणसाला न्याय देण्याच्या भूमिकेतून हे विधेयक आणले आहे. मला पूर्ण विश्वास आहे की, हे विधेयक एकमताने मंजूर होईल. धन्यवाद.

.........

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या विषयाच्या संदर्भात माझी हरकत अशी आहे की, कै. दाभोळकराची जी अनिस संस्था आहे त्यासंदर्भात सन्माननीय मंत्री महोदय, श्री. शिवाजीराव मोघे साहेबांवर मी हक्कभंग दिलेला आहे. जादूटोणा विधेयक सभागृहात आणावयाचे की, नाही यासंदर्भातील निर्णय शेवटी आपल्यालाच द्यावयाचा आहे. यासंदर्भात आपण जो निर्णय द्याल तो आम्हा सर्वांना मान्य असेल. माझ्या हातात "महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती एक आगळेवेगळे संघटन" नावाचे पुस्तक आहे. या पुस्तकात संस्थेचे काम कशा प्रकारे चालते यासंदर्भातील मुद्दा क्रमांक 4 मध्ये असे म्हटले आहे की, "कोणतेही शासकीय अनुदान वा देशी विदेशी फंडाशिवाय गेल्या 22 वर्षापासून ही संस्था कार्यरत आहे". अंनिस संस्थे संदर्भात मी माहितीच्या अधिकाराखाली सर्व माहिती मागवली व औचित्याच्या मुद्याद्वारे मी माननीय मंत्री महोदयांना तसेच शासनाला विचारणा केली की, अंनिस ही संस्था शासनाकडून परदेशातील फंड घेते काय ? यासंदर्भात माननीय मंत्री श्री. मोघे साहेबांनी माझ्या औचित्याच्या मुद्यासंदर्भात असे उत्तर दिले की, "या संस्थेची आम्ही चौकशी असता या संस्थेचे ऑफिस सातारा येथे असून ही संस्था असा कोणताही फंड परदेशातून घेत नाही". या विषयाच्या संदर्भात मी माहितीच्या अधिकाराखाली जी माहिती मागवली होती ती सर्व माहिती घेऊन माननीय मंत्री श्री. शिवाजीराव मोघे यांच्या विरुध्द हक्कभंग दिला आहे. अनिस या संस्थेला परदेशातून पैसे आलेले असून त्यासंदर्भातील सर्व कागदपत्रे मी माननीय मंत्री महोदय व शासनाला दिलेले आहेत. यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले आहे की, "अंधश्रध्दा विधेयकासंदर्भात श्री. रामदास कदम, वि.प.स. यांनी सन 2011 च्या पावसाळी अधिवेशनात उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यावर विशेषाधिकार भंगाच्या सूचनेसंदर्भातील प्रकरणाची वस्तुस्थिती खालील प्रमाणे आहे."

"डॉ नरेंद्र दाभोळकर यांची अंनिस नावाची संस्था असून त्या समितीच्या माध्यमातून सभागृहात अंधश्रध्दा निर्मूलन विधेयक आणण्याचा प्रयत्न झाला होता. डॉ. दाभोळकर यांनी यासंदर्भात एक पुस्तक लिहिले असून त्यात त्यांनी त्यांच्या संस्थेला विदेशातून फंड किंवा अनुदान मिळत नसल्याचे नमूद केले आहे. याबाबत मा. श्री.रामदास कदम यांनी माहितीच्या अधिकारान्वये माहिती घेतली असता डॉ. दाभोळकर यांच्या संस्थेकडे 1.50 कोटी रुपये एतक्या रकमेचा निधी जमा असून अद्यापही मोठया प्रमाणात परेदशातून पैसे मिळत आहेत हे ऊघड झाले आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम.....

अशा प्रकारे परदेशातून पैसा घेऊन अंधश्रध्दा निर्मूलन कायदा या राज्यात करुन हिंदूच्या भावना भडकविण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे सदर संस्था भंग करण्याबाबत श्री. रामदास कदम, वि.प.स. यांनी उपरोक्त औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास विनंती केली होती. सदर प्रकरणी त्वरित आयुक्त समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र, पुणे,मुंबई यांच्याकडून माहिती मागवण्यात आली असता आयुक्त समाजकल्याण पुणे यांनी त्यांच्या पत्रासोबत तत्कालीन पोलीस अधीक्षक, सातारा यांचा अहवाल पाठविला होता. सदर अहवालान्वये असे कळविले होते की, डॉ. नरेंद्र दाभोळकर यांची अंधश्रध्दा निर्मूलन ही संस्था सातारा जिल्हयात कार्यरत असून ती सन 1992 मध्ये धर्मादाय आयुक्त सातारा कार्यालयात क्रमांक इ 461, सातारा या क्रमांकाने नोंदणी करण्यात आलेली आहे. सदर समितीचा कागदोपत्री नोंद असलेला पत्ता 155 सदाशिव पेठ,पंचमुखी मंदिरासमोर, सातारा असा असून सद्याचा पत्ता परिवर्तन हॉस्पीटल,सातारा असा आहे. सदर संस्थेची सातारा जिल्हयात इतर ठिकाणी शाखा कार्यरत नसल्याची माहिती देण्यात आलेली आहे. सदर संस्थेस परदेशातून निधी मिळत असल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा उपलब्ध नसल्यामुळे सदर समिती विरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही ही वस्तुस्थिती मा.श्री.रामदास कदम, वि.प.स. यांना कळविण्यात आली. सदर माहिती चुकीची असल्याने त्यांनी म.वि.प.नियम 240 अन्वये विशेष हक्क भंगाची सूचना विधान परिषदेत मांडली. अशा प्रकारच्या संस्थेची तपासणी व नियंत्रण धर्मादाय आयुक्तांच्या अधिपत्त्याखाली असल्याने त्यांच्याकडून अधिकची माहिती पोलीस विभागाकडून प्राप्त केली असता दाभोळकरांच्या संस्थेविषयी धर्मादाय आयुक्तांकडे सादर केलेल्या वार्षिक हिशोब पत्रकात 2007 ते 2010 पर्यंत विदेशातून मिळणाऱ्या निधीची सविस्तर माहिती खालील प्रमाणे आढळली.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

ती सर्व माहिती दिलेली आहे. दिनांक 19.10.2001 रोजी 83 लाख 97 हजार रुपये, सन 2007 मध्ये 14 लाख रुपये अशी आकडेवारी दिलेली आहे. या अधिकच्या माहितीच्या अनुषंगाने हे प्रकरण गृह विभाग, विधी व न्याय विभागाकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले आहे. हे प्रकरण गृह विभागाकडे चौकशीसाठी पाठविले आहे.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी** ): मी सन्माननीय सदस्यांना विचारु इच्छितो की, हरकतीचा मुद्दा मांडण्यास ते किती वेळ घेणार आहेत.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, ही गंभीर बाब आहे. माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, ज्या संस्थेची पोलीस विभागामार्फत, विधि व न्याय विभागामार्फत चौकशी सुरु आहे त्या संस्थेने आणलेले विधेयक येथे कसे मांडता येईल ? या विधेयकाची येथे चर्चा होऊ शकत नाही. अंनिसची चौकशी सुरु आहे असे मला माननीय मुख्यमंत्री महोदयांकडून उत्तर देण्यात आलेले आहे. तेव्हा ही बाब अतिशय गंभीर आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्या सांगण्यावरुन हे विधेयक आणलेले आहे असे नाही. या महाराष्ट्रामध्ये आमच्यासारखे पुरोगामी विचाराचे लोक भरपूर आहेत. डॉ.दाभोळकरांनी यामध्ये चांगले योगदान दिलेले आहे. ते आमचे चांगले मित्र होते. डॉ.दाभोळकर हे परदेशी पैशातून मिळणाऱ्या मदतीवर काम करीत होते असे मला वाटत नाही. आपण देखील त्यांना ओळखत होता. त्यांनी स्वत: प्रॅक्टीस केली असती तर करोडो रुपये मिळविले असते. परदेशी पैसा अतिरेक्यांकडून आला आहे का, परदेशी पैसा एखाद्या शक्तीकडून आला आहे काय ? या जगामध्ये समाजवादी आणि डाव्या विचारसरणीचे विचार करणारे लोक भरपूर आहेत. असे लोक नोकरी करतात आणि नोकरीतून मिळणाऱ्या पैशातून काही पैसा अशा संस्थांना देतात. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांच्या देखील काही एनजीओ आहेत. त्यांच्या एनजीओमार्फत अनेक चांगले उपक्रम राबविले जात आहेत. त्यांनी महिलांना चांगल्याप्रकारे आधार दिलेला आहे. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी मांडलेला मुद्दा हरकतीचा होऊ शकत नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

सभापती महोदय, डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्यामुळे हे विधेयक आलेले नाही. अनेक सन्माननीय सदस्यांनी मागील दहा-बारा वर्षापासून पाठपुरावा करुन हे विधेयक आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. या ठिकाणी आमच्यावर अन्याय होत आहे, डॉ.दाभोळकरांवर अन्याय होत आहे. डॉ.दाभोळकरांनी या विधेयकाचा चांगला पाठपुरावा केलेला आहे आणि तो पाठपुरावा करण्यास आम्ही कमी पडलो. डॉ.दाभोळकरांनी इतका पाठपुरावा केला की, दुर्दैवाने त्यांचे बलिदान झालेले आहे. या ठिकाणी अशाप्रकारचे वक्तव्य करणे याला माझा आक्षेप आहे. तेव्हा आपण या विधेयकावर चर्चा सुरु करावी अशी माझी विनंती आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, या पुस्तकामध्ये डॉ.दाभोळकरांनी लिहिले आहे की, ...

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, त्या पुस्तकाचा आणि या विधेयकाचा काहीही संबंध नाही.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय,...

**तालिका सभापती** : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, कृपया त्यांनी खाली बसावे. आपण आपला हरकतीचा मुद्दा मांडलेला आहे.

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य चांगला मुद्दा मांडण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु त्यांचे कन्फ्युजन झालेले आहे. हे शासकीय विधेयक आहे. डॉ.दाभोळकर आणि श्री.श्याम मानव यांचे चांगले कॉन्ट्रीब्युशन आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे प्रबोधनकार ठाकरे यांचे हे विचार आहेत, महात्मा जोतिबा फुले, शाहू महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे हे विचार आहेत. आपण त्यांचे विचार कायद्यात आणत आहोत हे मला येथे सांगायचे आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय,...

**तालिका सभापती** : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी खाली बसावे. विधानमंडळ हे कायदेमंडळ आहे. हे विधेयक विधानसभेने मंजूर करुन विधानपरिषदेत मंजुरीसाठी पाठविले आहे. तेव्हा आता या विधेयकावर काही हरकत घेता येणार नाही.

प्रश्न प्रस्तुत झाला.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : आता सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी विधेयकावरील भाषणास सुरुवात करावी.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक-35...

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ...

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आपण सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना बोलण्यास अनुमती दिली आहे काय ? त्यांना बोलण्याची अनुमती दिली असेल तर मी खाली बसतो.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना विधेयकावर बोलायचे नाही. कदाचित त्यांचा दुसरा विषय मांडावयाचा आहे.

श्री.रामदास कदम : महोदय, तसे असेल तर आपण मला खाली बसण्यास सांगावे. कारण एक सन्माननीय सदस्य बोलत असताना दुसरे सन्माननीय सदस्य बोलत असतील तर ते योग्य नाही. आपण सुरुवातीला मला या विधेयकावर बोलण्यास अनुमती दिली आहे. आपण मला खाली बसण्याची परवानगी द्यावी व त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना बोलण्याची अनुमती द्यावी.

श्री.जयंत प्र.पाटील : महोदय, आम्ही सकाळी 10.00 वाजेपासून सभागृहात बसलेलो आहोत. आम्हाला भूक लागल्यामुळे आपण 15-20 मिनिटांचा ब्रेक घ्यावा व त्यानंतर सभागृहाचे कामकाज पुढे सुरु करावे.

श्री.दिवाकर रावते : महोदय, आम्हाला माननीय सभापतींनी चर्चेसाठी बोलाविले होते. त्यापूर्वी माननीय विरोधी पक्ष नेत्यांसोबत बैठक झाली होती. त्या बैठकीत असे ठरले की, अगोदर पुरवणी मागण्यांवर चर्चा घेण्यात येईल व त्या नंतर दुपारी 3.15 वाजता वि.स.वि.क्रमांक-35 वर चर्चा सुरु करण्यात येईल. दरम्यानच्या काळात काय झाले हे मला माहीत नाही. वि.स.वि.क्रमांक-35 हे दुपारी 3.15 वाजता चर्चेला घेण्यात येणार असल्यामुळे मी आमच्या पक्षाच्या प्रमुखांना भेटावयास गेलो. मी त्यांना भेटून दुपारी 3.15 वाजेपर्यंत सभागृहात परत येणार होतो. वास्तविक पाहता दरम्यानच्या काळात काही बदल झाला असेल तर मध्यंतराची सुटी घेऊन दुपारी 3.15 वाजता विधेयकावर चर्चा सुरु करता येऊ शकली असती. परंतु हे सरकार हातघाईवर

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

आल्यासारखे जादूटोणा प्रतिबंधक विधेयक संमत झालेच पाहिजे असा जो अगतिकपणा दाखवित आहे तो विधिमंडळाचे पावित्र्य राखण्यासाठी योग्य आहे काय, या बाबतचा विचार आपण केला पाहिजे. या विधेयकावरील चर्चेमध्ये खंड पाडता कामा नये, या विधेयकावर चर्चा करण्यासाठी आम्हाला पुरेसा वेळ दिला पाहिजे असेही मी म्हटले होते. माझे असे म्हणणे आहे की, पुरवणी मागण्यांवरील चर्चा थांबवून विधेयकावरील चर्चा सुरु केली असती तर अखंडीतपणे चर्चा झाली असती. आज मधल्या काळात प्रदर्शनाचे उद्‌घाटन करण्यासाठी आपण दोन तासांचे मध्यंतर घेणार आहोत. मला वाटते ते मध्यंतर सुध्दा घेता कामा नये. सरकारच्या सोयीनुसार सर्व चालले पाहिजे, मग त्यामुळे सन्माननीय सदस्यांची गैरसोय होत असेल तर ते विधिमंडळ कामकाजाच्या दृष्टीने योग्य आहे काय ? या ठिकाणी वैधानिक काम करीत असताना या सर्वांचे भान ठेवून आम्हाला आपल्याकडून संरक्षण आणि न्याय मिळणे अपेक्षित आहे. सभापती महोदय, आम्ही आपल्याबद्दल बाकी काही बोलू शकत नाही.

महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या संदर्भात तिढा निर्माण झाला असेल तर आपण सभागृहाचे कामकाज थांबवावयास पाहिजे होते. हे विधेयक मध्येच चर्चेला घेतल्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम हे आमच्या पक्ष प्रमुखांच्या बैठकीला उपस्थित राहू शकले नाही. ते या ठिकाणी असल्यामुळे या विधेयकावरील चर्चेमध्ये सहभागी होऊ शकले. महोदय, मी ज्या बाबी निदर्शनास आणून दिलेल्या आहेत त्या बाबत आपण विचार करावा, अशी माझी नम्र विनंती आहे.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देतो की, पुरवणी मागण्यांच्या संदर्भात सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणी घटनात्मक मुद्दा उपस्थित केल्यामुळे व त्या बाबत बैठक घेण्याचे ठरविल्यामुळे पुरवणी मागण्यांवरील चर्चा सुरु करता आली नाही. त्याऐवजी वि.स.वि.क्रमांक-35 या विधेयकावरील चर्चा सुरु करावी लागली.

श्री.दिवाकर रावते : महोदय, आजच्या कामकाजपत्रिकेवर वि.स.वि.क्रमांक-35 पूर्वी वि.प.वि.क्रमांक-9, महाराष्ट्र जमीन सुधारणा परियोजना (सुधारणा) विधेयक दर्शविण्यात आलेले आहे. त्यामुळे दरम्यानच्या काळात वि.प.वि.क्रमांक-9 या विधेयकावर चर्चा होऊ शकली असती. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, अर्जुनासारखे केवळ माशाकडे लक्ष देऊन चालणे ही बाब विधिमंडळाला योग्य आहे काय ?

नंतर श्री.कांबळे...

अप्रकाशित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. रामदास कदम (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्र विधानसभेने सुधारणासह संमत केलेले सन 2013 चे वि.स.वि. क्रमांक 35 - अज्ञानावर पोसल्या जाणाऱ्या अनिष्ट व दुष्ट प्रथांपासून समाजातील सर्वसामान्य लोकांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने, आणि समाजातील सर्वसामान्य लोकांचे शोषण करण्याच्या व त्याद्वारे समाजाची घडीच विस्कटून टाकण्याच्या दुष्ट हेतूने भोंदू लोकांनी सर्वसामान्यत: जादूटोणा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तथाकथित अलौकिक शक्तीच्या किंवा अद्‌भूत शक्तीच्या किंवा भूतपिशाच्च यांच्या नावाने निर्माण झालेल्या नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट, दुष्ट व अघोरी प्रथांचा मुकाबला करुन त्यांचे समूळ उच्चाटन करण्याच्या दृष्टीने, समाजामध्ये जनजागृती व सामाजिक जाणीव निर्माण करण्याकरिता तसेच समाजात निकोप व सुरक्षित वातावरण निर्माण करण्याकरिता; आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या 45 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त 6 महिन्याच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

**तालिका सभापती** : आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न व विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा प्रस्ताव, या दोन्ही प्रस्तावांवर एकत्रित चर्चा होईल. त्यानंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर प्रथम विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव मतास टाकला जाईल. तो असंमत झाल्यानंर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल. आता या प्रस्तावावर सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी आपल्या भाषणात सुरूवात करण्यापूर्वी मी असे सांगू इच्छितो की, सन्माननीय श्री. जयंत प्र. पाटील यांनी सुचविल्यानुसार आता 15 मिनिटांचे मध्यंतर घेऊ. सभागृहाची बैठक दुपारी 3.15 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.56 ते दुपारी 3.15 पर्यंत स्थगित झाली.)

----

( नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( मध्यंतरानंतर )**

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी )**

श्री.रामदास कदम ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, विधानसभा विधेयक क्रमांक 35, अज्ञानावर पोसल्या जाणाऱ्या अनिष्ट व दुष्ट प्रथांपासून समाजातील सर्वसामान्य लोकांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने आणि समाजातील सर्वसामान्य लोकांचे शोषण करण्याच्या व त्याद्वारे समाजाची घडीच विस्कटून टाकण्याच्या दुष्ट हेतूने भोंदू लोकांनी सर्वसामान्यत: जादूटोणा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तथाकथित अलौकिक शक्तीच्या किंवा अद्‌भूत शक्तीच्या किंवा भूतपिशाच्च यांच्या नावाने निर्माण झालेल्या नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट, दुष्ट व अघोरी प्रथांचा मुकाबला करुन त्यांचे समूळ उच्चाटन करण्याच्या दृष्टीने, समाजामध्ये जनजागृती व सामाजिक जाणीव निर्माण करण्याकरिता तसेच समाजात निकोप व सुरक्षित वातावरण निर्माण करण्याकरिता आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक मंत्री महोदयांनी विचारार्थ सभागृहासमोर मांडलेले आहे.

सभापती महोदय, मागील जवळजवळ 18 वर्षांपासून या विधेयकाची वाटचाल चालू आहे. कै.दाभोळकर व श्याम मानव यांच्याबरोबर मातोश्रीवर आमच्या जवळपास 5 बैठका झाल्या आहेत. या विधेयकामधील 21 कलमांबाबत आम्ही त्यांच्यासोबत चर्चेला बसत होतो. या विधेयकातील हा शब्द नको असेल तर तो काढून टाका, या शब्दाची अडचण असेल तो काढून टाका अशा पध्दतीने चर्चा होत होती. श्याम मानव व कै.दाभोळकर या दोघांनी हे विधेयक मंजूर होण्यासाठी अविरत प्रयत्न केले होते. त्यांनी शेवटी अशी भूमिका घेतली होती की, या विधेयकातील 21 कलमांपैकी 20 कलमे, 18 कलमे, 16 कलमे 14 कलमे मंजूर करावीत. तेही शक्य नसेल तर एक कलम का होईना पण हे विधेयक मंजूर झाले पाहिजे.

सभापती महोदय, अंनिस संस्थेची मी माहिती घेतलेली आहे. आम्ही नि:स्वार्थीपणे काम करीत आहोत असे त्या संस्थेकडून छातीठोकपणे सांगितले जाते.

नंतर श्री.शिगम.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

म्हणून मी अंनिसची माहिती घेतली. नरेंद्र दाभोळकर यांचा खून झाला. त्याचा निषेध मी केला. विचारांचा सामना विचारांनीच झाला पाहिजे. झालेला हल्ला हा भ्याड होता या बद्दल दुमत नाही. मला या ठिकाणी एक गोष्ट स्पष्टपणे सांगितली पाहिजे की, या बिलाच्या पाठीमागील कै. नरेंद्र दाभोळकर आणि त्यांच्या सहका-यांचा हेतू स्वच्छ होता काय अशी माझ्या मनामध्ये शंका निर्माण होते. त्यांच्या हेतूबाबत माझ्या मनात शंका आहे. याचे कारण असे की, त्यांनी जे पुस्तक लिहिलेले आहे त्यामध्ये त्यांनी 'आमच्या संस्थेला आम्ही कोणाकडूनही पैसा घेत नाही' असे नमूद केलेले आहे. म्हणून मी या संस्थेबाबत माहिती घेतली. ही माहिती घेत असताना मला समजले की या संस्थेला परदेशातून पैसा येतो. ही संस्था जर अशा प्रकारे पैसे घेत असेल तर मग आम्ही कोणाकडूनही पैसे घेत नाही असे लोकांना खोटे का सांगतात, लोकांची दिशाभूल का करतात अशा प्रकारचे प्रश्न माझ्या मनामध्ये निर्माण झाले. यासंदर्भात मी माननीय मंत्री महोदय श्री. शिवाजराव मोघे यांच्या विरुध्द विशेषाधिकार भंगाची सूचना दिली होती. त्या सूचनेला उत्तर देताना, "त्या संस्थेला पैसे आले, ते पैसे जमा आहेत, त्याची गृह विभागाकडून तसेच विधी व न्याय विभागाकडून चौकशी करण्यात येत आहे" अशा प्रकारे उत्तर देण्यात आले. जेव्हा अंनिस बद्दल मी आक्षेप घेतला त्यावेळी मंत्री महोदयांनी लेखी लिहून दिले आहे की त्या संस्थेने पैसे घेतलेले आहेत. लोकांची दिशाभूल केल्याबद्दल, शासनाची दिशाभूल केल्याबद्दल अंनिसच्या कार्यकर्त्यांना 5 वर्षे शिक्षा होऊ शकते. या प्रकरणी चौकशी करण्यात येत आहे असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. मागील सहा महिन्याच्या कालावधीत या प्रकरणाची चौकशी कोठपर्यंत आलेली आहे, कोणावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, चौकशीचा अहवाल काय आहे याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणामध्ये द्यावी अशी माझी त्यांना विनंती आहे.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री सभागृहामध्ये बसलेले आहेत. ते सभागृहामध्ये सहसा दिसत नाहीत..(अडथळा).. मागील आठवड्यामध्ये मी सभागृहामध्ये का गैरहजर होतो या बद्दल मी माननीय सभापतींना लेखी कळविलेले आहे. या निमित्ताने एक गोष्ट मला माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून द्यायची आहे की, राज्यामध्ये दाभोळकर सारख्या सामाजिक कार्यकर्त्याने एखादा प्रश्न हातामध्ये घेतल्यानंतर त्यांचा खून होणे ही बाब महाराष्ट्राला भूषणावह

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम....

नाही. त्यांच्या हत्येचा खालपासून वरपर्यंत सर्वस्तरातून निषेध करण्यात आला. या दुर्दैवी घटनेच्या वेळी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी असे विधान केले की, ज्यांनी गांधी हत्या केली होती त्या विचारणीचे हे काम असले पाहिजे. खरे म्हणजे अशा प्रकारे विधान करुन माननीय मुख्यमंत्र्यांनी पोलीस तपासामध्ये बाधा आणली आहे. आपण राज्याचे मुख्यमंत्री आहात, राज्याचे प्रमुख आहात, आपणाकडून खुनासारख्या गंभीर घटनेमध्ये पोलिसांच्या तपासामध्ये बाधा येईल असे विधान करावयाय नको होते. राज्याचे मुख्यमंत्रीच असे म्हणतात की, गांधीजींची हत्या करणा-या विचारसरणीचेच हे काम असले पाहिजे मग पोलिसांनी सर्व धागेदोरे बाजूला ठेवले आणि मुख्यमंत्र्यांनी केलेल्या विधानाप्रमाणे कामाला लागले ..

...नंतर श्री. गिते...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण : मी जी वाक्यरचना केली होती त्या बाबतीत स्पष्टीकरण देऊ इच्छितो की, ज्या प्रवृत्तीने, ज्या मानसिकतेने गांधीचा वध झाला तीच मानसिकता आणि तीच प्रवृत्ती याला जबाबदार आहे. तशा व्यक्तीने केला असे मी म्हणालोच नाही.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माझी एका गोष्टीवर हरकत आहे. या सभागृहामध्ये एक पुरोगामी विचाराचे विधेयक मांडले गेलेले आहे. माननीय श्री.रामदास कदम साहेब ज्येष्ठ सदस्य आहेत. विधानसभेत त्यांनी विरोधी पक्ष नेता म्हणूनही चांगले काम केलेले आहे. कोठल्या आयुधाच्या माध्यमातून कोणत्या गोष्टी काढाव्यात हे आम्ही तुम्हाला सांगण्याची आवश्यकता नाही. किंबहुना आम्ही या गोष्टी तुमच्याकडून शिकायच्या असतात. सभागृहाची बैठक मघाशी 15 मिनिटांसाठी स्थगित करण्यात आली होती. त्यापूर्वी आपण चर्चा केली व आता चर्चा करीत आहात, ती चर्चा कोणत्या आधारावर चालली आहे याची माहिती मिळाली तर आमच्या ज्ञानात भर भडेल. दुसरे असे की, अंनिस संस्थेच्या बाबतीत जे बोलले जात आहे तो आजचा विषय नाही. सभागृहात विषय उपस्थित करण्यासाठी अनेक आयुधे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. ती आयुधे वापरुन त्यांना बोलता येईल आणि तो त्यांचा अधिकार आहे. परंतु आज या सभागृहामध्ये अतिशय महत्वाचा विषय चर्चेला आलेला असताना विषयाला सोडून बोलणे हे उचित नाही. ही चर्चा सुरु होण्यापूर्वी शंका, कुशंका उपस्थित करता आली असती. हे विधयक सभागृहात कशासाठी मांडले आहे, विधयकाचा उद्देश व कारणे काय आहेत यासबंधी पूर्णपणे विश्लेषण केलेले आहे. त्यामुळे या विधेयकाच्या अनुषंगाने विरोधी पक्षातील सदस्यांनी त्यांचे विचार मांडावेत. एखादे विधेयक या पवित्र सभागृहात येते त्यासंबंधीची प्रक्रिया ठरलेली आहे असा आमचा समज आहे. माझी हरकत एका मुद्याला आहे की, ज्या आधारे ही चर्चा चाललेली आहे, त्या चर्चेचा या विषयाशी अथवा या विधेयकाशी काय संबंध आहे या बाबतची माहिती सभागृहाला मिळाली तर बरे होईल.

**तालिका सभापती ( श्री.मोहन जोशी )** : ठीक आहे.

श्री.रामदास कदम :सभापती महोदय, नरेंद्र दाभोळकर साहेब तसेच त्यांच्या जवळचे अनिसचे काही सदस्य आहेत त्यांच्याबरोबर आमची चर्चा झालेली आहे. हे विधेयक सभागृहात आणावे यासाठी हीच मंडळी आमच्याकडे येत होती. या विधेयकातील 21 कलमे खाली कशी आली याचा मी मघाशी खुलासा केलेला आहे. हे विधेयक शासनाने आमच्या समोर आणलेले असले तरी

..2...

श्री.रामदास कदम..

याच्या पडद्यामागे कोण आहे, ही गोष्ट तुम्हा, आम्हाला माहीत आहे, ही गोष्ट संपूर्ण महाराष्ट्र, संपूर्ण जगाला माहीत आहे. ही गोष्ट सर्व पत्रकारांनाही माहीत आहे. मी या सभागृहात नवीन सदस्य नाही. विधिमंडळ सदस्य म्हणून मी 25 वर्षापासून काम करीत आहे. मी विधेयकाला सोडून एकही अवाक्षर काढलेले नाही. पडद्यामागे यांचा संबंध आहे आणि म्हणून आज मीडिया त्यांनाच विचारीत आहे. ते पुन्हा तेच स्टेटमेंट देत आहेत. या विधेयकाचा गाभा काढून घेतला गेला आहे. या विधेयकाचा आत्मा काढून घेतला गेला. सभापती महोदय, अंनिसचा संबंध या विधेयकाशी आहे. जर सबंध नसेल तर माननीय मंत्री महोदय आपल्या भाषणात त्या बाबतचा उल्लेख करतील. यासंबंधी कोणी ड्रॉफ्ट तयार करुन दिलेला नाही, त्या लोकांचा काहीही संबंध नाही, ते लोक आम्हाला कधी भेटलेले नाहीत, ते लोक कधी शासनाकडे आलेले नाहीत, या बाबतचा खुलासा माननीय मंत्री महोदय करतील. परंतु माझी विनंती आहे की, मला या विधेयकावर माझे विचार व्यक्त करु द्यावेत. जर मी काही चुकीचे बोललो तर त्याचे उत्तरही माननीय मंत्री आपल्या उत्तरात देतील. कृपया कोणी माझ्या भाषणात व्यत्यय आणू नये अशी माझी सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांना विनंती आहे.

श्री.भाई जगताप : आपण विधेयकावर बोलत असाल तर ती गोष्ट अधिक चांगली आहे, त्या गोष्टीचे स्वागतच होईल. परंतु एका विषयाला धरुन आपण बोलत आहात. आपण ज्येष्ठ आहात. काही विषय उपस्थित करण्यासाठी अनेक आयुधे उपलब्ध आहेत. त्या आयुधांचा वापर करुन तुम्ही बोलू शकता.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी जे स्टेटमेंट केलेले आहे. त्या बाबत त्यांनी सभागृहात खुलासा केलेला आहे. ते प्रवृत्ती बाबत बोलले असले तरी त्या प्रवृत्तीचा अर्थ काय होतो. गांधीच्या बाबतीत स्पेसिफिक उल्लेख केला जातो. लाखो खून झाले. इंदिरा गांधीचा देखील खून झाला. दाभोळकरांच्या खुनावर माननीय मुख्यमंत्र्यांनी स्टेटमेंट केलेले आहे. त्या अनुषंगानेच मी बोलतो आहे. इंदिरा गांधी यांचा खून झाला, ती प्रवृत्ती कुठली होती. गांधींचा खून झ ाला, ती प्रवृत्ती कुठली होती ?

यानंतर श्री. भोगले....





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम............

म्हणून माझी शासनाला नम्र विनंती आहे की, एखाद्या घटनेबाबत पोलिसांचा तपास सुरु असेल अशा वेळेला राज्याचे गृहमंत्री, मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री यांनी थोडी शांतता बाळगली तर योग्य होईल. मला आबांचे आवडते, पोलीस तपास चालू असल्यामुळे त्यात व्यत्यय येऊ नये म्हणून मला काही बोलायचे नाही असे सांगून ते वेळ मारुन नेतात. ते कदाचित योग्यही असेल. परंतु तीन महिने उलटून गेले, 100 दिवस उलटून गेले तरी दाभोळकर यांच्या खुनाचा तपास का लागला नाही, याला कोण जबाबदार आहे, नेमकी कोणती प्रवृत्ती आहे हे महाराष्ट्रासमोर कधी आणणार आहात? माननीय मुख्यमंत्र्यांनी खुलासा केला की, मी अमुक असे बोललो असा त्याचा अर्थ होत नाही हे मान्य आहे. डॉ.नरेंद्र दाभोळकर यांनी या विषयाबाबत मोठे वादळ निर्माण केले. हा कायदा संमत व्हावा म्हणून सतत 14 वर्षे ते भांडत होते. 14 वर्षे त्यांचा प्रवास सुरु होता. अनेक लोक रस्त्यावर उतरले. नरेंद्र दाभोळकर यांच्या खुनाबाबत नेमकी काय भूमिका आहे, किती दिवसात आरोपी पकडले जाणार आहेत? केंद्रीय गृहमंत्र्यांनी सांगितले की, आम्हाला धागेदोरे सापडले आहेत. राज्याचे गृहमंत्री वेगळी माहिती सांगतात, मुख्यमंत्री वेगळे बोलतात. महाराष्ट्राच्या जनतेची मात्र करमणूक होत आहे. त्या अनुषंगाने मंत्री महोदयांच्या भाषणातून ठोस उत्तर आले पाहिजे.

सभापती महोदय, नरेंद्र दाभोळकर यांच्या खुनाचा तपास कुठपर्यंत आला, किती दिवसात मारेकरी सापडतील? मंत्री महोदयांना याची माहिती नसेल तर शेजारी गृहमंत्री बसले आहेत, त्यांच्याकडे विचारणा करावी. त्यांना माहिती नसेल तर मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत, त्यांना विचारावे. दाभोळकर यांचा खून झाल्यानंतर दुसऱ्या दिवशीच अध्यादेश काढण्याचा प्रयत्न झाला होता. मग 14 वर्षे वेळ का घेतला? दाभोळकर यांचा खून कधी होतो याची वाट पहात होता का? हेही महाराष्ट्राच्या जनतेला कळले पाहिजे.

सभापती महोदय, आज सगळे कामकाज बाजूला ठेवून पहिल्यांदा हे विधेयक मंजूर करुन घ्या. मी संसदीय कार्यमंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांची मुलाखत पाहिली. त्यांनी म्हटले की, सर्व सत्ताधारी पक्षाच्या आमदारांना व्हीप देऊन हे विधेयक बहुमताच्या जोरावर मंजूर करणार आहोत. मंत्री महोदयांनी देखील मीडियासमोर वक्तव्य केले की, काल विधानसभेत विधेयक मंजूर झाले

...2....



श्री.रामदास कदम............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असून वरच्या सभागृहात मंजूर करणार आहोत. मग तुम्ही 14 वर्षे कोणाची वाट पहात होता? या वटहुकुमामुळे तुमची संवेदनशीलता सिध्द होईल, कार्यक्षमता सिध्द होईल असे महाराष्ट्र सरकारला वाटते का?

सभापती महोदय, रस्त्यात खड्डे पडले, पाच-दहा लोक मेले की खड्डे बुजविण्यासाठी जाग येते. महाराष्ट्रात ज्या ज्यावेळी बलात्काराच्या घटना घडतात, बालकांची हत्या होते, सावकारी कर्जाबाबत मोठया प्रमाणात भूमिका मांडली जाते त्या दृष्टीने सरकारकडून वेळ मारुन नेली जाते. दाभोळकर यांचा खून झाला त्याच्या दुसऱ्या दिवशी सरकारने अध्यादेश काढून महाराष्ट्र सरकार किती गतिमान आहे. नरेंद्र दाभोळकर यांच्याबद्दल किती आस्था, आपुलकी, जिव्हाळा, प्रेम आहे हे दाखविण्याचा प्रयत्न होत असला तरी सरकारचे हे बेगडी प्रेम आहे असे मी म्हटले तर ते चुकीचे होणार नाही.

नंतर 3 के.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

सभापती महोदय, या विधेयकातील अनेक कलमे कमी केली आहेत. माननीय मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री आणि आम्हाला महाराष्ट्रातील अनेक संत-वारकरी मंडळी भेटली आहेत. गुप्तधनाची आशा दाखवून नरबळी होत असेल तर त्यावर कारवाई झालीच पाहिजे. असे अनेक भोंदू बाबा आज देशामध्ये आहेत. मागे एका बाबाने अमूक एका ठिकाणी सोने आहे असे सांगितल्यामुळे आपल्या केंद्र सरकारने ती जागा खोदायला घेतली. त्या जमिनीखाली केंद्र शासनाला काय मिळाले ? अशा कायद्यान्वये आपण सरकारला फाशी देणार आहात काय ? त्यासाठी आपण कोणता नियम लावणार आहात. या बिलाबाबत शासनाने तत्परता दाखविली आहे. माझ्याकडे बोलण्या सारखे अनेक मुद्दे आहेत. सावकारी पाशामुळे आज महाराष्ट्रामध्ये अनेक शेतकऱ्यांच्या दररोज आत्महत्या होत आहेत. तशी तत्परता आपण सावकारी कायदा आणण्यासाठी का दाखवत नाही ? सावकारी कायदा आणण्यासाठी सहा वर्षे का लागत आहेत ? या संबंधातील सर्व माहिती आजच प्रश्नोत्तराच्या वेळी माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनी सांगितली आहे. आपण 4-5 अधिकाऱ्यांना घेऊन दिल्लीला गेला असता व तेथील अधिकाऱ्यांसमवेत एक बैठक घेतली असती तर सावकारी कायदा महाराष्ट्रात लागू झाला असता. मुख्यमंत्री महोदय, या बिलाच्या माध्यमातून अंनिसने परदेशातून पैसे आणून या देशातील, महाराष्ट्रातील हिंदुंना संपविण्यासाठी घेतलेली ही सुपारी आहे, असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. मी हे जबाबदारीने बोलत आहे. एका बाजूने सांगायचे की, परदेशातून पैसा घेत नाही आणि दुसऱ्या बाजूने परदेशात जाऊन पैसा आणायचा. फक्त हिंदू आणि हिंदू आणि हिंदुंच्या बाबतीतच या कायद्यामध्ये उल्लेख केलेला आहे. 21 सी मध्ये नऊ कलमे समाविष्ट केली नसती तर आम्ही महाराष्ट्रातील एकाही देवळात सुद्धा जाऊ शकलो नसतो. सत्यनाराणाची पूजा सोडूनच द्या. कुठलाही धार्मिक सण, कार्यक्रम झाला नसता. आमचा देव-धर्म सगळे संपले असते. आपला या पाठीमागचा हेतू स्वच्छ होता असे आपल्याला म्हणावयाचे आहे काय ? हा कायदा आज पास होणार असल्यामुळे कदाचित आज आपण खुशीत असाल. यात आम्ही काहीच करू शकणार नाही. कारण आमचे हात बांधलेले आहेत. कारण आमची संख्या कमी आहे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

मी माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांना सांगू इच्छितो की, आपल्याला भविष्यामध्ये महाराष्ट्रातील हिंदू समाजाला तोंड द्यावे लागणार आहे. कदाचित आपणाला वाटले असेल की, गेल्या चार मुख्यमंत्र्यांनी जे केले नाही ते श्री.पृथ्वीराज चव्हाणांनी करून दाखविले. कदाचित तसे आपल्याला वाटले असेल. पण आपला हा गैरसमज आहे. हिंदू धर्म हा आजचा नाही, कालचा नाही. तो आपण संपवू शकणार नाही. तो संपविण्याचा आपल्याला अधिकार नाही. श्री.दाभोळकरांचा खून झाला नसता तर हे बिल आज येथे आले नसते हे देखील मी आपणाला सांगतो आहे.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

परंतु डॉ. दाभोळकरांचा खून झालेला असल्यामुळे आम्हाला संवेदना आहेत त्यामध्ये हिंदू धर्म संपला तरी चालेल, आम्ही आमच्या संवेदना महाराष्ट्रातील जनतेला दाखवणारच अशी भूमिका दिसते. या विधेयकाचे अगोदरचे नाव "अंधश्रध्दा निर्मूलन" होते ते परंतु ते नाव बदलून आता "जादूटोणा" विधेयक असे ठेवण्यात आले. या बिलाबाबत आपला हेतू स्वच्छ होता तर या विधेयकाचे नाव का बदलले ? श्रध्दा कोणती, अंधश्रध्दा कोणती याचे विश्लेषण करण्यासाठी हे सभागृह होते. या विधेयकाचे नाव कोणाच्या सांगण्यारुन बदलवण्यात आले ? नाव बदलण्यामागे आपला हेतू स्वच्छ नव्हताच.

विधानसभेत हा कायदा मंजूर झाला होता परंतु हे बिल मात्र विधान परिषदेत थांबवण्यात आले. या बिलामध्ये फार काटछाट झाली हे बरोबर आहे. या बिलामुळे हिंदू धर्मावर अतिक्रमण होईल यासंदर्भात आपल्याला निश्चितपणे यश मिळालेले आहे. हे बिल संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्यात आले होते. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगावे की, हे बिल संयुक्त चिकित्सा समितीकडे गेल्यानंतर संबंध महाराष्ट्रातून या बिलाच्या संदर्भात दोन्ही बाजूने हरकती व सूचना लाखोच्या संख्येने आल्या होत्या. या बिलाच्या संदर्भात ज्या हरकती सूचना मागवल्या होत्या त्याची आता होळी करणार आहात काय ? ज्यांनी या विधेयकाच्या संदर्भात शासनाला पत्र पाठविले होते त्यांना शासनाला काही तरी संवेदना आहे असे वाटले होते, हे शासन संवेदनशील आहे, आमची बाजू समजून घेतली जाईल, आमच्या भावना समजून घेतल्या जातील असे त्यांना वाटल्यामुळेच त्यांनी शासनाकडे पत्र पाठविले होते. शासनाने मला सांगावे की, संयुक्त चिकित्सा समितीचा या विधेयकाच्या संदर्भातील अहवाल आपल्याकडे आला आहे काय, अहवाल आला असेल तर तो कोठे आहे ? यासंदर्भात माननीय मंत्री महोदय काहीही सांगू शकणार नाही. एका बाजूने हे बिल संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवायचे,या विधेयकाच्या बाबत महाराष्ट्रातील जनतेकडून हरकती व सूचना मागवून घ्यावयाच्या व त्यांच्या हरकती व सूचनेला धूप न घालता, त्यांच्या जखमेवर मीठ चोळून कोणतीही कायदेशीर प्रक्रिया पूर्ण न करता, संयुक्त चिकित्सा समितीचा अहवाल या सभागृहात न आणता पुन्हा हे बिल या सदनात आणणे हे कायदेशीर आहे काय ? या विधेयकाबाबत नेमके काय

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

घडले की, ज्यामुळे विधेयकाच्या संदर्भातील सर्व गोष्टी बाजूला ठेवण्याचे ठरवले होते. परंतु डॉ. दाभोळकरांचा खून झाल्यामुळे दुसऱ्या दिवशीच हे विधेयक पास झाले पाहिजे असे सरकारने ठरवले. जेवढे दाभोळकरांना महत्व आहे तेवढेच महाराष्ट्रातील लाखो भाविकांना, लाखो वारकऱ्यांनाही महत्व देणे अत्यंत आवश्यक आहे. मी आपल्याला पुन्हा एकदा सांगातो की, जोपर्यंत संयुक्त चिकित्सा समितीचा अहवाल या सभागृहात येत नाही तोपर्यंत या सभागृहात हे विधेयक आणू नका. हे सभागृह नियमाने चालते. नियमबाह्य काम या सभागृहात केले जात नाही. त्यामुळे आपण जर नियमाने काम करणार असाल तर संयुक्त चिकित्सा समितीचा अहवाल तातडीने मागवून घेऊन तो या सभागृहात ठेवावा.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ KTG/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 15:45

श्री.रामदास कदम...

हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्यात आले होते. लोकांची थट्टा करण्याचा शासनाचा उद्देश होता काय ? संयुक्त चिकित्सा समितीचा अहवाल आल्यानंतर आपण हे विधेयक आणावे. जोपर्यंत आपण संयुक्त चिकित्सा समितीचा अहवाल येथे आणत नाही तोपर्यंत आपणास हे विधेयक मंजूर करता येणार नाही.

सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत. कायदेशीर काम करणारे मुख्यमंत्री म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. काही लोक त्यांना "लकवा" झाला असे म्हणतात. काही जण जास्त लकवा झाला असे म्हणतात. तो प्रत्येकाचा भाग आहे. त्या लकव्यामध्ये मी जाणार नाही. माननीय मुख्यमंत्री स्वच्छ प्रतिमेचे आहेत. पण येथे नेमके काय झाले ? संयुक्त चिकित्सा समितीचा अहवाल आलेला नसताना हे विधेयक आणले तर आपल्या स्वच्छ कारभाराला काळा डाग लागणार नाही काय, याचा आपण अभ्यास करावा.

सभापती महोदय, या समितीने पंढपूरला जाऊन वारकऱ्यांशी चर्चा केली. त्या समितीला वेड लागले होते काय ? आपण्ास हे विधेयक मंजूर करण्याची इतकी घाई का आहे ? हे विधेयक आणण्यासाठी महिनाभर उशीर झाला असता तर आभाळ कोसळणार नव्हते. डॉ.दाभोळकरांचा खून झाला होता ना. कायदा बाजूला ठेवून, समितीचा अहवाल बाजूला ठेवून "हम करे सो कायदा" अशा पध्दतीने हे विधेयक आणले आहे आणि हे कशासाठी चालले आहे. हे कोणासाठी चालले आहे ?

सभापती महोदय, सन 2009 मध्ये निवडणुका आल्या त्यावेळी हे विधेयक बरखास्त झाले. त्यानंतर सन 2011 मध्ये माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी मंत्रिमंडळात पाचव्यांदा हे विधेयक मांडले आणि जुलै 2011 च्या पावसाळी अधिवेशनामध्ये हे विधेयक विधानसभेत पुन्हा मांडण्यात आले. मागील चार वर्षापासून हे विधेयक प्रत्येक अधिवेशनात चर्चेसाठी येत आहे. या विधेयकाची पार्श्वभूमी काय आहे हे जनतेला समजले पाहिजे. शासन त्यांना पाहिजे तेवढेच काम करुन घेते. जे काम करायचे नाही, अन्य लोकांना जे काम करायचे नाही, त्या फाईलवर सही का होत नाही ? असे काहीजण महाराष्ट्रातील जनतेला सांगण्यात प्रयत्न करीत आहेत. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या विधेयकाचा फेरविचार करावा अशी माझी त्यांना विनंती आहे आणि मागणी देखील आहे.

..2..

16-12-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3M-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

सभापती महोदय, या विधेयकामध्ये काही फेरफार झालेला आहे. हे विधेयक पुन्हा संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवावे अशी मी मागणी केली आहे. संयुक्त चिकित्सा समितीचा अहवाल येत नाही तोपर्यंत हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवावे.

सभापती महोदय, जादूटोणा विरोधी विधेयक हे घटनाबाह्य आणि घटनाविरोधी आहे असे माझे मत आहे. जादूटोणा विरोधी विधेयक हे हिंदू धर्मातील प्रथा, परंपरा,धार्मिक कृत्ये आणि विधी यावर प्रतिबंध आणणारे म्हणजे राज्य घटनेने दिलेले धर्म स्वातंत्र्य हिरावून घेण्यासारखे आहे असे मी येथे जाणीवपूर्वक सांगत आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

माननीय मुख्यमंत्री साहेब, आम्हाला घटनेने धर्म स्वातंत्र्य दिले आहे. ते स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा आपल्याला अधिकार नाही. माननीय मुख्यमंत्री साहेब, आपण हे विधेयक विधिमंडळात आणले आहे. आपण बहुमताच्या जोरावर हे विधेयक संमत कराल. मी सांगू इच्छितो की, हे विधेयक विधिमंडळाने नव्हे तर राज्य सरकारने आणलेले आहे. या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, यापूर्वीच्या 14 मुख्यमंत्र्यांना जे जमले नाही ते विद्यमान मुख्यमंत्री करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

महोदय, आम्ही या विधेयकाला विरोध करीत आहोत. मला माहीत आहे की, विधानसभेत ज्या प्रकारे हे विधेयक संमत करण्यात आले त्याच प्रकारे या सभागृहात सुध्दा ते संमत करण्यात येईल. सत्ताधारी पक्षाच्या आमदारांना गोंधळ घालावयास लावून हे विधेयक संमत केले जाईल. विधेयक संमत होताना सभागृहात सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांची संख्या जास्त असल्यास सरकार मतदान घेण्याची देखील तयारी दाखवील. माननीय मुख्यमंत्री महोदय, आपण केंद्रीय मंत्री म्हणून काम पाहिलेले आहे. देशाच्या तुलनेत महाराष्ट्र हा छोटा भाग आहे. आपल्या व्याप्तीची मला कल्पना आहे.

महोदय, राज्यात अशा प्रकारचे विधेयक आणून हिंदू धर्माच्या मुळावर घाव घालण्याचे पाप राज्य सरकारकडून होत असेल तर आम्ही ते कदापि होऊ देणार नाही, असा इशारा मी आज या निमित्ताने देतो. मी तर म्हणेन की, मुळात घटनाबाह्य असलेले विधेयक संमत करण्याचा अधिकार राज्य सरकारला नाही. अस्तित्वात असलेल्या कायद्यांमध्ये विधिमंडळाने आवश्यकतेनुसार सुधारणा केल्या आहेत. अशाप्रकारे विधिमंडळाने शेकडो कायद्यांमध्ये सुधारणा केल्या आहेत. माननीय मंत्री श्री.शिवाजीराव मोघे यांनी आपल्या भाषणात या बाबतचा उल्लेख केला. यापूर्वी राज्य सरकारने अनेक विधेयकांत दुरुस्त्या केल्या. या विधेयकाच्या बाबतीत दुरुस्ती न करता घटनात्मक अधिकाराचा अधिक परिणामकारक वापर व्हावा यासाठी प्रयत्न करावयास हवे होते. पण या विधेयकाच्या बाबतीत आपण नेमके उलटे केले. जादूटोणा प्रतिबंधक विधेयक, हे घटनात्मक अधिकारात अधिक्षेप करणारे विधेयक आपण आणले असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, इतर कायद्यांप्रमाणे या विधेयकात दुरुस्ती का होऊ शकली नाही ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

महोदय, एका कलमाचा का होईना बदल करुन या ठिकाणी नवीन विधेयक मांडण्यात आले. असे करुन जेथून पैसा आणला जातो त्यांना सांगू शकतो की, आम्ही तुमचे काम केले आहे. आम्ही महाराष्ट्रामध्ये नवीन कायदा केला आहे. हा संदेश पोहचविण्याचे काम 'अंनिस' ही संस्था करीत असेल तर ते योग्य नाही. अंनिस संस्थेकडून केल्या जाणाऱ्या अनेक गोष्टी मी आपल्याकडे पाठवीन. अनिस संस्थेने ज्येष्ठ सिने अभिनेते निळू फुले यांच्या मृत्यू नंतर त्यांची खोटी प्रमाणपत्रे तयार करुन ती कशी जोडली या बाबतचे सर्व पुरावे माझ्याकडे आहेत. हा विषय सांगितल्यामुळे कोणी तरी सन्माननीय सदस्य उठतील आणि सांगतील की, या घटनेचा आणि विधेयकाचा काय संबंध आहे ? मी त्यांच्या माहितीसाठी सांगतो की, निळू फुले यांच्या मृत्यूचा खोटा, बनावट व फेरफार अहवाल मी माहितीच्या अधिकारातून मिळविला आहे. तो मी माननीय मुख्यमंत्र्यांना पाठवीन. अनिस संस्थेतील एक सदस्य हे केंद्रीय मंत्र्यांचे मोठे भाऊ आहेत. याची देखील मला कल्पना आहे. हा सर्व प्रकार कोणासाठी आणि कशासाठी चालला आहे याच्या खोलात मी गेलो.

महोदय, या विधेयकावर चर्चा सुरु करीत असताना आपण मला थांबविले आणि बसायला सांगितले. आपल्या निदेशानुसार मी खाली बसलो. या बद्दल माझे काही म्हणणे नाही. कारण तो आपला अधिकार आहे. परंतु अनिस सारखी भ्रष्टाचारी संस्था परदेशातून पैसा आणून आमच्या हिंदू धर्मावर घाला घालण्याचा प्रयत्न करीत असेल आणि हे शासन त्या संस्थेला मदत करणार असेल, त्या संस्थेला डोक्यावर घेऊन चालणार असेल तर महाराष्ट्रातील हिंदू समाज कदापि गप्प बसणार नाही. तो समाज रस्त्यावर उतरेल. त्यामध्ये प्राण गेला तरी चालेल. आम्ही अंगावर गोळ्या झेलू, पण अशा प्रकारे हिंदू समाज आपल्याला संपवू देणार नाही.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

मी ही कागदपत्रे माननीय मुख्यमंत्र्यांना देतो.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, माझी हरकत आहे. आम्ही हिंदू नाही का ? हिंदू धर्मावर घाला घालण्यात येत आहे, असे सन्माननीय सदस्य म्हणत आहेत. सन्माननीय सदस्यांचे भाषण कुठेही चालले आहे. काहीही बोलायचे, हे ठीक आहे का ?

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणात त्यांचे मत व्यक्त करावे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, भाषण कुठेही भरकटत चालले आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणात बोलावे. सन्माननीय सदस्यांचा कोणता धर्म आहे, हे मला माहीत नाही.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी उपस्थित केलेला मुद्दा तपासून घेतला जाईल आणि काही आक्षेपार्ह असेल तर ते विधिमंडळाच्या कामकाजातून काढले जाईल. कारण सन्माननीय सदस्य असे सातत्याने बोलत आहेत.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मी विधेयकावरच बोलत आहे. मी सांगत आहे की, हे हिंदू धर्माबाबतच का आहे. मी पुढेही सांगणार आहे. मी पुढे बोलणार आहे. यह तो सिर्फ झाँकी है अभी और भी बहुत कुछ बाकी है. मला सांगण्यासारखे भरपूर बाकी आहे. तुम्ही चिंता करू नका. मी पुढे सांगणार आहे की, मी हिंदू असे का म्हणत आहे.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण विधेयकावर बोलावे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मी विधेयकावरच बोलत आहे. सन्माननीय सदस्यांनी कृपा करून माझ्या भाषणात व्यत्यय आणू नये, असे आपण त्यांना सांगावे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य विधेयकावर बोलत असतील तर आम्ही ऐकून घेऊ. ते विधेयकावर न बोलता इतर गोष्टींवर बोलत आहेत.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मी कोणाला विचारून किंवा दुसऱ्यांचे मत मांडत नाही. मी माझे मत मांडत आहे. मी माझे मत मांडण्यासाठी उभा आहे. एखाद्या सन्माननीय सदस्यांना माझे मत पटत नसेल तर त्यांनी त्यांच्या भाषणात त्यांची मते मांडावीत.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

सभापती महोदय, या विधेयकात "भोंदू बाबा" असे म्हटले आहे, "भोंदू लोक", असे म्हटले आहे. मी उदाहरण देतो. मी पुढे बोलणार आहे. हे मुसलमानांचा उल्लेख करू शकले असते. ख्रिश्चन धर्माचा उल्लेख करून "भोंदू फादर" असा उल्लेख करू शकले असते. (अडथळा) सभापती महोदय, मला व्यत्यय होता कामा नये, याची आपण काळजी घ्यावी. मी भाषण करीत आहे. मला बोलू द्यावे. "भोंदू बाबा", "भोंदू लोक" असे तुम्ही फक्त हिंदू धर्माबाबत बोलणार का ? तुम्ही ताईतची व्याख्या विधेयकामध्ये टाकावी. आपण गंडे, दोरे, धागा सर्व विधेयकात आणत आहात. तुम्ही विधेयकामध्ये "ताईत" असे कुठेही म्हटलेले नाही. कारण ते मुसलमानांचे होईल, त्यांच्या भावना दुखावतील. मी हिंदू असे म्हणत आहे. ते मी जबाबदारीने बोलत आहे. आपण विधेयक तपासा. मग आपल्याला सर्व समजेल. सभापती महोदय, मी पूर्वी देखील विधेयकाच्या बाहेर जाऊन कधीही बोललो नाही. हिंदुंच्या धार्मिक प्रथा, परंपरा, रूढी, विधी, दैवी चमत्कारांचे कथन, धर्मग्रंथांचे मुद्रण आणि खडतर उपासना पध्दती आदींवर या कायद्यान्वये बंधन येणार आहे, असा माझा समज आहे. मी म्हणत असलेले कसे चुकीचे आहे याबाबत माननीय मंत्री त्यांच्या उत्तरात सांगतीलच. माननीय मंत्री सक्षम आहे. शासन सक्षम आहे. जादूटोणाविरोधी विधेयकातील छुप्या नियमांचा आधार घेत धर्मावरील आघात आम्ही कदापि सहन करणार नाही. माननीय कै. प्रबोधनजी ठाकरे यांचा उल्लेख सभागृहात झाला. कै. प्रबोधनकार ठाकरेंनी स्वत:च्या कामाबद्दल सन 1921 मध्ये सांगितले होते की,

जुन्या पुराण्या चिंध्या माथा !
मनुस्मृतीच्या मुखात गाथा !
कर्मठतेच्या चिपळ्या हाती !
अंधश्रध्दा अंगी विभूती !
या सर्वांना धक्का देऊन पुढती सरणारे
हा वारसा शिवसैनिकांनी का विसरावा !

सभापती महोदय, शिवसैनिक हे कधीही विसरणार नाहीत आणि रामदास कदम तर कधीच विसरणार नाही.

( नंतर श्री. खंदारे ....



श्री.रामदास कदम....

म्हणून प्रबोधनकार ठाकरे यांच्या विचारांशी आम्ही 100 टक्के सहमत आहोत. अंधश्रध्देबद्दल प्रथम कोणी आवाज उठविला असेल तर तो प्रबोधनकार ठाकरे यांनी उठविला होता. याबद्दल कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहाची बैठक 4 वाजता स्थगित होऊन पुन्हा सायंकाळी 6 वाजता सुरु होणार आहे. आपल्या सभागृहाची अशी पध्दतच नाही. स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त विभागीय स्तरावरील प्रदर्शनाच्या उद्घाटन सोहळ्यासाठी मध्यंतर होणार आहे. शिवसेना, भारतीय जनता पक्ष व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षांच्या आमदारांची आदरणीय श्री.उद्ध्वजी ठाकरे व सर्व नेत्यांची एक संयुक्त बैठक आज संध्याकाळी 6 वाजता होणार आहे. त्या बैठकीला या सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी जाऊ नये का ? आमची ही अडचण आपण लक्षात घेणार की नाही ? दोन्ही सभागृहांच्या बैठका सुरु असताना पक्षाच्याही बैठका घेतल्या जातात. सन्माननीय मंत्री श्री.मधुकर पिचड हे त्यांच्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष होते. ते सुध्दा अशा प्रकारच्या बैठका बोलवित असत. आपण आमची अडचण समजून घ्यावी.

**तालिका सभापती ( श्री.मोहन जोशी )** : सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांचे भाषण अपूर्ण राहिलेले आहे. या विधेयकावरील चर्चा ज्यावेळी पुन्हा सुरु करण्यात येईल त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम हे चर्चा पुढे सुरु करतील.

---

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ D/ KTG/ ST/

**स्व.वसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त होणाऱ्या प्रदर्शन सोहळ्याच्या कार्यक्रमासंबंधी**

**तालिका सभापती** : महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व कृषी, औद्योगिक आणि हरित क्रांतीचे प्रणेते स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त महाराष्ट्र विधानमंडळाच्या विद्यमाने त्यांच्या जीवनावर आधारित विभागीय स्तरावरील प्रदर्शन आमदार निवास प्रांगण, नागपूर येथे आयोजित करण्यात आले आहे.

सदरहू प्रदर्शनाचा उद्‌घाटन सोहळा आजच सायंकाळी 4.30 वाजता वसंतराव देशपांडे सभागृह, नागपूर येथे मा.मुख्यमंत्री महोदयांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे.

उद्‌घाटन सोहळ्यास माननीय सदस्यांना उपस्थित राहता यावे म्हणून सभागृहाची बैठक सायंकाळी 6.15 वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 04.02 ते 06.15 पर्यंत स्थगित झाली. )

------

नंतर श्री.शिगम.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**स्थगितीनंतर**</u>

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी)**

**पृ. शी.** : नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत विधेयक

**L. A. BILL NO. XXXV OF 2013**

(A BILL TO BRING SOCIAL AWAKENING AND AWARENESS IN THE SOCIETY AND TO CREATE A HEALTHY AND SAFE SOCIAL ENVIRONMENT WITH A VIEW TO PROTECT THE COMMON PEOPLE IN THE SOCIETY AGAINST THE EVIL AND SINISTER PRACTICES THRIVING ON IGNORANCE, AND TO COMBAT AND ERADICATE HUMAN SACRIFICE AND OTHER INHUMAN, EVIL, SINISTER AND AGHORI PRACTICES PROPAGATED IN THE NAME OF SO CALLED SUPERNATURAL OR MAGICAL POWERS OR EVIL SPIRITS COMMONLY KNOWN AS BLACK MAGIC BY CONMEN WITH SINISTER MOTIVE OF EXPLOITING THE COMMON PEOPLE IN THE SOCIETY AND THEREBY DESTROYING THE VERY SOCIAL FIBRE OF THE SOCIETY; AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.) AND MOTION FOR REFERRING THE BILL TO THE JOINT COMMITTEE

(चर्चा पुढे सुरु.....)

श्री. आर.आर.पाटील (गृह मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी गृह खात्याशी संबंधित अशा काही गोष्टींचा उल्लेख केल्यामुळे त्या संदर्भात खुलासा करणे मला आवश्यक वाटते. डॉ. नरेंद्र दाभोळकर यांना परदेशातून विशेषत: अमेरिकेतून मदत झाली असा सन्माननीय सदस्यांनी चर्चेला सुरुवात होण्यापूर्वी आणि चर्चेला सुरुवात झाल्यानंतरही उल्लेख केला. सन्माननीय सदस्यांचा भाषणाचा जोर त्यावरच आहे. या संदर्भात लोकांच्या मनामध्ये कोठे संशय किंवा शंका निर्माण होऊ नये म्हणून मी खुलासा करु इच्छितो. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या अन्य मुद्यासंबंधी माननीय मंत्री महोदय उत्तर देतील.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील....

सभापती महोदय, अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडे पैसे आले असा उल्लेख विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी केला. या बाबत मी सांगू इच्छितो की, दशकातील सर्वोत्कृष्ट कायकर्ता हा पुरस्कार महाराष्ट्र फाऊंडेशन या अमेरिकास्थित संस्थेने दिलेला आहे. हा पुरस्कार 2000 साली दिला. या संस्थेचे प्रमुख सुनील देशमुख हे महाराष्ट्रातील आहेत. या संस्थेचे सर्व देणगीदार हे महाराष्ट्रातील आहेत. त्याची नावे देखील मिळालेली आहेत. महाराष्ट्र फाऊंडेशनच्या वतीने आतापर्यंत ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक नागनाथ नायकवडी, व्यंकटराव अण्णा रणबीर, ठाकूरदासजी बंग, खगोल शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर, नाटककार महेश एलकुंचवार, डॉ. अरुण टिकेकर, कुमार केतकर, नारायण सुर्वे, य.दि.फडके, मालती बेडेकर, विंदा करंदिकर, रावसाहेब कसबे अशा अनेक मान्यवरांना या महाराष्ट्र फाऊंडेशनने सन्मानित केलेले आहे. नरेंद्र दाभोळकर यांना देखील 10 लाख रुपयाचा पुरस्कार देऊन या दशकातील सर्वोत्कृष्ट समाजिक कार्यकर्ता म्हणून सन्मानित करण्यात आले होते. डॉ. दाभोळकर हे इतक्या उदार मनाचे होते की, त्यांना व्यक्तिगतरित्या दिलेला हा पुरस्कार त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलन समितीला तिथल्या तिथे देऊन टाकला. या समितीचे काम पुढे जावे हा त्यांचा उद्देश होता. अन्य जे 12 लाख रुपये दिले होते ते या लोकांना सन्मानित करण्यासाठी अंनिसकडे दिले होते. अंनिस आणि साधना संस्थेने या लोकांना सन्मानित करुन या संस्थेच्या वतीने रोखीत पुरस्कार दिले. त्यामुळे अंधश्रद्धा निर्मूलन समितीसाठी जे पैसे आले आणि सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांच्या बोलण्यातून जो गैरसमज होणार होता त्याबाबत स्पष्ट उल्लेख यातून होत आहे. या संस्थेचे अमेरिकेमध्ये जे आश्रयदाते आहेत ते स्वत: सुनील देशमुख, डॉ. प्रसन्न देशपांडे, डॉ.श्रीधर व स्मिता गोंधळेकर, आनंद लागू, राजेंद्र मराठे, श्रीधर गोंधळेकर ही सगळी महाराष्ट्रीयन माणसे आहेत. महाराष्ट्रामध्ये जे लोक चांगल्या ॲक्टीव्हिटी करीत आहेत, सामाजिक कार्य करीत आहेत त्यांना प्रोत्साहन द्यावे, साहित्याला आणि मराठीला प्रोत्साहन द्यावे म्हणून ही संस्था कार्यरत आहे. या संस्थेने सन्मान करुन हे पैसे दिलेले आहेत. या खेरीज अन्य कुठल्याही संस्थेकडून किंवा अन्यधर्मीय किंवा अन्यभाषिक संस्थेकडून हे पैसे आलेले नाहीत. हे पैसे केवळ अमेरिकेमध्ये राहाणाऱ्या मराठी माणसांनी महाराष्ट्र फाऊंडेशन काढून चांगल्या कामासाठी, सन्मानित करण्यासाठी दिलेले आहेत.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील....

सभापती महोदय, आज सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांच्या भाषणाचा आवेष पाहिल्यानंतर मला त्यानी विरोधी पक्षनेते पदावर असताना केलेल्या भाषणाची आठवण आवर्जून झाली. थोडेसे उशिरा येऊन आपण आपले अस्तित्व दाखविल्या बद्दल अभिनंदन. आपण जणू काही हिंदू धर्माचा आहात रक्षणकर्ता आणि सरकार हे हिंदूधर्म नष्ट करायला निघालेले आहे अशी स्थिती नाही. सन्माननीय सदस्यांनी गृहखात्यासंबंधीचे जे मुद्दे उपस्थित केले तेवढयापुरते मी बोलत आहे.

..नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

जादूटोणाच्या कायद्यावर माननीय राज्यपालांनी दिनांक 26 ऑगस्ट, 2013 रोजी सही केली आहे. त्यानंतर हा अध्यादेश लागू झाला. हा अध्यादेश लागू झाल्यानंतर नांदेड येथे मुस्लीम धर्मीय जादूटोणा करणाऱ्या व्यक्तीच्या विरोधात पहिला गुन्हा नोंदला गेला. हे हिंदू धर्मासाठी कटकारस्थान आहे अशातला एकंदरीत भाग दिसून येत नाही. आतापर्यंत दोन घटना मुस्लीम धर्मीयांच्या बाबतीत, एक घटना बौध्द धर्मीयांच्या बाबतीत तसेच इतरही बाबतीत घटना घडलेल्या आहेत. घडलेल्या घटना बघितल्या तर आपण कोणाचे रक्षण करावयाचे, यात धर्माचा काय प्रश्न येतो, हाही महत्वाचा प्रश्न आहे. नांदेड येथे जी घटना घडली त्यामध्ये सईदखान लियाकत अमिरुद्दीन लतिफ या मांत्रिकाने असाध्य आजारावर उपचाराच्या नावाने जाहिरात दिली आणि जादूटोणा करताना मारहाण केली. नाशिक येथे एक घटना घडली, गुप्त धनाच्या अपेक्षेने घरात खड्डा खोदला. त्या खड्डयात पुरण्यासाठी लहान मुलाला बसविले. ही गोष्ट शेजाऱ्याने बघितली. त्याने पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद केला. त्या लहान मुलाचा जीव शेजाऱ्याने वाचविला. हे कृत्य करु देणे हे काही कोणत्या धर्माचे काम असू शकत नाही. भूत उतरविण्याच्या बहाण्याने अघोरी कृत्य करणाऱ्या महाराजाने जादूटोणा करुन मारहाण केली. अशा 23 घटना घडल्या आहेत. महिलांचा विनयभंग करण्यात आला आहे, महिलांवर अत्याचार करण्यात आले आहेत, महिलांचे शोषण करण्यात आले आहे, पैशांचे शोषण आहे, अशा स्वरुपाच्या ज्या घटना घडल्या आहेत. तेवढयापुरत्या कारवाया पोलिसांनी केलेल्या आहेत. अजून काही घटना घडलेल्या आहेत, त्या घटनांची माहिती सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना खाजगीत सांगेन. त्या घटनांची यादी मी आपल्याकडे देतो. कोणाच्याही धार्मिक श्रध्दा, भावना यात हात घालण्याचे काम हा अध्यादेश काढल्यापासून झालेले नाही. अंधश्रध्दा निर्मूलन समितीला परदेशातल्या कोणी अन्य धर्मियांनी, अन्य देशातील माणसांनी पैसे दिलेले आहेत, अशीही घटना घडलेली नाही. मदत करणारी ही सगळी महाराष्ट्रातील माणसे आहेत.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, या ठिकाणी स्पष्टीकरण देण्यासाठी माननीय गृहमंत्र्यांनी अतिशय तत्परता दाखविली त्यामुळे मी त्यांचे आभार मानतो. खरे तर माझे भाषण

श्री.रामदास कदम....

अजून व्हावयाचे आहे. मी माझ्या भाषणास नुकतीच सुरुवात केली होती. सभापती महोदय, आज 4.00 वाजता कार्यक्रम होता म्हणून आपण मला थांबविले. मी ऑन लेग असताना मला माननीय गृहमंत्र्यांनी सांगितले की, आपले भाषण सुरु होण्यापूर्वी मला काही गोष्टींचा खुलासा करावयाचा आहे. माझा खुलासा पूर्ण झाल्यानंतर तुम्ही बोला. माननीय गृहमंत्र्यांना खुलासा करण्याची किती घाई झाली होती. माझे भाषण संपल्यानंतर माननीय गृहमंत्री खुलासा करु शकले असते.

श्री.आर.आर.पाटील : आपल्या नावाने संभ्रम निर्माण करणारे चुकीचे वक्तव्य रेकॉर्डवर येऊ नये ही काळजी मला होती, म्हणून मी प्रथम खुलासा केला आहे.

श्री.रामदास कदम : माझी आपल्याला एवढी काळजी होती तर मग तुमच्या सन्माननीय मंत्र्यांनी चौकशी दरम्यान काहीच का केले नाही. तुमचे सरकार सहा महिने झोपले होते काय, यासंदर्भातील चौकशी करण्यासाठी सहा महिने तुमचे सरकार झोपले होते काय ? मला असे उत्तर दिले की, गृह खाते आणि विधी व न्याय खात्यामार्फत आम्ही चौकशी करीत आहोत. ते उत्तर देऊन सहा महिने झाले आहेत. तुमच्या शासनाने सहा महिने झोपा काढल्या काय ? या बाबतची चौकशी झाली असती व तसे मला उत्तर मिळाले असते तर मी हा मुद्दा उपस्थितच केला नसता. माझ्याकडे बोट दाखविण्यापेक्षा आपण आपल्याकडे देखील बघावे.

श्री.आर.आर.पाटील : डॉ. दाभोळकरांसारख्या एका चांगल्या सामाजिक कार्यकर्त्याची बदनामी करणारी बातमी वर्तमानपत्रात छापून येते, त्यांच्या बाबतीत माहिती विचारली जाते, त्या बाबतची माहिती यंत्रणा देत नसेल तर ते बरोबर नाही. यासंबंधी आपल्याला स्पष्टीकरण मिळावयास पाहिजे होते. आपल्याला माहिती मिळविण्याचा हक्क आहे याची मला जाणीव आहे. सदरचे उत्तर देण्यासाठी ज्या कोणी अधिकाऱ्याने विलंब केला असेल त्याच्यावर कठोर कारवाई करतो.

श्री.रामदास कदम : मी आपला अत्यंत आभारी आहे. मी माझ्या भाषणाच्या सुरुवातीला विचारले की, त्या कार्यवाहीचे काय झाले यासंबंधी माननीय मंत्र्यांनी उत्तराच्या भाषणात सांगावे. मी या गोष्टीचा दोन तीन वेळा उल्लेख केला आहे. आपण काही नावे वाचून दाखविली. मी

...3...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

खाजगीमध्ये आणखी काही नावे देईल. माझ्याकडे सर्व माहिती उपलब्ध आहे. अनिस संस्थेने काय काय घोटाळे केले, त्यासंबंधीची देखील मी खाजगीत माहिती देईन. माहितीच्या अधिकाराच्या आधारे मी सगळी माहिती उपलब्ध करुन घेतलेली आहे. मला एका गोष्टीचे वाईट वाटले. अनिस संस्थेने पुस्तक काढले, त्या पुस्तकाच्या शेवटच्या पानावर असे लिहिले आहे की, ही संस्था चालविण्यासाठी परदेशाचा फंड घेत नाही.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.............

ते एका बाजूला असे म्हणतात. त्यामुळे माझ्या ठिकाणी जर माननीय गृहमंत्री असते तर त्यांनी काय केले असते?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांचा गैरसमज होणे शक्य आहे. यात एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, या संस्थेने फक्त दाभोळकर यांचा एकमेव सत्कार केला असता तर तसा अर्थ काढता आला असता. हा पैसा अंनिसकरिता दिला. ही संस्था दरवर्षी महाराष्ट्रातील लोकांना सन्मानित करते. लोकांना सन्मानित करणे, प्रोत्साहन देणे या हेतूने संस्थेची स्थापना झाली आहे. दाभोळकर यांचाच सत्कार संस्थेने केलेला नाही. महाराष्ट्रातील अनेक मान्यवरांचा सत्कार आणि सन्मान या संस्थेने केला आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विचारले होते की, अंनिसला फॉरेनमधून पैसे मिळतात का? मला शासनाकडून "नाही" असे उत्तर देण्यात आले. आता गृहमंत्री यांनी फॉरेनमधून पैसे मिळाल्याचे सांगितले. ही माहिती मला त्यावेळी दिली असती तर ही वेळ आली नसती. चुका शासनाने करायच्या आणि आम्हाला दोष देण्याचा प्रयत्न करायचा हे बरोबर नाही.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, प्रशासनाची चूक मी मान्य करतो. अपुऱ्या माहितीमुळे माननीय सदस्यांनी मुद्दा उपस्थित केला. अपुरी माहिती दिल्यामुळे माननीय सदस्यांना वक्तव्य करावे लागले. प्रशासनाने दिलेल्या चुकीच्या माहितीबद्दल एवढेच सांगू इच्छितो की, ज्यांची कोणाची चूक असेल त्यांच्यावर कारवाई करु.

श्री.रामदास कदम : याचा अर्थ तुमचा प्रशासनावर वचक नाही.

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, मी सातारा पोलिसांकडून माहिती मागविली होती. त्यांनी कळविले की, त्यांच्या ज्युरिडिक्शनमध्ये अशा प्रकारे फॉरेन फंड मिळाल्याची एंट्री नव्हती. त्या आधारे आम्ही उत्तर दिले होते.

श्री.रामदास कदम : मी असे म्हटले नव्हते की, त्यांचे कार्यालय साताऱ्यामध्ये आहे, तेथे तुम्ही चौकशी करा. शासन म्हणून संपूर्ण राज्याची माहिती संबंधित विभागाने उपलब्ध करुन घेणे अपेक्षित होते. मी सातारा येथे चौकशी करुन उत्तर द्यावे असे म्हटलेले नव्हते. तुम्ही राजीनामा द्या. सभापती महोदय, मागील सहा महिन्यांच्या काळात गृहमंत्री माहिती घेऊ शकले असते.

...2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.............

मागील सहा महिन्यांच्या काळात त्यांनी माहिती घेतली नाही याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. अंनिसबाबत अनेक उल्लेखनीय गोष्टी आहेत. मी गृहमंत्र्यांकडे त्या पाठवितो, त्यांनी चौकशी करुन घ्यावी.

सभापती महोदय, सुधारित विधेयकामध्ये अनेक गोष्टी वगळल्या आहेत. विधेयकातील कलम 5 आणि 13 यातून काही शब्द वगळण्यात आले आहेत. हिंदूंबाबत का बोलतो हे सांगण्याचा मी प्रयत्न करणार आहे. या कायद्यामध्ये हिंदू धर्माबाबत कोणतेही संरक्षण देण्यात आलेले नाही. सगळ्या धार्मिक व्यक्तींना गुन्हेगार ठरविणारा हा कायदा आहे का? पहिल्यांदा जे विधेयक आणले होते त्यात भोंदू बाबा, भोंदू वैद्य असा उल्लेख केला होता आणि आता भोंदू लोक असा उल्लेख केला आहे. माझा या शब्दाला देखील आक्षेप आहे. केवळ शब्दांची हेराफेरी करुन त्यातून वेगळा अर्थ कसा निघू शकतो हे दाखविण्याचा प्रयत्न आहे. पहिल्यांदा भोंदू बाबा, नंतर भोंदू वैद्य आणि आता भोंदू लोक असा उल्लेख आहे.

नंतर 3टी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

आता आपण सांगत आहात की, भोंदू बाबा आणि भोंदू वैद्य हा शब्द काढलेला आहे व त्या ऐवजी भोंदू लोक हा शब्द ठेवला आहे. कशा प्रकारे दिशाभूल करण्याचे काम आपल्याकडून होत आहे हे या ठिकाणी शासन म्हणून आपण दाखवून दिलेले आहे. भोंदू बाबा ऐवजी भोंदू मौलवी, भोंदू फादर असा शब्द प्रयोग का करण्यात आला नाही ? भोंदू बाबा हा शब्द फक्त हिंदूमध्येच वापरला जातो. मुस्लिम आणि ख्रिश्चन धर्मामध्ये बाबा म्हणत नाही? त्या शब्दांचा उल्लेख या विधेयकामध्ये आला असता तर हे विधेयक हिंदू विरोधी नाही असे मला म्हणता आले असते. मुस्लिमांध्मये मौलवी आहेत.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, आम्ही फादर शब्द वापरला असता त्यास मराठी शब्द नाही म्हणून विरोधी पक्षानेच हरकत घेतली असती.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, फादरला मराठीमध्ये धर्मगुरू म्हणतात हे या विधेयकामध्ये दिलेले आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, नगर, धुळे या जिल्ह्यांमध्ये गोंधळ झालेला नाही. मी देखील राज्याचा गृह राज्यमंत्री होतो. सभापती महोदय, येथे बंगाली बाबाचा उल्लेख करता आला असता. पण तो उल्लेख करण्यात आलेला नाही. या बिलाच्या पाठीमागे जी शक्ती आहे ती नास्तिक आहे. ते देवाला मानत नाही, धर्माला मानत नाही त्यांना आमच्या धर्मामध्ये हस्तक्षेप करण्याचा अधिकार कोणी दिला आहे ? तेव्हा भोंदू बाबा व भोंदू लोक हा शब्द या विधेयकातून वगळावा. त्या ऐवजी आपण सर्व समाजातील बाबा असा समावेश करावा. त्याला काही अडचण नाही. आपला दृष्टिकोन हिंदू विरोधी असल्याचे दिसून येत आहे.

सभापती महोदय, शब्दांची व्याख्या न दिल्याने संदिग्धता निर्माण करण्याचे काम या कायद्याच्या माध्यमातून केले आहे. तसेच "जर" शब्द वापरून संदिग्धता निर्माण करण्याचे काम झाले आहे. शब्दांच्या व्याख्या नसल्यामुळे नेमका अर्थ कोणीच लावू शकत नाही. त्यामुळे त्याचा गैरवापर अधिक होण्याची शक्यता आहे. या कायद्याची अंमलबजावणी दक्षता अधिकारी करणार

...2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

आहे. जोपर्यंत या शब्दांचा अर्थ स्पष्ट होत नाही. तोपर्यंत कायद्याची अंमलबजावणी योग्य पद्धतीने होणार नाही. त्यामुळे यात बदल होणे अत्यंत आवश्यक आहे. एवढे होणे अत्यंत आवश्यक आहे, गरजेचे आहे असे मला वाटते.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

सभापती महोदय, विधेयकामध्ये त्रयस्थ व्यक्तीचा तक्रार करण्याचा अधिकार आपण काढून टाकलेला असल्यामुळे आपल्याला धन्यवाद. परंतु या विधेयकामध्ये तिसऱ्या व्यक्तीचा उल्लेख का केला आहे ? प्रत्येक कुटुंबामध्ये भांडणे असतात. ज्या माणसाने विधी केलेला आहे, त्याला जर कटू अनुभव आला तर ती व्यक्ती तक्रार करु शकते. त्यामुळे या ठिकाणीही आपला हेतू स्वच्छ दिसून येत नाही. त्यामुळे आपण "दुसरा माणूस" हा जो शब्द घातला आहे तो काढण्यात यावा. समजा मी एखाद्या बाबाला घरी बोलावले आणि त्याने मला काही विधी करावयास सांगितले पण त्यातून मला फायदा झाला नाही तर मी स्वतः जाऊन पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करु शकतो. त्यामुळे आपण तो अधिकार दुसऱ्याला देऊ नका. भावाभावामध्ये काटा काढावयाचा असेल तर ते या कलमान्वये संधी घेऊन आत मध्ये टाकू शकतात. त्यामुळे आपला जो निर्णय आहे तो निश्चितपणे चुकीचा आहे. त्यामुळे दुस-या माणसाचा मुद्दा या विधेयकातून काढून टाकण्यात यावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, एखाद्याने संबंधित व्यक्तीला "भोंदू लोक" ठरवले तर यामध्ये जामीन मिळणार नाही. गुन्हा निश्चित झाला तर ती व्यक्ती जेल मध्ये जाईल. या शब्दामुळे गैर फायदा घेता येऊ शकतो त्यामुळे दुसऱ्या किंवा तिसऱ्या माणसाला संधी न देता पहिल्या व्यक्तीने तक्रार केली तर त्याची अंमलबजावणी कायद्याप्रमाणे व्हावी असे मला वाटते.

सभापती महोदय, पहिल्या मुसद्यामध्ये "दैवी शक्ती"असा उल्लेख होता तो वगळल्याबद्दल धन्यवाद. "दैवी शक्ती" काढून आपण त्या ठिकाणी "अतिंद्रिय" असा जड शब्द घातला. "अतिंद्रिय" शब्द घालून आपण शब्दांची दिशाभूल करुन हेराफेरी करण्याचे काम केले आहे. श्याम मानव मीडिया समोर म्हणाले होते की, "या बिलाचे एक कलम जरी पास झाले तर या बिलामध्ये आम्ही काय काय बाबी अंतर्भूत करु शकतो ते बघा, हे बिल पास झाल्यानंतर या बिलामध्ये काय आहे ते तुम्हाला नंतर समजेल." श्याम मानव यांना आपल्या बद्दल एवढी शाश्वती कशी काय ? तुम्ही श्याम मानवच्या मुठीमध्ये आहात काय ? या विधेयकामध्ये केवळ शब्दांच्या हेराफेरी केलेल्या आहेत. ही हेराफेरी तुमच्या कोणत्या सचिवाने केली आहे ? "दैवी शक्ती" काढून आपण त्या ठिकाणी "अतिंद्रिय" असा जड शब्द घातला आहे त्यामुळे हा नवा कायदा काहींना लागू होणार असल्यामुळे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

हा शब्द विधेयकातून वगळण्यात यावा. एखाद्या भक्ताला अनुभूती झाली असेल परंतु तिचा भाव सांगता येत नाही. "अतिंद्रिय" या शब्दाचा काहीच अर्थ समजत नाही. माननीय मंत्री महोदयांना या शब्दाचा कोणता अर्थ कळाला आहे ते मला माहिती नाही. शब्दांची हेराफेरी करुन बिल पास करण्याचा आपला उद्देश आहे. या शब्दांच्या पाठीमागे ज्या गोष्टी आहेत त्या संशयास्पद आहेत त्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे की, "दैवी" आणि "अतिंद्रिय" हे दोन्ही शब्द वगळावेत.

सभापती महोदय, अनुसूची कलम 1 मध्ये असे म्हटले आहे की, "भूत उतरवण्याच्या बहाण्याने". बहाणा म्हणजे काय ? बहाण्याच्या ऐवजी "माध्यमातून" असा शब्द टाकावयास पाहिजे होता. कोणीही म्हणू शकते की, सन्माननीय मंत्री महोदयांनी या या माणसाचा भूत उतरवण्याचा बहाणा केला, गुन्हा केला तर तुमच्यावर लगेच गुन्हा दाखल होईल. त्यामुळे "बहाणा" या शब्दाचा अर्थ स्पष्ट होण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे या संदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, आपण "बहाणा" हा शब्द विधेयकातून काढून टाकावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीपूर्व नाही

श्री.रामदास कदम....

यातून काय निष्पन्न होणार आहे ? आपण फक्त शब्दच्छल केला, पण शब्दाचा अर्थ तोच आहे. कलम एकमध्ये भूत उतरविण्याचा बहाणा असा जो शब्दप्रयोग केलेला आहे तो बदलावा अशी विनंती आहे. आपण भूत उतरविण्याचा बहाणा गुन्हा ठरविला आहे. त्यामुळे आता मारुती स्तोत्र म्हणता येणार नाही. आपण सर्वजण मारुती स्तोत्र म्हणत असाल. मी तर मारुती स्तोत्र म्हणतो. मारुती स्तोत्रामध्ये भूत प्रेत या संबंधीचा उल्लेख आहे. यापुढे मारुती स्तोत्र म्हणणे गुन्हा होणार आहे. तेव्हा आपण "बहाणा" या शब्दाची व्याख्या स्पष्ट केली पाहिजे. या विधेयकातून "बहाणा" हा शब्द काढून टाकावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, या विधेयकाच्या अनुषंगाने आपण दक्षता अधिकाऱ्याची नेमणूक करणार आहात. महाराष्ट्रामध्ये किती दक्षता अधिकाऱ्याची नियुक्ती करणार आहात, त्याची पोस्ट काय असणार आहे. त्यांना बसण्यासाठी प्रत्येक पोलीस स्टेशनला वेगळी जागा देणार आहात काय ? त्यांच्यासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद केलेली आहे काय ? त्यांना किती पगार देणार आहात ? या सर्व प्रश्नांची उत्तरे मंत्रिमहोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात द्यावीत. हा दक्षता अधिकारी स्वत: गुन्हा दाखल करणार, तोच चौकशी करणार आणि तोच न्यायालयात नेणार म्हणजे एकच माणूस किती काम करणार ? जर दक्षता अधिकारी भ्रष्टाचारी निघाला तर आपण काय करणार आहात ? कारण आपली सर्व मदार दक्षता अधिकाऱ्यावर असल्यामुळे विधेयकाचा गाभा दक्षता अधिकारी आहे. या दक्षता अधिकाऱ्यावर वचक ठेवण्यासाठी, त्याने चुकीचा गुन्हा दाखल केला किंवा कसे हे पाहण्यासाठी आपली नेमकी कोणती यंत्रणा आहे याची माहिती सभागृहाला समजली तर चांगले होईल. आम्हाला या दक्षता अधिकाऱ्याची कार्यपध्दती समजली पहिजे.

सभापती महोदय, आज कोणत्याही पोलीस स्टेशनला तक्रार नोंदविण्यास गेल्यास त्यासाठी पैसे द्यावे लागतात. गुन्हेगार पकडण्यासाठी पैसे द्यावे लागतात. या सरकारचा पोलीस स्टेशनवर काही धाक राहिलेला नाही. असे प्रकार प्रत्येक पोलीस स्टेशनला होतात असे मी म्हणणार नाही. परंतु प्रत्येक पोलीस अधिकारी स्वच्छ असेल, वाईट असेल किंवा चांगला असेल याची ग्वाही आपण कशी देऊ शकता ? आपण त्या संदर्भात कोणती कार्यवाही करणार आहात ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

सभापती महोदय, आपण आदिवासी भागात जाऊन पहावे. आदिवासी डॉक्टरकडे जात नाही ही गोष्ट सत्य आहे. जादूटोणा विधेयक 100 टक्के चुकीचे आहे असे मी म्हणणार नाही. कारण आपण अंधश्रध्देपोटी नरबळी दिल्याचे वर्तमानपत्रात वाचतो. देशाला स्वातंत्र्य मिळून 60-65 वर्षे झाली. इतक्या वर्षात आदिवासींचे प्रबोधन करण्यासाठी आपण काय केले आहे ? आपले दक्षता अधिकारी त्यांच्याकडून पैसे घेतील किंवा त्यांना जेलमध्ये तरी टाकतील. आपणास स्वातंत्र्य मिळून 65 वर्षे झाली तर आदिवासींची लंगोटी गेलेली नाही. त्यांच्या राहणीमानात बदल झालेला नाही. आपल्या नेत्यांचे आणि पुढाऱ्यांचे राहणीमान बदलले. गरीब अधिक गरीब होत गेला. तेव्हा या आदिवासींच्या संदर्भात नेमका काय निर्णय घेणार आहात ? या विधेयकामध्ये आदिवासींसाठी काय उपाय योजना केलेली आहे ते माननीय मंत्री महोदयांनी सांगावे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ ST/ पूर्वी श्री.अजित.... 18:45

श्री.रामदास कदम....

आदिवासी बांधव आज देखील उपचारासाठी वैदूंकडे जातो. या समाजातील लोक डॉक्टरांकडे जात नाहीत. ते रुग्णालयातून पळून जातात. मग या बाबतीत शासनाची काहीच जबाबदारी नाही काय ? हाताला जखम झाली तर पायाला मलमपट्टी करावयाची अशी या शासनकर्त्यांची अवस्था झाली आहे. उलटपक्षी आदिवासी समाजाच्या जखमांवर मीठ चोळण्याचे काम या सरकारकडून होते असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. त्यामुळे या आदिवासींना कशा पध्दतीने न्याय देणार आहात, हे उत्तराच्या भाषणातून स्पष्ट केले पाहिजे.

महोदय, या विधेयकातील अनुसूची कलम 3 नुसार अतिंद्रीय शक्तीची, अर्थात दैवी शक्तीची कृपा मिळविण्यासाठी शरीराला जीवघेण्या इजा झाल्यास त्याला गुन्हा ठरविता येईल, असे नमूद केले आहे. मुळात इजा अनेक प्रकारे होतात. उदाहरणार्थ जैन धर्मातील वयस्कर लोक मरेपर्यंत उपवास करतात. या निमित्ताने मी माननीय मंत्र्यांना विचारतो की, शरीराला इजा झाल्याशिवाय त्यांचा जीव जातो काय, या जैन धर्माच्या बाबतीत शासन काय निर्णय घेणार आहे, या विधेयकातील तरतुदी जैन धर्मीयांना लागू आहेत की नाहीत, या तरतुदी केवळ हिंदू धर्मासाठी लागू आहेत काय ? कारण या बाबतचा येथे कोठेही उल्लेख नाही. जैन धर्मात केस उपटणे वगैरे जे विधी होतात ते विधेयकाच्या तरतुदीतून वगळल्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. या विधेयकातील काही तरतुदी वगळून या सरकारने आवळा काढून भोपळा ठेवल्याची अवस्था या विधेयकाची करुन ठेवली आहे. आमच्याशिवाय इतरांना काहीच कळत नाही, आम्हीच सज्ञान आहोत आणि बाकीचे सर्व अज्ञान आहेत अशा अविर्भावात हे सरकार आहे. केवळ श्याम मानव यांना कायदा, कायद्यातील नियम आणि कलमे कळतात आणि इतरांना काहीच कळत नाही असे आपल्याला वाटते काय ? श्याम मानव हे नास्तिक आहेत. ते देवाला आणि धर्माला मानत नाहीत. जी माणसे स्वत:च्या धर्माला मानत नाहीत त्यांना इतरांच्या धर्मात हस्तक्षेप करण्याचा अधिकार कोणी दिला ? एका बाजूला कोणत्याही धर्माला मानत नाही असे सांगायचे आणि दुसऱ्या बाजूला इतरांच्या धर्माच्या आत घुसून त्यांच्यामध्ये मतभेद कसे निर्माण होतील याचा प्रयत्न करायचा हे योग्य नाही.

महोदय, शासनाने या तरतुदीबाबत मोठी चलाखी केली आहे. या तरतुदीच्या माध्यमातून यापुढे केवळ दिवंगत संत यांचा फक्त प्रचार करु शकतो. त्यांची कागदपत्रे, साहित्य जप्त





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

करायची नाहीत असा आपण निर्णय घेतल्याबद्दत आपले स्वागत करतो. श्याम मानव जे म्हणतात ते चुकीचे नाही. आता राज्यात संत नसले तरी या पुढे महाराष्ट्रात कोणी संत होणार नाही काय, या तरतुदीमध्ये दिवंगत हा शब्द का ठेवला ? तुम्ही स्वच्छ आहात ना, तुमचे मन स्वच्छ आहे ना ? हिंदू धर्मावर घाला घालण्याचा तुम्ही प्रयत्न करीत नाही असे आपण म्हणता. दिवंगत संतांचा प्रचार केला तर चालेल. मला वाटते 'दिवंगत संत' यातील 'दिवंगत' हा शब्द वगळून केवळ 'संत' एवढाच शब्द ठेवावा. शब्दाचा खेळ करुन हिंदू धर्मावर घाला घालण्याचे काम सरकारकडून होत आहे हे पुन्हा सांगतो. संत हा मागच्या काळातील असू शकतो, आताच्या काळातील असू शकतो किंवा भविष्यकाळातील असू शकतो. या विधेयकात 'दिवंगत संत' असा शब्दप्रयोग करण्यात आला हे कोणाच्याही लक्षात आले नाही काय ? मी पुन्हा एकदा कळकळीची विनंती करतो की, यातील 'दिवंगत' हा शब्द वगळून केवळ 'संत' हा शब्द ठेवावा.

महोदय, अनुसूचीतील कलम 2 मध्ये " अशा तथाकथित चमत्कारांचा प्रचार व प्रसार करुन लोकांना फसवणे, ठकवणे आणि त्यांच्यावर दहशत बसविणे" असे नमूद केले आहे. तथाकथित चमत्कार म्हणजे काय ? तत्कालीन मुख्यमंत्री श्री.अशोकराव चव्हाण यांनी सत्य साईबाबा यांना वर्षा या बंगल्यावर बोलविले होते.

नंतर श्री.कांबळे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

ते चमत्कार करायचे. मूठ उघडली की, घड्याळ आले, मूठ उघडली की, सोने आले, मूठ उघडली की, अंगठी आली. हे सर्व व्हायचे. काँग्रेस पक्षाचे माजी मुख्यमंत्री यांनी त्यांना आणले. आता आपण बोला. आपण ज्यावेळी दुसऱ्याकडे एक बोट दाखवितो, त्यावेळी स्वत:कडे तीन बोटे असतात, याचे आपण भान ठेवावे. त्यावेळी हा कायदा असता तर तुमच्या माजी मुख्यमंत्र्यांवर देखील गुन्हा दाखल झाला असता. तुम्ही तुमच्या भाषणात या संदर्भात सांगावे. साईबाबा देखील चमत्कार दाखवत होते. ते पाण्याचे दिवे पेटवत होते. साईबाबांनी एक चिमटा मारला की, त्या जागेवर अग्नी पेटत होता. चमत्कार दाखविणाऱ्या साईबाबांच्या शिर्डीमध्ये आज लाखो भाविक येतात. चमत्कार दाखविणाऱ्या साईबाबांच्या शिर्डी संस्थांनाच्या पैशांतून शासनाने 50 कोटी रूपये घेतले आहेत. शासनाला भीक लागली आहे. आता पुन्हा तुम्ही सांगत आहात की, चमत्कारावर विश्वास ठेवू नये. आपण 'चमत्कार' हा शब्द वापरून हे सर्व करीत आहात. मग आपण शिर्डी संस्थानाकडून 50 कोटी रूपये का घेतले आहेत ? शासनाला जनाची नाही तर मनाची काहीच नाही का ? आपण एका बाजूला कृती वेगळी करता आणि दुसऱ्या बाजूला वेगळे दाखवता हे बरोबर नाही. खाण्याचे दात वेगळे आणि दाखविण्याचे दात वेगळे, हे बरोबर नाही. आपल्याला अशीच शासनाची अवस्था पहावयास मिळत आहे. तथाकथित चमत्काराचा प्रचार करू नये, असे आपण विधेयकात लिहिले आहे, ते काढून टाकावे. तुम्ही कोणाला तरी खूष करण्यासाठी हे करीत आहात. शेवटी आम्ही कायदा केला, असे सांगण्यासाठी हे करीत आहात. तुम्ही कायदा केव्हाही करू शकता. तुम्ही 18 वर्षे अगोदर देखील कायदा करू शकत होता. तुमचीच मेजोरिटी होती. मग आपल्याला अडचण काय होती ? चमत्कार पहायला मिळत होते. ज्ञानेश्वरांच्या, मुक्ताबाईंच्या बाबतीतील चमत्कार, वेद वगैरे सर्व गोष्टी आपण यामध्ये आणू शकतो. तुम्ही तो भाग जरी काढला असला तरी ते शब्द असेच ठेवले आहेत. तुम्ही ते काढत नाही. ते काढणे अत्यंत आवश्यक आहे, अत्यंत गरजेचे आहे, असे मला वाटते.

सभापती महोदय, तुम्ही ते शब्द विधेयकातून काढले नसते तर तुकारामांची गाथा इंद्रायणी नदीतून वर आली, हे सुध्दा आम्ही बोलू शकलो नसतो. तुम्ही "दिवंगत संत", असे म्हटले आहे. त्यामध्ये आताचे संत नाहीत. आपण फक्त 'संत' असे म्हणावे, अशी माझी आपणाला विनंती आहे.

..2

श्री. रामदास कदम ....

ज्ञानोबांनी भिंत चालविली हा चमत्कार आहे. आमचा विरोध नसता तर कीर्तनकार, वारकरी संप्रदाय सर्व संपले असते. कलम 2 मध्ये धर्मग्रंथ, स्तोत्र, पुराणे, धार्मिक साहित्यांवर बंदी, असे लिहिले आहे. ठाण्यामध्ये हिंदु-मुस्लिम समाजामध्ये दंगल झाली होती, हे आठवत असेल. घटनेतील अधिकारी कोणत्या समाजाचा होता, हे मी येथे बोलणार नाही. मला कोणाच्याही भावना दुखवायच्या नाहीत. एक अधिकारी बूट घालून अख्ख्या ताफ्यासह देवळामध्ये शिरला होता. तेथे सर्वांना काठीने झोडले होते. तो अधिकारी तेथील सर्व पारायण वगैरे सर्व उचलून निघून गेला होता. त्यामुळे ठाण्यामध्ये दंगल झाली होती. धर्मग्रंथ, स्तोत्र, पुराणे, धार्मिक साहित्यांवर बंदी आणण्याचा अधिकार आपला नाही. तो अधिकार आपल्याला कोणी दिला ? आमच्या धर्म स्वातंत्र्यावर घाला घालण्याचा अधिकार आपल्याला नाही. आपण जर येथे ऐकले नाही तर आम्ही न्यायालयात जाऊ. आम्ही रस्त्यांवर येऊन आंदोलन करू. पण आम्ही आमच्या धर्मावर अन्याय होऊ देणार नाही. तंत्र, मंत्र असलेल्या हिंदू धर्मातील अथर्व वेद, मंत्र शास्त्र, स्तोत्रे आणि इतर असंख्य धर्मग्रंथांवर बंदी येऊ शकते, म्हणून आपण हे शब्द काढावेत, अशी माझी विनंती आहे.

यामुळे चमत्काराच्या प्रचारावर बंदी येणार आहे. कलम 22 नुसार चमत्काराच्या प्रसारावर प्रतिबंध आणण्यात येणार आहे. चमत्काराचा अंतर्भाव असणारी सत्यनारायणाची पूजा त्यामध्ये घेतली आहे. पण इतर बाकीच्याही गोष्टी आहेत. तुमचा दक्षता अधिकारी याचा अर्थ काहीही लावू शकतो. त्यामुळे सर्व बाबींच्या संदर्भात स्पष्ट व्याख्या असणे अत्यंत आवश्यक आहे. समाजातील श्रध्दा जिवंत राहिली पाहिजे की समाजातील श्रध्दा संपली पहिजे, हे आपण ठरविले पाहिजे. श्रध्दाहिन समाजाला खरोखर भविष्य असते काय ? कोणाची इस्लाम धर्मावर श्रध्दा असते, कोणाची खिश्चन धर्मावर श्रध्दा असते तर कोणाची ज्यू धर्मावर श्रध्दा असते.

( नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

कोणी धर्म न मानता निसर्गाला, सूर्याला देव मानतो. तसेच कोणी नास्तिकही असतो. प्रत्येकाला आपला धर्म पाळण्याचे स्वातंत्र्य घटनेने दिलेले आहे. त्यावर शासनाने अतिक्रमण करु नये अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, आय.पी.सी. व सी.आर.पी.सी.मधील काही तरतुदी बॉम्बे ॲक्टमधील आहेत. या देशात वेगवेगळे कायदे असताना विशेष कायदे का करण्यात येतात ? देशामध्ये हे दोन्ही कायदे अस्तित्वात असताना त्या कायद्यात दुरुस्ती करुन केंद्र सरकारने पोटा व टाडा हे कायदे करण्यात आले. राज्य सरकारलाही विद्यमान कायद्यामध्ये जेथे आवश्यक आहे तेथे दुरुस्ती करुन या सर्व गोष्टींचा समावेश करता आला असता. पण कोणाच्या तरी हट्टापायी हे केले जात आहे.

डॉ.नरेंद्र दाभोळकर यांचा खून झाल्याबरोबर शासनाला एकदम जाग आल्यानंतर शासनाने हा कायदा घाईघाईने आणला आहे. आयुर्वेदाच्या तिन्ही संहितेमध्ये मंत्र आहे. गायत्री मंत्राचा उद्‌घोष केल्यानंतर व त्या मंत्राचा जप केल्यानंतर कोणते तरंग निर्माण होतात, 'ओम' च्या उच्चारणानंतर कोणत्या लहरी तयार होतात. याबाबत सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले हे माझ्यापेक्षा अधिक सांगू शकतील. माझ्यापेक्षा त्यांचा अभ्यास चांगला असू शकेल. यासाठी अभ्यास करण्यात आलेला आहे. या सर्व गोष्टी हिंदू धर्माच्या साहित्यामध्ये लिहून ठेवलेल्या आहेत. त्याला थेट हात घालण्याचे काम शासनाकडून होऊ नये अशी माझी प्रामाणिक इच्छा आहे.

योग हे शास्त्र आहे. केवळ भारतानेच नाही तर सबंध जगाने योगशास्त्र स्वीकारलेले आहे. या शास्त्राला शासनाने आव्हान देऊ नये. म्हणून मी धर्माच्या बाबतीत पुन्हा पुन्हा बोलत आहे त्याला हे कारण आहे.

हिंदू धर्माच्या अध्यात्माला तत्वज्ञानाची जोड आहे. गीतेमध्ये भगवानाचे विश्वरुप दाखविलेले आहे. त्याला अध्यात्माची देखील जोड आहे. या अध्यात्माला शासनाने आव्हान देऊ नये अशी माझ ी शासनाला विनंती आहे.

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

सभापती महोदय, गोमुत्राला हिंदू धार्मिक विधीमध्ये अतिशय पवित्र मानले जाते. ही बाब पहिल्या विधेयकामधून वगळण्यात आली आहे, येथे शासनाने काही हातचलाखी केलेली नाही त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो.

कलम 3 मध्ये हिंदू मुलामुलींचे कान टोचणे, तपश्चर्या करणे, पायी तीर्थयात्रा करणे, मुसलमानांनी सुंथा करणे, मातम्च्या वेळी शरीरावर जीवघेण्या इजा करणे, अंगावरील केस उपटणे, शारीरिक हनन करणारे मात्र सध्या न दिसणारे अनेक विधी करणे ही कृत्ये अजामीनपात्र होती. या ठिकाणी काही अंशी दिलासा दिला असला तरी काही ठिकाणी यातील काही गोष्टी कायमच्या ठेवल्या आहेत. त्या यातून वगळाव्या जेणे करुन धर्म स्वातंत्र्यावर घाला येणार नाही.

गणेशोत्सवामध्ये ध्वनीक्षेपकाद्वारे पूजा व उत्सव साजरे करणे याबाबत अहिंदू किंवा इतर कोणीही आक्षेप घेऊ शकतात. ते विधेयकातून वगळले आहे. त्याबद्दल शासनाला मी धन्यवाद देतो. आता हे वगळले असले तरी शब्दचलाखी करुन त्याचा पुन्हा समावेश करु नये अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, मी यानंतर अतिशय महत्त्वाचा मुद्दा मांडणार आहे. या विधेयकात नरबळीसाठी 7 वर्षाच्या शिक्षेची तरतूद करण्यात आलेली आहे.

नंतर श्री.शिगम.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम....

सभापती महोदय, मी राज्याचा गृहराज्यमंत्री होतो. खुनासाठी फाशी होऊ शकते आणि जन्मठेप देखील होऊ शकते. मग 7 वर्षाची सजा जास्त होते की जन्मठेपेची, की फाशीची सजा जास्त होते ? या बिलाच्या संदर्भात शासनाची नेमकी भूमिका काय आहे ? भूत उतरविण्याच्या बहाण्याने एखाद्या व्यक्तीला दोराने किंवा साखळीने बांधून ठेऊन तिला मारहाण करणे, काठीने किंवा चाबकाने मारणे यासाठी कलम 319, 322, 320 324 ही कलमे प्रचलित कायद्यामध्ये आहेत. यासाठी वेगळा कायदा करण्याची आवश्यकता नव्हती.

पादत्राणे भिजवलेले पाणी प्यायला लावणे यासाठी कलम 503 आहे, मिरचीची धुरी देणे, छताला टांगणे यासाठी कलम 299 आहे. दोराने किंवा केसांनी बांधणे किंवा त्या व्यक्तीचे केस उपटणे, व्यक्तीच्या शरीरावर किंवा अवयवांवर तापलेल्या वस्तूंचे चटके देऊन इजा पोहोचविणे यासाठी कलम 319, 320, 322, 324 ही कलमे आहेत.

उघडयावर लैगिंक कृत्य करण्यासाठी जबरदस्ती करणे यासाठी कलम 503 आहे, व्यक्तीच्या तोंडात जबरदस्तीने मूत्र किंवा विष्ठा घालणे किंवा यासारख्या कोणत्याही कृती करणे यासाठी कलम 503 आहे. एखाद्या व्यक्तीने तथाकथित चमत्काराचा प्रयोग करुन त्याद्वारे आर्थिक प्राप्ती करणे आणि अशा तथाकथित चमत्कारांचा प्रचार व प्रसार करुन लोकांना फसवणे, ठकवणे आणि त्यांच्यावर दहशत बसविणे यासाठी 420 कलम आहे. कलम 420 नुसार या गुन्ह्यासाठी 5 वर्षाची सजा होऊ शकते. त्यामुळे वेगळा कायदा आणण्याची आवश्यकता नाही.

अलौकिक व्यक्तीची कृपा मिळविण्यासाठी ज्यामुळे जीवाला धोका निर्माण होतो किंवा शरीराला जीवघेण्या जखमा होतात अशा अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथांचा अवलंब करणे आणि अशा प्रथांचा अवलंब करण्यास इतरांना प्रवृत्त करणे, उत्तेजन देणे किंवा सक्ती करणे इत्यादी. उपासना ही प्रचलित कायद्यामध्ये गुन्हा ठरत नाही.

मौल्यवान वस्तू, गुप्त धन आणि जलस्त्रोत यांचा शोध घेण्याच्या बहाण्याने वा तत्सम कारणाने करणी, भानामती या नावाने कोणतेही अमानुष, अनिष्ट व अघोरी कृत्य आणि जादूटोणा करणे आणि जारणमारण यांच्या नावाने व त्यासारख्या अन्य कारणाने नरबळी देणे, किंवा देण्याचा प्रयत्न करणे किंवा अशी अमानुष कृत्ये करण्याचा सल्ला देणे, त्याकरिता प्रवृत्त करणे, अथवा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ D/ ST/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 19:00

श्री. रामदास कदम....

प्रोत्साहन देणे यासाठी कलम 299 आहे. जारणमारण, मूठमाती, नरबळी यासाठी कलम 302, 117 आहे. स्वेच्छेने गंभीर इजा करणे, लोकांना स्वेच्छेने दुखापत करण्यासाठी प्रवृत्त करणे यासाठी 1 वर्षापासून ते 7 वर्षापर्यंत कारावास आणि दंडाची तरतूद आहे. कायद्याने बंधनकारक नसलेले व बेकायदेशीर कृत्य करावयास लावणे यासाठी 2 वर्षे कारावास आणि दंडाची तरतूद आहे. मृत्यू होईल अशा दुखापती करणे, यासाठी सदोष मनुष्य वधाखाली गुन्हा नोंदविता येतो. त्यासाठी 10 वर्षे कारावास आणि दंडाची तरतूद आहे. या कायद्यामध्ये 7 वर्षाची शिक्षा आहे. स्वेच्छेने गंभीर इजा करणे, धोकादायक वस्तूंनी दुखपत करणे, यासाठी 7 वर्षे कारावास व दंडाची तरतूद आहे. आर्थिक फसवणूक, चमत्कार खोटा असल्याचे सिद्ध झाल्यास 7 वर्षे कारावास आणि दंडाची तरतूद कायद्यामध्ये आहे. खून यासाठी फाशीची शिक्षा कायद्यामध्ये आहे.

सभापती महोदय, आपल्या अंगात अतिंद्रिय शक्ती असल्याचे भासवून अथवा एखाद्या व्यक्तीत अतिंद्रिय शक्ती संचारली असल्याचा आभास निर्माण करुन इतरांच्या मनात भीती निर्माण करणे किंवा त्या व्यक्तीचे सांगणे न ऐकल्यास वाईट परिणाम होतील अशी इतरांना धमकी देणे, फसवणे व ठकवणे यासाठी एक वर्ष कारावास आणि दंडाच्या शिक्षेची तरतूद कायद्यामध्ये आहे. एखादी विशिष्ट व्यक्ती करणी करते, जादूटोणा करते किंवा भूत लावते किंवा मंत्रतंत्राने जनावरांचे दूध आटवते असे सांगून त्या व्यक्तीबाबत तशी समजूत निर्माण करणे किंवा त्याचप्रमाणे एखादी व्यक्ती अपशकुनी आहे किंवा रोगराई पसरण्यास कारणीभूत ठरणारी आहे असे भासवणे, अशा व्यक्तीचे जगणे मुश्किल करणे, त्रासदायक करणे वा कठीण करणे, एखादी व्यक्ती सैतान असल्याचे किंवा तो सैतानाचा अवतार असल्याचे जाहीर करणे, यासाठी 2 वर्षे कारावास आणि दंडाची तरतूद कायद्यामध्ये आहे. सभापती महोदय, या बिलामध्ये जी जी कलमे आणलेली आहेत त्या प्रत्येक कलमासाठी प्रचलित कायद्यामध्ये तरतूद आहे. असे असताना वेगळा कायदा करण्याचा अट्टाहास आपण का करीत आहात ?

...नंतर श्री. गिते...

अमुद्रित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.रामदास कदम......

मी मघापासून जी व्यथा या ठिकाणी व्यक्त करीत आहे, त्यासंबंधीचे उत्तर मला माननीय मंत्री महोदयांकडून हवे आहे. आपण या सभागृहात अनेक कायद्यांमध्ये दुरुस्त्या केलेल्या आहेत. जर या कायद्यात एखाद्या गुन्हयांसाठी दोन वर्षाची शिक्षा असेल तर कायद्यात दुरुस्ती करुन ती शिक्षा पाच, दहा, पंधरा वर्षे आपण करु शकत होता. कायद्यात दुरुस्ती करण्यास या शासनास अडचण काय होती. परंतु कायद्यात दुरुस्ती न करता आम्ही हा नवीनच कायदा लागू करीत आहोत असे लोकांना आपणास दाखवून द्यावयाचे आहे. परंतु हा कायदा कोणासाठी केला आहे, कशासाठी केला आहे ? तो कायदा श्याम मानव यांच्यासाठी करीत आहात. हे शासन अतिशय ढोंगी आहे. हे शासन अतिशय मतलबी आहे. आम्ही नवीन कायदा आणून कोणाचे तरी भले करीत आहोत, कोणाचे तरी समाधान करीत आहोत. हा कायदा झाल्यामुळे नरेंद्र दाभोळकर यांच्या आत्म्याला शांती लाभेल. ज्यावेळी नरेंद्र दाभोळकरांच्या खऱ्या खुन्यांना अटक करुन शिक्षा दिली जाईल त्यावेळी नरेंद्र दाळोळकराच्या आत्म्यास शांती लाभेल. त्या खुन्यांना पकडून फासासर लटकवा. ज्या दिवशी नरेंद्र दाभोळकरांच्या आरोपींना फासावर लटकाविले जाईल, त्यावेळी खरोखरच त्यांच्या आत्म्यांना शांती लाभेल. या संदर्भात थोडीशी चौकशी करुन बघावी. डॉ. नरेंद्र दाभोळकर यांचा राहता वाडा आहे, त्या वाडयाच्या दुरुस्ती बाबत एका बिल्डरशी बोलणी चालू होती. आपण पुण्याच्या पोलीस आयुक्तांना विचारुन बघा, त्यांच्याकडून थोडीशी माहिती जाणून घ्यावी. यात काही तथ्य आहे काय, यात काही अडचण आहे काय, तो बिल्डर नेमका कोण आहे. तेथून काही अडचणी निर्माण झाल्या काय, यासबंधी थोडीशी माहिती घेऊन बघावी. नरेंद्र दाभोळकर यांचे खुनी तुम्हाला का मिळत नाहीत ? त्या खुनी लोकांना कोण पाठीमागे घालत आहे. सभापती महोदय,आपण पुणे शहरातून लोकप्रतिनिधित्व करीत आहात. तुम्ही पुणे पोलीस आयुक्तांकडे या बाबतीत चौकशी करुन बघावी.

सभापती महोदय, महाराष्ट्र पशुसंवर्धन कायदा 1976 संबंधीचे पुस्तक माझ्याकडे उपलब्ध आहे. मी ते पुस्तक आपल्याला सादर करीन. आपण छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेता. आज

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम......

लाखो गायी खाटीकखान्यात चालल्या आहेत. महाराष्ट्र पशुसंवर्धन कायदा, 1976 अशा प्रकारचे रिव्हाईज कायदे या सरकारला आणता येत नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाचविण्यासाठी सावकारी कायदा या सरकारला आणता येत नाही. परंतु एखाद्या धर्माला संपविण्यासाठी या ठिकाणी कशासाठी आणले जात आहेत. या देशात "वंदे मातरम्"चा कायदा का आणला जात
नाही ? या शासनामध्ये हिंमत असेल तर "वंदे मातरम" चा कायदा आणा. या देशाच्या भूमीवर प्रेम करणारे लोक नेमके कोण आहेत, त्यासंबंधीचा कायदा हिंमत असेल तर आणून दाखवा. आज लोकसभेत वंदे मातरम् सुरु झाले तर अनेक खासदार बाहेर पडतात. त्या बाबतीत कायदा आणण्याची तुमच्यात हिंमत आहे काय ? आम्ही हिंदुनाच निवडू शकतो, कधीही कायदा करु शकतो, त्याचे कारण आम्हा हिंदुना भावना नाहीत ना. आमच्या भावना आपण कधीही पायदळी तुडवू शकतो. याचा कोठे तरी गांभीर्याने विचार होण्याची आवश्यकता आहे.

महोदय, आपले सगळयांचे लाडके सचिन तेंडुलकर त्यास आपण क्रिकेटचा देव म्हणतो. त्यांनी आपले सर्वस्व सत्य साईबाबांच्या चरणी अर्पण केले. तुम्ही त्यास काही बोलू शकता काय,
यासंदर्भात त्याच्याशी बोलण्याची तुमची हिंमत आहे काय ? त्यांची सत्य साई बाबांवर श्रध्दा आहे. महोदय, गजानन बाबांसाठी अनेक भक्तांनी आपले जीवन अर्पण केलेले आहे. त्यांच्या बाबतीत काही बोलू शकता काय, तुम्ही त्यांच्या बाबतीत काहीही बोलू शकत नाही.

महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांनी त्या काळात कायदा केला होता. नेताजी पालकर मुस्लीम झाले होते. नेताजी पालकर मुस्लीम होऊ शकतो. हिंदू धर्मातून त्यांनी मुस्लीम धर्म स्वीकारला तर आम्ही मुस्लीमांना हिंदू धर्मात घेऊन हिंदू बनवू शकतो. हे त्यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांनी दाखवून दिले आणि तसा पहिला कायदा त्यांनी केला.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.........

हे त्या काळात छत्रपतींनी दाखवून दिले. पहिला कायदा त्यांनी केला होता. आपण शिवाजीराव म्हणून नाव घेता. आई वडिलांना सांगा, तुमचे नाव बदलायला. तेवढे होते का बघा. छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेता त्यावेळेला शासनाला जर काही चाड असेल तर हिंदू धर्मावर घाला घालू नका. सर्व धर्मांसाठी कायदा करा. प्रबोधनकारांना मानणारे आम्ही आहोत. प्रबोधनकारांनी गाढवावरुन धिंड काढण्याचे काम केले. प्रबोधनकारांनी आंदोलने छेडली होती.

सभापती महोदय, आपल्या माध्यमातून मी मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, त्यांचा भारतीय दंड विधान संहितेवर विश्वास नाही का? भारतीय दंड विधान संहितेवर राज्याच्या गृहमंत्र्यांचा, मुख्यमंत्र्यांचा, सामाजिक न्याय मंत्र्यांचा थोडासा जरी विश्वास असेल तर भारतीय दंड विधान संहितेमध्ये आवश्यक ती सर्व कलमे आहेत, त्या अंतर्गत जो कायदा आहे तो तसाच ठेवावा, तो बदलण्यात येऊ नये. नवीन कायद्यानुसार एखाद्याने चमत्कार केला किंवा नरबळी दिला तर 5 वर्षांच्या शिक्षेची तरतूद आहे. भारतीय दंड विधान संहितेमध्ये याकरिता फाशीच्या शिक्षेची तरतूद आहे. अशा परिस्थितीत या दोन्ही शिक्षा कशा लागू होतील. एखाद्याला फाशी दिल्यानंतर तो आणखी शिक्षा कशी भोगणार? त्याचे भूत खाली येणार आहे का? मंत्री महोदय काय सांगतात हे समाजाला कळत नाही. या बिलाबाबत मंत्री महोदयांचा अभ्यास झालेला नाही असे मला वाटते.

सभापती महोदय, भारतीय संसदेने भारतीय दंड विधान संहितेमध्ये जे बदल केले त्यामागे न्या.जगदीशचंद्र वर्मा यांच्या अहवालाचा आधार आहे. वर्मा आयोगाच्या अहवालानुसार कलम 307 (क) नुसार लैंगिक गुन्हयाकरिता किमान 5 ते 10 वर्षाच्या कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. मग नवीन कायदा कशासाठी आणला आहे? या बिलामध्ये प्रत्येक गोष्टीसाठी कलमे आहेत.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रमेश शेंडगे)**

जादूटोणा, अंधश्रध्दा आणि नरबळीचे प्रकार त्याच वेळी थांबतील, ज्यावेळी गुन्हयाची प्रकरणे फास्ट ट्रॅक कोर्टात जातील आणि तातडीने निकाल लागून गुन्हेगांराना शासन होईल. या कायद्याची अंमलबजावणी तातडीने होणे आवश्यक आहे. मंत्री महोदयांनी थोडी माहिती घ्यावी. सरकारकडून जे खटले कोर्टात दाखल केले जातात त्यापैकी 6 टक्के गुन्हेगारांना शिक्षा होते, उर्वरित 94 टक्के प्रकरणात गुन्हेगार निर्दोष सुटतात. अशा परिस्थितीत या कायद्याचा धाक कसा बसणार आहे? तुमच्यात हिंमत असेल तर सक्षम अधिकारी नेमावा. भ्रष्टाचार थांबवावा आणि

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.........

ज्या अधिकाऱ्याकडून कोर्टात केस दाखल केली जाईल, त्या प्रकरणामध्ये गुन्हेगाराला शिक्षा झाली नाही तर या अधिकाऱ्याला सस्पेंड करा. त्यासाठी कायद्यात बदल करुन घ्यावेत.

सभापती महोदय, आम्ही साडेचार वर्षे राज्यात सत्तेवर होतो. आमच्या शासन काळात महाराष्ट्रात एकही जातीय दंगल झालेली नव्हती. सत्ता बदलली आणि तुमचे शासन सत्तारुढ झाल्यापासून या राज्यात 500 दंगली झाल्या. कशावरही तुमचा वचक नाही.

नंतर 4सी.1...

अशुध्दारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

सभापती महोदय, दक्षता अधिकाऱ्याच्या मार्फत कोर्टामध्ये दाखल केलेला गुन्हा 10 वर्ष चालला तर त्याला साक्षीदार कोणीही मिळणार नाही. यातील 50 टक्के साक्षीदार मेलेले असतात. उर्वरित माणासांना समोरचा माणूस विकत घेतो. अशानेच गुन्हेगार सुटतात. फास्ट ट्रॅक कोर्टामध्ये या प्रकरणांचा निकाल एक महिन्यात लागला तर त्या गुन्हेगाराला नक्कीच फाशी होईल. नरबळी दिल्यामुळे फाशी होते असा संदेश महाराष्ट्रामध्ये गेला तर गुन्ह्याचे प्रमाण शिल्लकच राहणार नाही.

आज आपण बिहार पेक्षा खाली आहोत. कायदा आपल्या समोर ठेवल्यानंतर त्याचा अभ्यास केला पाहिजे. आज बिहारमध्ये गुन्ह्यांचे प्रमाण 6 टक्के असून आपल्याकडे हे प्रमाण 14 टक्के आहे. जखम हाताला आणि पट्टी पायाला लावली तर त्याचा काहीच उपयोग होणार नाही. नुसते कायदे करण्या पेक्षा त्याची अंमलबजावणी करणे महत्त्वाचे आहे. कायदे हे चर्चेद्वारा झाले पहिजेत.
गोंधळ घालून बिल पास करून घेतले तर त्याला कायदा म्हणता येणार नाही. त्याला पळवाट म्हणतात. ताकावर लोणी असते. जेव्हा आपण ताक घुसळतो तेव्हा त्याच्यावर लोणी तयार होऊन येते. मी मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, सभागृहामध्ये जेव्हा दोन्ही बाजूने चर्चा होते तेव्हा लोण्या सारखा सुंदर कायदा बाहेर पडतो. तोच खरा कायदा असतो. मघाशी गोंधळ घाला असे म्हटल्याचे मी ऐकले. विधान सभेच्या सभागृहात आपण तेच केले. शेवटी शासन आपलेच आहे. आपल्या आमदारांनी विधान सभेत गोंधळ घालून कायदा मंजूर करून घेतला आहे. असे आपण किती दिवस करणार आहात ? आता आपल्या शासनाचे थोडे दिवस राहिले आहेत. माझी आपल्या मार्फत माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, बहुमताच्या जोरावर आपण हा कायदा रेटून घेऊन जाऊ नका. आपण सर्वांना विश्वासात घेऊन चालावे. या नवीन कायद्याला शिवसेनेचा सक्त विरोध आहे. शिवसेनेचे पक्ष प्रमुख श्री.उद्धवजी ठाकरे यांनी आपली भूमिका स्पष्टपणे मांडली आहे. मी मघा पासून त्यांचीच भूमिका येथे मांडण्याचा प्रयत्न करीत होतो. हिंदुंच्या मुळावर आपण उठणार असाल तर उद्याच्या निवडणुकीत महाराष्ट्रातील जनता कॉंग्रेस-राष्ट्रवादीला मुळापासून उखडून टाकल्या शिवाय राहणार नाही असा इशारा देतो आणि माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद. जय हिंद जय महाराष्ट्र.

......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, आजचे सभागृहाचे कामकाम किती वाजे पर्यंत चालणार आहे त्या संबंधी आम्हाला अवगत करावे.

**तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे)** : आजचे कामकाज किती वाजे पर्यंत चालवायचे हे सभागृहाने ठरवायचे आहे. आता बिलावर चर्चा सुरू आहे. सभागृहाचे कामकाज साधारणत: 8.30 ते 9.00 वाजे पर्यंत चालावे अशी अपेक्षा आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आता सायंकाळचे 7.00 वाजले आहेत. आम्ही सकाळी 11.00 वाजल्या पासून आलेलो आहोत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आज सकाळी 10.00 वाजता सभागृहाची विशेष बैठक होती. तेव्हा पासून आम्ही बसलेलो आहोत.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज किती वेळ चालवायचे याला काही नियम आहेत की नाही.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मघाशी सभागृहाचे कामकाज दोन तासासाठी स्व.वसंतराव नाईक यांच्या कार्यक्रमासाठी तहकूब ठेवले होते.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ती काही सुट्टी नव्हती. आम्ही देखील त्या कार्यक्रमाला गेलो होतो. तो कार्यक्रम संपल्यानंतर येथे आलो आहोत.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, या बिलावर आपण सर्वांना बोलण्यास अनुमती द्यावी. त्याला आमची काहीही हरकत नाही. आपण दोन-चार दिवस वाढवून द्यावेत. हे बिल मंजूर करण्यास शासन घाई का करीत आहे ? सकाळी 10.00 वाजल्या पासून सन्माननीय सदस्य सभागृहात बसले आहेत.

**तालिका सभापती** : माझी सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना विनंती आहे की त्यांनी आपल्या भाषणास सुरूवात करावी.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना सांगू इच्छितो की, त्यांचे भाषण सुरू असताना कोणीही त्यांना अजिबात अडविले नाही. ते मनसोक्त बोलले आहेत.

..3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना देखील अडवत नाही.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती ( श्री. रमेश शेंडगे )** : आज सकाळी 12.45 वाजता सभागृहाची नियमित बैठक सुरु झालेली आहे. सभागृहाच्या कामकाजाची वेळ 7.45 वाजे पर्यंत असून ती 8.00 वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री. भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, पुरोगामी महाराष्ट्राच्या या सभागृहात सामाजिक न्याय मंत्री श्री. शिवाजीराव मोघे साहेबांनी या ठिकाणी ऐतिहासिक विधेयक आणले असून त्यावर माझे विचार मांडण्यासाठी तसेच त्याला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी विचार मांडत असताना मला शासनाचे खास अभिनंदन करावयाचे आहे की, या विधेयकाचा प्रवास युती काळापासून सुरु झाला होता व मध्यंतरी या विधेयकाचा अनेक स्थित्यंरातून प्रवास होऊन सुध्दा, या बिलातील असलेला संभ्रम दूर करण्याच्या दृष्टीने या शासनाने या बिलाच्या संदर्भात वारंवार पावले उचलली आहेत. सर्व समाजाच्या सर्वसामान्य जनतेच्या भावना "जादूटोणा" विधेयकाशी निगडित आहेत. सर्वसामान्यांच्या दैनिक जीवनात होणारी स्थित्यंतरे या बिलाशी निगडित आहेत. या गोष्टीची जाण ठेवून या विधेयकाच्या संदर्भात सर्व बाजूने चर्चा व्हावी यासाठी या विधेयकाच्या संदर्भात हरकती व सूचना मागवल्या गेल्या. या विधेयकाच्या संदर्भात जवळजवळ 1.25 लाख हरकती व सूचना आल्या होत्या त्या तपासून पाहण्यात काही कालावधी गेला असेल परंतु एक गोष्ट मला मुद्दामहून सांगावयाची आहे की, या सभागृहात आपण लोकांचे प्रतिनिधी म्हणून किंबहुना या पुरोगामी राज्याच्या या सभागृहाचा सदस्य म्हणून मुद्दे मांडत असताना वस्तुस्थिती मांडणे आवश्यक आहे. मग ती वस्तुस्थिती एखाद्या वेळेस दाहक किंवा फार कठीण असली तरी आपल्याला ती नाकारता येत नाही. परंतु त्या गोष्टीचा परिणाम जास्त व्हावा म्हणून आकडेवारीच्या जंजाळामध्ये अनेकवेळा आपण सगळे अडकत असतो. त्यामुळे आकडेवारीचे जंजाळ दूर होण्याची आवश्यकता आहे. माझी बुध्दी जेवढी असेल त्या प्रमाणे मला जेवढे जमेल तेवढे करण्याचा मी प्रयत्न करीन तसेच माझे सहकारीही या विषयाच्या संदर्भात विचार मांडणारच आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम म्हणाले की, आम्ही त्यांना चार पाच वेळा अडवले. परंतु आम्ही त्यांना अजिबात अडवले नाही तर आम्ही त्यांना मदत करण्याचा प्रयत्न करीत होतो. आपण जे बोलतो ते सर्व सत्य आहे.

यानंतर श्री.अजित.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप...

अशा अविर्भावात जेव्हा सांगत असतो तेव्हा त्यांच्याच वाक्यानुसार वारंवार एक बोट सरकारकडे दाखविलेले असते त्यावेळी उरलेली बोटे आपण काय बोलत आहोत, लोकांसमोर काय सांगत आहोत, मीडियासमोर काय बोलत आहोत, आपण लोकांना काय संदेश देऊ इच्छित आहोत हे सांगत असते. तेव्हा या सर्व गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, एखाद्या विभागाचे हे विधेयक नाही. अस्तित्वात असलेल्या कायद्याला दुरुस्ती सुचविलेले हे विधेयक नाही. भारतीय समाजातील अनेक गोष्टींची उलथापालथ करणारे हे विधेयक आहे. आम्ही इतकी वर्षे काही गोष्टी डोळ्यांनी पाहत आहोत परंतु काही करु शकत नव्हतो. अनेक गोष्टींची बंधने मग ती धार्मिक गोष्टींची बंधने असतील, सामाजिक बंधने असतील, काही संस्था बनलेल्या आहेत त्याची बंधने असतील, त्यांच्यावर आम्ही काहीही कारवाई करु शकत नव्हतो. परंतु आम्ही हे विधेयक आणून त्याचे कायद्यात रुपांतर करुन मानवतेचे भले करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सभापती महोदय, आपण या पवित्र सभागृहात कायदा बनविण्याच्या प्रक्रियेमध्ये आहोत. या कायद्याचे वेगळे महत्व आहे. केवळ राज्याच्या दृष्टीने नव्हे तर संपूर्ण भारतीय समाज आणि त्या समाजाचे जे काही पडसाद, नाद निनाद आम्ही इतकी वर्षे ऐकले त्याचे प्रतिबिंब या विधेयकामध्ये येणार आहे आणि याची जाण प्रत्येकाला असणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, कोणताही कायदा बनविताना त्याची एक प्रक्रिया असते. आपण सर्वजण या प्रक्रियेच्या बाबतीत ज्ञात आहात. आपण या प्रक्रियेमध्ये सहभाग घेत असताना ती प्रक्रिया अधिक चांगली कशी होईल, एखादा कायदा अधिक सक्षम कसा होईल, एखादा कायदा बनवित असताना तो सर्वसामान्यांपर्यंत, तळागाळातील लोकांपर्यंत कसा पोहोचेल, त्याला तो कसा उपयोगी ठरेल अशा पध्दतीची चर्चा आपल्याला अपेक्षित असते आणि तेच खरे या सभागृहाचे उद्दिष्ट असते. परंतु मागील दोन-अडीच तासामध्ये आम्ही भाषणातून जे काही विचार ऐकले, अर्थात हा विचाराचा एक भाग आहेच, या विचाराच्या बाबतीत वक्तव्य करीत असताना कुठेतरी एक गोष्ट सातत्याने जाणवत होती की, समाजामध्ये दोन प्रवृत्ती आहेत. त्याला जातीच्या भिंती असतील, धर्माच्या भिंती असतील



अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप...

किंवा अन्य काही भिंती असतील, पण प्रवृत्ती दोनच आहेत. त्यातील एक प्रवृत्ती म्हणजे सज्जन आणि दुसरी प्रवृत्ती म्हणजे दुर्जन. परंतु दुर्जन जेव्हा सज्जनाचा अंगरखा किंवा बुरखा घालून आपली भूमिका मांडण्याचा प्रयत्न करतो त्यावेळेला लक्षात येते की, हे सर्व धादांत खोटे चालले आहे. परंतु सभाशास्त्राचे काही संकेत व परंपरा आहे आणि त्याचा आपण सर्वांनी आदर करणे आवश्यक आहे. आम्ही तो केलेला आहे. आपणही तो करावा अशी माझी आपणा सर्वांना विनंती आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ KTG/ पूर्वी श्री.अजित..... 19:30

श्री.भाई जगताप....

या बाबतीत आपल्याला अनेक उदाहरणे देता येतील. मी या निमित्ताने एक साधे उदाहरण देतो. त्या बाबतीत या ठिकाणी खूप काही बोलले गेले. या सभागृहात या विधेयकावर केवळ एकच भाषण झाले आहे. परंतु या सभागृहाबाहेर या विधेयकाच्या बाबतीत शेकडो भाषणे झाली आहेत. त्या सर्व भाषणांचा रोख एकच होता. आज सभागृहात एकच भाषण झाले असले तरी त्या भाषणाचा रोख आणि विशेषत: 2003 व 2005 पासून आतापर्यंत सभागृहाबाहेर केलेल्या भाषणांचा रोख पाहिला तर तो एकच आहे.

महोदय, वारंवार हेच सांगितले जाते की, या विधेयकाच्या संदर्भात सव्वा लाख हरकती व सूचना आल्या. परंतु हे सांगत असताना त्यातील 80 हजार सूचना व हरकती देणाऱ्यांचे असे ठाम मत आहे की, जादूटोणा प्रतिबंधक विधेयकाचे कायद्यात रुपांतर झाले पाहिजे. परंतु ही बाब सांगण्याचा कोणीही प्रयत्न केला नाही. आम्ही सभागृहात अनेक गोष्टी ऐकत असतो. यापूर्वी विरोधकांकडून सांगण्यात आले की, भ्रष्टाचाराच्या बाबतीत आम्ही ट्रकभर पुरावे सादर करु, 10 गाड्या पुरावे सादर करु. भ्रष्टाचाराचे पुरावे सादर करण्यासाठी चार ट्रक मागविल्याचे देखील सांगितले गेले. परंतु चार कागदांव्यतिरिक्त विरोधकांकडे काही दिसून आले नाही. ती कागदे केवळ सभागृहात फडकविण्याशिवाय कसल्याही उपयोगात आली नाहीत. त्या कागदांची तपासणी केली असता, सत्य वेगळेच होते.

महोदय, या विधेयकाच्या अनुषंगाने ज्या गोष्टींचा उल्लेख करण्यात आला त्यांच्या मुळाशी जाणे गरजेचे आहे. या विषयी कायदा करीत असताना आपल्या सर्वांना एका गोष्टीचा विसर पडता कामा नये. कारण तुम्ही-आम्ही या विधिमंडळाचे सदस्य आहोत. या ठिकाणी घडणाऱ्या सर्व घटनांचे आपण सर्वजण साक्षीदार आहोत. या कायदे मंडळाच्या व्यतिरिक्त सर्वात मोठे छत हे घटनेचे आहे. या घटनेच्या छताखाली सर्व धर्मांचे, पंथांचे अधिकार शाबूत आहेत. त्या अधिकाराला कोणालाही धक्का लावता येत नाही. एखाद्या गोष्टीचा आधार घेऊन किंबहुना तिचे औदुंबर करुन, तीच तीच गोष्ट लोकांसमोर बोलून दाखवायची आणि येणाऱ्या काळातील राजकीय गणिते मांडून आपल्या पध्दतीने त्या गोष्टींच्या बेरजा करणे योग्य नाही. महाराष्ट्रातील जनता अशा गोष्टींना बळी पडणार नाही. राज्यातील जनता अशा गोष्टींना यापूर्वी कधी बळी पडली नाही आणि भविष्यात देखील बळी पडणार नाही याची मला खात्री आहे. कारण हा महाराष्ट्र विचारवंतांचा आणि

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ KTG/ पूर्वी श्री.अजित..... 19:30

श्री.भाई जगताप....

गुणवंतांचा आहे.

महोदय, प्रबोधनकार ठाकरे या विचारवंताचा शिवसेना पक्षाच्या निर्मितीमध्ये खऱ्या अर्थाने सिंहाचा वाटा आहे आणि ते आम्हाला आदरणीय आहेत. प्रबोधनकार ठाकरे यांनी लिहिलेले "देवळांचा धर्म आणि धर्मांचे देऊळ" हे पुस्तक माझ्या हातात आहे. मी ते सर्व पुस्तक वाचून दाखविणार नाही. त्या पुस्तकातील एक-दोन परिच्छेद केवळ नजरेखाली घालणार आहे. या ठिकाणी एक तासापूर्वी एक व्याख्या केली गेली. या ठिकाणी सांगितले गेले की, अशा प्रकारे धर्माच्या बाबतीत कोणी घाला घालत असेल तर आम्ही अमुक अमुक करु.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ....

मग प्रबोधनकार ठाकरे यांना तुम्ही काय मानता ? आम्ही मानतो. जात नव्हे, पंथ नव्हे, धर्म नव्हे, ज्या समाजसुधारकांनी समाज हा घटक केंद्रीभूत करून एक मोठी संकल्पना भारतीय समाजापुढे मांडली, त्यांचे नाव आम्ही आदराने घेतो. त्यांनी सांगितलेल्या, लिहिलेल्या, शिकविलेल्या गोष्टींचा कुठेतरी विसर पडत आहे की काय, असा प्रश्न माझ्या मनामध्ये तयार झालेला आहे. मी आपल्याला या पुस्तकातील एक परिच्छेद वाचून दाखवितो, असे अनेक परिच्छेद आहेत. तुम्ही आम्ही सर्वजण या सर्व गोष्टींचा विचार करण्याचा प्रयत्न का करीत आहोत, आपण याला कायद्याचे स्वरूप देण्याचा प्रयत्न का करीत आहोत ?

आपण स्वातंत्र्यानंतरच्या किंवा त्या काळातील रूढी, परंपरा यांचा नेहमी उल्लेख करतो. आपला धर्म हजारो वर्षांचा आहे. मग तो धर्म एखाद्या कायद्यामुळे बदलला जाईल. त्यामध्ये आमूलाग्र बदल होणार आहेत, अशी भीती आपल्याला का वाटते ? आपला हिंदू धर्म एवढा तकलादू आहे का आणि असे कोणी समजत आहे का, आपण हे समजण्याचे कारण काय आहे, आपण अर्धवट इतिहास का सांगतो ? आपण हे का विसरतो की, 800 वर्षांपूर्वी अकबराने तलवारीच्या जोरावर कंदहारपासून अगदी थेट आताच्या बांग्लादेश पर्यंतचा सर्व भाग काबीज केला आणि दीन-ए-इलाही नावाचा धर्म स्थापन केला. हे त्याने कशासाठी केले हे आपल्याला माहीत आहे का ? कारण हिंदू व इस्लाम धर्मामध्ये तंटे बखडे होते. अकबराचे उद्दिष्ट काहीही असेल पण त्याने धर्माला हात लावण्याचा प्रयत्न केला. अकबराने असे केल्याने हिंदू धर्म बदलला का, संपला का ? हिंदू धर्म संपणार नाही. एखाद्या रूढीपासून, परंपरेपासून जर धर्माचे नुकसान झाले, समाजाचे नुकसान झाले तर त्या रूढी बदलायच्या नाहीत का, की फक्त उघड्या डोळ्याने त्याकडे पाहत रहायचे ? मला समाजाचा घटक म्हणून प्रश्न पडतो की, आपण कशासाठी आणि कोणत्या गोष्टींसाठी आक्षेप घेणार आहोत ? माझ्या डोळ्यांसमोर काही घटना घटल्या आहेत, काही घटना घडत आहेत किंवा काल परवा घडल्या आहेत. सभापती महोदय, या सर्व घटना ज्या शतकाचा उल्लेख क्रांतिकारी आणि प्रचंड वेगाचे शतक म्हणून आपण करतो, त्या 21 व्या शतकात घडत आहेत. आपल्या पत्नीला बरे वाटावे म्हणून दुसऱ्याच्या पत्नीचा बळी द्यायचा आणि आम्ही समाजाने फक्त त्याचा निषेध करून गप्प बसायचे का, प्रचलित कायदा पाहून घेईल, असे म्हणून समाधान मानायचे का ?

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ....

तुमची आमची, कोणत्या प्रकारच्या समाजाची संकल्पना आहे, हे मला कळत नाही. 21 व्या शतकात अशा घटना घडत असतील तर ते योग्य नाही. अनेक वर्षापासून रूढी, परंपरा यांच्या नावाखाली, धार्मिक विधींच्या नावाखाली अयोग्य गोष्टी होत असतील तर ते योग्य नाही. त्याचा उल्लेख समाजधुरीणांनीही केलेला आहे. आज तुम्ही आम्ही जी चर्चा करीत आहोत तो आजच्या चर्चेचा विषय मुळीच नाही. धर्मांचा पगडा, जातींचा पगडा प्रचंड होता, त्या काळात धर्मधुरीणांनीही ही वक्तव्ये केली आहेत. प्रबोधनकार ठाकरे असतील, लोकमान्य टिळक असतील, आगरकर असतील किंवा हिंदू धर्माच्या बाबतीत नेहमी बोलणारे स्वातंत्र्यवीर सावरकर असतील, त्यांनी अशी वक्तव्ये केलेली आहेत.

( नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप....

त्यावेळी स्वामी विवेकानंद यांनी वक्तव्ये केली होती. म्हणून ही कोणती मानसिकता आहे असे मी म्हटलेले आहे. कोणत्या मानसिकतेतून आम्ही बोलत आहोत, कोणती मानसिकता या समाजाला सुदृढ बनविणार आहे ? ही मानसिकता तयार करीत असताना सरकार अन्याय करीत आहे, कोणते तरी मंत्री, कोणता तरी घटक अन्याय करीत आहे अशा प्रकारचा बागुलबुवा समाजासमोर उभा करावयाचा, अशाने आपण समाजाला कोठे घेऊन जाणार आहोत, आपल्यावर समाजाचे दायित्व आहे की नाही ?

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांच्या म्हणण्याचा रोख कोठे आहे ते मी सांगतो. सन्माननीय गृह मंत्री यांनी सभागृहात कबूल केले आहे की, आमच्याकडून चूक झालेली आहे. ज्या अधिकाऱ्यांनी ही चूक केलेली आहे त्यांच्याविरुध्द कारवाई केली जाईल. त्यांनी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे सभागृहाला आश्वासन दिलेले आहे. मंत्री महोदयांवरच कारवाई केली पाहिजे असे मी म्हटले होते. आम्ही काही बागुलबुवा उभा करीत आहोत अशातील भाग नाही. मी या विधेयकाच्या बाहेर जाऊन बोललो नाही, मी काही तरी आभास निर्माण केलेला नाही. मी सर्व कागदपत्रे शासनाकडे सुपूर्द केलेली आहेत. एवढेच मला त्यांना सांगावयाचे आहे.

श्री.भाई जगताप : मी सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना सांगू इच्छितो की, मला सभागृहाच्या प्रथा व परंपरा बऱ्यापैकी माहीत आहेत मला असे वाटते की, वैचारिक काही गोष्टी जेव्हा मांडत असतो तेव्हा सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना वैचारिक मंथन अभिप्रेत आहे. त्यावेळी विचाराचे खंडन विचारानेच करण्याचा मी प्रयत्न करीत आहे. कदाचित माझी बुध्दी तोकडी असण्याची शक्यता आहे. मी कधीच असा दावा केलेला नाही. उलट मी असे सांगितले आहे की, माझ्या अल्प बुध्दीला जे वाटते, जे पटते, जे मी वाचले आहे, जे मी वाचू शकतो, जे मी पाहिले आहे, मला जे अयोग्य वाटते त्याचा उल्लेख मी करीत आहे. मला यातील फार कळते असा मी कधीही दावा केलेला नाही. म्हणून मी म्हणतो की, समाजामध्ये चांगला व वाईट हे दोनच घटक आहेत असे माझे मत आहे. चांगल्या गोष्टीची व्याख्या असत नाही, पण वाईटाचीच

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.भाई जगताप....

व्याख्या मात्र करावी लागते. म्हणून आपण ज्यावेळी एखाद्या गोष्टीकडे समाज म्हणून पहात असतो. कोणता धर्म, पंथ, प्रदेश म्हणून त्याकडे पहात नसतो. अशा प्रकारचे कायदे तयार करीत असताना आपल्याला समाज मनाच्या आरशातून पहावे लागते. संपूर्ण समाजामध्ये बदल व अभिसरणाची प्रकिया होत असते. अशा वेळी आपल्या सर्वांना प्रचंड काळजी घ्यावी लागते. ती घेतली जावी या पवित्र भावनेतून मी माझी मते मांडण्याचा प्रयत्न करीत आहे.

हे सांगत असताना कोणी तरी अवडंबर करीत आहे असे माझे म्हणणे नाही. त्या विषयाचे अवडंबर का केले जाते असा माझा विषय आहे. तुम्हा आम्हाकडून जनतेला अपेक्षा आहे. या ठिकाणी तयार होणारा कायदा सुस्पष्ट, पारदर्शक, सर्वांना सहज समजणारा असावा, सोप्या भाषेतील असावा, अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त करतो आणि तो तसाच असला पाहिजे. त्यामुळे या कायद्याच्या प्रक्रियेमध्ये, जडणघडणीमध्ये असलेली काही जळमटे आपल्याला दूर करावी लागतील. ती दूर केली नाही तर सुदृढ कायदा तयार होणार नाही. कारण या देशामध्ये कल्याणकारी राज्य म्हणून तुमचा आमचा लौकिक आहे. या राज्याने अनेक कल्याणकारी कायदे केलेले आहेत. त्यानंतर ते देशाने स्वीकारलेले आहेत. याचे एक उदाहरण मी सांगेन. अशा प्रकारचा कायदा छत्तीसगढ राज्यामध्ये आहे. ज्या राज्यांना पूर्वेकडील राज्ये असे म्हणतो.

नंतर श्री.शिगम.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप....

त्या राज्यांमध्ये अशा प्रकारच्या प्रचंड रुढी आणि परंपरा होत्या. त्या राज्यांमध्ये एका ओळीचा कायदा झाला. त्यामध्ये अंधश्रद्धा हा शब्द आहे. आपण याबाबतची माहिती घ्यावी. त्या ठिकाणी देखील भिन्न विचारांचे लोक आहेत. लोकशाहीमध्ये प्रत्येकाला विचारांचे स्वातंत्र्य आहे. परंतु तो कायदा त्या विधानसभेने पारित केला. त्यावेळी चर्चा झाली आणि ती होणे आवश्यक आहे. चर्चेसाठी या सभागृहाचे महत्व असते. आपण जगापेक्षा काही वेगळे करायला निघालो नाही. ज्या राज्यामध्ये चर्चा झाली आणि कायदा झाला ते राज्य हिंदू नाही काय ?

सभापती महोदय, मला या ठिकाणी आवर्जून सांगावेसे वाटते की, ज्या समाजधुरीणांनी तुम्हा-आम्हाला एक दिशा दिली, या महाराष्ट्राला दिशा दिली ते समाजधुरीणजे सांगतात तेही आपण चुकीचे आहे असे मानायचे काय ? त्यांनी आपल्यापुढे समाजाचा आरसा ठेवलेला आहे. त्या आरशामध्ये आपले प्रतिबिंब पहात असताना, जो बदल घडविणे आवश्यक आहे तो घडवत असताना लोकांच्या मनात गैरसमज रहाता कामा नये, हेही बरोबर आहे. परंतु जो समज आहे त्याबाबतीत गैरसमज पसरविणारे वातावरण कोणी निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असेल तर त्या बाबतीत माझी त्यांना विनंती आहे की, आपण या जगामध्ये प्रवासी आहोत. माणसाच्या जन्माची तारीख सांगता येते. परंतु मृत्यूची तारीख सांगता येत नाही इतका हा प्रवास अस्थिर आहे. येणारा प्रवास हा कंटिन्युअस फ्लो आहे. या प्रवाहामध्ये सभागृहाच्या माध्यमातून आपण समाजाला काय देणार आहोत ? आपण हेच देणार आहोत काय ? गुप्त धन सापडावे, गुप्त धन स्वप्नात आले म्हणून मुलाचा बळी दिला जातो. एक महिन्यापूर्वीची घटना आहे. ज्या लहान मुलाचे पार्थीव मिळाले होते त्याच्या शरीरावर जखमा होत्या. त्या ठिकाणी हळद कुंकू वाहण्यात आले होते, अशा प्रकारचे दृश्य त्या ठिकाणी दिसत होते. परंतु बोलण्याची कुणाची हिमंत झाली नाही. कारण कायदा नाही. अशा प्रकारच्या वाईट आणि क्रूर घटनांना वाचा फोडण्यासाठी कायद्याचे गठन आपण करायचे नाही काय ? आज तुमच्या आमच्या समोर मीडिआ आहे. ज्या ज्या गोष्टी घडतात त्या तुम्हा आम्हाला कळतात तरी. परंतु न कळणाऱ्या अशा शेकडो आणि हजारो गोष्टी आहेत. या सर्व गोष्टींना पायबंद घालण्यासाठी एका परिपूर्ण कायद्याची निर्मिती व्हावी असे सरकारचे मत असेल, सरकार त्या दिशेने पावले टाकत असेल तर तसे सरकारला करु द्यायचे नाही काय ? मग सरकारने नेमके काय करायचे ? हा कायदा सामाजिक अभिसरण करणारा,



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

भारताच्या सामाजिक जीवनामध्ये प्रचंड अशी उलथापालथ करणारा कायदा आपण निर्माण करीत आहोत. खरे सांगायचे झाले तर या कायद्याचा कीस पाडून या कायद्यावे अवमूल्यन करण्यात आलेले आहे. माझी बुद्धी बरोबर असेल तर मी सांगू इच्छितो की, युतीच्या काळामध्ये या कायद्याची वाच्यता एका अशासकीय विधेयकाच्या माध्यमातून झाली होती. त्या विधेयकामध्ये 27 कलमे होती. त्या कलमापैकी आता फक्त 6 ते 7 कलमे राहिलेली आहेत.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप....

पुढे त्यावर चर्चा झाली नाही, यावर पुढील प्रक्रिया झाली नाही, ही गोष्ट मी मान्य करतो. या दोन्ही गोष्टींकडे आपण तुलनात्मक दृष्टीकोनातून पाहिले तर आपल्या लक्षात येईल की, आता जो कायदा होऊ घातलेला आहे, विधानसभा सभागृहात जो कायदा पारित झालेला आहे तो त्यादृष्टीने खूपच मवाळ आहे. मी अतिशय जबाबदारीने हा शब्दप्रयोग करीत आहे. हा अतिशय मवाळ कायदा होऊ घातलेला आहे आणि त्याचे आपण सर्वजण साक्षीदार आहोत. त्याला वेगवेगळी कारणे आहेत. मी मघाशी ज्या मुलाचे उदाहरण दिले त्या मुलाच्या घरचे लोक तक्रार करण्यासाठी पुढे आले नाहीत. या प्रकारात ज्याने गुन्हा केला, जो गुन्हेगार आहे, त्याचे सगळे कुटुंब त्यात सहभागी असल्यामुळे ते कशासाठी तक्रार करतील. तसे लोक तक्रार करु शकत नाहीत. त्यामुळे या कायद्यात अशा तरतुदी करणे आवश्यक होते

मला माहीत आहे की, विधानसभेमध्ये ज्या चौकटीमध्ये हा कायदा पारित झालेला आहे. त्या चौकटीच्या बाहेर जाऊन काही करता येणार नाही याची मला जाणीव आहे. मला या सगळया प्रक्रियेची माहिती आहे. परंतु ही गोष्ट सुध्दा जाणून घेणे गरजेची वाटते. देशासमोर, समाजासमोर आणि या सगळया घटकांसमोर हेही जाणे महत्वाचे आहे. हे सगळे काय होऊ घातलेले आहे. निवडणूक डोळयासमोर ठेवून हे होऊ घातलेले आहे काय असा काही लोकांचा चुकीचा समज आहे. राजकारण गृहीत धरुन अशा प्रकारे काही करण्याचा प्रयत्न केला असता तर आम्ही विधेयक आणण्याचा प्रयत्न केलाच नसता. लोक काय बोलतील, सगळे लोक अंगावर येतील, काय होईल. आमची जबाबदारी आहे. महाराष्ट्राच्या जनतेच्या हातून 1995 या वर्षी एक चूक झाली. ती चूक राज्यातील जनता आतापर्यंत भोगत आहे. कदाचित लोकांना असे वाटले असेल की, आमचा गणपती दूध पितो. त्यामुळे तसा काही तरी कायदा येईल असे अपेक्षित होते. म्हणजे दुसऱ्या गणपतीने दुसरा काही प्रकार केला असता तर त्या अनुषंगाने कायदा झाला असता. मी कोणाच्या भावनांशी खेळत नाही. ते माझे काम नाही. मी हिंदू आहे आणि त्याचा मला अभिमान आहे. परंतु हिंदुचे सर्टिफिकेट मला श्री.तोगडिया यांच्याकडून घ्यावे लागत नाही. हिंदू असल्याचे सर्टिफिकेट मला श्री.अडवाणी यांचेकडून घ्यावे लागत नाही. मला हिंदू असल्याचे सर्टिफिकेट पलीकडच्या

2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप....

लोकांकडून घेण्याची गरज नाही. मी हिंदु आहे आणि हिंदूची जी संकल्पना आहे, हिंदूचा जो अर्थ संपूर्ण जगाला माहिती आहे, तो मी हिंदू आहे. तो सहिष्णू हिंदू मी आहे. दुसऱ्याच्या धर्मावर, दुसऱ्याच्या जातीवर आघात करुन माझा धर्म किती तरी श्रेष्ठ आहे असे सांगण्याचा प्रयत्न मी करणार नाही. आम्ही हिंदुत्वाच्या गोष्टी करतो.

सभापती महोदय, मला एक गोष्ट कळत नाही की, छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळे यांनी लावावयाचे. मी अनेक वेळा या ठिकाणी सांगितले आहे की, आज तो चर्चेचा विषय नाही.

श्री.रामदास कदम : अरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाचे काय झाले ?

श्री. भाई जगताप : अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय स्मारक होणार आहे. त्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचा खरा इतिहास आम्ही जगाला दाखविणार आहोत. छत्रपतींचा योध्दा म्हणून खरा पराक्रम जनतेला दाखविण्याचा प्रयत्न करणार आहोत. छत्रपती शिवाजी महाराजांनी अफझलखानाचा कोथळा बाहेर काढला म्हणून अनेक गोष्टी सांगितल्या जातात. परंतु छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रतापगडाच्या पायथ्याशी अतिशय सन्मानाने अफझलखानची कबर बांधलेली आहे. त्यांनी त्यावेळी त्या समाजाचा भावनांचा आदर केला. हा इतिहास सांगण्याचा कोण प्रयत्न करतो काय ?

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SGB/ D/ KTG/ ST/ 19:55

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना माहिती नसेल, छत्रपती शिवाजी महाराज यांनी अफझलखानाचा कोथळा बाहेर काढला, त्या प्रतापगडाच्या पायथ्याशी त्यांची समाधी बांधली आहे. त्यातून एक वेगळा संदेश जावा हा प्रामाणिक हेतू होता. त्या समाधीच्या शेजारी महाराष्ट्र शासनाने 10 हजार चौ.फूट अनधिकृत बांधकाम केले आहे. त्या बांधकामाच्या ठिकाणी काय काय चालले आहे हे एकदा बघून या. संबंधित लोक हायकोर्टात गेले, हायकोर्टाने ताबडतोब बांधकाम पाडून टाकण्याचे आदेश दिले. त्यानंतर महाराष्ट्र शासन सर्वोच्च न्यायालयात गेले, सर्वोच्च न्यायालयाने देखील बांधकाम पाडून टाकण्याचे आदेश दिले. तरी देखील छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान करुन त्या ठिकाणी मदरसा सुरु आहे. अफझलखानाचा उल्लेख केला म्हणून मला हे बोलावे लागले.

सभापती महोदय, कधी कधी आम्हाला प्रश्न पडतो की, हे शासन कोणाची अवलाद आहे. अफझलखानाची अवलाद आहे का? सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिल्यानंतर देखील अफझलखानाच्या कबरीशेजारील अनधिकृत बांधकाम पाडत नसतील तर काय म्हणावे? आम्ही अरबी समुद्रात शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभे करणार ही घोषणा करुन दहा वर्षे झाली आहेत. फक्त आश्वासने द्यायची, भाषणे करायची हेच चालू आहे.

**तालिका सभापती** (श्री.रमेश शेंडगे) : माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांच्या हरकतीच्या मुद्याची नोंद झालेली आहे. माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री.भाई जगताप : माझ्या सगळ्या सहकाऱ्यांना माझी विनंती आहे की, आपण छत्रपतींच्या खऱ्याखुऱ्या इतिहासाबद्दल बोलत आहोत. त्यामुळे छत्रपतींच्या पुतळ्याच्या आधारे, त्यांची तसबीर लावून ज्यांनी आयुष्यभर राजकारण केले त्यांना त्याचा त्रास होणे क्रमप्राप्त आहे. हे जर असेल तर आदरणीय बाळासाहेबांबद्दल आदर ठेवून एक माझा साधा प्रश्न आहे. विषयांतर झाले म्हणून त्याचा उल्लेख करतो. छत्रपतींचा पुतळा सेनाभवनामध्ये एवढासा आणि छत्रपतींच्या डोक्यावर बाळासाहेब एवढे. काय आदर आहे? क्या बात है. वाह...वाह...वाह..वाह....छत्रपतींचा केवढा आदर. त्यामुळे या बाबतीत आम्हाला कोणी सांगण्याचा प्रयत्न करु नये......(अडथळा)....या बाबतीत आमची चर्चेची तयारी आहे. या बाबतीत सगळ्या गोष्टीची आमची तयारी आहे. छत्रपतींचे नाव वापरुन साडेचार वर्षे महाराष्ट्राच्या जनतेला तुम्ही एकदा मूर्ख बनविले. वारंवार तुम्ही बनवू शकणार नाही. आमची अक्कल काढण्याएवढी तुमची अक्कल खचितच नाही. त्यामुळे

..2..

श्री.भाई जगताप......

आम्हाला अकलेचे डोस पाजण्यापूर्वी स्वत:ची अक्कल कुठे गहाण ठेवली का याचा पहिला शोध लावा. नंतर आमच्याजवळ चर्चेला तयार व्हा. सभापती महोदय, या ठिकाणी मला नम्रपणे सांगावेसे वाटते की, गेल्या दोन तासातील संपूर्ण भाषण आपण काढून पहा, ते पडताळून पहा. त्यात बिलासंबंधी किती बोलले गेले आहे आणि इतर विषयावर किती बोलले गेले आहे हे आपण तपासून पहा. छत्रपतींचा विषय येण्याचे कारण म्हणजे त्यांनी अरबी समुद्राचा उल्लेख केला. म्हणून मी या ठिकाणी त्याचा उल्लेख केला. अरबी समुद्रामध्ये छत्रपतींचा पुतळा उभारला जाणार आहे. खऱ्याखुऱ्या इतिहासाची जगाला आम्ही माहिती देणार आहोत. छत्रपती शिवाजी महाराज खऱ्या अर्थाने कशा प्रकारचे योध्दा होते हे आम्ही जगाला आणि महाराष्ट्राला दाखविणार आहोत. त्यामुळे आपल्याला त्याची चिंता करण्याचे कारण नाही. छत्रपतींचा पुतळा ज्या ठिकाणी सांगितला गेला आहे त्या ठिकाणी उभा केला जाईल, त्याबद्दल चिंता करण्याचे कारण नाही.

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्यासाठी उभे असतात)

**तालिका सभापती** : सभागृहाचे कामकाज रात्री 8.00 वाजेपर्यंत चालविण्याचा निर्णय झालेला आहे. सभागृहाच्या कामकाजाची वेळ वाढवायची असेल तर तसे सभागृहाने स्पष्ट करावे. माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना आणखी किती वेळ लागणार आहे.

नंतर 4 एल.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मी अजून 1.00 तास बोलणार आहे.

**तालिका सभापती (श्री. रमेश शेंडगे)** : सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना ऑन लेग ठेवायचे काय ?

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना ऑन लेग ठेवावे. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी जे वक्तव्य केले आहे त्यावर विरोधी पक्षातील फक्त एका सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी दिली तर हा विषय तेथेच संपेल.

**तालिका सभापती** : माझ्या माहिती प्रमाणे त्यांनी शब्द कामकाजातून काढून टाकण्याची विनंती केली आहे. तो तपासून बघू व तो काढून टाकण्याजोगा असेल तर सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकण्यात येईल.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत असून मंगळवार, दिनांक 17 डिसेंबर 2013 रोजी सकाळी 10.00 वाजता विशेष बैठक भरेल. या विशेष बैठकीमध्ये सकाळी 10.00 ते 11.55 वाजेपर्यंत लक्षवेधी सूचना घेण्यात येतील. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक रात्री 8.00 वाजून 1 मिनिटांनी मंगळवार, दिनांक 17 डिसेंबर 2013 रोजीच्या सकाळी 10.00 वाजे पर्यंत स्थगित झाली.)

.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही